भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
राष्ट्रीय पुस्तकालय, कलकत्ता ।
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

वर्ग संख्या
Class No. Mat 891.461

पुस्तक संख्या
Book No. V3759 V.1

रा० पु०/ N. L. 38.

MGIPC—S4—9 LNL/66—13-12-66—1,50,000.

# वामनी ग्रंथ.

[redacted]न पंडितांच्या सर्व उपलब्ध

ग्रंथांचा संग्रह.

भाग पहिला.

# यथार्थदीपिका.

अध्याय १-१०.

([illegible] आक्टाप्रमाणें सर्व हक्क प्रकाशकांनीं राखिले आहेत.)

वामनी ग्रंथ, भाग पहिला.

# यथार्थदीपिका.

अध्याय १-१०.

भगवद्गीतेवरील विस्तृत टीका हस्तलिखित प्रतींवरून

बाळाजी आणि कंपनी

यांनीं शुद्ध करून प्रसिद्ध केली.

केली श्रीगीतेची व्याख्या बहु भक्ति जींत गाजविली ।
गाजविली साधुसभा भाषाकविकवनशक्ति लाजविली ॥
मोरोपंत.

१८९१

किंमत २४ रुपये.

मुंबईत,

" इंडिअन प्रिंटिंग प्रेस " छा. छापविली.

# वामनपंडितस्तुति.

श्रीपतिभक्तोत्तम जो गावा तद्रूप वामनस्वामी ।
ज्या होउनि लब्ध म्हणे त्यजिन श्रीकृष्णनाम न स्वामी ॥ १ ॥
सुगुण श्रीहरि· क्त ख्यात ज्ञाल्या जनांत हा शुकसा ।
बहुजन्मसिद्ध ·सा साधिल सुपक्क योग आशु कसा ॥ २ ॥
काम न वामन चित्तीं मोक्षाचा कृष्णभक्तिवांचून ।
भगवद्भजनाचि केलें अनुदिन किमपि न तदन्य वांचून ॥ ३ ॥
रिचीं बहु रचिलीं देती जीं हर्ष नित्य नव चरितें ।
भक्तिर· चरित यत्कवन जयांत एक न वच रितें ॥ ४ ॥
केली श्री· ी व्याख्या बहु भक्ति जींत गाजविली ।
लाजविलं· प्रभुसभा भाषाकविकवनशक्ति लाजविली ॥ ५ ॥
रीति समश्लोकीची अतुला साधिल काय भव्यास ।
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास ॥ ६ ॥
श्रोटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला ॥ ७ ॥
ज्याच्या सद्रससभरवें कवनें तो नाचलाचि नाकर्षी ।
हरिजन हरिजनहृदया जैसा चुंबक अयास आकर्षी ॥ ८ ॥
अन्यत्र ना· कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं ।
ली भाषाकवि जे त्यांची तों गर्वहानि यमकांहीं ॥ ९ ॥
भवि भगवान् सुयशें देउनि वर वामना सदा साचा ।
हरितो प्रसाद येतां प्रेमा वरवा मनास दासाचा ॥ १० ॥
श्रमन वामन साक्षात् तरिच असा हा महातपा वेधी ।
बहु दुःख हरिदासांची ज्याच्या कृतिनें पहात पावे धी ॥ ११ ॥

िवना ।
निवतोचि वामनाच्या मानुनि भगवंत वा मना क ाकवना ॥ १२ ॥
न ।शिरे गुरुशीं हरिशीं चित्तांत असोनि वाम न यास ।
भक्त मयूरें स्तविला वामन हा मन विशुद्ध होर ३ ॥
पंक प्रक्षालाया प्रार्थावें प्रथम पूत तोयास ॥ १

मोरोपंत

---

# यथार्थदीपिका.

## भाग पहिला

## अनुक्रमणिका.


| अध्याय | विषय | मूळश्लोकसंख्या | ओंवी संख्या | प्रमाणार्थ श्रुति इ० | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जुनविषाद-योग | ४७ | ३८८ | १३ | १ |
| २ | सांख्ययोग | ७२ | १७०३ | २२ | २६ |
| ३ | कर्मयोग | ४३ | ९४७ | १४ | १२० |
| ४ | कर्मब्रह्मार्पण-योग | ४२ | १४३९ | १६ | १७४ |
| ५ | कर्मसंन्यास-योग | २९ | ९५१ | १६ | २५५ |
| ६ | आत्मसंयम-योग | ४७ | ११९६ | १७ | ३१० |
| ७ | ज्ञानविज्ञान-योग | ३० | ११८६ | १२ | ३७७ |
| ८ | अक्षरब्रह्मयोग | २८ | १२०१ | १२ | ४४२ |
| ९ | राजविद्याराज-गुह्ययोग | ३४ | १८२५ | २० | ५०९ |
| १० | विभूतियोग | ४२ | ९१० | ३ | ६१४ |
| | | ४१४ | ११७४६ | १४५ | |

श्रीः

# वामन पंडितांचें चरित्र.

बहुतेक साधुसंतांचीं चरित्रें महीपतिबोवांनीं लिहून ठेविलीं आहेत, तसें वामनाचें एकादें चरित्र त्यांनीं किंवा अन्य कोणीं लिहून ठेविलें नाहीं, याचें पुष्कळांस नवल वाटतें. वामन पंडित ह्मणजे सामान्य हरिभक्त होते असें नाहीं. ते निःसीम भक्त असून भक्तीचें व आत्मज्ञानाचें लग्न त्यांनींच पहिल्यानें लावून दिलें हें सांगायासच नको. त्यांच्या सर्व ग्रंथांत तत्त्वज्ञांस जशी हरिभक्तीची अत्यंत आवश्यकता. प्रतिपादन केलेली पदोपदीं दृष्टीस पडते, तशी अन्य ग्रंथांत नाहीं. ते प्रेमळ जीवन्मुक्त हरिभक्त होते, परंतु त्यांच्या हातून एकही अद्भुत चमत्कार झाला नाहीं, ह्मणूनच जर त्यांला साधुमालिकेंत ओंविलें नसेल तर कोण जाणे! किंवा ते सत्यप्रिय व निस्पृह असल्या कारणानें त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर टीका करतेवेळीं कित्येक शब्दांचा अर्थ अन्य टीकाकारांस समजला नाहीं असें स्पष्ट सांगितल्याबद्दल इतर टीकाकारांच्या अनुयायांचा त्यांवर रोष झाला असावा, व ते संतमालिकेंत ओवण्याजोगे साधु नव्हत, यास्तव त्यांस त्या चरित्रांच्या हद्दपार करावें असें त्यांनीं मनांत आणिलें असावें.

वामन पंडितांचें जन्म शके १६४० च्या सुमारास झालें असावें. यां-

---

१. रामदास स्वामी व वामन पंडित समकालीन हें निर्विवाद आहे. दासांपेक्षां वामन ९–१० वर्षांनीं लहान असावेत. शास्त्राध्ययनासाठीं काशीस जातांना पंडित आपले पत्नीस समागमें घेऊन गेले असें चौबळकृत रामदासाच्या चरित्रांत लिहिलें आहे, व बारा वर्षें काशींत राहून शास्त्राध्ययनादि करून पंडित स्वदेशास परत येत असतां बरोबर त्यांची पत्नी गिराबाई होती, असें गोवर्धनदास यांणीं छापलेल्या रामदासांच्या बखरींत सांपडतें. यावरून महायात्रेस जाण्याच्या पूर्वीं त्यांचें लग्न झालें होतें असें ठरतें. गिराबाई जर अल्पवयी असती तर ते तिला समागमें घेऊन जाण्यास धजलेच नसते. ती त्या वेळीं निदान १४–१५ वर्षांची व पंडित सुमारें १७–१८ वर्षांच्या वयाचे असावेत. पुढें ते काशींत १२ वर्षें राहिले, असलें ह्मणजे ज्या वेळीं ते स्वदेशास परत आले त्या वेळीं त्यांचें वय ३०–३१ वर्षांचें असावें. पंडित आले तेव्हां तुकाराम बोवा हयात होते. कारण रामदास

च्या तीर्थरूपाचें नांव नृहरि पंडित, हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण सातारा जिल्ह्यांत कोरेगांव कुमठें ह्मणून आहे, तेथले ज्योतिषी असून मध्वसंप्रदायी होते.यांचें गोत्र शांडिल्य व कुलदेव नृसिंह. यांच्या आईचें नांव लक्ष्मीबाई. ही गुणांनीं केवळ लक्ष्मीच होती असें वामन पंडित स्वतः सांगतात. तेव्हां वामन पंडितांचें बाल्यावस्थेंत लालनपालनादि उत्तम प्रकारें झालें असावें. लाडानें वाढविल्यावर मुलाचे सुखसोहळे पहाण्याची जी मातुश्रीला स्वभावतः हौस असते ती पुरविण्यासाठीं तिणें व्रतबंध व गिराबाईशीं त्यांचा विवाहही लहानपणींच करविला असावा.

बाप पंडित होता व वामन पंडित तीक्ष्णबुद्धीचे असल्यामुळें लहानपणीं जो त्यांचा वेदाध्ययनाचा व संस्कृताचा अभ्यास व्हावयाचा तो यथायोग्य झाला असावा आणि त्यावरूनच त्यांस शास्त्राध्ययनाची अभिरुचि उत्पन्न झाली असावी. पुढें वामनाचीं मातापितरें निवर्तलीं असावीं असें वाटतें. असें झालें नसतें तर काशीस जातांना पंडितांला पत्नीस बरोबर घेऊन जाणें अगत्य पडलें नसतें. स्त्री ही एक विद्याभ्यासास मोठी आडकाठी;तिला गांवीं ठेवायाची सोय असती तर जाणूनबुजून त्यांनीं तिला संगातीं नेलें नसतें. शास्त्राध्ययनाच्या अभिरुचीनें त्यांच्या मनांत विद्यासाधनाचें माहेर-घर जें महाक्षेत्र काशी तेथें जाण्याची उत्कट इच्छा उत्पन्न केली व त्यामुळें घरच्या जिनगीची व्यवस्था लावून आपले पत्नीसह ते काशीयात्रेस गेले.

हें प्रयाण पंडितांच्या तारुण्यांतच झालें असावें, यांत संशय नाहीं. बायकोस बरोबर घेऊन जाणें केवळ ज्वानींत आलेल्या पुरुषापासूनच

---

प्रथमच पंढरपुरास गेले, त्या दिवशीं तुकाराम बोवांचें कीर्तन झालें; व दुसऱ्या दिवशीं रामदासांचें झालें. या दोन्हीं कीर्तनांस वामन पंडित व दुसरी संतमंडळी हजर होती, असें महीपति लिहितो. ( संतवि० अ० १०.)

ही गोष्ट १६७१ च्या आषाढांत झाली ( चौ० रा० च० पु० १६९-१८ ) फाल्गुनांत तुकाराम गुप्त झाले. याच वर्षी वामन पंडित स्वदेशास परत आले असावे. हें अनुमान खरें असल्यास त्यांचें वय या वेळीं ३१ वर्षांचें ठरतें. यावि-रून त्यांचें जन्म शके १५४० त झालें असावें अशी अटकळ निघते.

१. ताताभिधा नृहरिपंडित माय लक्ष्मी, जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी ।
शांडिल्य गोत्र कुलदेव नृसिंह ज्याचा, दासानुदास निजवामन हो अजाचा ॥१॥

भीष्मप्रतिज्ञा.

होईल; बाल्यावस्थेंत व्हावयाचें नाहीं. शिवाय तेव्हांची महायात्रा आतांच्या महायात्रेसारिखी नव्हती. मार्गांत पुष्कळ अडचणी येत होत्या व भयंकर प्रसंग गुदरण्याची त्या वेळीं भीति होती. हे विचार मनांत आले म्हणजे पंडितांचें वय तेव्हां १८ वर्षांचें तरी असावें असें वाटतें.

पुढें बारा वर्षें काशींत राहून त्यांनीं शास्त्राध्ययन केलें. ग्रंथावलोकनानें त्यांच्या बुद्धीचा प्रभाव वाढला. मोठमोठ्या पंडितांशीं वादविवादांचे त्यांना प्रसंग येऊं लागले. त्यांत त्यांना यश येत चाललें व चहूंकडे त्यांची कीर्ति पसरली.

ज्या महापंडितांपाशीं ते विद्याभ्यास करीत होते त्यांच्या कानांवर हा सुकीर्तिघोष आला. त्यांना त्याचा फार आनंद होऊन वामनांच्या वादशक्तीचें प्रमाण काढावें अशा हेतूनें एक दिवस स्वतः त्यांनीं-च त्यांशीं सहजरीत्या वादास आरंभ केला. तेथेंही पंडितांस यश आलें. गुरूजीनीं या गोष्टीचा संतोष मानून 'पुत्रादेच्छे पराजयं शिष्यादेच्छे पराजयं' असें म्हणून वामनांचें गौरव केलें. नंतर गुरूची आज्ञा घेऊन पंडित जन्मभूमीस यावयास निघाले, त्या समयीं क्षेत्रवासी पंडितांनीं सभा करून त्यांस मानपत्रें दिलीं.

बरोबर गिराबाई, एक दोन शागीर्द व उंटावर लादून कांहीं दुर्मिळ शास्त्रीय ग्रंथ घेऊन पंडितांची स्वारी महाक्षेत्रांतून निघाली ती देशोदेशीं दिग्विजय करीत करीत व मानपत्रें घेत घेत सुरक्षित इंद्रायणीच्या तीरीं अलकावतीस येऊन थडकली. ते येथें पोंचायाच्या पूर्वीच त्यांच्या दिग्विजयाची बातमी सर्व दक्षिणभर पसरली होती. जेथें तेथें त्यांच्या विद्वत्तेची व वादशक्तीची तारीफ होऊं लागली होती. तेणेंकरून कांहीं क्षेत्राभिमानी नामधारी शास्त्रीबोवांस व कांहीं दुराग्रही ब्राह्मणांस त्यांच्या आगमनाची दहशत पडली असें वाटतें.

या समयीं सर्व महाराष्ट्र देशांत वामन पंडितांच्या जोडीचा त्यांशीं वाद करण्यासारिखा एकही महापंडित नव्हता असें दिसतें. तो काळच तसा होता. देशभर मोंगलाई माजली होती, तिची जरी मोडकळीची वेळा समीप येऊन महाराष्ट्र पादशाहीच्या पायाची सुरवात झाली होती तरी शेंकडों वर्षें मुसलमानांपासून झालेल्या धर्मोच्छेदाचा परिणाम दक्षिणेंत एवढा गाजला होता कीं, सर्व शास्त्रांस व त्यांच्या अनुयायी पंडितमंडळीस महायात्रेचीच वाट धरावी लागली होती. राजदरबारीं, न्याय-

मंदिरीं, अथवा धर्मसमाजांत धर्माधर्मकर्माकर्मनिर्णयप्रसंगीं पंडितांची जरूरी लागायाची, परंतु राज्यक्रांतीमुळें तशीं स्थानें देशांत राहिलीं नव्हतीं; मग पंडितमंडळीला विचारतो कोण? दरवडे, मारामारी, हाणाहाणी, धर्मच्छल इत्यादि गोष्टी जारीनें सुरू होत्या. केव्हां कसा प्रसंग येईल याचा नियम राहिला नव्हता. महाराष्ट्रियांच्या मनाची शांतता अगदीं उडून जाऊन हतवीर्य झालेल्या मानवी प्राण्यांचा जो शेवटला उपाय, ह्मणजे हातपाय गाळून सर्व भरिभार ईश्वरावर टाकून स्वस्थ बसायाचें, त्या थरास त्यांची स्थिति येऊन पोंचली होती. अशा उदास वृत्तीमुळें कांहीं दिवसांपासून ऱ्हीकडे साधुमंडळ बरेंच उदयास येत चाललें होतें. लोकांचीं मनें या साधुमंडळीनें आकर्षित केलींच होतीं; तथापि त्यांच्या अद्भुत चमत्कारांनीं धर्माचा कायमचा पगडा जेवढा लोकांच्या मनावर बसवून दिला, तसा अन्य कोणत्याच उपायांनीं बसला नसता. त्यांचा विश्वास धर्मावर व धर्मानुयायांवर एवढा बसला कीं, ते त्यांसाठीं प्राण द्यायास मागें पुढें पहात नाहींसारखे झाले व नवी मराठी पादशाही स्थापणाऱ्या दूरदर्शी शिवाजी महाराजांच्या उद्योगास व त्यांच्या गुरुदत्त भगव्या झेंड्यास जें कांहीं एकसारखें यश येत गेलें, त्याचा बराच भाग या धर्मश्रद्धेचें फल नव्हे असें कोणी मराठा ह्मणेल असें आह्मांस वाटत नाहीं.

अशा समयीं इंद्रायणीच्या तीरीं ज्ञानेश्वराच्या आळंदीस ह्मणजे ज्या क्षेत्रास पूर्वी वेदांतविषयाचें आदिस्थान असें मानीत असत, तेथें येऊन पोंचलेल्या वामन पंडितांशीं वाद करून क्षेत्राचें नांव राखतो कोण? असें क्षेत्राभिमानी ब्राह्मणांस मोठें संकट पडलें असावें, आणि देशांत पंडित नाहींत याविषयींचा खरा प्रकार वामनास सांगून पुढें महाराष्ट्र-देश ह्मणजे त्यांची जन्मभूमि तेथें वाद करून मानपत्र घेण्याचा आग्रह न धरण्याविषयीं त्यांचें अभिवचन घेऊन या संकटाचें निवारण केलें असावें; किंवा दुरभिमान धरून क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं या संकटाच्या निवारणार्थ गोवर्धनदास यांणीं प्रसिद्ध केलेल्या रामदासाच्या बखरींतील वामन चरित्रासंबंधी ब्रह्मराक्षसाच्या आख्यायिकेचा उपयोग केला असावा.

---

१. ही आख्यायिका दोन प्रकारांनीं सांगितली आहे. भरतखंडाचा अर्वाचीन कोश याचे कर्ते कविचरित्राच्या आधारानें व वृद्धमाहितीवरून ही गोष्ट काशींत घडली असें सांगतात, व हनुमंत स्वामींनीं शके १७१९ त सांगितलेलें समर्थांचें चरित्र जें हल्लीं रामदासांची बखर या नांवानें गोवर्धनदास यांणीं प्रसिद्ध

त्यांनीं आपल्या मतें ही एक उत्कृष्ट युक्ति शोधून काढिली आणि एका धूर्त व वाचस्पति ब्राह्मणास ती पढवून वामनपंडितांकडे पाठविलें असावें.

स्नानसंध्यादि नित्यकर्में आटपून भोजनोत्तर पंडित चार आळंदीकर ब्राह्मणांशीं गोष्टी बोलत बसले आहेत इतक्यांत हा ब्राह्मण तेथें आला. नमस्कारादि शिष्टाचार झाल्यावर या ब्राह्मणानें 'मला कांहीं आपल्याशीं एकांतीं बोलावयाचें आहे' अशी पंडितांपाशीं विनंती केली. पंडित आदरातिथ्यांत निष्णात व निर्मलांतःकरणाचे त्यांनीं जवळ असलेल्या सर्व मंडळीस दूर करून त्यास 'बोला' ह्मणून सांगितलें. तेव्हां तो ब्राह्मण ह्मणाला "महाराज! मी ब्रह्मराक्षस आहें ज्या अश्वत्थ वृक्षावर मीं

केलें आहे त्यांत, काव्येतिहासांतील वामन चरित्रांत व अन्य जुनाट लेखांत ही गोष्ट आळंदीसच घडली असें आहे. शिवाय त्यावेळीं षड्दर्शनादि पढून पंडित व्हायाचीं साधनेंही दक्षिणेंत नसतां वामन पंडित येथून तयार होऊन काशीपर्यंत जयपत्रें घेत गेले असें ह्मणणें असंभाव्य होतें; यास्तव वरील सर्व ग्रंथांत जुना ग्रंथ ह्मटला ह्मणजे हनुमंत स्वामिकृत समर्थांचें चरित्र, हाच अधिक विश्वसनीय असावयाचा, ह्मणून आह्मीं हें चरित्र लिहितांना फार करून त्याचाच आधार धरून लिहिलें आहे.

१. मूळ गोष्ट श्री रामदासाची ब॰ आ॰ २ री पान २९१ वर दिली आहे तींत ब्रह्मराक्षस मानवी देह धारण करून पंडितांजवळ त्यांच्या जागेचा कांहीं दिवस उपभोग घेण्यासाठीं त्यांची परवानगी मागायास आला असें सांगितलें आहे. आह्मीं त्याच गोष्टींबल्या ब्रह्मराक्षसाचें आमच्या मतें जें खरें रूप तेंच प्रगट केलें आहे, याशिवाय आणखी कसलाच फेरफार केला नाहीं. याविषयीं आह्मांस कोणी शब्द लावूं शकणार नाहीं. कारण जर देहरहित ह्मणजे सूक्ष्मदेही पिशाचयोनि ह्मणजे पापयोनि केवळ वासनात्मक जीव याला, सर्वांत उत्तम व श्रेष्ठ जो मनुष्यदेह तो हवा तेव्हां धारण करून या जगांत वर्तन करितां आलें, तर मग पिशाचयोनि ही पापयोनि नव्हेच. ती मनुष्ययोनी-पेक्षांही श्रेष्ठ मानिली पाहिजे. कारण पिशाचांस मनुष्यदेह धारण करितां येतो इतकेंच नव्हे, तर मनुष्ययोनीस जें त्रिकाल ज्ञान दिलें नाहीं तें त्यांस विशेष असल्याकारणानें ऐहिक व पारमार्थिक सुखाचें साधन त्यांना अत्यंत सुलभ झालें असतें. अर्थात् सृष्टिनियमाप्रमाणें ब्रह्मराक्षसास मनुष्यदेह धारण करितां येत नाहीं हेंच सिद्ध. दुसरें, गोलकांशिवाय इंद्रियांस आपापलीं कर्में करितां येत नाहींत व सूक्ष्मदेहास गोलकें नाहींत, सबब ब्रह्मराक्षसास बोलतांही येणार नाहीं, हेंही सिद्धच आहे.

रहात होतों, तो वृक्ष विच्छिन्न झाला. मला राहण्यास स्थळ नाहींसें झालें आहे. या इंद्रायणीच्या तीरीं एक अश्वत्थ वृक्ष आहे त्यास तीन खांद्या आहेत. दोहोंवर दुसरे दोघे ब्रह्मराक्षस राहतात व तिसरी रिकामी आहे, तीवर माझें रहावयाचें स्थान करावें म्हणून मी तेथें गेलों तेव्हां ते दोघे-ही ब्रह्मराक्षस म्हणाले कीं, हें स्थान तुम्हांला मिळावयाचें नाहीं. याची योजना एका महापंडिताकडे झाली आहे. ते कोण म्हणाल तर जे परवांचे दिवशीं येथें येऊन उतरले आहेत ते वामन पंडित. त्यांची जर तुम्हीं परवानगी आणाल तर ह्या स्थानाचा उपभोग घेण्यास आम्हांकडून तुम्हांस मनाई व्हावयाची नाहीं. त्यांच्या या भाषणावरून मी आपली परवानगी मागायास आलों आहें. आपण जें कर्म हल्लीं करितां तेंच कर्म मागें आम्हीं करीत होतों. त्याचमुळें ही योनि आम्हांस प्राप्त झाली. ही पापयोनि तर खरीच परंतु त्रिकालज्ञान या योनींत आहे. या क्षेत्रांत तर आपण विजयी व्हालच, परंतु स्थानासाठीं आम्हांस मात्र भिक्षाटणास पाठवाल ! असो. परंतु जर आपणास ही पापयोनि चुकवायाची असेल तर साधुसमागम धरा, मस्तक ठेंगणा करा व ह्या आपल्या अफाट विद्येचा सद्यः असलेल्या व पुढें होणाऱ्या असंख्य महाराष्ट्र जनांच्या नित्यसुखा-साठीं सदुपयोग करा. हीच माझी आपल्यापाशीं विनंती आहे. "

वादरीतींत निष्णात पंडितांनीं हें युक्तिशास्त्र शांतपणें ऐकून घेऊन त्यास म्हटलें कीं– 'तुम्हांसारिखा सत्पथोपदेशक ब्रह्मराक्षस मी आजच पाहिला, आम्हांवर हा तुमचा अनुग्रहच म्हणायाचा! म्हणून आम्हासाठीं नेमलेल्या स्थलाचें मी तुम्हांस गुरुदक्षणेदाखल अर्पण करितों. तुम्हीं तेथें आनंदानें आचंद्रार्क वास करावा.'

वेदशास्त्रपारंगत असून देशपर्यटनानें व भिन्नभिन्न स्वभावाच्या पुरुषां-च्या संघट्टनानें ज्या पंडितांची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण झालेली त्यांना जर या वेषधारी ब्रह्मराक्षसाच्या कपटाचें परीक्षण झालें नाहीं, किंवा त्याच्या युक्तिशास्त्राचें इंगित समजलें नाहीं तर तें दुसरे कोणास समजायाचें बरें ? महापंडितांनीं कोठें असल्या पिशाचयोनीची परवा केलेली कोणीं ऐकिली आहे काय ? परशुरामाचे वेळीं जशी पृथ्वी निःक्षत्रिय झाली होती, तसाच या राज्यक्रांतीच्या समयास महाराष्ट्रदेश निःपंडित झाला आहे, असें तेव्हांच त्यांच्या लक्ष्यांत आलें असावें, व ते तेथून निघून आपल्या गांवीं गेले असावे.

या समयास देहूस तुकारामबोवा, कृष्णातीरीं चाफळखोऱ्यांत राजगुरु रामदासस्वामी, वडगांवीं जयरामस्वामी, वारणातीरीं बाळस्वामी, ब्रह्मनाळ्यास रघुनाथस्वामी, निगडींत रंगनाथस्वामी व त्यांचे बंधु आत्यास्वामी, आनंदमूर्ती, पाटगांवांस मानी बोवा, त्र्यंबक नारायणाश्रम बोवा, संगमेश्वरीं अचलपुरी गोसावी, धामणगांवांत बोधले बोवा, भागानगरास केशवस्वामी, पोलादपुरीं परमानंद बोवा, चिंचवडास मोरया देव धरणीधर, पैठणास निंबराज, अनंतसिद्ध व चांभारगोंद्यास शेक महंमद अशी बरीच संतमंडळी उदयास येऊन त्यांचा कीर्तिसूर्य ऐन मध्यान्हीं आला होता. राजापासून रंकापर्यंत या साधूंचे अंकित झाले होते. कोणाच्या पंक्तीस बसून विठोबारखुमाई जेवलीं, तर कोणाचे घरीं गणपतीनें मोदकांचा फराळ केला. कोणी नदीप्रवाहांत गुप्त होऊन सात दिवसांनीं बाहेर पडला नाहीं, इतक्यांत कोणी मध्यान्हीं शिदासामग्री मिळाली नाहीं ह्मणून टोणगा मारून खाल्ला व त्यास जिवंत केलें. अशा अद्भुत चमत्कारांच्या बातम्या मोठमोठाल्या शहरांतून कांहीं दिवसांआड सर्वत्र पसरतच होत्या, त्या वामनपंडितांच्या एकांतवासी कोरेगांवच्या आश्रमद्वारावर जाऊन प्रहार करूं लागल्या. ते जेवढे विद्वान होते तेवढेच हरिभक्त होते. समता तशीच दया पंडितांमध्यें पूर्णपणें वास करीत होती. लहानपणापासून विष्णुभक्तीचा छंद असल्यावांचून पंडितलोकांचें अंतःकरण तिकडे वळणेंच कठीण. तेव्हां हे मूळचेच हरिभक्तिपरायण होते असें दिसतें. या अद्भुतचमत्कारांच्या गोष्टी ऐकून त्यांच्या मनांत असें आलें असावें कीं, ज्या देशांत शास्त्रज्ञांचा किंवा पंडितांचा एवढा अभाव, त्याच देशांत काय साधुजनांचें ऐश्वर्य हें ! तर यांची ईश्वरप्रीति आत्मप्रीतीपलीकडे असावी. योगज्ञान यांना करतलामलवत् असावें. यांना आत्मज्ञानाची कळ सांपडली असावी. काशीसारख्या पुण्यक्षेत्रांत, जेथें, तेत्तीस कोटि देवांचा मेळा पाप्यांस पुण्यवान् करण्यासाठीं सतत जागतो, जेथें विष्णुपदवाहिनी गंगा पातकी जनांचे पापमल धुण्यासाठीं रात्रंदिवस वाहत आहे, जेथें शास्त्रीय विषयांच्या कोटिक्रमांनीं महापंडितांचीं ज्ञानभांडारें वेढावून जातात, तेथें ज्या अमानुष साधूंचा दुष्काळ त्यांचाच स्वदेशीं केवढा सुकाळ हा !

बऱ्याच दिवसांपासून पंडितांचें लक्ष्य बौद्ध, जैन, शांकर, माध्व, वल्लभ, रामानुज इत्यादि मतांच्या सिद्धांतांच्या विचारांत गुंतलें होतें. पुढें शांकरमतच श्रुतिस्मृतीस अनुसरून आहे व इतर मतें भेदाश्रित आहेत असा यांचा

निश्चय झाला व तो श्रीमद्भागवतांतर्गत आत्मज्ञानानें दृढतर झाला. उप० निषदांच्या अर्थान्वयें ब्रह्मात्मैक्याविषयीं सच्चिदानंदब्रह्मलक्षण आत्म्याकडे कसें लागतें याचें मनन करितां करितां, सत्पदानें आत्मा ब्रह्मासारिखा कालत्रयीं विद्यमान आहे आणि चित्पदानें तो तसाच ज्ञानरूपही आहे, असें पंडितांच्या अनुभवास आलें; तथापि या दुःखमय सृष्टींत तो निरंतर आनंदरूप कसा असावा या शंकेचें निराकरण त्यांना होईना. ही शंका सद्गुरुवांचून दूर होणें कठीण असें जाणून या संतमंडळीचें दर्शन घेऊन होईल तर शंकेचें समाधान करून घ्यावें, असा हेतु धरून, पंडितांनीं पंढरपुरास जाण्याचा विचार केला असावा.

पंडितांची आपल्या पत्नीवर फार प्रीति होती. तशीच गिराबाईही पति-सेवेंत तत्पर असून पंडितांस सोडून एक दिवसही कोठें राहिली नाहीं. ती शहाणी होती व पतिप्रेम तिचें जीवन होतें. उभयतांचेही विचार एक असल्यामुळें संतमंडळीचा दर्शनलाभ घेण्याचा त्यांचा बेत ठरला व तीं उभयतां शके १५७१ च्या आषाढी एकादशीच्या उत्साहास श्रीपांडुरंगाच्या भेटीस निघून गेलीं.

याच वेळेस विठोबानें रामदासांस पंढरीस नेलें होतें व चालतांना रुतलेले त्यांच्या पायांतील कांटे काढिले होते. महीपतिबोवा संतविजयाच्या १० व्या अध्यायांत असें लिहितात कीं, पहिले दिवशीं वाळवंटांत तुकाराम बोवांचें फारच प्रेमळ कीर्त्तन झालें. दुसरे दिवशीं गरुडपारीं रामदासस्वामींचें रसभरित कीर्त्तन झालें. वामनस्वामी, निंबराजबोवा देउणकर, माणकोजी बोधला, जयराम गोसावी वडगांवकर, शेख महंमद चांभारगोंदेकर, रंगनाथस्वामी व आत्याबोवा निगडीकर वगैरे संतमंडळी

---

१. वामनी ग्रंथ भाग ४ था पृष्ठ १ निगमसार अ० १ ओंव्या ११–१६.

२. प्रियसुधा म्हणून पंडितांनीं जो ग्रंथ केला आहे तो त्यांहीं आपले पत्नीसाठींच केला. त्याच्या शेवटील पद्यांत ते असें म्हणतात:—

> प्रियसुधा उपदेश गिराप्रती, करुनि वामन तीस म्हणे सती ।
> परम आवडि आपुलि आपणा, वळख तूं शुभ टाकुनि मीपणा ॥ १८ ॥

वामनी ग्रंथ, भाग ३ रा, पृष्ठ ४१८.

३. चौबळकृत रामदास चरित्र आ० २ री, प्र० ४, पृष्ठ ११६; रामदासाची बखर पृष्ठ १८०; संतविजय अ० ९–१०.

या दोन्ही कीर्तनप्रसंगीं हजर होती. वामनपंडितांचें वर्णन त्यांनीं तुकारामाच्या कीर्त्तनप्रसंगीं असें केलें आहे–

वामनस्वामी चतुर पंडित । जो प्रेमळ आणि द्वेषरहित ।
यांणीं दशमस्कंध भागवत । केलें प्राकृत निजबुद्धी ॥ १६ ॥

व रामदास कीर्तनप्रसंगीं–

वामनस्वामी चतुर पंडित । जो वेदांतशास्त्रीं निपुण बहुत ।
त्याहीवरी प्रेमळ भक्त । कविता प्रख्यात जयाची ॥ ७३ ॥

येथें या संतमंडळीची व पंडितांची ही पहिल्यानेंच गांठ पडली. मागाहून त्यांकडून या 'प्रेमळ व द्वेषरहित भक्तास' आपापल्या उपास्यदेवतांच्या किंवा गुरूच्या पुण्यतिथीच्या उत्साहास आमंत्रणें येत असत व पंडितही त्यांचे तेथें जात असत असें दिसतें.

चाफळास, परळीस व रामघळींत रामदासांपाशीं पंडित कांहीं दिवस राहिले होते असें दिसतें. त्यांस या दिवसांत सच्चिदानंद या पदत्रयांतील 'आनंद' आत्म्यास सतत कोणत्या प्रकारें अनुभवितां येईल या विचाराचा निदिध्यास लागला होता असें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या समाधानार्थ पंडितांनीं रामदासस्वामींकडे विनंती केली असावी. त्यांच्या उत्तरानें किंवा स्पष्टीकरणानें पंडितांचें समाधान झालें नाहीं. त्यावरून वाद

१. चाफळखोऱ्यांत हनुमंतजयंतीस जे साधुसंत आले होते त्यांत पंडितांचेंही नांव आहे. संतवि० अ० १८ ओ० १७५. वडगांवास जयरामस्वामींच्या येथें जन्माष्टमीच्या उत्साहास पंडित हजर होते. संतवि० अ० २२ ओ० ४१. चाफळखोऱ्यांत रामनवमीच्या उत्साहास पंडित होतेः—

वामनस्वामी भक्त थोर, जो व्यास अवतार कलियुगीं. संतवि. अ. २२ ओ. ११७.

२. "सच्चिदानंद पदार्थाविषयींच कोणाही महापंडितास शंका येणें संभवनीय असून, वामनास दुसऱ्या पदार्थाविषयीं शंका आल्याचें त्याच्या ग्रंथावरून दिसत नाहीं. तेव्हां वरील चरित्रांत (काव्येतिहासांतील वामनचरित्रांत) जी एक शंका म्हणून मोघम लिहिलें आहे. ती सच्चिदानंदाविषयींच असावी असेंच मानिलें पाहिजे. जर वर लिहिलेली शंकासमाधानाची गोष्ट रामदासस्वामींच्या संबंधानें घडली हें खरें असतें तर, जेथें वामनानीं त्या गोष्टीचा विशेष विचार केला आहे, तेथें रामदासस्वामींचें नांव घालविण्यास त्याजवळ गुरुभक्ति कमी होती काय?" बाळकृष्ण मल्हार हंसकृत वामनचरित्र.

३. "स्वामींपाशीं चाफळास, परळीस व रामघळीस कांहीं दिवस राहून (वामनपंडित) ज्ञानपूर्ण निःसंशय झाले; आणि नेहमीं स्वामींनीं केलेल्या दासबोध

उपस्थित झाला असावा. वादांत पंडित विजयी झाल्यामुळें समर्थांस फार राग येऊन त्यांनीं रुद्ररूप धारण केलें. तेव्हां पंडितांनीं कंटाळून 'स्वामी! समस्या पूर्ण झाली.' असें ह्मटलें असावें. परंतु त्यांचा क्रोध शमन झाल्यावर त्यांनीं पुनः विचारल्यावरून वादविषयक शंकेची निवृत्ति झाली नाहीं असें पंडितांनीं स्पष्ट सांगितलें असावें; व त्यामुळें स्वामींचें मन दुखावलें

---

ग्रंथाचें पारायण करीत असतां सातवे दशकीं चौथे (येथें 'तिसरे' असें पाहिजे) समासीं चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं. यांपैकीं विचार पहातां चवदा स्थानीं ब्रह्मसंज्ञेविषयीं बहुतग्रंथीं दाखला मिळतो, परंतु उडविल्याचा दाखला कोणत्या ग्रंथीं दिसत नाहीं, हें पाहून स्वामीस विचारावयाचें तर सामर्थ्य नाहीं आणि निःसंदेह तर होत नाहीं, असा विचार करून स्वामींस समक्ष विनंती केली कीं, 'महाराज, ग्रंथाचें पारायण मी करितों आणि आपण त्याचा अर्थ स्वमुखें सांगावा.' समर्थांनीं 'बहुत बरें' असें ह्मणतांच पारायणास आरंभ करून सातवे दशकीं तिसरे समासीं पारायण आलें. त्या समयीं चवदा ब्रह्मांविषयीं प्रश्न वामनांनीं केला. त्या काळीं स्वामींनीं चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं. याप्रमाणें स्वामींनीं उडवावीं व वामनांनीं स्थापावीं, असें होत असतां वामनाचा निःसंशय होईना. तेव्हां समर्थ श्रीमारुतीरूपानें भुभुःकार करून शेपटाचा मोठा तडाखा देऊन 'बोल बोल' असें वामनांस ह्मणूं लागले. तों त्यांच्या त्या स्वरूपास पाहून वामन पंडित भयभीत होऊन 'स्वामी, माझी समस्या पूर्ण झाली.' असें बोलले. × × × नंतर स्वामींनीं पूर्वरूप धारण करून 'वामना, तुझी समस्या पूर्ण झाली कीं नाहीं?' असें पुसलें. वामनांनीं 'महाराज! नाहीं' असें उत्तर करितांच समर्थ बोलले 'अरे, पूर्वी समस्या पूर्ण झाली ह्मणून बोललास आणि आतां नाहीं कां ह्मणतोस?' तेव्हां 'स्वामी आपण आद्यरूप धारण केलें त्यावरोबर बोलायाचें सामर्थ्य कोणाचें आहे?' असें वामनांनीं उत्तर दिलें. तेव्हां स्वामी हास्य करून बोलले कीं, 'तुह्मी पंडित सर्व ग्रंथांचें अवलोकन करीत असून बरोबर उंटाचे उंट पुस्तकें बाळगून जयपत्रें घेत आलां आणि चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं हें कोणत्याही ग्रंथीं पाहिलें नाहीं असें ह्मणतां हें आश्चर्य वाटतें. असो. आतां बृहदारण्यांत चवदा ब्रह्मांची स्थापना करून उडविण्याचा प्रकारही आहे तो पहा—" राम० बखर पृष्ठ ३०१.

हीच चवदा ब्रह्मांची गोष्ट पंढरपुरांत कोणी ब्राह्मणांनीं समर्थांस विचारली. वामनपंडितांनीं नव्हे. तेव्हां स्वामींनीं अद्भुत चमत्कार दाखविण्यासाठीं कोणी मलयगंधर्व नारदाच्या शापामुळें पंढरींत अविंधाच्या जन्मास आला होता, त्याकडून ती सांगवून त्या अविंधाचा उद्धार केला, असें महीपति संतविजय अ० २१ त सांगतात. तेथें वामनपंडितांच्या नांवाचा उल्लेख मुळींच नाहीं!

असावें. असें झालें नसतें तर स्वामींनीं रुद्ररूप धारण करून क्रोधानें शेंपटाचा तडाखा मारणें व कोप शमनानंतर ' तुह्मी पंडित सर्व ग्रंथांचें अवलोकन करीत असून बरोबर उंटाचेउंट पुस्तकें बाळगून जयपत्रें घेत आलां ' इत्यादि मानभंगाचीं दुरुत्तरें बोलणें, या दोन गोष्टी समर्थांकडून झाल्या नसत्या, किंबहुना त्यांच्या बखरकारानें अशा प्रकारचे मत्सर-प्रदर्शक शब्द त्यांच्या तोंडांतून काढविले नसते. पदार्थास संज्ञार्थ ब्रह्म असें नांव दिलेलें, परंतु तो पदार्थ खरें ब्रह्म नव्हे. असे हे चवदा पदार्थ ब्रह्म या नांवानें मोडतात परंतु ते ब्रह्म नव्हत. अशी क्षुल्लक गोष्ट या महापंडितांस समजली नाहीं व तीं ब्रह्मेंच आहेत असा ते दुराग्रह धरून बसले, असें सांगणें हें निवळ भाविक जनांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्या-सारखें होय. वादांत ज्याचा पक्ष दुर्बल ठरत येतो त्या पक्षकारा-सच राग यावयाचा संभव असतो. यावरून समर्थांचा पक्ष दुर्बल होत आल्यामुळें त्यांना रुद्ररूप धारण करावें लागलें असें सिद्ध होतें. आणखी, हा चवदा ब्रह्मांचाच वाद घटकाभर खरा असें ह्मणून चाललों तरी समर्थांस साधुरीतीप्रमाणें आपणाकडे आलेल्या वामन पंडितांसारख्या विद्वानाचें जर दुरुत्तरांनीं गांजल्याशिवाय समाधान करावयाचें असतें तर जें त्यांहीं सरते शेवटीं ' हें बृहदारण्यकांत पहा ' असें सांगितलें, तेंच प्रथमारंभीं पंडितांस सांगितलें असतें, ह्मणजे या सर्व संतापाचें मूळच जाऊन समर्थांकडे गौरव व साधुपणा विशेष आला नसता काय? कसेंही असो, या गोष्टीचा एकंदर झोक असा दिसतो कीं, कोणत्याही प्रकारें पंडितांच्या उपहासानें समर्थांचें महत्त्व वाढवायाचें एवढाच आहे. हें वामन पंडितांचा गीर्वाणभाषेंत अनुभूतिलेश या नांवांचा एक ग्रंथ आहे त्यांत जी कांहीं त्यांनीं आपली व आपल्या वेळच्या साधूंची थोडीशी हकीगत दिली आहे त्यावरून स्पष्ट दिसून येईल. पंडित असें ह्मणतात कीं,

---

१ गागाभट महापंडित ज्यांहीं शिवाजीला राज्याभिषेकाविषयीं शास्त्राधार देऊन त्याप्रमाणें राज्याभिषेकही केला, ह्यांची देखील समर्थांच्या महतीसमर्थनार्थ यांनीं टर उडविण्यांत कमी केलें नाहीं. ( संतवि० अ० १४ ओं० ५५-१३६ पहा. ) यावरून या महासाधूंच्या अनुयायांचा पंडितजनांशीं स्वभावतः मत्सरभाव दिसतो. याचें कारण त्यांच्या पांडित्यरूप सूर्यप्रभेपुढें या साधुजनांच्या सर्वज्ञतारूप अग्निप्रभेचा सहज लोप होई, तो त्यांना असह्य होत असे हुतकेंच असावें.

" छांदोग्य उपनिषदाच्या वचनांवरून अद्वैततत्त्व जाणण्याची ज्या कालीं मला जिज्ञासा झाली, त्या कालीं पृथ्वीवरील विख्यात यति, वेदांतशास्त्र सांगणारे साधु, जे प्रत्यगात्मा जाणून सर्व जग ब्रह्मत्वानें जाणत नाहींत अशा पुष्कळांची मी गुरु करण्यासाठीं सेवा केली. संस्कृतशास्त्रज्ञ व प्राकृतग्रंथवित्तम अशा पुष्कळ साधूंस अद्वैततत्त्व सांगण्यासाठीं मीं सेविलें. संस्कृतग्रंथकर्त्यां भाष्यकारादिकांहीं जें ज्ञान सांगितलें आहे, तें देखील कोठेंच ऐकण्यांत आलें नाहीं. शंभर वर्षांमागें जे प्राकृतग्रंथकार होऊन गेले त्यांसारिखे ज्ञानी प्रस्तुत कोणी नाहीं. ह्या भूतलावर तत्त्वज्ञान जाणणारा कोणी मला मिळाला नाहीं. ह्मणून मीं निराश होऊन गंगायमुनेच्या संगमीं देहत्याग करण्याचा निश्चय केला. कारण ज्या धीरांनीं तेथें देहत्याग केला, त्यांना अन्य जन्मीं गुरुमुखापासून ज्ञानप्राप्ति होऊन मुक्ति मिळाली आहे. 'नान्यः पंथा' या श्रुतीवरून ज्ञानानेंच मोक्षप्राप्ति, किंवा प्रयागीं देहत्याग केल्यानें अन्य जन्मांत ज्ञानप्राप्ति होऊन मुक्ति मिळायाची, असा निर्णय आहे. असा निश्चय करून मी मलयाद्रिदेशीं फिरत असतां, श्रीविष्णूनें यतिरूपानें प्रगट होऊन मला तत्त्वोपदेश केला."

'या भूतलावर तत्त्वज्ञान जाणणारा कोणी मला मिळाला नाहीं.' एव

---

१ अनुभूतिलेश नामक पंडितांच्या संस्कृत ग्रंथाची समश्लोकी टीका साम्राज वामनानें केली ती मूळासहित वामनी ग्रंथ भाग ४ पृष्ठ २६१ वर छापिली आहे, तींतील ह्या पुढील पद्यांचें हें भाषांतरः—

वेदांतशास्त्रवक्तारे यती जे प्रत्यगात्मता । जाणूनीही सर्व जग ब्रह्मत्वेंच न जाणती ॥ १३४ ॥ गुरुत्वाकारणें त्यां या भूतळीं बहु सेविले । आत्मोपदेशसमर्यी आचार्यत्वें न मानिले ॥ १३९ ॥ ऐशी छांदोग्यवचनें जिज्ञासा ऊठली जयीं । तत्त्वज्ञ जे क्षितितळीं विख्यात सेविले तयीं ॥ १३८ ॥ एवं संस्कृतशास्त्रज्ञ प्राकृतग्रंथवित्तम । अद्वैततत्त्व बोलाया सेविले त्यां बहूत ते ॥ १४० ॥ संस्कृतग्रंथकर्ते जे भाष्यकारादि पूजित । जें ज्ञान बोलिले तेंही कोठेंच नाहिं देखिलें ॥ १४१ ॥ वर्षशताचिया पूर्वीं प्राकृतग्रंथाकर जे । त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं ॥ १४२ ॥ होतां निराश ज्ञानातें नच भूताळें जाणता । संगमीं सित आसित सिद्धांत तनु त्यागणें ॥ १४३ ॥ त्यागिली तेथ तनु ज्या धीरांनीं अन्य जन्मि ते । कोठें गुरुमुखें ज्ञान लाभुनी मुक्ति पावले ॥ १४४ ॥ "नान्यः पंथा" श्रुतीनें या ज्ञानेंच मोक्षनिर्णय । मुक्ति जन्मांतरी ज्ञानें तनुत्यागें प्रयागिंही १४५ ऐशा स्वबुद्धि कृतनिश्चयानें, मालयाद्रिदेशीं फिरतां तनूनें । श्रीशेषशायी यतिवर्यरूपें, झालाच प्रत्यक्ष गुरुस्वरूपें ॥ १४६ ॥

हेंच या पंडितांच्या मत्सरयुक्त छलास उत्तर बस आहे; अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत तत्त्वज्ञासाठीं देशपर्यटण करून यांनीं सर्व तीर्थें व देवस्थानें पाहिलीं असें स्पष्ट होतें. रामेश्वराकडून परत येतांना मार्गात मलयाचळीं ह्मणजे मलबार प्रांतांतील चंदनवनांत यांनीं मुक्काम केला. जोंपर्यंत अद्वैततत्त्वाचा पूर्णानुभव पंडितांस आला नव्हता तोंपर्यंत त्यांनीं मध्वमतानुसार पत्नीच्या हातच्या अन्नास स्पर्श केला नाहीं असें वाटतें. कारण कीं, त्यांसमागमें त्यांची पत्नी असतांही येथें ते स्वयंपाकाच्या खटाटोपांत गुंतले असून अंतर्यामीं आनंदपदाच्या अनुभवविचारांत निमग्न होते. अशा समयीं पंडितांच्या कानांत एकाएकीं हास्यध्वनि पडला. पंडितांनीं कोण आहे ह्मणून मागें वळून पाहिलें तेव्हां त्यांस भगवें वस्त्र दिसलें. मुखाकडे पहातात तर त्यांस शेंडी नाहीं. त्यांना पाहून पंडितांचें चित्त वेधून गेलें. इतक्यांत 'तुमच्या मनांत काय घोळतें?' असा त्या संन्याशानीं पंडितांस प्रश्न केला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून पंडितांनीं आपल्या मनांत घोळत होते ते विचार त्यांस निवेदन केले. तेव्हां त्या सच्चिदानंदमूर्तीनें कृपाविष्ट होऊन सर्व उपनिषदांचें सार दोन मुहूर्तांत वामन पंडितांस उपदेशिलें व मस्तकावर हात ठेवून आपल्यासारिखें सच्चिदानंदरूप करून सोडिलें.

---

१. वामनी ग्रंथ भाग ४ था पृष्ठ १-२ निगमसार ओं० १०, १७, १९ अ० १.

२. या हास्यध्वनीविषयीं रामदासांचे बखरकार असें लिहितात कीं, वामनपंडित मध्वसंप्रदायी असल्यामुळें पत्नीचे हातचें जेवीत नसत; परंतु तिनें स्वयंपाकाची सिद्धता करून भांडीं चुलीवर चढवावीं व पंडितांनीं तीं उतरून घेऊन मग भोजन करावें. एक दिवस वाटेंत पाक करतेवेळीं सच्चिदानंदब्रह्मलक्षणाचा विचार करीत असतां पंडितांस समाधी लागली. इकडे पात्र अग्नीवरून घसरलें. त्यामुळें गिराबाई हंसली. पंडितांच्या हें कानांत पडतांच कां हंसलीस ह्मणून त्यांनीं विचारलें. ती ह्मणाली-'तीन वेदांचा अद्यापि विचार करीत आहां ह्मणून हंसलें.' तेव्हां पंडितांनीं ह्मटलें कीं, 'दुसरा कोणी असता तर वंदनादि व्यवहार केला असता इ०' हें वर्त्तमान अंतर्ज्ञानानें समर्थांस समजलें व पुढें भेटीअंतीं समर्थांनीं पंडितांची थट्टा केली!

निगमसार ग्रंथांत पंडितांनीं दिलेल्या हकीकतीचें हें यतीच्या ठिकाणीं गिराबाईचें नांव घालून रूपांतर केलें आहे, असें कोणीही सांगूं शकेल. मर्मज्ञच हवा असें नाहीं. यावरून ब्रह्मराक्षसाची गोष्ट आह्मी सांगितल्याप्रमाणेंच असावी किंवा नाहीं याचा सुज्ञांनीं विचार करावा.

या उपदेशानंतर पंडितांची वृत्ति कशी झाली तिचें त्यांनीं थोडक्यांत अपूर्व रीतीनें वर्णन केलें आहे; तें असें:–

क्षणामाजी सचराचर । मज वाटलें माझें शरीर ।
आकार तितुकें निराकार । तेंचि समयीं ॥ ४० ॥
जैसा उगवतां दिनकर । कांहींच नुरे अंधार ।
उपदेशाचा बडिवार । ऐसा देखिला ॥ ४१ ॥

निगमसार अ० १.

वामनपंडित जरी निःसीम व प्रेमळ हरिभक्त होते तरी त्यांची साधूंत गणना झाली नाहीं. याचीं कारणें दोन. ते ढोंगी नव्हते त्यामुळें त्यांकडून अद्भुत चमत्कार झाले नाहींत, हें एक; व श्रीमद्भगवद्वचन, जें गीताशास्त्र, त्याची यथार्थ टीका करितांना "जेथें जेथें अन्य संस्कृत किंवा महाराष्ट्र टीकाकारांपासून एखाद्या पदाचा अर्थच झाला नाहीं, किंवा कोठें कोठें विपरीतार्थ झाला आहे, तेथें तेथें पंडितांनीं त्यांना गीता समजली नाहीं असें निर्भीडपणें ह्मटलें, हें दुसरें.

प्राकृतांत यावेळीं दोन टीका होत्या. एक भावार्थदीपिका किंवा ज्ञानेश्वरी व दुसरी चित्सदानंदलहरी. पहिलीचे कर्ते जगविख्यात ज्ञानेश्वर व दुसरीचे रंगनाथस्वामी. पंडितांनीं जें कांहीं संस्कृत व प्राकृतटीकाकारांस अनुलक्षून ह्मटलें तें सर्वच प्राकृतटीकाकारांच्या भक्तांनीं त्यांकडेसच लागू केलें. ज्ञानेश्वरास लोक ईश्वरावतार मानीत असत व हल्लींही मानितात. त्यांना अर्थ समजला नाहीं असें ह्मणणें ह्मणजे ईश्वरासच गीतेचा अर्थ समजला नाहीं असें ह्मटल्यासारिखें झालें. हा पंडितांचा लहानसहान अपराध नव्हे. ज्ञानेश्वरानें भिंत चालवून रेड्याच्या मुखानें वेद बोलविले. रंगनाथस्वामींनींहि असेच कांहीं अद्भुत चमत्कार केले. परंतु पंडितांच्या अंगीं लहानसा पाषाण देखील उचलायाची शक्ति नसून त्या अवतारी पुरुषांच्या अर्थास दोष लावणें हें कोणास सहन होणार होतें बरें? या महदपराधाचें शासन पंडितांस मिळालें! त्या टीकांच्या भक्तांनीं यांचें साधुत्व हिसकून घेऊन, होईल तितका छल केला व संताळ्याच्या प्रदेशांतून यांच्या टीकेस हाकून लाविलें. परंतु साधु ते साधूच! ज्यांहीं विश्वात्मयोगाच्या

१ ही टीका शके १५१० त झाली. ह्मणजे वामन पंडितांच्या जन्मापूर्वी १० वर्षें. पंडित प्राकृत टीकांविषयीं बोलतांना बहुवचनीं बोलतात तेव्हां हीहि टीका त्यांच्या पहाण्यांत आलीच असावी.

सिद्धीसाठीं भरतखंडभर प्रवास केला, ज्यांचें सर्वत्र सम पाहणें क्षणभर टळलें नाहीं, विश्वकल्याण हेंच ज्या सत्पुरुषाचें महाव्रत, त्याला असला साधुपणा मिरवायाची आवड कोठून असायाची ? यथार्थ गीतार्थ सांगून जगाचा मुक्तिमार्ग सुलभ करून द्यावा एवढाच त्यांचा हेतु. तथापि इतर टीकाकारांचे अभिमानी आपली व आपल्या टीकेची अवहेलना करितील असें त्यांना समजलें नव्हतें असें नाहीं. ते त्याविषयीं असें ह्मणतातः—

वाचोत जे वाचिती । न वाचोत जे वाईट मानिती ।
संतुष्ट होय एक जगत्पती । या यथार्थ निरूपणें ॥११८०॥

यथार्थदी० अ० ७.

ज्यांस इतर टीकाकारांचे अभिमान । ते न देतील या टीकेस मान ।
हरिभक्त निर्मत्सर निरभिमान । तेचि देतील सन्मान या टीकेतें॥ ११९८॥

यथार्थदी० अ० ८.

यथार्थदीपिकेंत श्रुतिस्मृति पुराणांतून तशींच भागवत भारतांतून प्रमाणें देऊन शास्त्रिय रीतीनें जें विषयप्रतिपादन केलें आहे त्यावरून हे महापंडित होते व यांचें ग्रंथावलोकन फारच होतें, याविषयीं मुळींच संशय रहात नाहीं. भगवद्गीतेच्या नवमाध्यायांतील दुसऱ्या श्लोकांत 'प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्' द्वादशाध्यायांतील शेवटल्या श्लोकांत 'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते,' अष्टादशाध्यायांतील सत्तराव्या श्लोकांत 'अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः' या स्थलीं गीताकारानें 'धर्म्य' पदाची जी योजना केली आहे तिचा स्पष्टार्थ कोणींच केला नाहीं तो सांगावा इत्यादि यथार्थदीपिका करण्याचा हेतु सांगतांना पंडित ह्मणतात कीं:—

भवद्रुमातें छेदी शस्त्र । ऐसें तुझें गीताशास्त्र ।
त्याची दाविती पाठमात्र । धार लपविती ये रीती ॥११०॥
खड्गास मुख्य पाणी । तैशी भक्तिपर तुझी वाणी ।
गीतेच्या अंतीं चक्रपाणी । ऐसेंचि बोलिलासी ॥१११॥
कोण्या मिसें तरी कोणी । गीतार्थ अन्यथा वाखाणी ।
मज नावडे ती थोरांचीही वाणी । काय करूं जी श्रीकृष्णा ११६
संसारछेदक सार । गीताशास्त्राची भक्ति धार ।
ते झांकूनि नुसतें निराकार । मात्र दाविती ॥ ११७ ॥

यथार्थदी० अ० १

---

१ निबंधमाला भाग २ पृष्ठ ९२१.

हें त्यांचें ह्मणणें वेदांतधर्मपुरश्चरणकर्ते प्रख्यात गीताभाष्यकार जगद्गुरु शंकराचार्य यांपासून तहत महाराष्ट्रटीकाकार रंगनाथस्वामी यांपर्यंत लागू आहे. या एका धर्म्यपदाच्या जोरावर गीतार्थांत सगुणभक्ती वर्चस्व स्थापून गीतावचनांची एकवाक्यता करतांना पंडितांनीं पांडित्याची जी शिकस्त केली आहे तशी महाराष्ट्र ग्रंथांत कोठें सांपडणार नाहीं.

पंडितजनांस गीर्वाणभाषेशिवाय इतर भाषा तुच्छ, असें असतां वामन पंडितांनीं यथार्थदीपिकादि जे ग्रंथ महाराष्ट्र भाषेंतच केले ते केवळ लोकसंग्रहार्थच केले, इतकेंच नव्हे, तर गीर्वाण भाषेचा तसाच आपल्या पांडित्याचा यत्किंचित् गर्व त्यांना नव्हता. जें आत्मज्ञान संपादन करण्यासाठीं त्यांहीं अश्रांत श्रम केले व देहत्यागाचाही निश्चय केला, तें महाराष्ट्र जनांस अल्पायासानें प्राप्त करून द्यावें, एतदर्थ पारिभाषिक शब्दांचाही अर्थ यथार्थदीपिकेंत जेथल्या तेथें देऊन, अपक्व महाराष्ट्र भाषेस पक्वदशेस आणून, अत्यंत कठीण शास्त्रीय विषय साधे सोपे व सरळ मराठींत सांगितला. याहून साधूंचें सदयहृदय तें कोणत्या प्रकारचें असावयाचें? स्वतः ते याविषयीं असें ह्मणतातः—

जी जी देवाधिदेवा । प्राकृत भाषें करितां तुझी सेवा ।
वेदवाणीस उपजे हेवा । तुझ्या स्वरूपाचा ठेवा जीमाजी ॥१०॥
मुख्य तुझें नाम गोड । पुरवी सर्वां भाषांचें कोड ।
तें कानीं मुखीं येतां मोड । देहीं उपजती प्रेमाचे ॥ ११ ॥
काय वेदशास्त्र जाणे व्रज? । ज्याची भक्ति देखोनि तुझा आत्मज ।
ब्रह्मा वेदवक्ता शिरीं पदरज । वंदी व्रजनारीनरांचे ॥ १२ ॥
गजेंद्र कोण शास्त्र पढला । बाळ कोणा पांडित्यें ध्रुवपदा चढला ।
दासी कुब्जा तिला घडला । काय अभ्यास संस्कृताचा? ॥ १३ ॥
व्रजीं चारितां गायी । कुचकुंकुमें गोपिकांचीं पायीं ।
तदंकित तृणें कृतार्थ ठायींठायीं । बल्लवस्त्रिया पढलिया त्या काय १४
अभिमानें बुडाले पंडित । यज्ञपत्न्यांनीं अर्चितां वैकुंठमंडित ।
न पढतां न वाचितां अखंडित । आनंद भक्तीनें पावल्या ॥ १५ ॥
भक्ति थोर भक्ति थोर । तूं चंद्रमा भक्त तुझे चकोर ।
तूं मेघ भक्त मयूर । मेघश्याम समोर त्यांस तूं सर्वत्रही ॥ १६॥
एवं पावावया तुझे चरण । भाषा कोणी नव्हे कारण ।
कारण सप्रेम अंतःकरण । देवाधिदेवा ॥ ११७ ॥

तैसें भजनास कारण नव्हे वित्त । मुख्य सादर असावें चित्त ।
तथापि वित्तवंत वेंचिती यानिमित्त । कीं अन्यथा वित्तशाठ्य लागेल ॥१८॥
मंगलाचरण ह्मणोनी । करितों देवा संस्कृतें करोनी ।
कोणी अर्थी दृष्टीशी नेदुनी । सुखें उगेंच ही वाचोत ॥ १९ ॥
जेथोनि टीकेचा आरंभ । तेथोनि गीतार्थ जो स्वयंभ ।
तो होय अत्यंत सुलभ । शब्द ऐसे योजितों ॥ २० ॥

यथार्थदी० अ० १.

अक्षरगणवृत्तांत कविता करणाऱ्या महाराष्ट्र कवींत वामनपंडित हे आद्यकवि. भीष्मप्रतिज्ञा हें त्यांचें प्रथम काव्य असावें. कारण यांतील मंगलाचरणपद्यांत त्यांहीं मातापित्यांस वंदन करून शेवटील पद्यांत त्यांचीं नांवें, गोत्र, कुलदेवाचें नांव इत्यादि सांगितलें आहे. असें त्यांनीं आणखी कोणत्याच काव्यप्रकरणांत केलें नाहीं. त्यांनीं ग्रंथारंभीं सगुण ब्रह्म जो विष्णु त्याचें अथवा त्याच्या रामकृष्णाद्यवतारांचें मंगलाचरण केलें आहे. अन्य महाराष्ट्र कवींसारिखें विघ्ननाशनादि देवतांचें मुळींच केलें नाहीं. त्याविषयीं त्यांचें ह्मणणें असें आहेः—

जे मंगलाचरणीं । लागती इतरदेवतांचे चरणीं ।
त्यांस भगवंताचे जगद्वंद्यचरणीं । कैंचें अनन्यभक्तित्व ? ॥३९१॥
द्वाराचि ज्याचें न सांपडे । त्या गृहांतील निधि कैंवि हातीं पडे ? ।
या ज्ञानाचें कवाड उघडे । अनन्य चरणशरणातें ॥ ३९२ ॥

यथार्थदीपिका अ० ९.

मंगलाचरणानंतर जो कांहीं विषय किंवा कथाभाग सांगायाचा त्याचें तत्त्व एक दोन पद्यांत वाचकांस सादर करावयाचा पंडितांचा प्रघात असे.तो असाः-

ठेवूनि नंदसदनांत हरी स्वहातें, माया व्रजेशतनया तिस ने गृहातें ।
आणी अजा त्यजुनि अन्यगृहीं अजाला, तो बद्ध मागुति पहा वसुदेव झाला ॥

कृष्णजन्म.

भक्तांनिमित्तचि अघासहि मोक्ष झाला, भक्तांस देउनिहि मोक्ष अधोक्षजाला ।
वाटे असेच मजला ऋण त्या जनांचें, भक्तप्रियत्व इतुकें भवभंजनाचें ॥

वत्सहरण.

---

१. निबंधमाला भाग २, पृष्ठ ९२२. हंसकृत वामनचरित्र पृष्ठ ९. रामदासांची बखर पृष्ठ ३०४. रामदासस्वामींचें मत असें नसतें तर त्यांनीं 'वामक्या वामन' असें लाडकें नांव पंडितांस दिलें नसतें.

स्वउदरांत चराचर मृत्तिका, पसरुनी मुख दावित कौतुका ।
प्रकट जो करि बाल्यकथारसा, नमिन त्या हरिच्या पदसारसा ॥

मृत्तिकाभक्षण.

सलज्जांची लज्जा हरि परिहरी आशुभजनीं
असें गोपीवस्त्रें हरुनि विभु दावी शुभ जनीं ।
स्वभक्ता नारीही नर न भजती त्याहुनि वरा
द्विजस्त्रीप्रेमें हें स्फुट करि नमो त्या यदुविरा ॥

कात्यायनीव्रत.

'सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी मुक्तेश्वराची, आर्या गावी मयूरपंताची ॥'

हें ज्या कोणी काव्यमर्मज्ञानें ह्मटलें तें अक्षरशः खरें आहे. पंडितांच्या कालापासून आजपर्यंत अक्षरगणवृत्तांत अनेक कवींनीं अनेक कथानकें लिहिलीं, परंतु त्यांतुन एकही यांच्या काव्यरचनेशीं तुलना करणारें अझून झालें नाहीं. जशीं गोपिकांचीं मनें वेणुनादानें अत्यंत मोहित झालीं, तशींच वामनाच्या काव्यसूक्तींनें जनमनें भुलून गेलीं; इतकेंच नव्हे, तर आद्यकवि जो वाल्मीकि त्याचेंही मन भुलून त्यानें मस्तक डोलविलाच कीं काय असें मोरोपंत ह्मणतात. ह्या प्रकारचा सन्मान पंतांनीं कोणत्याच महाराष्ट्रकवीस दिला नाहीं.

वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला ॥

वामनपंडितस्तुति.

पंडितांची वाणी मधुर व प्रसादयुक्त; महाराष्ट्र भाषेवर यांची पूर्ण सत्ता; अर्थालंकार, शब्दालंकार, प्रास, यमक इत्यादि काव्यगुणांनीं मंडित यांची कविता; देश काल व स्थिति यांस योग्य त्या विचारानें संस्कृत शब्दांचें अधिक मिश्रण

१. मोरोपंतांच्या चरित्रलेखकांनीं भाषास्वामित्व पंतांकडे दिलें आहे. आह्मीही तें नाकबूल करण्यास खुषी नाहीं, परंतु तत्वज्ञानासारिखा कठीण शास्त्रीय विषय अक्षरगणवृत्तांत अस्खलित व आनंददायक रीतीनें प्रतिपादन करितांना वामन पंडितांनीं संस्कृत भाषेचें कितीसें साह्य घेतलें आहे व त्यांच्या मागून पंत ११० वर्षांनीं त्याच रंगभूमीवर आले, त्यांनीं भारत, रामायणादि ग्रंथांतील कथानकें सांगतांना गीर्वाण भाषेचें किती साह्य घेतलें आहे, याचें जर अनुमान काढिलें तर महाराष्ट्रभाषास्वामित्व पंडितांकडेच आलें पाहिजे, असें निर्मत्सर लेखक कबूल करितील, असें आह्मांस वाटतें.

न करितां, आपण काय सांगतों हें सर्वांस समजावें अशा रसभरित सुगम मराठींत रचिली. तींतील प्रत्येक पद्यावर जसा काय यांचा ठसाच उमटला आहे; यामुळें तींत जें पुढें कमजास्त झालें तें लेखकप्रमादानें किंवा लेखक-पांडित्यानें झालें असें स्पष्ट दिसतें; इतकेंच नव्हे, तर कोठें कोठें मागाहून जीं नवीन पद्यें मध्येंच घुसडिलीं आहेत तींहि बिनचूक ओळखितां येतात.

पंडितांचा मुख्य विषय म्हटला म्हणजे अध्यात्म; हा लोकांच्या अनावडीचा. परंतु श्रीमद्भागवतावर यांचें फार प्रेम असल्यामुळें सगुणभक्तिरूप अलंकारानें तो इतका विभूषित झाला आहे कीं, त्यांत वाचकांचीं मनें प्रेमानंदानें तन्मय होऊन जातात.

नामसुधा, चित्सुधा, प्रियसुधा, गीतार्णवसुधा, चरमगुरुमंजरी, विश्वासबंध, राजयोग, उपादान, निगमसार, ब्रह्मस्तुति, कर्मतत्त्व, तत्त्वमाला, समश्लोकी गीता, यथार्थदीपिका इत्यादि यांच्या तत्त्वज्ञानग्रंथांत तर निरस स्थलें मुळींच मिळायाचीं नाहींत. या ग्रंथांत विषयप्रतिपादनरूप नदीचा प्रवाह इतका अव्याहत चालला आहे कीं, त्यांत वाचकांचें मन निमग्न होऊन गहनविचाररूप रत्नांच्या शोधार्थ तें गटकळ्या देत आनंदानें त्या ओघासरसें पोंहत जात आहे असेंच अनुभवास येतें. वाचकांस मात्र या शास्त्रीय विषयाचें थोडें बहुत ज्ञान असलें पाहिजे. मासल्यासाठीं नामसुधेंतील लहानसा एक चुटका येथें देतों:—

---

१. निबंधमाला भाग २ पृष्ठ ९४६. हंसकृतवामनचरित्र पृष्ठ ६८.

२. हंस आपल्या वामनचारित्रांत पंडितांच्या काव्यांतील च्युतसंस्कृति अथवा संस्कारहीनत्वादि दोष दाखवितांना "श्रवण कीर्त्तन माधव वंदनें, जळति पूर्विल पापहि काननें ।' या पद्यांतील 'पापहि काननें' या शब्दांवर बरीच टीका करून मग म्हणतात कीं, 'पापहि काननें' या ठिकाणीं 'पातककाननें' असा शब्द घातला असता तर च्युतसंस्कृतीचा दोष झाला नसता. अथवा 'पातककाननें' असाच मूळचा पाठ असून लेखकप्रमादानें त्या ठिकाणीं 'पापहि काननें' झालें असेल असेंही संभवतें." हंसांस हा लेखकप्रमाद असावा असा संशय तर आला खरा; परंतु वामनपंडितांकडून अशी चूक व्हायाचा संभव नाहीं, असें मात्र वाटलें नाहीं; हें नवल! आम्हांकडेस नामसुधेच्या सहा प्रती आल्या. त्यांतून एकेही प्रतींत वरील प्रमाद आम्हांस आढळला नाहीं. तथापि लेखकप्रमादानें किंवा त्यांच्या पांडित्यानें यांच्या कित्येक प्रकरणांत असा कांहीं चमत्कार झाला आहे कीं, कांहीं पद्यांचा अर्थ मुळींच लागत नाहीं.

विज्ञान जें अतिरहस्य विशुद्ध वेदीं, तेथेंचि भागवतधर्म न भक्ति भेदीं ।
ज्याकारणें प्रिय कलत्र सुतादिवित्तें, तेव्हांचि भक्ति जरि तो उमजेल चित्तें ॥
म्हणविती बहु वैष्णव आपणा, परि न जाणति भक्तिचिया खुणा ।
हरि असें दुसरें जरि नावडे, तरिच ते हरिभक्ति तयां घडे ॥ १७ ॥
प्रिय हरी सकळांहुनि जाणती, परि जयास्तव तो प्रिय नेणती ।
भजति कीं सुख दे हरि आपणा, प्रिय तयीं निजजीव हरी उणा ॥१८॥
निजसुखार्थ धनादि जसीं प्रियें, प्रिय हरी स्वसुखार्थचि निश्चयें ।
धनसुतांहुनि आवडि आपुली, तसि हरीहुनि भक्ति न हे भली ॥१९॥
भजति मुक्तिनिमित्त हरी जरी, निजनिमित्त तदर्थ नव्हे तरी ।
भजति मानधनार्थ नृपा जसे, हरिस मुक्तिनिमित्तक हे तसे ॥ २० ॥
जरि न मुक्तिनिमित्तहि सेविती, तरि किमर्थ उपास्य रमापती ।
जगिं वृथाचि न मंदहि वर्तती, वदति शास्त्रविशारद ये रिती ॥ २१ ॥
प्रयोजनावांचुनि मूर्ख तेही, प्रवर्तती न त्रिजगांत देही ।
शास्त्रज्ञ होऊनि वृथा हरीला, कां सेविती हें समजोनि बोला ॥ २२ ॥
म्हणाल आतां गुण गोड भारी, याकारणें आवडतो मुरारी ।
सुधा बहू गोड सुरेंद्रलोकीं, ऐकोनि तीतें न भजाचि कां कीं ॥ २३ ॥
स्वभक्ता न जाणे सुधा आणि कांहीं, कृपाळू हरीसारिखी होत नाहीं ।
असें बोलती जे तयांला पुसावें, कृपा घेउनी काय सांगा करावें ॥२४॥
कोण्या प्रकारें निजदुःख नाशी, नासूनि दुःखा करि सौख्यराशी ।
याकारणें तो प्रिय देव जेव्हां, स्वप्रीति देवाहुनि थोर तेव्हां ॥ २५ ॥
निजसुखार्थ हरी प्रिय जेधवां, अधिक आपुलि आवडि तेधवां ।
हरिहुनी प्रिय आणिक ही असी, निगमसंमत भक्ति घडे कसी ॥ २६ ॥
मैत्रेयीप्रति याज्ञवल्क्य निगमीं विस्तार हा बोलिला
कीं ज्यालागिं समस्त ही प्रिय असा आत्माच हा आपला ।
जो कां आवडतो निमित्त नसतां तो जाणसी जेधवां
कांहीं ही तुज जाणणेंचि न उरे सर्वज्ञ तूं तेधवां ॥ २७ ॥
जें जें लौकिक सौख्य वैदिकहि जें ज्या आपणा कारणें
वाटे आवडतें तसा प्रियतम स्वात्माचि जो आपणें ।
ज्याची आवडि निर्निमित्त हरिही ज्याकारणें आवडे
तोचि श्रीहरिसा कळे तरिच हे सद्भक्ति ठायीं पडे ॥ २८ ॥

नामसुधा अ० ३, चरण २.

काव्यांत नऊ रसांची योजना केलेली असते, परंतु पंडितांनीं शुक्राचार्यांच्या आधारावर आणखी एक भक्तिरस त्यांत वाढवून, त्यांचीं उदाहरणें नवरसमाला किंवा कंसवध या प्रकरणांत दिलीं आहेत. त्यांतील हे दोन श्लोक; यांत कंसवधसमयीं श्रीकृष्ण भगवान् कसा दिसला तें वर्णिलें आहेः—

मल्लां वज्र गमे नरां नृप गमे काम स्वयें स्त्रीजनां
गौळ्यां आप्त नृपां खळां प्रभु शिशू मातापित्यांच्या मना ।
कंसा मृत्यु अशक्त पामरजना संतांसि तत्त्वामृत
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित ।। ४ ।।
दे मल्लां रस रौद्र अद्भुत नरां शृंगार नारीजनां
गौळ्यां हास्य नृपांस वीर करुणा मातापित्यांच्या मना ।
कंसालागिं भयानकाख्य रस दे बिभत्स मूढां भ्रमें
संतां शांतरस स्वभक्तिरस तो दे यादवां या क्रमें ।। ५ ।।

सीतास्वयंवरांतही पंडितांनीं या दहा रसांचीं उदाहरणें दिलीं आहेतः—

मुख नवहि रसांची रामरूपेंचि केली
तरि दशम रसाच्या आवडीनें भुकेली ।
दशम सुरस ओते त्यांत रूपें नवांचीं
दिसति सफल विद्या तेधवां मानवांची ।। ५७ ।।

हें पंडितांचें संक्षिप्त चरित्र असल्यामुळें सर्वरसप्रदर्शक वर्णनांचे उतारे देण्याची यांत सवड नाहीं. तथापि ज्यांना शृंगाररसोत्कर्ष पहायाचा असेल त्यांनीं तो रासक्रीडा, रासमंडळ, भामाविलास, राधाविलास, कात्यायनीव्रत व राधाभुजंग या प्रकरणांत पहावा; हास्यरस वनसुधा, वेणुसुधा, कालियमर्दन, बालक्रीडा, द्वारकाविजय व सीतास्वयंवर यांत पहावा; वीररसप्रधान काव्य करण्याचा पंडितांचा हेतू जरी नव्हता तरी तो साधारण रीत्या भीष्मप्रतिज्ञेंत, भागवतरामायणांत व सीतास्वयंवरांत व्यक्त झाला आहे; रौद्र व भयानक हे नृहरिदर्पण, कालियमर्दन, सीतास्वयंवर व भरतभाव या प्रकरणांत स्पष्ट झाले आहेत; बिभत्सरसांत लिहायाचें पंडितांस कांहीं कारण जरी नव्हतें तरी तो अंशतः राधाभुजंगांत व भरतभावांत दृष्टिगोचर होतो; अद्भुतरस वामनचरित्र, अहल्योद्धार व सीतास्वयंवर या प्रकरणांत दिसतो; करुण, शांत, वात्सल्य अथवा भक्ति हे रस

तर यांच्या सर्वच काव्यांत मूर्तिमंत उभे आहेत. मासल्यासाठीं एक दृष्ट लक्षनशीं वर्णनें देतों:—

स्वस्तुत बाल्यचरित्रमहोदधी, स्मरत गात सुखें मथि हो दधी ।
रुचत भक्तिच कीं जननीच ते, समजती न कधीं जन नीच ते ॥ ४ ॥
पृथु नितंब नितंबिनिचा वरी, कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ।
कनककंकणवृंदहि वाजती, मुखिं सुखश्रमबिंदु विराजती ॥ ५ ॥
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती, गळति गुंफिलिया शिरिं मालती ।
घुसळितां कुचकुंभहि कांपती, अमृत ज्यांतिल घे कमळापती ॥ ६ ॥
फिरविते रवितें दधिभीतरी, मिरविते रवितेज नगांवरी ।
स्वकरिं ते करि चंचलता मनीं, उपरमे परमेश्वरगायनीं ॥ ७ ॥
मथी पुत्रभावें असी गायमाय, स्तनीं प्रेमपान्हा तिच्या काय माय ।
अशामाजि ये सर्वसंसारसाक्षी, असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी ॥९॥
फुटे प्रेमपान्हा भिजे आंत चोळी, हरी हानि मानूनिया हात चोळी ।
धरी भक्तिनें आपल्याची स्पृहा हा, ह्मणोनी ह्मणे व्यर्थ जातें अहाहा ॥१०
जननिच्या स्तनदुग्धरसार्पणें, स्वसुखतृप्तिहि मानिचि तर्पणें ।
ह्मणे असा रस जाय गळोनिया, ह्मणुनि ये हरि हेंचि कळोनिया ॥१२॥
क्षुधित मी स्तन दे मज लौकरी, ह्मणुनिया रवि गाढ धरी करीं ।
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी, मन जिचें बुडतें सुखसागरीं ॥ १३ ॥
मुखसुखामृतरश्मि पहातसे, तुह्मि हि कां स्वमनीं न पहा तसे ।
परि तयासहि टाकुनि धांवते, तुह्मि हि घ्याल ह्मणी अजि धांव ते ॥१४॥
त्रिभुवनात्मक राज्यहि ये करा, त्यजुनि तें हरिभक्तिचि हे करा ।
जरि बुडोनि समस्तहि जातसे, तरि बुडो, हरि तोचि भजा तसे ॥ १५ ॥
प्रभूस नेणोनिच पुत्रभावें, ते गौळणी स्त्रीप्रकृतिस्वभावें ।
लोटोनियां चक्रगदायुधातें, धांवे उते दुग्ध तया क्षुधातें ॥ १६ ॥
तो प्रेमपान्हा अवघाचि मातें, न पाजिला कां पुरुषोत्तमातें ।
ह्मणोनि कोपास चढे हरी तो, जो क्रोधकामा स्मरणें हरीतो ॥ १७ ॥
चावोनि ओष्ठ दशनीं मधुकैटभारी, फोडी शिळेंकरुनि तें दधिपात्र भारी ।
शिंकाघरांत हरि घालुनि पाणि खातो, दे मर्कटांसि नवनीत न आणिकां तो १८
मी घें स्वभक्तिरस कीर्तनिं वो रसाचा, टाकूनि त्या मज इला निजगोरसाचा ।
लोण्या दह्यांस हरि जो न कधीं भुकेला, कां फार लोभ ह्मणऊनिच नाश केला १९
हें दुग्ध नीट करितां क्षण एक झाला, तों आटवी जननि त्या क्षुधिता अजाला ।

मे थान देइन ह्मणूनि मनीं कृपा हे,देखे न त्यासि परि तत्कृतमात्र पाहे! ३१
हांसे परंतु बहु गोरसनाश झाला, मारीन यास्तव मनींच ह्मणे अजाला।
काठी धरूनि अवलोकन जों करीते,देखे घरांत मग ये अति लौकरी ते ३२
तों काष्ठऊलूखलपृष्ठभागीं, उभा दुजे मर्कटही विभागी।
चोरूनि खातो नवनीत पाणी, घालूनि सिंका प्रभु चक्रपाणी ॥ ३३ ॥
उडी टाकुनीयां पळाला हरी तो, समस्तां भयालागिंही जो हरीतो।
न तो सांपडे कीं जया काम नाहीं, न ठायीं पडे त्यांचिया त्या मनाही ३४
श्रमें श्रांत तीचा बहू देह झाला, बहू धांवतां ये कृपा त्या अजाला।
जसी हस्तिनी बालहस्तीसि हस्तीं, यशोदा धरी कृष्णहस्त स्वहस्तीं ॥३५॥
कृतापराधें प्रभु रोदनातें, करी धरी त्या मधुसूदनातें।
करें उगारी वरि वेत्र भारी, कांपे भयें देखुनि कैटभारी ॥ ३६ ॥
अहो लोचनीं पूर वाहे जळाचा, मुखीं माखला रंग तो काजळाचा।
मुखाऊपरी नाचवी आड पाणी, भयें ताडणाच्या प्रभू चक्रपाणी ॥ ३७ ॥
नीलपंकजतनू सुकुमारा, देखतां अजि अशा स्वकुमारा।
वेत्र दाखवि जरी घननीळा, हाणवे न तरि त्या जननीला ॥ ३८ ॥
संत्रस्त तो देखियला मुरारी, उगारितां वेत्र भयें थरारी।
टाकूनि काठी मधुसूदनातें, बांधूं ह्मणे त्या निजनंदनातें ॥ ३९ ॥
न कामना ज्यास न वासनाही, प्रेमेंविना बंधन त्यास नाहीं।
तें प्रेम वाहे हृदयांत माय, दाव्यांत तीच्या ह्मणऊनि माय ॥ ४० ॥

उखळबंधन.

सहृदय मातापित्यांनीं आणि प्रेमळ भक्तांनींच या खुबीदार वर्णनांतील रसास्वाद घ्यावा.

वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी, व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थरारी।
तया वर्णिती प्राण ठेवूनि कंठीं, वधूवृंद तो संकटें दीन कंठी ॥ २ ॥
अंगवक्र अधरीं धरि पांवा, गोपवेष हरि तोचि जपावा।
वामबाहुवरि गालहि डावा, तो ठसा स्वहृदयांत पडावा ॥ ३ ॥
वेणु जेंवि अधरीं स्वररंध्रीं, अंगुली स्मरति गोपपुरंध्री।
कोमळा सुचपळा अतिलंबा, सप्तही स्वररसा अविलंबा ॥ ४ ॥
ऐसिये हरिचिये मुरलीनें, कामतत्परमनें स्मरलीनें।
मोहिलीं सहवधूत्रिदशांचीं, आमुचीं न नवलें सुदृशांचीं ॥ ५ ॥
गायनीं अमर जे अभिमानी, आणि देवललना स्वविमानीं।

त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी, मोहिलें ह्मणति या व्रजनारी ॥ ६ ॥
वेणुध्वनी तो सुरगायकांनीं, त्यांच्या विमानांतहि बायकांनीं ।
आश्चर्य कांनीं पडतांचि केलें, न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ॥ ७ ॥
स्मरशरें विकळा सुरकामिनी, गलितनीविहि नेणति भामिनी ।
हरिस देखुनि त्या अधरामृता, त्वरित इच्छिति त्याविण ज्या मृता ॥ ८ ॥
कितीकी अशा बोलती गोपदारा, दुज्या गोपिका वर्णिती त्या उदारा ।
महाथोर आश्चर्य हें आयकाया, असें प्रार्थिती दुसऱ्या बायका या ॥ ९ ॥
आयका नवल हें अबळा हो, कीं स्थिरा घनिं विजा प्रबळा हो ।
हार ये रिती मुकुंद उरीं वो, देखतां न उरतेच उरी वो ॥ १० ॥
वास ज्यांतचि रमारमणीचा, श्याम ऊर वरि हार मणीचा ।
वेणुगान समयांत हरी तो, डोलतां जनमनास हरीतो ॥ ११ ॥
अधरिं वेणु धरी जइं तो हरी, विरहिणी जनचित्तहि मोहरी ।
व्रजवधूंसि खुणा व्रजराज तो, मुरलिमाजि वदोनि विराजतो ॥ १२ ॥
करूनी वियोगें मुखें दीनवाणीं, वसे तों विनोदें रमाकांतवाणी ।
अकस्मात त्या वेणुनें कर्णरंध्रीं. निवे सौख्य तत्काळ पावे पुरंध्री ॥१३॥
क्षण असें सुख पावति मागुती, त्वरित त्या अधरामृत मागती ।
जसजसा ध्वनि गोड गमे मना, तसितसी उपजे स्मरकामना ॥ १४ ॥
मोहती व्रजपशू मृग गाई, आमुचें नवल काय अगाई ।
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें, वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें! ॥१५
ज्यांसि न स्मरण हृत्सदनांत, ग्रास ते न गिळिती वदनांत ।
निद्रितेंचि अथवा लिहिलीं हो, चित्रिचीं न गमती पहिलीं हो ॥ १६ ॥
मातृस्तनींचा रस आननांत, तों होय वेणुध्वनि काननांत ।
गळें गिळेना पय वांसुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ १७ ॥
उचलुनि श्रवण श्रवणामृता, पशु पिती रस जीवन जो मृता ।
जवळि दूरहि वृंद अहो असे, मधुवनीं हरि जेथ उभा असे! ॥१८॥

वेणुसुधा.

पंडितांच्या या दोन्ही स्वभावोक्तींच्या वर्णनांचें हुबेहूब चित्र वाचकांच्या मनोनयनासंमुख किती उत्कर्षानें उभें रहातें हें त्यांनींच पहावें. अशा प्रकारचीं किंबहुना याहून सरस व विविध रसांनीं पूरित अशा वर्णनांनीं यांचे सर्वच ग्रंथ भरलेले आहेत. जें जें वाचावें त्यांत त्यांत वाच-

---

१ या ग्रंथांपैकीं गोपीगीत, रुक्मिणीपत्रिका, भागवतरामायण, ध्यानमाला.

कांनीं तल्लीन होऊन जावें अशा प्रकारचीच यांची काव्यशक्ति. याचें कारण इतकेंच कीं, विषयाविवेचनाच्या भरांत किंवा वस्तुवर्णनाच्या प्रेमांत निमग्न असतां पंडित स्वतः तद्रूप होऊन जाऊन देहभान विसरत असत, हें होय. यांच्या काव्यांत जे कांहीं प्रमाद ह्मणून आढळतात तेहीं अशाच प्रसंगीं झालेले असल्यामुळें ते काव्यास सदोष करण्याबद्दल सुशोभित करितात असें आह्मांस वाटतें.

हा ग्रंथ हरीच करितो किंवा हें प्रकरण हरीनेंच केलें, अशा प्रकारचे पंडितांचे उद्गार त्यांच्या प्रत्येक ग्रंथांत सांपडतात, त्याचा स्पष्टार्थ त्यांनींच कर्मतत्त्वांत सांगितला आहे, तो असाः—

ज्याचें मुख द्विज असे पुरुषाख्यसूक्तीं,त्याचेंच कीं वदन वामन हे तदुक्ती।
विश्वात्मतेकरुनि तों दुसरें असेना, ग्रंथासि यांसि करणार दुजा दिसेना २
जो सर्वबुद्धिगत चित्प्रतिबिंबरूपें, तो भक्तहृद्गत अनंत निजस्वरूपें ।
त्याच्या मुखेंचि उपदेशुनि आत्मविद्या, जीवांचिया हरि मुकुंद अनाद्यविद्या ३

यांच्या ग्रंथांत कोठें कोठें लहानसान व्याकरणप्रमाद आढळतात, ते असेः-संस्कृत शब्दांच्या र्‍हस्व दीर्घ उच्चारांकडे यांनीं लक्ष्य दिलें नाहीं. पद्यांतील

---

चतुःश्लोकी भागवत, अपरोक्षानुभूति व समश्लोकी गीता हीं भाषांतरें होत. ब्रह्मस्तुति,नामसुधा, यांनांही कोणी कोणी भाषांतरें ह्मणतात; परंतु तीं भाषांतरें नव्हत व समश्लोकी गीतेसही भाषांतर ह्मणतां येणार नाहीं. कारण कीं तिच्या अध्यायांच्या आरंभीं व शेवटीं जे संगतिश्लोक दिलेले आहेत त्यांची संख्या गीतेच्या मूळ श्लोकांच्या संख्येजवळ जवळ असून त्यांत विषयाची संगति लावण्यासाठीं जें पंडितांनीं पांडित्य खर्चिलें आहे त्याचाच एक स्वतंत्र ग्रंथ झाला आहे. हीं केवळ भाषांतरें आहेत, यांत पंडितांना बुद्धीचा काय व्यय करावा लागला? असें जे ह्मणतात त्यांचें ह्मणणें घटकाभर खरें असें धरून जरी चाललों, तरी पंडितांचीं हीं भाषांतरें मुळासारिखींच किंवा त्यांहूनही सुरेख उतरल्यामुळें महाराष्ट्र जनांवर त्यांचे जे उपकार झाले आहेत ते आचंद्रार्क विसरण्याजोगे नव्हत. ते जर हल्लीं हयात असते तर माहाराष्ट्रियांस शेक्सपियर, मिल्टन, वर्ड्स्वर्थ इत्यादिकांचीं अमूल्य काव्यें जशाचीं तशीं किंबहुना उत्कर्षानें स्वभाषेंत वाचायास सांपडलीं असतीं व मराठीभाषेचें आसन संस्कृत, ल्याटिन्, ग्रीक, फ्रेंच, इत्यादि भाष्यांच्या शेजारीं पडलें असतें व तीस जी विश्वविद्यालयाची पायरी वर्ज्य झाली आहे ती कधीं झाली नसती, असें आह्मांस खास वाटतें. मुळासारिखींच भाषांतरें उतरावयाची देखील पंडितांची हातवटी अझून कोणा माहाराष्ट्रियांत दिसून आली नाहीं, हें देशाचें दुर्दैव ह्मटलें पाहिजे.

एकादें उपयुक्त पद छंदोभंगास्तव क्वचित् समासांत मध्येंच घुसविलें आहे. वाक्याच्या स्पष्टार्थासाठीं समासाचीं पदें तोडून निराळीं केलीं आहेत. निर्लज्ज शब्दाचें निर्लज असें रूपांतर झालें आहे. हे काय ते यांचे दोष. हे कसे झाले असावेत हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. मागाहून यांकडे यांनीं लक्ष्य दिलें नाहीं, इतकेंच. यांना म्हणजे हीं व्यंगें नीट करितां आलीं नसतीं असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. असे दोष कालिदास, शेकस्पियर इत्यादि महाकवींपासूनही झालेले आहेत, म्हणून त्यांच्या काव्यांची किम्मत कमी झाली नाहीं. तद्वत् पंडितांच्याही काव्याची व्हायाची नाहीं.

आतां यांचीं नव्हेत अशीं कांहीं प्रकरणें वामनी ग्रंथांत यांच्या इतर प्रकरणांत मिसळून छापिलीं गेलीं, हें चुकीनें झालें; तथापि आमच्या चुकीबद्दल पंडितांस दोष लागावा हें अनुचित. याकरितां त्याविषयीं दोन शब्द सांगणें जरूर आहे.

सुदामचरित्र हें पंडितांचें नव्हे असें तें छापीत असतांच आमच्या लक्ष्यांत आलें व त्याविषयीं आम्हीं त्या प्रकरणाच्या आरंभीं जें कथेचें सार दिलें आहे त्यांत सांगितलेंच आहे. हें साम्राज्यवामनानें केलें. तो पंडितांचा शिष्य होता असें त्याच्याच म्हणण्यावरून दिसतें:—

साम्राज्यवामन तयासहि वामनानें, केली कृपा अनुभवोनिहि या मनानें ।
ऐश्वर्य सांसहित देहपुरींत ठेवी, ज्याची जनांस न कळे अनुभूतिठेवी ११३
सुदामचरित्र.

यानेंच पंडितांच्या अनुभूतिलेश नामक संस्कृत ग्रंथावर महाराष्ट्र टीका व ब्रह्मोपदेश अशीं दोन प्रकरणें केलीं आहेत. तीं आम्हीं 'वामन पंडितांच्या नांवांवर मोडणारे ग्रंथ' या सदराखालीं छापिलीं आहेत. ब्रह्मोपदेशांत तो स्पष्ट असें सांगतोः—

---

१. हें सुदामचरित्र पंडितांचेंच असें घेऊन बाळकृष्ण मल्हार हंस यांनीं आपल्या वामनचरित्रांत जो पंडितांची या प्रकरणावरून फजीती उडविली आहे तिला सीमा नाहीं. परंतु असें करण्यापूर्वीं हें प्रकरण कोणाचें याचा यांनीं कांहीं तरी विचार करावयाचा होता. कारण, पंडितांच्या व या वामनाच्या विचारांत व भाषासरणींत जमीन अस्मानाचा फरक असतां यांच्यानें हें काव्य पंडितांचें म्हणवलें तरी कसें? हे आमचे काव्यमर्मज्ञ. यांचे परीक्षक दक्षिणा प्रायझ् कमिटी, ज्यांनीं हें पुस्तक पसंत केलें व यांस या फजीत्याबद्दल दक्षिणा दिली; त्यांचेसारिखे काव्यमर्मज्ञ तर मिळायाचेच नाहींत !

पंचविंशति वर्षांतीं, श्रीसद्गुरु वामनाप्रती ।
शरण गेलों पुनरावृत्ती, जन्म मरण चुकवावया ॥ १३२ ॥
इति श्रीसद्गुरुचरणीं, साम्राज्यवामन अनुभवत्राणी ।
समर्पितां समर्पणीं, अद्वैतरूप जाहलें ॥ १३३ ॥

गोरसहरण, हें प्रकरण पंडितांचें नव्हे. यांत गणपति, सरस्वती इत्यादि अन्य देवतांचें मंगलाचरण केलें आहे. हें पंडितांच्या मतास विरुद्ध. याची भाषासरणीही पंडितांच्याहून निराळी आहे. हें कोणी नामधारी वामनानें आपली कवित्वशक्ति पहाण्यासाठीं केलें असावें, असें आह्मांस वाटतें.

नौकाचरित्र, हेंही प्रकरण पंडितांचें नव्हे. भाषासरणी मुळींच पंडितांची नाहीं. व्याकरणदोष फार आहेत. अशा प्रकारचे दोष त्यांच्या काव्यांत कोठें मिळायाचे नाहींत.

जयद्रथवध, पंडितांचा नव्हे. हा ज्या वामनानें विराटपर्व केलें त्याचा असावा असें आह्मांस वाटतें. कारण कीं भाषासरणी कांहींशी तशी दिसते.

---

१ विराटपर्व पंडितांचें नव्हे असें कशावरून? तें त्यांचें पहिलेंच काव्य असावें. काव्यरचना करण्यास ते त्यावरून शिकले. पहिल्यानें अशीं निरस काव्यें होतां होतां पुढें पंडितांची हातवटी बसली असें कशावरून नसेल? असें कित्येकांचें ह्मणणें आहे. वामन हे महापंडित, पोक्त वयाचे, काशीहून परत आल्यापासून अनुग्रह होई तोंपर्यंत रात्रंदिवस आत्मज्ञानविचारांत गढून गेलेले, असेच त्यांना आह्मी पहात आलों. मलयाचल पर्वतावर अनुग्रह होऊन त्यांची समाधानवृत्ति होई तोंपर्यंत त्यांनीं कांहींच केलेलें दिसत नाहीं. जें कांहीं काव्य ह्मणून त्यांनीं केलें, तें, प्रेमळ सगुणभक्तीनें लोकांचीं मनें आत्मज्ञानाकडे सहजरीत्या वळून जें आपल्यास महाप्रयासानें प्राप्त झालें तें त्यांस सुलभ रीतीनें मिळावें, याच हेतूनें केलें. ती भक्ति व तें ज्ञान अंशतः तरी विराटपर्वांत दिसतें काय? मग विराटपर्व करण्याची पंडितांस जरूरी कसली होती? जे कवि असतात त्यांस काव्य करावयास शिकावें लागत नाहीं. त्यांची बुद्धीच विलक्षण असते. विलक्षण मानासिक सृष्टि जगाच्या मनोमय नेत्रांपुढें मांडून, त्या जगास त्यांतील सुख-दुःखाचे विभागी करायाला तिला यत्किंचितही आयास पडत नाहींत. हें शिकून किंवा घोकून व्हायाचें नाहीं. पंडितांस आत्मज्ञान झाल्यावर काव्य करायाचा अभ्यास करावा लागला असता तर त्यांकडून कांहींच झालें नसतें. कवीलाच काव्यस्फूर्ति व्हायाची, इतरांस नाहीं. वामन पंडित व मोरोपंत व्हायाला आजपर्यंत थोड्यांनीं प्रयत्न केले काय? परंतु कोणी तसे झाले नाहींत. या विराटपर्वकर्त्यानेंही पंडितांचें अनुकरण करण्याविषयीं फार प्रयत्न केलेले दिसतात, परंतु त्यांतील क्षुल्लक विचार, भाषासरणी, हिंदुस्थानी शब्द, अपरिचित

स्फुट श्लोकांतही साम्राज्यवामनाच्या व इतर वामनांच्या श्लोकांची बरीच मिसळ झालेली दिसते. याशिवाय दुसरीं प्रकरणें जीं जीं आह्मांस पंडितांचीं नव्हत अशीं वाटलीं, तीं तीं 'वामन पंडितांच्या नांवावर मोडणारे ग्रंथ' या सदराखालीं छापिलीं असल्यामुळें त्यांविषयीं विशेष लिहिण्याचें आतां कारण राहिलें नाहीं.

हें संक्षिप्त चरित्र बरेंच लांबलें, तरी पंडितांच्या अंतकालाविषयीं विचार केल्याविना आटोपल्यास तें अपूर्ण होईल. निगमसार ग्रंथ लिहिल्यावर पंडित फार दिवस जगले नाहींत, त्यांचा अंतकाल१६९६ च्या वैशाख शुद्ध षष्ठीस झाला, असें एका विद्वानानें जुन्या नवनीतांत लिहिलें, तेंच खरें मानून, अंधपरंपरेप्रमाणें सर्वच चरित्रकारांनीं तोच काल निश्चित केला; परंतु तो चुकीचा आहे.

निगमसार हा पंडितांच्या ओवीबद्ध ग्रंथांत प्रथम ग्रंथ. यांत याचा समाप्तिशक १५९५ असा लिहिला आहे. असें पंडितांनीं आणखी कोणत्याच ग्रंथांत केलें नाहीं.

> शके पंधरा शतें पंचाणव, तैं ग्रंथ प्रगटला अभिनव ।
> जो अनादि अनुभव, सकळ संतांचा ॥ १६३ ॥
>
> निगमसार अ० ९.

निगमसारापूर्वीं झालेलीं काव्यें कदाचित् अनुक्रमवार लावतां येणार नाहींत; परंतु त्या ग्रंथामागून झालेल्या कित्येकांचीं नांवें अनुक्रमानें देतां येतात; तीं अशीं:–

१ कर्मतत्त्व, २ ब्रह्मस्तुति, ३ समश्लोकी गीता, ४ गीतार्णवसुधा व ५ यथार्थदीपिका.

निगमसाराचा उल्लेख कर्मतत्त्वांत केला आहे, तो असा:—

> जो ग्रंथ वामनमुखें जगदात्मदेवें, केला असे निगमसार यथार्थ नांवें ।
> अभ्यास तेथ कथिले हरिभक्तिभावें, ते मानसीं धरुनि जीतचि मुक्त व्हावें८९
>
> कर्मतत्त्व अ० ८.

कर्मतत्त्वाचा उल्लेख ब्रह्मस्तुतींत आहे:–

---

संस्कृत शब्द, रर, रे रे, गा गा, हो हो, मोठाल्या यमकांसाठीं निरर्थक शब्दांचा उपयोग इत्यादि व पंडितांचा प्रसाद, माधुर्य व अर्थालंकारादिकांचा त्यांत अभाव पाहून हें त्यांचें नव्हे अशी आमची खात्री झाली. हें कदाचित् सिद्धांतविजय नामक संस्कृत ग्रंथकर्त्या वामनाचें असेल तर कोण जाणे !

• हें बिंब आणि प्रतिबिंब कैसें, विचार हा सारजगन्निवासें ।
भाषाप्रबंधीं स्फुट वर्णियेला, जो क मतत्त्वाख्य निबंध झाला ॥११२॥

ब्रह्मस्तुति चरण २.

पंडितांच्या बऱ्याच ग्रंथांचा उल्लेख समश्लोकी गीतेंत आहे; तथापि कामापुरता ब्रह्मस्तुतीविषयींचाच मात्र येथें घेतों:–

असो हें बोलतां ग्रंथ वाढेल बहु मागुतीं ।
ब्रह्मस्तुति त्रिचरणी टीका हे त्या स्थळीं पहा ॥ ३६ ॥

समश्लोकी गीता अ० १८ उपसंहार.

यामागून गीतार्णवसुधा झाली, कारण तींत समश्लोकी गीतेंतील कांहीं पद्यें जशाचीं तशीं उदाहरणार्थ उतरून घेतलीं आहेत.

समश्लोकी गीतेनंतर यथार्थदीपिका झाली. हें पुढील श्लोकावरून सिद्ध होतें:–

गीतार्थ वर्णितां ग्रंथ वाढेल अपरांपर ।
समश्लोकी प्रतिज्ञा हे केली यास्तव माधवें ॥ ९ ॥

समश्लोकी गीता. अ० १८. उपसंहार.

एथपर्यंत यथार्थदीपिका झाली नव्हती. झाली असती तर असें न बोलतां पंडितांनीं तिजवर हवाला दिला असता.

शिवाय निगमसार, कर्मतत्त्व व ब्रह्मस्तुति यांचा उल्लेख यथार्थदीपिकेंत केला आहे तो असा:–

ग्रंथ निगमसार ह्मणोनी, भगवंतें याच वामनमुखें करोनी ।
प्रगट केला तेथें अपसिद्धांत हे दूषूनी, वैदिकसिद्धांत ते सिद्ध केले ॥६०३

१ श्रुतिसार ह्मणून पंडितांचा एक संस्कृत ग्रंथ आहे, त्यांत शुष्कद्वैतवाद्यांचा पक्ष दूषिला आहे, असें पंडित स्वतः सांगतात. ( सम० गी० अ० १२ उपो० श्लो० ८४. ) हाही ग्रंथ निगमसारामागून झाला असावा असें वाटतें. ह्यांत अनुभूतिलेशाप्रमाणेंच पंडितांविषयीं कांहीं विशेष माहिती मिळेल ह्मणून ह्यासाठीं आह्मी फार प्रयत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ झाले. पंडितांचा आणखी एक श्रुतिकल्पलता नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ आहे, असें जुन्या नवनीतांत व कविचरित्रांत सांगितलें आहे; परंतु याचा उल्लेख त्यांच्या कोणत्याच ग्रंथांत केलेला आढळत नाहीं, व तो पाहिल्याचेंही कोणीं सांगत नाहीं. जर अशा प्रकारचा ग्रंथ असेल तर तो यथार्थदीपिकेच्याही मागून झाला असावा. आह्मीं तो मिळवायास पुष्कळ यत्न केले परंतु ते सर्व निष्फळ झाले.

कर्मतत्त्व ग्रंथीं हा विचार, भगवंत जो यथार्थदीपिकाकार ।
याणेंच केला असे येथें फार, बोलतां अपार ग्रंथ होतो ॥ ९६१ ॥

ब्रह्मा यास दृष्टांत, बोले तें वर्णितां असे अत्यंत ।
वामनरूपेंच भगवंत, टीकाकार या स्तुतीचा ॥ २१८ ॥

यथार्थदीपिका अ० १९.

समश्लोकी गीतेचा यथार्थदीपिकेंत उल्लेख करण्याचें कांहीं कारण नव्हतें ह्मणून केला नाहीं; तथापि ती सर्व ग्रंथांमागून व यथार्थदीपिकेच्या पूर्वी झाली हें वर सिद्ध झालेंच आहे.

याशिवाय यथार्थदीपिकेचा उल्लेख पंडितांच्या कोणत्याच ग्रंथांत नाहीं ह्मणून ती सर्व ग्रंथांमागून झाली. यांत संशय नाहीं.

निगमसार १५९८ त झाला. त्यामागून हे मोठाले ग्रंथ पंडितांनीं रचिले. यांतील श्लोकबद्ध प्रकरणांचा २,८६६ ग्रंथ आहे व यथार्थदीपिकेचा ओवीबद्ध ग्रंथ २२,२६६ आहे. यांची फक्त नकलच करायाला चांगल्या लेखकास निदान दोन वर्षें तरी लागतील; तर पंडितांना यांची रचना करावयास किती वर्षें लागलीं असावीं याचें वाचकानींच अनुमान काढावें.

पंडितांचा परंधामगमनकाल निश्चित करण्याचें साधन जरी आज राहिलें नाहीं, तरी तो शके १६०० च्या नंतर झाला, यांत संशय नाहीं. जुन्या नवनीतांतील निबंधकारानें दिलेला काल शके १५९९, हा १६१८ असावा. तो त्यास फार जुनाट लेखावरून मिळाला असल्यास त्यांतील मधले दोन आंकडे, ह्मणजे ६१, बालबोधलिपीच्या वळणाच्या संबंधानें किंवा कालगतीच्या झपाट्यांत सांपडून ह्या दोन आंकड्यांच्या वरला किंचित् भाग जीर्ण होऊन गळून पडल्यानें अथवा तो भाग क्रिमीनें खाल्यामुळें, सहांचा आंकडा पांचांसारिखा आणि एकाचा आंकडा नवांसारिखा ह्मणजे ५९, दिसायाचा संभव आहे. यांतील एखाद्या कारणांवरून त्याला हा शक १५९८ असावा असें भासलें; व ह्या त्याच्या भासास निगमसाराच्या समाप्तिशकानें निश्चितपणाचें रूप दिलें; असें आह्मांस वाटतें. या निबंधकारानें पंडितांचे सर्व उपलब्ध ग्रंथ वाचले नसावे. कार्यापुर्ता त्यांचा शेवटला भाग ग्रंथसमाप्तिकाल पहाण्यासाठीं चाळून पाहिला असावा व तो फक्त निगमसारांतच सांपडल्याकारणानें हाच पंडितांचा शेवटला ग्रंथ आहे असा त्याचा ग्रह झाला असावा. असें नसतें तर त्यानें, 'निगमसार ग्रंथ समाप्त झाल्यावर वामन पंडित फार दिवस जगला नाहीं.' असें ह्मटलें नसतें.

गिराबाई पंडितांच्या पूर्वी निवर्तल्या, व मागून त्यांनीं संन्यास घेतला असावा, ह्मणूनच त्यांना महिपतिबोवा, मोरोपंत वगैरे कवि, वामनस्वामी असें ह्मणतात, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हें आह्मांस संमत नाहीं. सर्व कर्मे ईश्वरार्पित करण्यानें जसा संन्यास घडतो तसा मुंडनादि करून केवळ चतुर्थाश्रमदीक्षाच घेतल्यानें तो साधतो असें नाहीं, असें पंडितांनीं आपलें मत ठिकठिकाणीं व्यक्त केलें असून, तेच शेवटीं संन्यास घेतील, असें आह्मांस वाटत नाहीं; कारण त्यांचेसारिखे दृढनिश्चयी पुरुष क्वचित् उपजतात. शिवाय एकनाथस्वामी गृहस्थाश्रमी असून त्यांसही लोक स्वामी ह्मणत असत, यावरून त्या कालीं संतमंडळीस सन्मानार्थ स्वामी ह्मणण्याचा प्रघात होता असें दिसतें.

यांचा काल कोरेगांवांतच झाला व ज्या ठिकाणीं यांचें उत्तरकार्यादि झालें त्या ठिकाणीं यांची समाधि बांधिली आहे.

ॐ

# वामनी ग्रंथ.

# यथार्थदीपिका.

## अध्याय पहिला.

श्रीगणेशो जयति ॥ श्रीमते भगवते गीताकृते देवाधिदेवाय श्रीवासुदेवाय नमः ॥ जय जय भगवन् वासुदेव । जय जय श्रीदेवाधिदेव । जय जय यदुदेव वासुदेव । अर्जुनगुरो ॥ १ ॥ जय जय जी भगवंता । ऐश्वर्यज्ञानवैराग्यवंता । धर्मयशश्रीमंता । षड्गुणा ॥ २ ॥ तूं गुणातीत[1] निर्गुण ॥ तूंचि सगुण तूंचि त्रिगुणें[2] । तूंचि तुझे षड्गुण । तूं प्रत्यक्षीं अपरोक्ष[3] ॥ ३ ॥ इंद्रियें आणि इंद्रियगम्यें[4] । तूंचि जो इंद्रियां अगम्य । तोचि तू ध्येयरम्य[5] । शेषशायी ॥ ४॥ तूं निर्गुण अनिर्वाच्य[6] । तोचि तूं षडगुणत्वें वाच्य । वाच्य तितकें अवाच्य । ठाव नुरतां वाचेसि ॥ ५ ॥ तुझें ऐश्वर्य तूंचि । ऐश्वर्यशक्ति ही दुजी केंची । अवघी सत्ताचि साचि । घट मृत्पिंडें[7] ही मृत्तिका ॥ ६ ॥ परी षड्गुणांचें विवरण । करितां दिसे कार्यकारण । षड्गुणत्वें षड्विधपण । तें भगवद्रूप जग हेंचि ॥ ७ ॥ जी श्रीसच्चिदानंद[8]गुरु । जें जें वदलासि कल्पतरु । निर्गुण सुवर्ण सगुण मेरु । तो भेटलासि यतिरूपें ॥ ८ ॥ तूं श्रीगुरु चिद्घन[9] । भगवद्गीता तुझें वचन । प्रत्यक्षीं षड्गुणज्ञान । व्याख्यान तेंचि गीतेचें ॥ ९ ॥ प्रत्यक्ष तुझे साही गुण । पाहे तोचि भक्त निपुण । आत्मा भगवंत ऐशी खूण । तो अनुभवी गीतेचा ॥१०॥ ऐश्वर्य म्हणिजे समर्थपण । कीं अघटित तेंही घडवणें । विश्व नसोनि मिरवणें । हें ऐश्वर्य ॥ ११ ॥ तूं तंतु विश्व पट । तूं मृत्तिका विश्व घट । ऐश्वर्य तेव्हां निपट[10] । चराचरचि प्रत्यक्ष ॥ १२ ॥ विश्वपटीं जो तंतू ।

---

१ गुणापलीकडला. २ सत्त्व, रज, तम. ३ अदृश्य. ४ विषय. ५ ध्यान करण्यास योग्य. ६ वाचेनें वर्णितां येत नाहीं असा. ७ मातीचा गोळा. ८ सत्य, ज्ञान आणि आनंद असें ईश्वरस्वरूप. ९ ज्ञानघन. १० केवळ.

तो निजात्मा प्रकाशहेतू । भक्त भागवत भगवंत तूं । भेद कोठूनि आणावा ॥ १३ ॥ एवं जगचि ऐश्वर्य जैसें । जगचि तुझें ज्ञान तैसें । एथेंही द्वैत तें कैसें । सांपडेल अणुमात्र ॥ १४ ॥ तूं सुवर्ण विश्व नग[1] । निर्गुणत्वीं हा विश्वयोग । परी तूं न कल्पिसी जग । तों हे रचना घडेना ॥ १५ ॥ [2]अधिष्ठान नेणे विवर्ता[3] । तुज निर्गुणत्वीं न प्रपंचवार्ता । तोचि सर्वसाक्षी विश्वभर्त्ता । जाणूनि कल्पिसी सर्वज्ञा ॥१६॥ श्रुति बोलती सर्व ॥ कीं धाता कल्पी यथापूर्व । सांख्य निरीश्वर त्यांचा गर्व । एथें हरे ॥ १७ ॥ जाणोनि कल्पिजे नगर । कल्पना तुझी चराचर । जन्मादि साही विकार । कल्पना तुझी साक्षित्वें ॥ १८ ॥ भूत भविष्य वर्तमान । हें कल्पका सर्वज्ञाचें ज्ञान । तेव्हां विश्वरूपेंचि ध्यान । जगत्कल्पकाच्या ज्ञानाचें ॥१९॥ वृत्तिरूप[4] ज्ञान जग ॥ निर्धर्मज्ञानीं त्याचा संयोग । अधिष्ठान कनकीं विवर्त नग । दोन्ही रूपें हेमांचीं ॥२०॥ जरी अलंकाररूप । तरी सुवर्णाचें तें स्वस्वरूप । दृष्टीस थिजलें विघरलें तूप । रसनेस रस एकचि ॥ २१ ॥ एवं ज्ञान दुसरा गुण । तोहि जगचि देखे निपुण । ज्यास जगदात्मत्वाची खूण । बाणे दृढ ॥ २२ ॥ विश्व नसोनि दावी । हे ऐश्वर्यशक्ति तुझी वदावी । त्याची सिद्धि अनुभवी । या ज्ञानगुणेंचि देखती ॥ २३ ॥ प्राकृत नरें ही केली कल्पना । परी देहप्रारब्धाचा साचा मना । वाटे तुज तो असेना । तो देह तुझा कल्पिसी ॥ २४ ॥ "पुरुष एवेदं सर्वं" असें । वेद बोले याचि रसें । मंगलाचरणमिसें । गुह्य अनुभवही बोलतों ॥ २५ ॥ आपणासि आपण नर । कल्पूनि दावी स्तंभाकार । हे ज्ञानकल्पना चराचर । तरीच अतर्क्य ऐश्वर्य ॥ २६ ॥ ऐसेंचि ऐश्वर्याविण । व्यर्थ जगत्कल्पकपण । स्वप्न प्रपंच कल्पी आपण । भी आपणचि आपणासि ॥२७॥ हस्ती जाला स्वयें । स्वयें पळे त्याच्या भयें । जगत्कल्पक निश्चयें । परी अनीश ॥२८॥ ऐसें ऐश्वर्य आणि ज्ञान । जागृतींत करी कल्पूनि ध्यान । परी त्यास न राहे अनुसंधान । विषयवासनेकरितां ॥ २९ ॥ प्रपंच मिथ्या कळला । जरी परमार्थी वळला । तरी देह आहे खवळला । प्रारब्धकर्मे ॥ ३० ॥ जरी बाणलें ध्यान । क्षुधा तृषा ओढी मन । ऐशास विश्वकल्पनानुसंधान । राहेल कैसें ॥ ३१ ॥ तुझें अनादि वैराग्य । ज्याच्या लवलेशें आह्मी सभाग्य । त्या वैराग्यें तुज योग्य । करणें कल्पना प्रपंचाची ॥३२॥ प्रथम संक-

---

१ दागिना. २ आधार. ३ भोंवरा, आभास, भ्रम. ४ मनोवृत्ति. ५ सोन्याचीं.

ल्पांपासूनि । जों ब्रह्म परार्धें[1] दोन्ही । सृष्टिस्थितिसंहार कल्पूनि । असती नव्हेसी विक्षिप्तें[2] ॥ ३३ ॥ एवं ऐश्वर्यहेतुज्ञान । जें जगत्कल्पनारूप चिंतन । त्यास हेतु वैराग्यसंपन्न । स्वतःसिद्ध ॥ ३४ ॥ देवा हे आमुची बुद्धि । कीं याकरितां त्याची सिद्धि । स्वतःसिद्धाशक्ति प्रसिद्धि । ऐशी तुझी निगमांत[3] ॥ ३५ ॥ तुज वैराग्यगुण । कल्पावया हेतु हे खूण । तूं तों स्वतःसिद्ध निपुण । सर्वेश्वर ॥ ३६ ॥ आतां वैराग्यही हेंचि जग । रज्जूस न वाटे साच भुजग । सुवर्णास वासना नग । न उपजवी आपुली ॥ ३७ ॥ प्रपंच वाटतां सत्य । तरी वासना उपजती अगत्य । तूं सत्य कल्पिसी असत्य । स्वतःसिद्ध ऐसें वैराग्य ॥ ३८ ॥ ज्यास ठाउकी शुक्तिं[4] । त्यास मिथ्या रजतीं विरक्ति । तें रुपेंचि विरक्ति ऐशी युक्ति । कीं जें न उपजवी अनुराग[6] ॥३९॥ वैराग्य नाशी अनुराग[6] । अनुराग नाशी विराग[7] । रागनाशक मिथ्या भाग । वैराग्य तुझें हें विश्व ॥४०॥ धर्म तेथें वैराग्य । वैराग्यें ज्ञान ऐश्वर्य भाग्य । तो धर्म तुज असणें योग्य । हें बुद्धिवैभव आमुचें ॥ ४१ ॥ लक्षूनि आमुच्या बुद्धी । वेद सांगे तुझ्या स्वतःसिद्धी । निगमार्गीं[8] तुझी प्रसिद्धी । आह्मांनिमित्त ॥४२॥ मुख्य धर्म समता दया । हे दोन्ही तुझे गुण अव्यया[9] ॥ कर्मानुरूपें देवराया । फळें हरिती वैषम्यें ॥ ४३ ॥ दया समान सर्वांवरी । मेघ सर्वत्र वृष्टि करी । जो जैशीं बीजें पेरी । तैशीं फळें तो पावे ॥ ४४ ॥ ज्यां ज्यांस जे जे प्रीति । ते ते तदर्थ कर्मे करिती । फळ तें तें त्यां त्यांप्रति । देसी देवा ॥ ४५ ॥ सकामास देसी काम । मुमुक्षूंस[10] कैवल्य[11]धाम । देऊनि मोक्ष आत्माराम । ऋणी ह्मणविसी भक्तांचा ॥ ४६ ॥ समर्थ तूं अव्यया । मुक्ति सकळां द्यावया । आणि नेदिसी कां सदया । हें निर्दयत्व एथें उडालें ॥ ४७ ॥ मुमुक्षा जया तया मुक्ति । बुभुक्षा[12] तया देसी भुक्तिं[13] । इच्छित फळें दे तुझी व्यक्ति । गुण हा कल्पवृक्षाचा ॥ ४८ ॥ ऐसा दयाळु आणि सम । हाचि तुझा स्वतःसिद्ध धर्म । तो धर्मही जगाचि हें वर्म । देवाधिदेवा[14] ॥ ४९ ॥ धर्म दिसे दों रूपें । फलरूपें कीं कर्मस्वरूपें । फलबंध तुझ्या चरणप्रतापें । कर्मे अर्पिती नसे त्यांला ॥ ५० ॥ तुज कैंचें धर्मफळ । धर्ममात्र असे केवळ । यज्ञादि रूपें

---

१ दोन परार्धें—ब्रह्मदेवाचा आयुष्यकाल. २ विक्षेपरहित. ३ वेदांत. ४ शिंपी. ५ रुपें. ६ प्रीति, वासना. ७ वैराग्य. ८ वेदशास्त्रांत. ९ अविनाशी. १० मोक्षेच्छु. ११ मुक्ति. १२ खाण्याची इच्छा. १३ अन्न. १४ मुख्य देव.

प्रांजळ । दिसे जैसा योजिकांचा ॥ ५१ ॥ तेव्हां जगचि तुझा धर्म । हेंचि समत्व दयालुत्व कर्म । वांच्छानुरूप प्राप्तिक्रम । वैषम्य न दिसे ॥ ५२ ॥ अन्नसत्रीं अन्नें नाना । परी आवडे जें ज्याच्या मना । तें तेंच त्या त्या जना । वाढिती अन्न ॥ ५३ ॥ ऐसें अन्नसत्र वसे । तेंचि दातयाची समता दिसे । एवं जगचि धर्म असे । भगवच्छब्दवाच्याचा ॥ ५४ ॥ एवं जगचि मुक्तांची मुक्ति ॥ जगचि विषयासक्तांची भुक्ति । समता दयारूपें अभिव्यक्ति । जगचि तुझ्या धर्माची ॥५५॥ तुझें धर्मरूप जग । दोरीं जैसा भुजग । तो दोर स्वयें उपासक मग । वेगळेपण कैंचें भक्तासि ॥ ५६ ॥ आतां जेथें धर्म तेथें यश । तेव्हां जगचि तव यशलेश । कीं सम दयाळू हृषीकेश । जगचि ऐसें गर्जतें ॥ ५७ ॥ यावेगळे जे जे गुण । ते यशचि ऐशी खूण । त्या गुणांसहित निपुण । देखती जगचि यशरूपें ॥ ५८ ॥ आतां श्री नामही यशाचें । श्री वेंचूनि यश साधिती साचें । श्री आणि यश परमपुरुषाचें । हेंचि जग ॥ ५९ ॥ दोरीं जैसा भुजग । कीं सुवर्णामाजीं नग । तैसें ब्रह्मीं जग । मायामात्र ॥६०॥ साकारलें ब्रह्म सगुण । माया लक्ष्मी जाली आपण । अधिष्ठानीं माया तैशी निपुण । श्रीधर हृदयीं धरी तीस ॥ ६१॥ चित्समुद्रीं मायातरंगा । ते श्रीहृदयीं अंतरंगा । चित्समुद्रा श्रीरंगा । हृदयीं श्री यापरी ॥ ६२ ॥ एवं माया विश्वरूपें । ते श्री धरिली चित्स्वरूपें । जैशी धरी शुक्ति रुपें । श्रीधरें धरिली श्री तैशी ॥ ६३ ॥ ऐसा तूं षड्गुण । विश्व-तुझे साही गुण । भगवच्छब्दवाच्य विश्वस्फुरण । निजात्मपण याकरितां ॥ ६४ ॥ एवं भगवच्छब्दवाच्य जग । आत्मरज्जूमाजीं भुजग । हा भगवदैक्याचा योग । दिधला तुवां भगवंता ॥ ६५ ॥ जीवत्व आढळे प्रारब्धयोगीं । विश्वात्मत्व या भागवतयोगीं । हे तुझी कृपा ईस उपयोगी । भगवद्गीता ॥ ६६ ॥ त्या गीतेचा अर्थ । तोचि परमार्थ । जिचा वक्ता तूं समर्थ । परमात्मा भगवंत ॥ ६७ ॥ परी अजी भगवंत जी । या कलियुगामाजीं । जो तो गीतार्थ योजी । मतानुरूप ॥ ६८ ॥ जे योजिती निर्गुणपर । त्यांस सगुणीं अनादर । सगुणींच योजिती जे नर । ते नेणती निर्गुणत्व ॥ ६९ ॥ दोहींत केवळ सगुणवादी । त्यांची निष्ठा अखंड भेदीं । जयांचें भजन वर्णिलें वेदीं । पशुतुल्य ॥७०॥ श्रुतिः॥ अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसाव-

---

१ शुद्ध. २ कर्मठांचा धर्म. ३ भगवंताचा. ४ भोग. ५ प्रकटपण. ६ चैतन्यस्वरूपानें.

न्योहमस्मीति न स वेद यथा पशुः ॥ श्रुत्यर्थ ॥ देव अन्य मी अन्य । ऐसा भेद अन्योन्य । दाटूनि आणिती जघन्य । त्यांस ही श्रुति निंदिते ॥ ७१ ॥ ह्मणोनि ते केवळ निषिद्ध । निर्गुणवादी ज्ञानी प्रबुद्ध । जे आत्मा निर्गुण स्वतःसिद्ध । अनुभविती ॥ ७२ ॥ जे सर्वथा मानिती वेद । जे निषेधिती समूळ भेद । जे हरिती खेद । कांडत्रैयाचा ॥ ७३ ॥ चित्तशुद्धीकारणें कर्म । ईश्वरप्रसादार्थ उपासनाधर्म । ज्ञानकांडीं निर्गुण ब्रह्म । अनुभविती आत्मत्वें ॥ ७४ ॥ परंतु त्यांचें मत । जों आत्मा कळे निश्चित । तोंवरीच उचित । सगुणोपासना ॥ ७५ ॥ आणि भगवंता तुझें मत । कीं निर्गुणात्मक अद्वैत । कळोनि माझे चरणीं रत । भक्त सकळांत तो थोर ॥ ७६ ॥ ऐसें गीतेंत जेथें । ते वाखाणिती विपरीत तेथें । पूर्वापर विचारितां एथें । गीता न साहे तो अर्थ ॥ ७७ ॥ ते तों परम सर्वज्ञ । त्यांस बोल ठेवी तो अज्ञ । तरी कां बोलती ऐसें अभिज्ञ । विरळ समजे हें तत्त्व ॥ ७८ । श्रीगुरुरूपें देवा । मज भेटलासि वासुदेवा । तें हें रहस्य देवाधिदेवा । बोलिलासी ॥७९॥ तुझीं वचनें तुजप्रति । यालागीं बोलतों श्रीपति ॥ कीं श्रोते तुझ्याच मूर्ति । तूं विश्वरूप भगवंत ॥ ८० ॥ कलियुगीं प्रबळले बौद्ध । वेद जाले असिद्ध । ते क्षीणबल होतां प्रसिद्ध । जालीं मतें भेदाश्रितें ॥८१॥प्रत्यक्षवादी चार्वाक । ज्यांच्या मतें न स्वर्ग नरक । न कर्मभोग तेव्हां फळदायक । जगदीश कैंचा ? ॥ ८२ ॥ ज्यांच्या मतें वेद असिद्ध । त्यांशीं वाद वेदसिद्ध । न करवे ह्मणोनि प्रसिद्ध ॥ तर्कशास्त्र जालें ॥ ८३ ॥ आपला एक सिद्धांत धरावा । तेव्हां वादियांशीं वाद करावा । अन्यथा त्या वादास परावा । वितंडवाद ह्मणेल ॥ ८४ ॥ स्वसिद्धांत बोलावा अभेद । तरी तो न साधे विना वेद । यालागीं सिद्धांत आपुला भेद । तार्किकें गौतमें धरिला ॥ ८५ ॥ कार्यापुरते नृपती । शत्रुहि घडि एक हातीं धरिती । तथापि अंतरीं चिंतिती । घात त्याचा ॥८६ ॥ दुःखबीजें एकवीस । गौतम ह्मणे त्यांचा ध्वंस । तोचि मोक्ष तरी हें परमहंस । अद्वैतानुभवीही मानिती ॥ ८७ ॥ जीवांस अखंड ब्रह्मत्व । ब्रह्माचि मोक्षसुख हें तत्त्व । दुःखनाशें मुक्तत्व । अद्वैतसिद्धांतही ऐसा ॥ ८८ ॥ एवं अंतरीं अद्वैत । बहिरंग कार्यार्थ धरिलें द्वैत । अगत्य वेदविरुद्ध मत । खंडावया ॥८९ ॥ परी हें नेणती लोक । गोड वाटती गौ-

१ अधम. २ कर्म, उपासना, आणि ज्ञान, अशीं तीन कांडें. ३ ज्ञानी. ४ प्रत्यक्ष आहे तेंच खरें व दुसरें खोटें असें ह्मणणारे. ५ परका. ६ नाश.

तमतर्क । ह्मणूनि ते अद्वैतअर्क । न पाहती जाले दिवांध ॥ ९० ॥ श्रद्धा उपजली वेदीं । परंतु जाले कुतर्कवादी । तेही वळले अभेदीं । जसे तसे ॥ ९१ ॥ कळलियाही निर्गुण । मागुतीं भजावा सगुण । ऐसें बोलतां ते तर्कनिपुण । हांसती शास्त्रासी ॥ ९२ ॥ कीं संसार स्वप्न ज्यांच्या मतें । निर्गुणात्मा ओळखिला जागृतें । पुन्हा मायिक सगुणभक्ति त्यांतें । कां बोलती ॥ ९३ ॥ आतां सांगावें त्यांस सार । कीं कळलें जऱ्ही निर्विकार । तरी मन झालें पाहिजे तदाकार । या निमित्तें सेव्य गुरुदेव ॥ ९४॥ निर्गुणात्मा कळल्यावरी । गुरुदेवाची भक्ति करी । तेव्हां अपरोक्ष बरवेपरी । बिंबे हें तों श्रुतिसिद्ध ॥९५॥ श्रुतिः॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः॥ टीका॥ श्रुति ह्मणे देवाची भक्ति । तैशीच गुरुचरणीं अनुरक्ति[3] । तेव्हां त्या गुरूच्या उक्ति । प्रकाशती याला ॥ ९६ ॥कीं ब्रह्म ओळखे बुद्धि । मग गुरुदेवभक्तीनें स्थैर्यसिद्धि । करावी या रहस्यांची प्रसिद्धी । जेव्हां त्यास ॥ ९७॥ तेव्हां कठिण वाटोनि मुक्ति । या शास्त्रीं न धरितील अनुरक्ति । ह्मणोनि निर्गुण कळे तोंचि भक्ति । शास्त्रकार ह्मणती सगुणाची ॥९८॥ परंतु भाव ऐसा चित्तीं । कीं जे निर्गुणात्मत्व समजती । ते गुरुदेवाची प्रीति । धरितीलचि अत्यंत ॥ ९९ ॥ साकरेच्या औषधीं । रोगनिवृत्तीचीच अवधी । गोड ह्मणोनि निरोगीही कधीं । न सोडी साकर ॥ १०० ॥अमर जाले अमर । तरी पिती अमृत सादर । न सांगतांही हा प्रकार । जीवन्मुक्त[4]ही करतील ॥१ ॥ एवं मूर्खसमजावणीकारणें । अगत्य लागलें अंगीकारणें। कीं निर्गुण कळल्या सगुण । कां भजावें ॥ २ ॥ कीं शास्त्राचा आरंभकाळ । ऐसाच होता कीं लोक सकळ । कुतर्कवादी प्रबळ । जसे तसे आणावे सन्मार्गीं ॥ ३ ॥ हें न कळूनि अंतरंग । शब्दज्ञानी जे बहिरंग । त्यांस भजनत्यागप्रसंग । प्राप्त जाला ॥ ४ ॥ जडनिषेधें चैतन्य । इतकेंचि कळतां मानिती धन्य । मनांत थारा जघन्यें[5] । विषयवासनेचा ॥ ५ ॥ सगुणाची अद्वैतभक्ति । करितां पूर्वील विषयविरक्ति । दृढ होतां होय मुक्ति । हें शब्दज्ञानी नेणती ॥ ६ ॥ पिसाटाच्या करीं कोलित । तैसें त्यांस शास्त्रसंमत । परी त्यांचा अंतरंग सिद्धांत । न कळे त्यांला ॥ ७ ॥ पशूंस पाजावया पाणी । वडिलीं कूप खारवणी । केला ह्मणोनि गोडवणी । न प्यावें काय ? ॥ ८ ॥ असो ते प्रस्तुत शास्त्रवाणी । ऐशी

१प्रत्यक्ष. २ प्रीति. ३ गोप्याची. ४ देहांत असून मुक्त. ५ नीच.

अजी चक्रपाणी । परी मी न पीं तें क्षार पाणी । वडिलीं केलें ह्मणोनि ॥९॥ भवद्रुमातें छेदी शस्त्र । ऐसें तुझें गीताशास्त्र । त्याची दाविती पाठ मात्र । धार लपविती ये रीती ॥१०॥ खड्गास मुख्य पाणी । तैशी भक्तिपर तुझी वाणी । गीतेच्या अंतीं चक्रपाणी । ऐसेंचि बोलिलासि ॥ ११ ॥ अष्टादशाध्यायश्लोक ॥ य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ॥ भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयम् ॥१ ॥ टीका ॥ ज्ञान भक्ति वैराग्य । गीतेंत तिन्ही यथायोग्य । त्यांत भक्ति जो सभाग्य । थोर करूनि सांगे ॥१२॥ गीतासिंधुमथन । करूनि भक्तिसुधेचें कथन । थोर करूनि सांगे जो जन । तो अनायासें मज पावे ॥१३॥ याहूनि पुढील श्लोक । त्यांत ह्मणसी तूं उत्तमश्लोक। कीं तैसा पाहतां त्रिलोक । प्रिय ज्याला न होईल ॥ १४ ॥ कोणी एथें आणिक अर्थ । करिती तो नव्हे समर्थ । पुढें विशद[1] होणार एथें व्यर्थ । ग्रंथ कां जी वाढवूं ॥१५॥ कोण्या मिसें तरी कोणी । गीतार्थ अन्यथा वाखाणी। मज नावडे ती थोरांचीहि वाणी । काय करूं जी श्रीकृष्णा ॥१६ ॥ संसारच्छेदक सार । गीताशास्त्राची भक्तिधार । ते झांकूनि नुसतें निराकार ।मात्र दाविती ॥ १७ ॥जडदेहनिषेधें निराकार । आत्मा कळला हा प्रकार । व्यतिरेकज्ञान[3] प्रथम विचार । हाचि आत्मज्ञानांचा ॥ १८ ॥ उरला प्रपंच देहासहित । हें जड भ्रांतिरूप द्वैत । तेंही ब्रह्मचि कळतां अद्वैत । तत्त्वं आलें अनुभवा ॥ १९ ॥ जडचैतन्यविवेक । या ज्ञानाचें नांव व्यतिरेक । जडीं अनेकीं पाहणें एक । अन्वयज्ञान या नांवें ॥१२०॥ तें कळतां जग । आत्मरज्जूंत होय भुजग । तथापि आत्मसुवर्णीं नाना नग । श्रुति ऐसें वर्णिती ॥ २१ ॥ कीं रज्जू कळलियाउपरी । सर्प दिसो नये वरी। जीवन्मुक्तास[6] तरी । प्रपंच दिसतो ॥ २२॥ जरी दिसे यथापूर्व जग । तरी सोनेंचि नुसतें जैसे नग । सुवर्णयाचकास उबग[5]। कां आकाराचा येईल ॥ २३ ॥ एवं प्रपंच दिसे । तथापि ब्रह्मचि असे । सगुणभक्ति समरसे । ते या प्रकारें॥२४॥ ब्रह्मविद्येचें वैभव । ऐसा सगुणभक्तीचा अनुभव । गीतेंत थोर हा भक्तिभाव। सर्वत्र असे वर्णिला ॥ २५ ॥ ऐसें ब्रह्म तेंचि सगुण । ऐसा ज्ञाननिष्ठ भक्त निपुण । भगवंत भागवत ऐशी खूण । जेथें वेगळी न सांपडे ॥ २६॥

१ संसाररूप वृक्षातें. २ स्पष्ट. ३ जडचैतन्यविवेक. ४ आत्म्यांस जाणण्याचा. ५ सार. ६ देहांत असून मुक्त. ७ ऐक्यभाव पावते ८ आत्मज्ञान.

सगुण ब्रह्म चराचर ॥ गीतेंत या ज्ञानाचा आदर । ह्मणूनि धर्म्यपद वारंवार । या ब्रह्मज्ञानीं योजिलें ॥ २७ ॥ नवमाऽध्यायश्लोकार्ध ॥ " प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् " ॥ द्वादशाऽध्यायश्लोकार्ध ॥ " ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते " ॥ अष्टादशाऽध्यायश्लोकार्ध ॥ "अऽध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः " ॥टीका ॥ एवं ऐसें धर्म्यपद । भगवान् बोले प्रतिपद । याचा अर्थ विशदें । न बोलती कोणी ॥ २८ ॥ निर्धर्म ह्मणजे निर्गुण । सधर्म ह्मणजे सगुण । धर्म्यपदें दावी खूण । विश्वात्मज्ञानाची ॥ २९ ॥ पुढें होईल विशद । जे जे ठायीं धर्म्यपद । हें मंगलाचरणीं कृष्णपद । स्मरतां आठवे समग्र गीता ॥१३०॥ याकारणें जी भगवंता । यथास्थित हे तुझी गीता । वाखाणावी ह्मणोनि होता ।बहुतकाळ संकल्प ॥३१॥ आणि तुझ्या कृपेचे विभागी । शिष्य संत भक्त योगी । ते ह्मणती कीं जगदुपयोगी ॥ ऐशी टीका करावी ॥ ३२ ॥ परंतु देवकीनंदन । जेव्हां देईल अनुमोदन। तेव्हांच करूनि त्यातें वंदन। करीन पोटीं हा भाव ॥३३॥ तें अनुमोदन भिन्नत्वें असेना । हृदयीं दाटली गीतार्थरचना । बुद्धिप्रेरकाची मना । तेंचि आज्ञा वाटली ॥ ३४ ॥ आत्माचि तूं निखिल । जो बुद्धि प्रकाशी निर्मळ । टीकारंभीं केवळ । तोचि आज्ञा वाटली ॥ ३५ ॥ करूनि तुझें स्मरण । ध्यानीं चिंतूनि चरण । आरंभिलें मंगलाचरण । प्रथम ओवी संस्कृत ॥ ३६ ॥ विश्वरूपें करूनि स्मरण । भगवत्पदें मंगलाचरण । सात ओविया होतां पूर्ण । आरंभिली ओवी आठवी ॥ ३७ ॥ ओवी लिहितां आठवी । तुज गुरुरूपें आठवीं । यतिरूपीं स्मरतां आठवी । अवतारमूर्ति दीससी ॥ ३८ ॥ करीं वागोरे सारथी । बैसला अर्जुनाचे रथीं। तोचि वामनमनोरथीं । टीका करितोसि गोविंदा ॥ ३९ ॥ तूंचि लेखणी तूंचि मसी । तूं पत्र विचित्रपदें होसी । तूंचि अर्थ भावार्थ स्फुरसी । तूंचि ऐसा अनुभव ॥१४०॥ तूंचि वामनरूपें दीससी ।त्रिविक्रम तूंचि अनुभवीं होसि । स्फुरोनि विश्वरूपें उरसी । अनंतत्वें सर्वदा ॥ ४१ ॥ हेंचि तुझें मंगलाचरण । आतां स्मरोनि तुझे चरण । गीतार्थाचें विवरण। करीन तुझ्या प्रसादें ॥ ४२ ॥ धृतराष्ट्राचे पुत्र शत । पांच पांडूचे सुत ॥ सैन्य मेळवून बहुत । झगडों पाहती कुरुक्षेत्रीं ॥ ४३ ॥ धृतराष्ट्र हस्तिनापुरीं ।

१ स्थावरजंगमात्मक जग. २ उघडा. ३ ईश्वराची. ४ सर्व. ५ कृष्ण. ६ शाई. ७ विष्णूचें बटुरूप अथवा स्वयें वामनपंडित. ८ विष्णूचें त्रैलोक्यव्यापिरूप.

अंध ह्मणूनि राहिला घरीं । त्यास वर्तमान श्रुत करी । संजय शिष्य व्यासाचा ॥ ४४ ॥ संजयाकारणें ऐसें । त्यास सामर्थ्य दिधलें व्यासें ॥ कीं दों सैन्यांत जें जैसें । वर्तेल तें कळावें तयास ॥ ४५ ॥ धृतराष्ट्र संजया । प्रश्न करी हे जनमेजया । वैशंपायन वदे तेथूनि या । आरंभ भगवद्गीतेचा ॥ ४६ ॥ व्यासशिष्य वैशंपायन । जनमेजय परीक्षितीचा नंदन । तो त्यास ह्मणे संजयाप्रति प्रश्न । करितो राजा धृतराष्ट्र ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥ धृतराष्ट्र उवाच ॥ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

॥ टीका ॥ धृतराष्ट्र अंबिकापुत्र । ह्मणे संजया कुरुक्षेत्र । धर्मपिकाचें परम क्षेत्र । उभय पक्ष तेथें मिळाले ॥ ४८ ॥ युद्धाची अपेक्षा मनीं । ऐसे दोन्ही पक्ष मिळोनी । कुरुक्षेत्रभूमी पावुनी । तेथें काय करिते जाले ॥४९॥ त्यांत माझेच एक शत । दुर्योधनादिक सर्वांस विदित । ते पांच पांडूचेहि सुत । होतीच कीं ॥ ५० ॥ कुंती माद्री पांडूच्या स्त्रिया । जरी आणिकांपासूनि गर्भ तयां । तरी अगा संजया । पांडूचेचि ह्मणोनि मानितों ॥ ५१ ॥ त्यांत धर्मराज धर्मसुत । तो धर्मी अत्यंत रत । आणि कुरुक्षेत्र धर्माचें शेत । परी झगडूंच पाहे तो तेथें ॥५२॥ आपण पांडूचे क्षेत्रज । हें तों आपल्याच बापाचें बीज । धर्मक्षेत्रीं धर्मगुज । सुचावें हें धर्मराया ॥५३॥ धर्मतत्त्व ऐसें असोनि । युद्धाचीच इच्छा धरूनि । माझे आणि पांडूचे तेहि मिळोनि । करिते जाले काय सांग ॥ ५४ ॥ या भावें कुरुक्षेत्र । त्यास ह्मणे धर्मक्षेत्र । "मामका एव" ह्मणिजे माझेच पुत्र । "पांडवाश्च" ह्मणजे पांडूचेही ॥५५॥ भावार्थ विशदें ऐसा जाला । तो या श्लोकाचमध्यें निघाला । पाल्हाळ पदरचा नाहीं घातला । पदें योजूनि पाहणें ॥ ५६ ॥ जिकडे कृष्ण तिकडे जय । श्री नीति धर्म अव्यय[3] । उत्तर देईल ऐसें संजय । श्लोकीं अंतीं गीतेच्या ॥ ५७ ॥ प्रस्तुत दोन्ही पक्ष मिळाले । प्रश्न कीं ते काय करिते जाले । त्याचेंचि उत्तर बोले ॥ संजय ॥ ५८ ॥

॥ श्लोक ॥ संजय उवाच ॥ दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

॥ टीका ॥ व्यूहरचनेनें रचलें । तें पांडवांचें सैन्य देखिलें । देखोनि दुर्यो-

---

१ शेत. २ उघड. ३ अविनाशी ब्रह्मस्वरूप.

धनें काय केलें । संजय ह्मणे तें आइक ॥ ५९ ॥ तेव्हां राजा दुर्योधन । द्रोणाचार्याप्रति हें वचन । जवळी येऊन भाव गहन । बोलता जाला ॥ १६० ॥

॥ श्लोक ॥ पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

॥ टीका ॥ अजी आचार्य मोठी हे । पांडुपुत्रांची सेना पाहें । व्यूहरचनेनें रचिली आहे । तुझ्याच शिष्यें ॥ ६१ ॥ जी तुमचा शिष्य परी । तुह्मांपरीस शहाणा भारी । हा भाव धरूनि अंतरीं । बुद्धिमंत ह्मणे द्रुपदपुत्र ॥ ६२ ॥ कीं तुमच्या वधालागीं वैरी । द्रुपद पुत्र उत्पन्न करी । तो तुमचेच पाय धरी । विद्या सांगा ह्मणोनि ॥ ६३ ॥ तो बुद्धिमंत ह्मणे द्रुपदपुत्र । तुह्मी शहाणे नव्हां अणुमात्र[१] । कीं आपला मृत्यु तो पात्रे[२] । केला शस्त्रास्त्रविद्येशीं ॥ ६४ ॥ भाव कीं या महत्कार्या । ह्मणीं ऐसाच आचार्या । असावध होसी गुरुवर्या । ह्मणोनि व्यंगोक्ति[३] बोलतों ॥ ६५ ॥ आतां तरी सावध राहें । ह्मणोनि ह्मणतों हे वीर पाहें । कीं बहुतेक जो तो आहे । महारथी यांत ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥ अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥
धृष्टकेतुश्चेकितानः काशीराजश्च वीर्यवान् ।
पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥
युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ धनुष्यें ज्यांचीं थोर थोर । या सैन्यांत उभे समोर । ते भीमार्जुनांसमान शूर । या युद्धीं ॥ ६७ ॥ सात्यकी विराट द्रुपद । हाही महारथ विशद । तो तुझा वैरी दुर्मद । आचार्या ॥ ६८ ॥ धृष्टकेतु चेकितान । काशीराज वीर्याचें[४] निधान । पुरुजित्कुंतिभोज यांसमान । नरश्रेष्ठ हा शैब्यही ॥ ६९ ॥ युधामन्यु विक्रमेंयुक्त । उत्तमौजा वीर्यवंत[५] । अभिमन्यु द्रौपदीसुत । हे महारथी सकळही ॥ १७० ॥ दहा सहस्र धनुर्धर । त्यांशीं झगडे एक वीर । शस्त्रास्त्रप्रवीण नर । तो महारथ बोलिजे ॥ ७१ ॥ अगणितांशीं करी युद्ध । शस्त्रास्त्रविद्येनें समृद्ध[६] । तो अतिरथ ह्मणोनि प्रसिद्ध । या महाभारतीं ॥ ७२ ॥ एकाशींच युद्ध करी । रथी ह्मणावा यापरी ।

---

१ किंचिन्मात्र. २ योग्य. ३ टोमणा देतों. ४ पराक्रमी. ५ शूर. ६ परिपूर्ण.

त्याहूनि उणा जरी । अर्धरथ ॥ ७३ ॥ हें आइकोनि वीरें[1] । झणीं ब्राह्मण होय अधीर । ह्मणूनि त्यास देतो धीर । वर्णूनि योद्धे आपले ॥ ७४ ॥

॥ श्लोक ॥ अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥

॥ टीका ॥ आमचे तों विशिष्ट । वीर त्यांहूनि वरिष्ट । तुज कळावया स्पष्ट । द्विजोत्तमा सांगतों ॥ ७५ ॥ माझ्या सैन्याचे पति । कळावे ह्मणूनि तुजप्रति । सांगतों ह्मणे कुरुचक्रवर्ति । द्रोणातें ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥ भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।
अश्वत्थामा विकर्णश्च सोमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥

॥ टीका ॥ तूं द्रोण भीष्म कर्ण । विजयी कृप अश्वत्थामा विकर्ण । तैसाच भूरिश्रवा वीर्यपूर्ण । पुत्र सोमदत्ताचा ॥ ७७ ॥ हे थोर थोर सैन्याचे नायक । यांवेगळे शूर अनेक । तेही ह्मणतो ऐक । दुर्योधन द्रोणातें ॥ ७८ ॥

॥ श्लोक ॥ अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ आणिकही शूर बहुत । मजकारणें मरतील निश्चित । जे नाना शस्त्रांसहित । चतुर युद्धीं सकळही ॥ ७९ ॥

॥ श्लोक ॥ अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

॥ टीका ॥ आमचे वीर असे । ह्मणूनि तें सैन्य असमर्थ दिसे । भीष्में रक्षिलें असे । समर्थ हें सैन्य आमुचें ॥ १८० ॥ ज्यांत पूर्वोक्त वीर । आणि भीष्म ज्यांस रक्षणार । तो समर्थ कां न दिसे भार[2] । भाव ऐसा ॥८१॥ या पांडवांचा भार[3] । त्यास तों भीम रक्षणार । तो काय सरी पावणार । या भीष्माची ॥ ८२ ॥ भीष्म इच्छामरणें अमर । आणि निःसीम धनुर्धर । भीम टोणपा[4] मुष्कर । बलाढ्य जाला तरी काय ॥ ८३ ॥ या श्लोकाचा अर्थ । प्रकारांतरें दिसे तो व्यर्थ । कीं आमुचें अपूर्ण असमर्थ । समर्थ सैन्य पांडवांचें ॥ ८४ ॥ कीं द्रोण भीष्मादि मनीं । सख्य करावें ह्मणूनि । हा बोलता भय मानूनि । तरि ते ह्मणते सख्य करीं ॥ ८५ ॥ मी जिंकेन हा भरंवसा । ह्मणूनि युद्धाचा वळसा[5] । तो कां बोलेल ऐसा । कीं समर्थ बळ

---

१ योद्धा. २ कदाचित्. ३ सैन्य. ४ न ठेंचलेला रेडा. ५ घोंटाळा.

पांडवांचें ॥ ८६ ॥ आतां समर्थ जरी आपण । तरी ह्मणे सावधपणें । तुह्मी असा हे नीतिनिपुण । नीति सांगे ॥ ८७ ॥

॥ श्लोक ॥ अयनेषु च सर्वेषु यथा भागमवस्थिताः ।
भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥

॥ टीका ॥ अजी भीष्म सेना रक्षणार । व्यूहरचना रचणार । परंतु त्यास जतन करणार । तुह्मी सकळ ॥ ८८ ॥ चुकवूनि भीष्माचीं नयनें । व्यूह भेदायाचीं स्थानें । त्यांस ह्मणिजे अयनें । तीं आश्रयस्थळें शत्रूसि ॥ ८९ ॥ ऐसें जें जें स्थळ । तें यथाविभागें सकळ । सावध राहूनि केवळ । भीष्मातेंचि रक्षणें ॥ १९० ॥ वृष्टिशीतोष्णपरिहार । करीतसे ज्यांचें घर । ते मिळोनि सर्वही नर । जतन करिती त्या गृहा ॥ ९१ ॥ ऐसें भीष्माचें गौरव[1] । वाढवूनि बोले कौरव । तें ऐकतां अभिनव[2] । स्फुरण आलें भीष्मातें ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥ तस्य संजनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

॥ टीका ॥ पितामह[3] भीष्म कुरुवृद्ध । आणि प्रतापें परम प्रसिद्ध । त्या दुर्योधना हर्षें समृद्ध[4] । करी सिंहनादें ॥ ९३ ॥ सिंहनादाची आरोळी । आणि शंख वाजवी महाबळी । कीं दुर्योधनाचे हृदयकमळीं । हर्ष उपजो ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥ ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ भीष्माचा शंख वाजतां । त्याच समयीं न विचारितां । अकरा अक्षौहिणींत अवचितां । वाद्यें वाजलीं ॥ ९५ ॥ शंख भेरिया पणव । आणखी नाना वाद्यसंभव । ध्वनि तुंबळ अभिनव[5] । उत्पन्न जाला ॥ ९६ ॥ ऐशी संजयाची वाणी । वर्णूनि कौरवांची कहाणी । आतां ज्या दळीं चक्रपाणी । ते कथा एथून सांगतों ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥ ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ त्यानंतर ह्मणे संजय । ज्यास यशवर्ण श्वेत[6] हयें[7] । त्या रथीं माधव मूर्तिद्वय ॥ पांडवही दिसे जनदृष्टीं ॥९८॥ माधवाकडे "एव" कार । पांडवाकडे "च"कार । लावूनि ऐसा अर्थविचार । सुचवी शिष्य व्यासाचा ॥ ९९ ॥ माधव एव ह्मणजे त्या रथीं । माधवच सारथी आणि रथी । अर्जुन

---

१ मोठेपणा. २ अद्भुत. ३ आजा. ४ पूर्ण. ५ फार मोठा. ६ पांढरे. ७ घोडे.

वांटे जनमनोरथीं । तरी पांडवश्च ह्मणजे तोही ॥ २०० ॥ कीं हरावया भूभार । कृष्णजयशक्ति अर्जुनाकार । सर्वात्मभावें तो निर्विकार । माधव एव पांडव ॥ १ ॥ एवं श्वेताश्वयुक्त रथीं । श्रीमाधव भक्तांचा सारथी । आणि पांडुसुत अर्जुन रथी । वाजविते जाले दिव्य शंख ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ नामार्थ शंखांचे क्रूर । ते न सांगतां न होतां निष्ठुर । नांवेंचि सांगोनि ऊर । फोडी धृतराष्ट्ररायाचा ॥ ३ ॥ गुरुपुत्र सागरीं बुडाला । तो यमापासूनि कृष्णें आणिला । पंचजननामा असुर मारिला । समुद्रांत आधीं ॥ ४ ॥ समुद्रासि गुरुकुमार । दे ह्मणतां ह्मणे सागर । पंचजननामा शंखाकार । असुर आहे मजमाजी ॥ ५ ॥ त्याणें गिळिला असेल । ऐसा समुद्राचा बोल । आइकोनि सिंधु सखोल । तेथें प्रवेशे श्रीकृष्ण ॥ ६ ॥ शंखाचें फाडितां उदर । न सांपडतां गुरुकुमार । शंखाकार पंचजनशरीर । जाला पांचजन्य कृष्णाचा ॥ ७ ॥ तो पंचजन वधूनि । गुरुपुत्र यमापासूनि । आणिला हें आइकोनि । धृतराष्ट्र जाणे ॥ ८ ॥ कृतांताच्या मुखांतूनी । गुरुपुत्र आणिला जो वधूनि । तो शंख वाजवी ह्मणूनि । स्मरण संजय देतसे ॥ ९ ॥ जिकडे कृष्ण तिकडे जय । त्यास नाहीं मृत्युभय । पांचजन्य शब्दीं संजय ॥ न बोलतां भाव सूचवी ॥ २१० ॥ अर्जुनाचा देवदत्त । जो खांडवदाहीं अग्निदत्त । जिकडे तो तिकडे निश्चित । जय ऐसें सूचवी ॥ ११ ॥ पौंड्रनामक क्रूर । शंख वाजवी वृकोदर । जो घटघटां रक्त पिणार । दुःशासनाचें ॥ १२ ॥ जयास हेतु कृष्णार्जुन । परी तुझे पुत्र भीमसेन । मारील हा अर्थ गहन । शंखप्रसंगें सूचवी ॥ १३ ॥ भाव कीं बोकड माते । तो आपले तोंडीं मुते । भ्रातृपत्नी द्रौपदीतें । नग्न करूं आरंभिली ॥ १४ ॥ ऐशा बोकडांसि गिळी । तो लांडगा भीम बळी[1] अतएव तो एक या कुळीं । भीमकर्मा ॥ १५ ॥ पोटीं निर्दय निष्ठुर । म्हणोनि नांव वृकोदर । वृक लांडगा तैसें उदर । दयाहीन म्हणोनि ॥ १६ ॥ हा भावार्थ गहन । खोंची धृतराष्ट्राचें मन । आतां संजय वचन । काय बोले आणिक ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥ अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

---

१ काळाच्या. २ खांडववनाच्या दहनवेळीं. ३ अग्नीनें दिलेला.

॥ टीका ॥ कुंतीपुत्र राजा युधिष्ठिर । अनंतविजयनामें सुंदर । वाजविती शंख माद्रीकुमार । सुघोष मणिपुष्पक ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक्पृथक् ॥ १८ ॥

॥ टीका ॥ काशीचा क्षितिपति । धनुष्य थोर ज्याचे हातीं । आणि जो शिखंडी म्हणती । महारथ त्यासही ॥ १९ ॥ धृष्टद्युम्न विराट सात्यकी । जो जिंकिला न जाय या लोकीं । शंख इत्यादि अनेकीं । वाजविले ॥२२०॥ द्रुपद आणि द्रौपदीसुत । अभिमन्यु वीर अत्यद्भुत । आणिक वीर जे बहुत । सकळीं शंख वाजविले ॥ २१ ॥ शंखांचीं नांवें संजय । सांगतां धृतराष्ट्र मानी भय ॥ घोष वर्णितांही निश्चित जय । तेंचि सुचवी यावरी ॥ २२ ॥

॥ श्लोक ॥ स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवींचैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

॥ टीका ॥ धृतराष्ट्रा तुझे सुत । जे धार्तराष्ट्र एक शत । त्यांचें हृदय निश्चित । विदारिलें त्या घोषें ॥ २३ ॥ पृथिवी आणि आकाश । तुमुलनादें निरवकाश । गर्जवूनि करी प्रवेश । हृदयीं तुझ्या पुत्रांच्या ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥ अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥

॥ टीका ॥ संजय ह्मणे यानंतर । ते धृतराष्ट्राचे कुमार । धैर्य धरूनि पुन्हा सादर । उभे राहिले ॥ २५ ॥ शस्त्रें हाणों लागले । तों पांडवही सरसावले । हेही कांहीं हाणिते जाले । प्रवर्तला शस्त्रपात ॥ २६ ॥ प्रवर्ततां शस्त्रपात । गांडीव घेऊनि हातांत । काय करिता जाला पंडुसुत । संजय ह्मणे परिस तें ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥ हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥

॥ टीका ॥ तेव्हां हृषीकेशाप्रती । हें वाक्य वदे गा महीपती । कीं दों सेनेंत क्षिती । उभा करीं रथ तेथें ॥ २८ ॥ हृषीकें ह्मणजे इंद्रियें । त्यांचा ईश जो चाळी स्वयें । कृष्ण हृषीकेश या अन्वयें । त्यातें तेव्हां हें बोले

॥ २९ ॥ जो वदवी वागिंद्रियों । अर्जुन वदे त्या अव्यया । कीं अच्युता रथास या । उभा करीं दों सेनेंत ॥ २३० ॥ एवं कृष्णचि बोलवितो । संजय हा भाव सुचवितो । कीं एथून अर्जुन तो । युद्ध न करी ह्मणेल ॥ ३१ ॥ तें-ही कृष्णचि बोलवील । आणि जेव्हां कुरुसेना दावील । कृपा तोचि उपज-वील । युद्ध न करीं ह्मणावया ॥ ३२ ॥ त्या प्रसंगें हे गीता । उपदेशूनि तत्त्वता । त्याची अज्ञानयुक्त अहंता । विश्वरूपें नाशील ॥ ३३ ॥ कीं कृ-ष्ण सकळांचा हंता । आपणास कां हे अहंता । आत्मज्ञानें अकर्तृता । देणार आतां पार्थातें ॥ ३४ ॥ साध्य व्हावया राज्यपद । सारथ्यार्थ वंदिलें पद । परी हा देणार परंपद । तें या उपदेशें देतसे ॥ ३५ ॥ शत्रु नाशावे कौरव । हें सारथ्यफलगौरव । परी हा अज्ञाननाशक देव । तें या उपदेशें नाशि-तो ॥ ३६ ॥ आत्मस्वरूप न कळणें । हें अज्ञानआवरण । रज्जू न कळतां सर्पसत्यपण । तो विक्षेप जडभ्रांति ॥ ३७ ॥ अष्टमाध्यायीं मूलावरण । नाशील आणि जडभ्रांतिपण । नवमीं नाशील कमलेक्षण । या सारथ्यप्रसं-गें ॥ ३८ ॥ हरावया तृषा मात्र । अमृत प्याला तृषार्त । तें अजरामर नि-श्चित । करी सहज गुण त्याचा ॥ ३९ ॥ पाकाकारणें नर । जरी पेटवी वैश्वानर । तरी तो नाशीच सत्वर । शीत तम यां दोहींतें ॥ २४० ॥ का-पावया तृण । परीस मानूनि सहज पाषाण । पाणी पाजितां विळा सुवर्ण । होय गुण हा परिसाचा ॥ ४१ ॥ ज्यांत जो महिमा पूर्ण । तो आपला दा-वीच गुण । आतां सारथि केला श्रीकृष्ण । तो कैंवि महिमा न दावी ॥४२॥ प्रस्तुत गीता या मिसें । आम्हां दीनांच्या कृपारसें । प्रकट करूं पाहे म्हणूनि ऐसें । हृषीकेश म्हणे संजय ॥ ४३ ॥ हृषीकें इंद्रियें म्हणावीं । त्यांचा ईश चाळक गोसांवी । तो हृषीकेश त्यातें बरवीं । हीं वचनें बोले अर्जुन ॥ ४४॥ संजय म्हणे गा महीपति । ऐसा कृष्ण हृषीकपति । जो त्यास बोलवी त्याप्र-ति । हें वाक्य बोले अर्जुन ॥ ४५ ॥ कीं श्रीअच्युता स्वामी । या दों सैन्यां-त जे भूमि । तेथें अजी अंतर्यामी । उभा करीं रथ माझा ॥ ४६॥ तेथें कोण काळवरी । रथ उभा करूं म्हणेल श्रीहरी । म्हणूनि जो आशय अंतरीं । तो बोलतो अर्जुन ॥ ४७ ॥

---

१ वाचेला. २ अविनाशी, ईश्वर. ३ ज्यास च्युति ह्म० पतन नाहीं, असा जो परमात्मा तो. ४ विश्वरूप दाखवून. ५अकर्तेपणा. ६ मुक्ति. ७ आच्छादन.८ विपरीत ज्ञान. ९ प्रत्यक्ष जे पदार्थ ते सत्य असा जो भ्रम.१०कमलनेत्र कृष्ण. ११अग्नि.

॥ श्लोक ॥ यावदेतान्निरीक्षेहं योध्दुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥ २२ ॥

॥ टीका ॥ युद्धकामना मनीं । धरूनि उभे एथें येउनी । त्यांस जों मी पाहेन नयनीं । तोंवरी ॥ ४८ ॥ कीं या रणाच्या उद्यमीं । कोणाकोणांशीं संग्रामीं । म्यां झगडावें जें हेंचि मी । पाहेन ॥४९॥ करावया युद्ध । भीष्मादि जे कुरुवृद्ध । इतर राजे तेही प्रसिद्ध । ठावके आहेत सर्वही ॥२५०॥ आतां पाहावें तें काय । ऐसें म्हणेल हा अव्यय । म्हणोनि जो हृदयीं निश्चय । तो म्हणे बोलों निज भाव ॥ ५१ ॥ कीं युद्ध करणें उचित । नव्हे यांशीं निश्चित । हें बोलों जातां चित्तांत । पुन्हा शंकला ॥ ५२ ॥ कृष्ण म्हणेल जरी । तुज उचित न वाटे तरी । हे कां मिळाले समरीं । तुजशीं युद्ध करावया ॥ ५३ ॥ तरी हे स्वयें नाहीं मिळाले । संकटेंकरूनि युद्धासि आले । स्वयें पाहतां भले । पाहेन म्हणतो ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥ योत्स्यमानानवेक्षेहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ युद्ध करणार यांतें । पाहेन जे हे आले एथें । दुर्योधनाचें प्रिय इच्छिती चित्तें । जे या युद्धीं ॥ ५५ ॥ आतां म्हणेल कीं हे भले । तरी यांस कां न निषेधिते जाले । म्हणूनि अर्जुन बोले । कीं धार्तराष्ट्र दुर्बुद्धि ॥ ५६ ॥ हे तों निषेधिते जाले । निषेधितां नाहीं भ्याले । आतां अगत्यास आले । प्रिय इच्छूनि दुष्टबुद्धीचें ॥ ५७ ॥ परी यांस हें नव्हे प्रिय । हा भाव दावी धनंजय । हृदयामध्यें निश्चय । भीष्मवचनाचा ॥ ५८ ॥ भीष्म वदला धर्मास । कीं अर्थाचा पुरुष दास । बांधलें दुर्योधनें आम्हांस । निजधनें ॥ ५९॥ " ॥ भीष्मोक्त श्लोक ॥ अर्थस्य पुरुषो दासो दासस्त्वर्थो न कस्यचित् । इति सत्यं महाराज बद्धोस्म्यर्थेन कौरवैः ॥ " ॥ टीका ॥ अर्जुन मनीं या श्लोका । स्मरूनि म्हणे उत्तमश्लोका[1] । दुर्बुद्धि दुर्योधना एका । युद्धापेक्षा न इतरांसि ॥ २६० ॥ संतापें म्हणे अर्जुन । कीं दुष्टबुद्धि दुर्योधन । भाव कीं या प्रसंगें स्वजन । कैसे युद्धीं मारावे ॥ ६१ ॥ तथापि पाहों नयनीं । कीं देखतां काय वाटेल मनीं । म्हणे कृष्णास म्हणोनी । कीं या सकळांस पाहेन ॥ ६२ ॥ या दों श्लोकीं हा अर्थ । प्रकट भावार्थ यथा-

---

१ उत्तमकीर्ति ज्याची तो; ईश्वर.

र्थ । हा भाव न काढितां व्यर्थ । पुनरुक्ति एथें बोलाची ॥ ६३ ॥ युद्धकामन । मनीं । त्यांस मी पाहेन नयनीं । हें पूर्वश्लोकेंकरूनी ॥ बोलिलाच कृष्णासि ॥६४॥ या युद्ध करणारांतें । पाहेन जे आले आहेत एथें । हे दुसऱ्या श्लोकें पार्थे । पुनरुक्ति कां हो वदावी ॥ ६५ ॥ यालागीं हाचि अर्थ । सिद्ध जाला समर्थ । हृषीकेशशब्दभावार्थ । जो पूर्वी एथें निरूपिला ॥ ६६ ॥ हे सकळ कृष्णकरणी । दया घातली अंतःकरणीं । म्हणोनि पुन्हा हृषीकेशस्मरणीं । वाणी योजी संजय ॥ ६७ ॥

॥ श्लोक ॥ संजय उवाच ॥ एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ संजय म्हणे हृषीकेश । त्याप्रति ऐसा गुडाकेश । दाखवी भावलेश ॥ तो तुज राया वदलोंचि ॥ ६८ ॥ त्याचीं हृषीकें इंद्रियें । त्यांस प्रेरी कृष्ण स्वयें । म्हणोनि ऐसें वदला निश्चयें ॥ स्वबुद्धि नव्हे अर्जुनाची ॥ ६९॥ हो अर्जुनाची नव्हे बुद्धि । या अर्थाची घडे सिद्धि । ह्मणोनि अर्जुनाची लोकप्रसिद्धि । त्याच्या नांवेंचि सुचवितो ॥ २७० ॥ कीं तो अर्जुन गुडाकेश । गुडाका निद्रा तिचा ईश । निद्रा भ्रांति तिचा प्रवेश । न घडे बुद्धींत अर्जुनाच्या ॥७१॥ तोच भ्रांतीचा ईश । ज्याच्या मनीं ते न करी प्रवेश । या भावें ह्मणे गुडाकेश । अर्जुनातें ॥ ७२ ॥ हींच कृष्णार्जुनांचीं नांवें । द्वितीयाध्यायीं याचि भावें । संजय बोलेल एथें पाहावें । रहस्य हेंचि ॥ ७३ ॥ द्वितीयाध्यायश्लोक ॥ एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप । न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूवह ॥ ॥ टीका ॥ एवं गुडाका निद्रा जे भ्रांती । ती नसे जयाच्या चित्तीं । तो गुडाकेश परी हे मती । प्रेरिलीं श्रीहृषीकेशें ॥ ७४ ॥ ऐसे समयीं दया मनीं । धरूनि परतणें युद्धापासुनी । यांत अपकीर्ति परलोकहानी । हें काय न कळे अर्जुना ॥ ७५ ॥ ज्याणें जिंकिली भ्रांति निद्रा । त्या गुडाकेशा बुद्धिसमुद्रा । भ्रांति न म्हणवे धृतराष्ट्रा नरेंद्रा । हा भाव सुचवी या नांवें ॥ ७६ ॥ एवं हृषीकेशाकरणी । दया घातली अंतःकरणीं । त्याप्रति पूर्वोक्त वाणी । अर्जुन ऐशी बोलिला ॥ ७७ ॥ ऐसा अर्जुन गुडाकेशें । प्रार्थिला त्याणें हृषीकेशें । जगदुद्धार कृपालेशें । केलें तैसेंचि ॥७८॥ परम उत्तम तो रथ । जणूं हरिभक्ताचा मनोरथ । ज्यांत रथी जीवात्मा अतिरथ । सारथी स्वयें हृषीकेश

---

१ निद्रेचा ईश अर्जुन.

॥ ७९ ॥ दोहींकडे उभय दळ । मध्यें जें रिकामें स्थळ । तेथें तो स्यंदन अचळ । उभा केला ॥ १८० ॥ स्थापूनि तेथें रथोत्तम । काय बोलिला सर्वोत्तम । तें वचन सावधान । ऐक सांगतों ॥ ८१ ॥

॥ श्लोक ॥ भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान् कुरूनिति ॥ २५ ॥

॥ टीका ॥ हरिमुखचंद्रचकोर । भीष्म द्रोण राजे थोर थोर । त्यां सकळांही समोर । तो श्रीहृषीकेश बोलिला ॥ ८२ ॥ पार्था मिळाले जे जे हे । आणि या कुरूंतें पाहें । ऐसें बोलूनि उगा राहे । गहन भाव दाखवूनी ॥ ८३ ॥ दुष्टबुद्धि दुर्योधन । त्याकारणें मिळाले स्वजन । म्हणोनि मागें म्हणे अर्जुन । त्यास तैसेंचि दाखवी ॥ ८४ ॥ कीं पाहें या कुरूंतें । आणि भीष्मद्रोणादि गुरूंतें । वृथा उपजवूनि जगद्गुरूंतें । असे गीता उपदेशणें ॥ ८५ ॥ आणि अर्जुनास म्हणे पार्था । यांतही सुचवी भावार्था । कीं कुंतीचें नांव पृथा । पार्थ म्हणजे पृथापुत्र ॥ ८६ ॥ कीं राजपुरुषाचें क्रूर कर्म । दया स्वजनीं स्त्रियांचा धर्म । मातृगुण एथें सगुणब्रह्म । स्वसामर्थ्यें उपजवी ॥ ८७ ॥ पार्था म्हणोनि घननीळ । म्हणे तों फिरे बुद्धीची कळ । ते या अडिचां श्लोकीं निखिल । संजय सांगतो ॥ ८८ ॥

॥ श्लोक ॥ तत्रापश्यत् स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन् पुत्रान् पौत्रान् सखींस्तथा ॥ २६ ॥
श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।
तान् समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥ २७ ॥
कृपयापरयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

॥ टीका ॥ तो पृथेचा पुत्र पार्थ । ज्यास मातृगुणीं योजी समर्थ । जे तेथें मिळाले युद्धार्थ । त्यांतें पाहे ॥ ८९ ॥ तों चुलते पिव्यासमान । आजे भीष्मादि गौरवनिधान । गुरु द्रोणादि जिहीं ज्ञान । दिधलें क्षात्रविद्येचें ॥ १९० ॥ शल्यादिक मातुळ । भाऊ पुतणे पुत्रचि केवळ । नातु कोंवळे किरळ । सखे अश्वत्थामादिक ॥ ९१ ॥ ऐसेच सासरे सोयरे । दोहीं सैन्यांत मरणार सारे । इतर राजे तेही बरे । हितकर्ते बंधुत्वें ॥ ९२ ॥ त्यांस देखोनि तो कौंतेय । कुंतीचा पुत्र जयास अव्यय । मातृगुणीं उपजवी निश्चय ।

---

१ हरिमुखचंद्राचे जे चकोर. २ कृष्णास. ३ मेघश्याम कृष्ण. ४ सर्व. ५ मोठेपणाचे निधि. ६ क्षत्रियांची विद्या, शस्त्रास्त्रविद्या. ७ अंकुर. ८ ईश्वर कृष्ण.

होता जाला कृपाविष्ट ॥ ९३ ॥ युद्ध न करावें म्हणूनि । विषाद उपजला मर्मी । तो कृष्णास या वचनीं । विनवूं पाहे ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥ अर्जुन उवाच ॥ दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।
सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ॥ २८ ॥
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।
गांडीवं स्रंसते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते ॥ २९ ॥

॥ टीका ॥ अर्जुन म्हणे जी कृष्णनाथा । देखोनि या स्वजनांतें व्यथा । मज अत्यंत होते सर्वथा । जे उभे युद्धाकारणें ॥ ९५ ॥ सर्वांग माझें पिळतें । आंत बाहेर मुख वाळतें । शरीर कांपें चळतें । कांटे येती देहासि ॥ ९६ ॥ हातींचें गांडीव[1] गळे । संतापें त्वचा जळे । शोकाग्नि ऐसा पाजळे । हृदयांत ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥ न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ।
निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ॥ ३० ॥

॥ टीका ॥ रथीं उभें राहवेना । भ्रम जाला वाटे मना । केशवा विपरीत नयनां । होणारीं निमित्तें दीसती ॥ ९८ ॥

॥ श्लोक ॥ न च श्रेयोनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ।
न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ कल्याण न दिसे कांहीं । युद्धीं स्वजन मारूनिही । विजयाची चाड नाहीं । राज्यसुखेंहि न लगती ॥ ९९ ॥

॥ श्लोक ॥ किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ।
येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ यांस राज्यार्थ मारावें । तें राज्य घेऊनि काय करावें । भोगांसि कोणीं भोगावें । जीवित्व नलगे जी आम्हां ॥ ३०० ॥ राज्य भोग सुख संपदा । यांचकारणें कीं गोविंदा । मारूनि त्या या स्वजनवृंदा । कोण वांचूं पाहतो ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ।
आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ राज्य करावें ज्यांकारणें । ते हे त्यजूनि धनें प्राणें । अंगीं कारूनि मरणें । युद्धीं उभे ॥ २ ॥ गुरु आणि चुलते ते ऐसे । कीं सख्खे पितृ[2] पांडु तैसे । पुतणे कीं तैसेही पुत्र जैसे । आणि पितामह ॥ ३ ॥

---

[1] अग्नीनें अर्जुनास दिलेलें धनुष्य. [2] बापजी.

॥ श्लोक ॥ मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ।
एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोपि मधुसूदन ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ मामे आणि सासरे । तैसेच नातु शालक सोयरे । प्राणांसमान आप्त सारे । कैसे मारूं मधुसूदना ॥ ४ ॥ देवा तूं मधुसूदन । ह्मणीं देसी अनुमोदन । कीं तुज दैत्यादिकदंन । करणें अगत्य ॥ ५ ॥ आतां म्हणसी हरी । कीं तूं न मारिसी यांतें परी । हे तुज मारिती ते अवसरीं । अगत्य तुवां मारावें ॥ ६ ॥ म्हणोनि म्हणतों यांतें । मारावें हे इच्छा चित्तें । मी जरी न धरीं हे मातें । मारिती ॥ ७ ॥ आतां म्हणेल अच्युत । कीं हें सहज भल्याचें वृत्त । परंतु राज्य साधायाचें निमित्त । प्राप्त झालें ॥ ८ ॥ या राज्याकारणें । अगत्य लागे मारणें । ऐसें हा अंतःकरणें । शंकोनि बोलतो अर्जुन ॥ ९ ॥

॥ श्लोक ॥ अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ।
निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ न घडे यांतें मारणें । त्रैलोक्यराज्याही कारणें । भूमिनिमित्त हें करणें । काय घडे ॥ ३१० ॥ हें बोलूनि शंकला पुन्हा । श्रीकृष्ण ह्मणे अरे अर्जुना । मारितां आततायी जना । पाप नाहीं ॥११॥ ॥स्मृतिः ॥ अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः । क्षेत्रदारहरश्चैव षडेते आततायिनः ॥ ॥ टीका ॥ या स्मृतीचा अर्थविचार । कीं आततायी ह्मणजे सहा प्रकार । अग्नि लावणार विष देणार । शस्त्रही घे जो मारावया ॥ १२ ॥ आणि जो करी धनापहार । स्वक्षेत्र स्त्री हरणार । या सहा आततायींचा मारणार । पापी नव्हे स्मृति ह्मणे ॥ १३ ॥ ॥ स्मृतिः ॥ आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन् । नाततायिवधे दोषो हंतुर्भवति कश्चन ॥ ॥ टीका ॥ स्मृतीचा अर्थ ऐसा । कीं आततायी वर्णिले जे सा । त्यांस मारितांही सहसा । दोष नाहीं ॥ १४ ॥ लाक्षागृहीं अग्नि लाविला । विषप्रयोग भीमास केला । शस्त्रें धरूनि सिद्ध आला । भार तुमच्या वधासि ॥ १५ ॥ कपटें धनादि संपत्ती । हरिली आणि या प्रस्तुतीं । तेरा वर्षें जालीं तरी क्षिती । न देती क्षेत्रापहारक ॥ १६ ॥ दारापहारींही ये रीती । कीं सभेस आणिली द्रौपदी सती । वधायोग्य आततायी होती । ऐशी परी

१ कसल. २ वर्तन. ३ महापराधी. ४ सहा. ५ लाखेचें घर. ६ पृथ्वी.

॥ १७ ॥ ऐसें शास्त्राधारें झणें । झगडेल ह्मणे चक्रपाणी । ह्मणोनि शंकोनि अंतःकरणीं । हा श्लोकार्थ बोलतो ॥ १८ ॥

॥ श्लोकार्थ ॥ पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ यांचें पापचि यांतें । मारूनि या आततायी यांतें । येऊनि आमच्या आशयातें । आश्रय करील आमचा ॥ १९ ॥ आततायी पापी । आह्मीं न मारावे तथापि । कीं यांचें सर्व पाप कदापि । न सोडी आह्मां ॥ ३२० ॥ यांचाच जो पापसंचय । हा यास मारील निश्चय । परी आह्मीं मारितां आश्रय । तें पाप करील आमुचा ॥ २१ भाव अर्जुनाचे चित्तीं । ऐसा कीं देवा या स्मृती । आततायी मारावा ह्मणती । हें अर्थशास्त्र ॥२२॥ दृष्टि ज्याची अर्थावरी । तो जरी आततायिवध करी ॥ तरी त्यास पाप मात्र नाहीं परी । न साधे धर्म ॥ २३॥ ज्यांस जोडणें धर्म । तिहीं न करावें हिंसाकर्म । हें मुख्य धर्माचें वर्म । अजी देवा ॥ २४ ॥ विचारितां वेदवचनीं । " न हिंस्यात्सर्वभूतानि " । पाहतां हिंसेकरूनी । जोडे अधर्म ॥ २५ ॥ अतएव अर्थशास्त्रविहित । तो दुर्बल पक्ष निश्चित । प्रबल त्याहूनि बहुत । धर्मशास्त्र स्मृति ह्मणे ॥ २६ ॥ ॥ स्मृतिः ॥ स्मृत्योर्विरोधे न्यायस्तु बलवान्व्यवहारतः । अर्थशास्त्राच्च बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः ॥ ॥ स्मृत्यर्थ ॥ हे याज्ञवल्क्य ऋषीची उक्ति । याची ऐशी अर्थस्थिति । कीं दों स्मृतींस विरोधप्राप्ति ॥ तेथें युक्ति बलवंत ॥ २७ ॥ आणि अर्थशास्त्राहून । धर्मशास्त्र बलवंत ह्मणोन । याज्ञवल्क्य ह्मणतो यावरून । हे न मारावे सर्वथा ॥ २८ ॥ गुरु आजे बाप । यांस मारितां कैसें नव्हे पाप । जों युद्धीं भीष्मद्रोणप्रताप । तों केंवि मरतो दुर्योधन ॥ २९ ॥ तोही चुलत्याचा सुत । त्याचा वधही नव्हे उचित । लोकविरुद्ध तें निश्चित । नरकातेंचि पाववी ॥३३०॥ ॥स्मृतिः ॥ अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न तु ॥ टीका ॥ जरी धर्म शुद्ध । आणि दिसे लोकविरुद्ध । तो नरकदायक हें सिद्ध । नरक कौरव मारितां ॥ ३१ ॥ यांचा जो पापसंचय । तोच यांस वधी हा निश्चय । परी तें पाप करील आश्रय । आमुचा आह्मीं मारितां ॥ ३२ ॥ ह्मणूनि हें क्रूर कर्म । आह्मीं न करावें हाचि धर्म ॥ ऐसें सिद्ध करूनि परम ॥ हेंचि बोलतो ॥ ३३ ॥

---

१ कदाचित्. २ अभिप्रायास. ३ आश्रय.

॥ श्लोक ॥ तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ यालागीं धृतराष्ट्राचे सुत । तदर्थ मरणार बहुत । यांस मारावें हें उचित । सर्वथा नव्हे ॥३४॥ बरें जरी शास्त्रविरुद्ध । यांच्या वधें सुख तों सिद्ध । ह्मणूनि ह्मणसी तरी हें प्रसिद्ध । स्वजनवधें सुख कैंचें ॥ ३५ ॥ स्वजन मारूनि माधवा । सुखी कैसे होऊं देवा । माधवा मायेच्या धवा । सर्वज्ञा सर्व जाणसि ॥३६॥ आतां ह्मणसी हा विचार । तिहींही करावाच सादर । ते उगे आणि वारंवार । तूंचि कां हे विचार करिसी ॥ ३७ ॥ ह्मणूनि तूंहि अर्जुना । नको करूं कष्टी मना । ह्मणसी मारीं स्वजना । तरी तें आईक बोलतों ॥३८॥

॥ श्लोक ॥ यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

॥टीका॥ आजि हेही हें जाणती । परी लोभें नाशिली त्यांची मती । ह्मणोनि हे न पाहती । या विचारासी ॥३९॥ सर्वांग सुंदर वरिष्ठ । आणि ललाटीं त्यांच्या कुष्ठ । सर्व सौंदर्यास अनिष्ट । तितकेंचि ॥३४० ॥ तैसा राज्यलोभ यांला । दिसत असोनि ऐसें मला । मीही हा दोष आपणाला । दाटूनि कैंवि संपादूं ॥४१॥ लोभें होऊनि नष्टमति । जरी हे हें न पाहती । आह्मी जाणते स्वदुर्गती । कैसी न चुकवावी ॥ ४२ ॥ कुलक्षयें मित्रद्रोह । यांत जो पापसंदोह[1] । तो यांला न कळे पडला मोह । राज्यलोभें ॥ ४३ ॥ परी करितां कुलक्षय । अत्यंत दोषाचा संचय । कळत कैसा न करावा निश्चय । या पापापासूनि परताया ॥ ४४ ॥ हें बोलतां कृष्णाप्रति । शंकली अर्जुनाची मति । कीं मारिता जाला यदुपति[2] । कंस मामा आपला ॥ ४५ ॥ सभेंत मारिला शिशुपाळ । इत्यादि सुहृदांचा हा काळ । स्वजन मारी जो तो फटकाळ[3] । ह्मणूनि ह्मणतो याप्रति ॥ ४६ ॥ या गोष्टीनें याची निंदा । मज घडते बुद्धिमंदा । ह्मणूनि ह्मणतों गोविंदा । जनार्दना ह्मणोनि ॥ ४७ कीं दुष्टजनांचें अर्दन । करितोसि तूं जनार्दन । तूं करावया असुरमर्दन । धरिसी अवतार ॥ ४८ ॥ तूं कर्मातीत सर्वेश्वर । आह्मी कर्मबद्ध[4] जीव नर । या भावें ह्मणे धनुर्धर ।

---

१ पापसंचय. २ यादवांचा राजा कृष्ण. ३ वाईट. ४ कर्मांनें बांधलेले.

जनार्दन ह्मणोनि ॥ ४९ ॥ आतां आह्मीं वधावें कुळ । तरी अनर्थ होती पुष्कळ । ह्मणोनि बोले विठ्ठळ । पांचां श्लोकेंकरूनि ॥ ३५० ॥

॥ श्लोक ॥ कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोभिभवत्युत ॥ ४० ॥

॥टीका ॥ देवा कुळाचिया क्षयें । कुळींचे धर्म लोपती स्वयें । जे आचरतां निश्चयें । ब्रह्म सनातन पाविजे ॥ ५१ ॥ सनातन ह्मणजे नित्य । धर्म कर्ममय हे तों अनित्य । ज्या धर्मी ब्रह्म सत्य । पाविजे ते सनातन ॥ ५२॥ तेव्हां हे भागवत धर्म । ज्या धर्मी विश्वहि ब्रह्म । हे नव्हती ते कुळधर्म । जे हीं क्षुद्रदैवतें पूजिती ॥ ५३ ॥ ते कुळधर्म बुडाले जरी । हानि होणार काय तरी । त्यांचा शोक न करी । अर्जुन एथें ॥ ५४ ॥ ह्मणूनि ह्मणतों जे धर्म । बुडालिया प्रबळे अधर्म । जो अधर्म करूनि कुकर्म । घात करी कुळांचा ॥ ५५ ॥

॥ श्लोक ॥ अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ अधर्में व्यापिलें जया । त्या कुळींच्या कुलस्त्रिया । भ्रष्टतां करिती जारक्रिया । त्या जारें वर्णसंकर ॥ ५६ ॥

॥ श्लोक ॥ संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ परपुरुषापासूनि उपजे । तें संतान संकर ह्मणिजे । त्या कुळीं मरती जे जे । ते पडती नरकांत ॥ ५७ ॥ करिती कुळाचा संहार । त्यांच्या कुळीं होय संकर । उत्तम गतीपासूनि पितर । च्यवती त्यांचे ॥ ५८ ॥ कीं पिंडोदकक्रिया । त्यांची न होतां तयां । पतन होय यदुराया । अर्जुन ह्मणे ॥ ५९ ॥ आतां जे स्ववर्णविहित । त्या धर्मी भगवद्भक्ति निश्चित । भक्तींत धर्म भागवत । ते सर्वांशीं कुलधर्म ॥ ३६० ॥ तें परम धन्य कुळ । त्या कुळींचे पितर सकळ । पावती पदें अढळ । हा सिद्धांत ॥ ६१ ॥ ते कुलधर्म शाश्वत । त्यांसि साधन जातिधर्मविहित । या दोहींचा उच्छेद निश्चित । करितां हत्या कुळाची ॥ ६२ ॥ हा भाव धरूनि पोटीं । आणि अनुतापाच्या कोटि कोटि । ह्मणतों कीं हे गोष्टी खोटी । कुलहत्येची माधवा ॥ ६३ ॥

---

१ अनादिसिद्ध, शाश्वत. २ अशाश्वत. ३ भगवत्संबंधी धर्म. ४ सर्व जगत्. ५ पतन पावतात. ६ खंड.

॥ श्लोक ॥ दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।
उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ स्वजातीस उचित कर्म । त्याणें जोडे शाश्वत धर्म । ज्या धर्मे शाश्वत ब्रह्म । मानवदेहीं पाविजे ॥ ६४ ॥ ऐसे परंपरागत । जातिधर्म आणि धर्म शाश्वत । त्यांचा उच्छेद होतो निश्चित ॥ दोषीं ऐशा कुलघ्नांच्या ॥ ६५ ॥ कुलांची हत्या करणार । ज्यांच्या दोषें वर्णसंकर ॥ सकळां अनर्थास ऐसे नर । हेतु होती ॥ ६६ ॥ परमधर्माची हानी । या कुलहत्त्येनें ह्मणोनी । ऐसा अनुतप्त होउनी । पूर्वी बोलिला ॥ ६७ ॥ ऐशा सद्धर्माचा लोप । करूनि हें कुलहत्त्येचें पाप । शेवटीं दे परम संताप । ऐसें अर्जुन बोलतो ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥ उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥

॥ टीका ॥ ज्या धर्मी जोडे ब्रह्म । ते विच्छिन्न होतां कुलधर्म । मोक्षप्रद मनुष्यजन्म । नरका साधन होतसे ॥ ६९ ॥ शाश्वत सनातन जे कुलधर्म । ते विच्छिन्न होतां कैचें ब्रह्म । उफराटा उपजोनि भ्रम । नियतें नरक मनुष्यास ॥ ३७० ॥ ऐसें आह्मीं आइकिलें । आणि हें काय आरंभिलें । ह्मणोनि अर्जुनाचें मन क्षोभलें । त्या क्षोभें आतां बोलतो ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥ अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसितावयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ अहाहा नवल अद्भुत । कीं आह्मी कळत कळत । प्रवर्तलों निश्चित । हें महत्पाप करावया ॥ ७२ ॥ जे राज्यलोभेंकरूनि । कवचें घालूनि शस्त्रें धरूनि । सिद्ध जालों कीं स्वजन मारूनि । राज्य करूं ॥ ७३ ॥ अनुतप्त अंतःकरणें । आतां आपण जें काय करणें । तें बोलतो परम करुणें । कुंतीसुत ॥ ७४ ॥

॥ श्लोक ॥ यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ आतां शस्त्रें टाकितों । निःशस्त्र होऊनि बैसतों । युद्ध करीन

१ ज्याला, रज, तम हे गुण नाहींत. माया, अविद्या हे उपाधि नाहींत, ज्याला उत्पत्ति, विनाश इत्यादि विकार नाहींत. सजातीय, विजातीय, स्वगत हे भेद नाहींत, व देश, काल, वस्तु हे परिच्छेद नाहींत, परंतु सच्चिदानंद ईश्वरस्वरूप तें. २ कुलघातक्याच्या. ३ अनादिसिद्ध. ४ भंग. ५ खचित.

हें तों। कधींच न घडे ॥ ७५ ॥ ऐसें देखूनि मज । हे धृतराष्ट्राचे आत्मज। सहरथपदातिसादिगज । लोटूनि येती मजवरी ॥ ७६ ॥ तरी प्रतिक्रिया कांहीं। मी त्यांसि करणार नाहीं। शस्त्रें घेऊनि मारावें तिहीं। मज निःशस्त्रासी ॥ ७७ ॥ जरी हे ऐशियास मज । मारिती धृतराष्ट्राचे आत्मज। तें माझें कल्याण चरणांबुज। शिवतों तुझें ॥ ७८ ॥ करूनि ऐसा निश्चय। मग काय करिता जाला धनंजय। हें धृतराष्ट्रास संजय। सांगतसे ॥ ७९॥

॥ श्लोक ॥ संजय उवाच ॥ एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्।

विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥

॥ टीका ॥ ऐसें बोलोनि अर्जुन। शरांसहित शरासन[3]। टाकूनि शोकविव्हळमन। रथीं उगा तो बैसला ॥ ३८०॥ हा अध्याय पहिला। जेथें अर्जुनविषाद लिहिला। युद्ध न करीं ह्मणून राहिला। अर्जुन उगा ॥८१ ॥ पुढें अध्याय दुसरा। उपदेश आरंभेल एकसरा। ज्याणें देहात्मवादी निजसुरा। जागा होय तत्काळ ॥ ८२ ॥ ऐशी टीका मराठी। जी संस्कृताचीच धाटी। अर्थभावार्थरहाटी। समजती अनुभवी शास्त्रज्ञ ॥ ८३ ॥ संस्कृतीं नसे परिज्ञान। तरी पदपदार्थानुसंधान। समजोनि वक्ते श्रोतेजन। सुख पावती ॥ ८४ ॥ गीताकारचिद्घन। मेघश्याम कृपाघन। तोचि हे टीकाजीवन। वर्षतो ॥ ८५ ॥ जैसे तुह्मी श्रोते वक्ते जन। तैसाच जाणावा वामन। टीकाकार जगज्जीवन। गीताकार श्रीकृष्ण ॥८६॥ हे भगवत्तत्त्वाची सुधा। सज्जनांची बुद्धिवसुधा। आर्द्र करील बहुधा। वामन ह्मणे ॥ ८७ ॥ गीतार्थ बिंबला मनीं। तेंचि टीका झाली वामनी। जे पाहती दिनयामिनी। भगवत्कृपापात्र ते होती ॥ ३८८ ॥

॥ वामनकृत संस्कृत श्लोक ॥

कमलभवभवाद्याः सर्वदा यन्निदेशे विजयरथमजोसौ सेनयोर्मध्यदेशे। तदुदितवचनेन स्थापयामास देवः करुण इति सदास्तु श्रीमुकुंदो मुदे वः॥१॥

इति श्रीमद्वामनपंडितविरचितायां यथार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ॥

१ घोडेस्वार. २ अर्जुन. ३ धनुष्य.

# अध्याय दुसरा.

श्रीगणेशो जयति ॥ श्रीमते वासुदेवाय नमः ॥ जय जय जगज्जीवन । जय जय श्रीराजीवनयन[1] । जय जय जी शेषशयन । लक्ष्मीपते ॥ १ ॥ जय जय करुणालयनिधे । जय जय ज्ञानविज्ञाननिधे[2] । जय जयानंदजलधे[3] । देवदेव ॥ २ ॥ करूनि तुझें ध्यान । द्वितीयाध्यायव्याख्यान । आरंभितों सांख्यज्ञान-। आरंभ जेथें ॥ ३ ॥ पूर्वाध्यायीं अर्जुन । करूनि शोकसंतप्त मन । टाकूनि शर शरासन । रथीं बैसला ॥ ४ ॥ देखोनि ऐसा धनंजय । काय करिता जाला अव्यय । त्याचें अनुसंधान संजय । लावीतसे ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥ संजय उवाच ॥ तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

॥ टीका ॥ धृतराष्ट्रास संजय । ह्मणे पूर्वाध्यायीं धनंजय । युद्ध न करावें हा निश्चय । करी विषादसंयुक्त ॥ ६ ॥ ज्याचे डोळे व्याकुळ । ज्यांत पूर्ण अश्रुजळ । कृपेनें आविष्ट[4] केवळ । विषादयुक्त ॥ ७ ॥ त्यातें पूर्णेंदुवदन[5] । हें बोले तो मधुसूदन । ह्मणूनि भाव गहन[6] । एथें दावी संजय ॥ ८ ॥ हा न करीं ह्मणे कदन । परी सारथि केला मधुसूदन । मधुमुरनरककैटभमर्दन[8] । तो कां सोडितो ॥ ९ ॥ ह्मणूनि ह्मणे मधुसूदन । पुढें बोलेल तें हें वचन । बोलता जाला अज्ञानशमन । श्रीभगवान यदुरूपें ॥ १० ॥

॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच । कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

॥ टीका ॥ पूर्ण षड्गुणवैभव । तो भगवान्देवदेव । ह्मणे कोण्या हेतुस्तव । मूढत्व उपजलें हें तूतें ॥ ११ ॥ कारणें वदसी बहुतें ॥ तीं पोंचट[9] अवघीं निमित्तें । हें तूं मानिसी मूढचित्तें । करूनि या ॥ १२ ॥ युद्धारंभ विषम काळ । ये समयीं हा फटकाळ । मोह उपजला तो तत्काळ । नाशी सकळ कल्याणें ॥ १३ ॥ इह लोकीं अपकीर्ति । स्वर्गहानि नरकप्राप्ति । जे भले ते हें चित्तीं । न धरिती कदापि ॥ १४ ॥ हे गोष्टी तुच्छांस योग्य ।

---

१ कमलनयन. २ ऐहिक व पारमार्थिक विद्येच्या निधाना. ३ आनंदसमुद्रा. ४ व्यापलेला. ५ पूर्ण चंद्रासारिखें मुख ज्याचें, कृष्ण. ६ दुर्गम. ७ काश्मल. ८ मधु, कैटभ, मुर व नरकासुर या दैत्यांना मारणारा. ९ पोकळ.

अपकीर्तिकर अस्वर्ग्य । तुज ऐसे चतुर सभाग्य । मनीं ऐसें न धरिती ॥ १५ ॥ मुरडोवया मत्त हस्ती । महामात्र दोन्हीं हस्तीं । अंकुश हाणी तैसा श्रीपती । मर्मोद्घाटनें करीतसे ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥ क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

॥ टीका ॥ नको धरूं षंढपणा । नको स्मरूं पूर्व गुणा । विराटनगरीं आपणा । षंढ ह्मणविलें जैसें ॥ १७ ॥ तोचि संस्कार तुजला । आजि वाटतो उदेला । परी हा विचार न भला । नको होऊं नपुंसक ॥ १८ ॥ ह्मणसी न भांडें आपण । याहूनि काय लंडीपण । हा तों नपुंसका गुण । नव्हे तुज योग्य ॥ १९ ॥ या प्रसंगीं ह्मणे पार्था । पार्थनामीं गहन अर्था । दावीत या भावार्था । पूर्वाध्यायीं वर्णिलें ॥ २० ॥ पृथा कुंती तिचा सुत । तो पार्थ गूढार्थ यांत । कीं हृदय कोमळ हा निश्चित । मायाळू गुण स्त्रियांचा ॥ २१ ॥ मातेचें दयाळूपण । अवलंबिसी आपण । परी तुझ्याठायीं हा गुण । योग्य नव्हे ॥ २२ ॥ जाला असतास कन्या । तरी लोक ह्मणते काय धन्या । पुत्र होऊनि या दैन्या । काय भाकिसी ॥ २३ ॥ पृथा नव्हे सामान्या । ते आह्मां यादवांची कन्या । तिचा पुत्र होऊनि दैन्या । काय भाकिसी ॥ २४ ॥ इत्यादि भावविवरण । असो याकारणें ह्मणे श्रीकृष्ण । तुज योग्य नव्हे हें लंडीपण । अगा पार्था ॥ २५ ॥ आणि भ्यालाही असती । ऐसें वाटतें मानसीं । बहुतेक विसरलासि । सामर्थ्य आपुलें ॥ २६ ॥ हें क्षुद्र दुर्बळपण । हा मनाचा सहज गुण । तूं साच मानिसी आपण । परम समर्थ होऊनि ॥ २७ ॥ मनाचें दुर्बलत्व । काय साच मानिसी तत्त्व । ऊठ अवलंबूनि सत्त्व । परंतपा ॥२८॥ तूं पराक्रमी या भावें । परंतपा ऐशा नांवें । तिरस्कारितों कीं तूं स्वभावें । परंतप ॥ २९ ॥ पर जे शत्रु त्यांस ताप । करी ऐसा तुझा प्रताप । मनाच्या दुर्बलत्वें पाप । स्वजनहत्त्या ह्मणतोसि ॥ ३० ॥ हें बोलिला उत्तमश्लोक । याचें उत्तर उत्तरश्लोक । आधींच पार्थ सशोक । दुःखी जाला बहु फार ॥ ३१ ॥ घाय लागोनि जर्जर ॥ रणीं पडला जो नर । त्यास करिजे लत्ताप्रहार ।

---

१ चालविण्यास, वळविण्यास. २ महात. ३ वर्म काढणें. ४ लहान. ५ शत्रूंस ताप करणारा, पराक्रमी. ६ तीक्ष्ण करितों, हुशार करितों.

तैसे अर्जुना हे शब्द ॥ ३२ ॥ हा समजोनि भावार्थ । क्रोधें संतप्त जाला पार्थ ॥ तडफडोनि पूर्वोक्त अर्थ । सिद्ध करितो अर्जुन ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥ अर्जुन उवाच ॥ कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

॥ टीका ॥ अर्जुन ह्मणे अजी स्वामी । कैसा भांडों भीष्माशीं मी । द्रोणाशींही संग्रामीं । झगडों कैसा ॥ ३४ ॥ वडील पूज्य चक्रपाणी । ज्यांसि बोलतां भिते वाणी । त्यांशीं सांग आजि बाणीं । केंवि भांडों ॥३५॥ पूजा करावया योग्य । कोण त्यांशीं भांडे अभाग्य । त्यांशीं भांडणें योग्य । कधीं नव्हे याकरितां ॥ ३६ ॥ बोलतां पार्थ शंकला । कीं याणें मामा आपला । केशीं धरूनि आफळिला । भूमीवरी ॥३७॥ आजा पिता चुलता मामा । समान या वडिलांचा महिमा । त्यांत मामा मारितां या यदूत्तमा । दया ऐशी न उपजली ॥ ३८ ॥ यावरूनि मातें ॥ झणीं ह्मणेल मारीं यातें । ह्मणोनि पुरुषोत्तमातें । आळवी एथें दों नामें ॥ ३९ ॥ कीं तूं ईश्वर आपण । कल्पतरूसमान गुण । जे तुज मानिती अरिपणें । तूं तदनुरूप अरि होसी ॥ ४० ॥ होऊनिही मामा । अरि मानी पुरुषोत्तमा ॥ दावूनि कल्पवृक्षाचा महिमा । मारिला तो तूं अरिसूदना ॥ ४१ ॥ तरी ह्मणसी तुजशीं युद्ध । करावया हेही सर्व सिद्ध । यांस मारूनि तूंही प्रसिद्ध । होय अरिसूदन ह्मणोनि ॥ ४२ ॥ ह्मणूनि ह्मणतो अर्जुन । कीं तूं विष्णु मधुसूदन । मी वडिलांचें निधन । करितां दुर्गति पावेन ॥ ४३ ॥ या श्लोकीं हीं दोन नांवें ॥ अर्जुन योजी इत्यादि भावें ॥ आतां हे न मारितां खावें । काय ह्मणेल तरी बोलतो ॥ ४४ ॥

॥ श्लोक ॥ गुरूनहत्वा हि महानुभावाञ्छ्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥

॥ टीका ॥ सहज वडील गुरु । जे विद्येचे कल्पतरु । महिमेंकरूनि महामेरू । भीष्मादिक ॥ ४५ ॥ यांचा न करूनि घात ॥ भिक्षा मागोनि लोकांत । भक्षावी हेंही अत्यंत । बरवें वाटे ॥ ४६ ॥ गुरु मारूनि हे वृद्ध । भोग भोगणें अति समृद्ध ॥ ते यांच्या रक्तें अशुद्ध । ग्रास माखूनि भक्षावे

---

१ कृष्णाचा मामा, कंस. २ आपटिला. ३ यादवांत उत्तम, कृष्ण. ४ कदाचित्. ५ शत्रुत्वानें. ६ शत्रुमर्दना. ७ मधुदैत्यास मारणारा. ८ नाश, वध.

॥४७॥ गुरुहत्येचें महापाप । आणि हृदयीं अनुताप । कोणा भोग देखतां कांप । न सुटे शरीरीं ॥४८॥ हे एथेंचि नरक । मेल्या होती ते तों अनेक । यांच्या वधें आणिक एक । अनर्थ भोग भोगितां ॥ ४९ ॥ हे अर्थकाम सकळ । अर्थ संपादिती पुष्कळ । भोग भोगिती अविकळ । अर्थकाम ते ऐसे ॥ ५० ॥ राज्य आह्मीं करावें । यांस अर्थकामें भरावें । तयां मारूनि विसरावें । कवणे परी ॥ ५१ ॥ स्वहस्तें यांचीं निधनें । करूनि मेळवूं जीं जीं धनें । तीं तीं यांचीं पूजासाधनें । स्मरोनि तों तों रडावें ॥ ५२ ॥ यांला अन्नें फळें प्रियें । तीं देखतां हे निश्चयें । आठवतील तेव्हां स्वयें । मारिलें हेंचि स्मरावें ॥ ५३ ॥ तीं अन्नें तीं फळें । यांच्या रक्तें केवळें । माखूनि भक्षिलीं वोंगळें । ऐशीं वाटती ॥ ५४ ॥ न मारितां यांस भिक्षा । मागूनि भक्षूं अंबुजाक्षा[1] । दोहीं पक्षीं याच पक्षा ॥ अंगीकारणें बहु बरें ॥ ५५ ॥ यापुढें दुसरा श्लोक । बोले पार्थ पुण्यश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । अर्थासहित परिसोत ॥ ५६ ॥ आतां जें तूं निपुण । बोलिलास कीं लंडीपण । युद्ध न करावयाचा करिसी पण । म्यां या गोष्टीस लाजावें ॥ ५७ ॥ आणि करावया युद्ध । म्यां व्हावें आजि सिद्ध । तरी दोहीं लोकीं विरुद्ध । दोहीं पक्षीं विपरीत ॥ ५८ ॥ कोण पक्ष होणार । हाही न कळे विचार । आतां इतकेही प्रकार बोलों पाहतों ॥ ५९ ॥ तत्रापि होऊनि दक्ष । कोण तो करावा पक्ष । कोणता बरा ह्मणतां प्रत्यक्ष । विरुद्ध दोन्ही ॥ ६० ॥ एवं इतकेही प्रकार । या वेगळाले विचार । करितां न दिसे एक निर्धार । ह्मणूनि ह्मणतों या श्लोकीं ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥ न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ आह्मी जिंकों यांला । तें बरें आह्मांला । कीं तो पक्ष भला । कीं हे जिंकिती आमुतें ॥६२॥ दोहींचा नव्हे निर्धार । विचारितां वारंवार । कीं आमचें बरें तो कोण प्रकार । दोहींमध्यें ॥ ६३ ॥ यांस मारावें तेव्हांच । जय आमचा होणार साच । तेव्हां अपयशें प्रपंच । व्यापे नरक शेवटीं ॥ ६४ ॥ आतां यांचा जय । आह्मी मेलों तरीच होय । तरी नरक हा निश्चय । आह्मांस आणी अपकीर्ती ॥ ६५ ॥ भीष्म द्रोण यांचीं हिंसा ।

१ कमलनेत्रा, कृष्णा.

करूं ह्मणोनि संकल्प ऐसा । करूं आह्मी केव्हां केला । चुकेल वास नरकाचा ॥ ६६ ॥ प्रत्यक्ष गुरूतें मारणें । मनीं धरिलें राज्याकारणें । त्या पापेंचि पावले मरणें । अपकीर्ति गाती हे लोक ॥ ६७ ॥ दोहीं पक्षीं यापरी । युद्ध न करणें गोष्टी बरी । ह्मणोनि भिक्षा भक्षूं परी । युद्ध न करूं ह्मणतसे ॥ ६८ ॥ आतां ह्मणसी हरी । कीं यांस मारिल्या उपरी । सुख पावसी आणि समेरीं । जय निश्चयें तूं पावसी ॥ ६९ ॥ तरी हें न घडे कांहीं । यांस मारितां सुख नाहीं । यांस मारूनि वांचावें हेंही । इच्छा आह्मांस होईना ॥ ७० ॥ अनुताप ऐसा मनातें । तो काय मारील यांतें । शस्त्र तरी कैसें हातें । तो यांवरी उगारील ॥ ७१ ॥ याकारणें ह्मणतों हरी । कीं ज्यांचा वध केल्यावरी । वांचों न इच्छूं ते ये अवसरीं । समोर उभे हे धार्तराष्ट्रं ॥ ७२ ॥ तरीच हातींचें चाप । गळालें जाला अनुताप । करीन म्हणेन तरी हें पाप । जाण न करवे माझ्यानें ॥ ७३ ॥ संमुख उभे परी । हात वाहेना यांवरी । युद्ध करूं कोणे परी । सांग आतां ॥ ७४ ॥ आतां पुढील जो श्लोक । तो पांडुपुत्र पुण्यश्लोक । कां बोलेल सुज्ञ लोक । निमित्त त्यांचें परिसोत ॥ ७५ ॥ कीं कोणे परी न करवे युद्ध । भिक्षा भक्षणें हेंचि शुद्ध । हा अर्थ केला पूर्वीं सिद्ध । परी मागुती शंकला ॥ ७६ ॥ कीं यांशीं युद्ध न करणें । आणि भिक्षा मागून भक्षणें । तेंही अपयश नपुंसकपणें । अपयशें नरक निश्चित ॥ ७७ ॥ तरी आतां काय करूं । या कृष्णाचे पाय धरूं । गुरुपणें यातेंचि वरूं । येविषयीं ॥ ७८ ॥ म्हणोनि दोंश्लोकीं शरण । येतो वंदूनि कृष्णचरण । त्यावरूनि आत्मानात्मविवरण । उपदेशील जगद्गुरु ॥ ७९ ॥

॥ श्लोक ॥ कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।

यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे, शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम्॥७॥

॥ टीका ॥ यांशीं न भांडणें हें कर्म । मज निश्चयें वाटे धर्म । आणि तूं म्हणतोसि अधर्म । याणें नरक अपकीर्ति ॥ ८० ॥ ऐसें हें धर्मसंकट । मोह उपजला उत्कट । अविवेकें चित्त निपट । मूढ जालें ॥ ८१ ॥ इत्यर्थ न सुचे मज । ह्मणोनि पुसतों जी तुज । कीं जें श्रेयाचें गुज । कृष्णजी तें बोल ॥ ८२ ॥ ज्या श्रेयें निश्चित । कल्याण होय तेंचि त्वरित । सांग मातें कीं

---

१ युद्धांत. २ धृतराष्ट्राचे कुमार. ३ अर्जुन. ४ आत्मा आणि अनात्मा यांविषयीं विचार. ५ फार. ६ केवळ.

शरणागत । शिष्य मी तुझा ॥ ८३ ॥ मानी गुरूच्या शासना । करी त्याची उपासना । तो शिष्य तरी गरुडासना । तैसाच मी ॥ ८४ ॥ माझें कल्याण तुझे चरण । हें समजोनि आलों शरण । आतां जें जें असेल कारण । तें तें करीं शासन ॥ ८५ ॥ ह्मणसी तूंहि नीतिनिपुण । आपलें हित तूं आपण । विचारूनि करीं शरण । काय निमित्त मज येसी ॥ ८६ ॥ तरी या संकटें झालों दीन । दीनपणें त्या बुद्धिहीन । ह्मणूनि पुसतों तुज अधीन । झालों आलों शरणागत ॥ ८७ ॥ आतां पुढील जो श्लोक । तो पांडुपुत्र पुण्यश्लोक । कां बोलेल हें सुज्ञ लोक । निमित्त त्याचें परिसोत ॥ ८८ ॥ अर्जुन ह्मणे उत्तमश्लोक । ह्मणेल तुज जाला शोक । हा जाईल तेव्हां भूलोकें । येईल हाता ॥ ८९ ॥ तरी तूं आतां धनंजया । यांस मारूनि पाव जया । हा शोक जातां अवघिया । या गोष्टीला विसरसी ॥ ९० ॥ यांत काय तत्त्वांचें विवरण । असे कीं तूं येतोस शरण । ऐसें बोलेल श्रीकृष्ण । ह्मणूनि बोलतों हा श्लोक ॥ ९१ ॥

॥ श्लोक ॥ नहि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८ ॥

॥ टीका ॥ जें हा माझा शोक हरी । तें मी न देखें जी श्रीहरी । ज्या शोकें इंद्रियें सारीं । शोषूनि टाकिलीं ॥ ९२ ॥ जितांच या भूमीवरी । सार्वभौम होऊनि श्रीहरी । देवाचें राज्यही जरी । प्राप्त होय निष्कंटक ॥ ९३ ॥ ज्या देवराज्यास दैत्य । कंटक नसती तें आधिपत्य । प्राप्त जालें तरी सत्य । न हरी हरी या शोका ॥ ९४ ॥ शोकें जाली भ्रांति । हें सत्य परी त्याची शांति । अन्य उपायें न घडे यदुपति । शरण आलों ह्मणोनी ॥ ९५ ॥ ऐशी अर्जुनाची वाणी । धृतराष्ट्रास संजय वर्णी । परी जाणे अंतःकरणीं । जें असे अर्जुनाच्या ॥ ९६ ॥ भाव ऐसा पांडवाचा । कीं त्यां शब्द माधवाचा । ऐकावा ऐशी वाचा । माझी त्यांच गोंविली ॥ ९७ ॥ युद्ध करावें हें मनीं । याच्या आहे ह्मणोनी । शासन करील हेंच एथुनी । कीं शासनार्ह मी शिष्य ॥ ९८ ॥ तरी हें एक वेगळें करूनि । मज योजिसी ज्या शासनीं । तें करीन ह्मणतों ह्मणोनी । बोले संजय ॥ ९९ ॥

---

१ गरुड आसन ज्याचें, विष्णु. २ राज्य. ३ ब्रह्मस्वरूपाचें.

॥ श्लोक ॥ संजय उवाच ॥ एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूवह ॥ ९ ॥

॥ टीका ॥ जो श्रीकृष्ण हृषीकेश । त्यास अर्जुन गुडाकेश । जें बोलिला कीं उपदेश । करिसी तो मी करीन ॥ १०० ॥ संजय ह्मणे जी राया । ऐसें अर्जुन बोलेनियां । शेवटीं ह्मणे गोविंदा तया । कीं युद्ध न करीं ॥ १ ॥ न करीं युद्ध ह्मणोनि । गोविंदातें बोलूनि । राहिला उगा मौन धरूनि ॥ धनंजय ॥ २ ॥ गो शब्दें वेद । वेदीं जाणिजे तो गोविंद । तोचि या रूपें मुकुंद । गुरु जाला ॥ ३ ॥ एवं वेदीं जाणावें । तें तत्त्वें कृष्णें सांगावें । याणें युद्धींच योजावें । नसे शरण यालागीं ॥ ४ ॥ युद्ध न करणें चित्तांतूनी । आणि तत्त्व आइकावें हें मनीं । युद्ध न करी ह्मणोनी । या भावें ह्मणे गोविंदा ॥ ५ ॥ अतएव अर्जुन गुडाकेश । गुडाका निद्रा तिचा ईश । निद्रा भ्रांति ते प्रवेश । न करी ज्याच्या हृदयांत ॥ ६ ॥ तत्त्वश्रवणीं सावध । तरी यांचा कां न करी वध । श्रुति स्मृति विविध । हा धर्म बोलती क्षत्रियां ॥ ७ ॥ तरी या भ्रांतीचा लेश । त्याच्या मनीं न करी प्रवेश । परी काय करी हृषीकेश । प्रेरी ह्मणे संजय ॥ ८ ॥ या दों नामीं हाचि अर्थ । पूर्वाध्यायीं सिद्ध समर्थ । तो निजभाव यथार्थ । एथें दाखवी संजय ॥ ९ ॥ धृतराष्ट्रास याचा प्रत्यय । ह्मणोनि ह्मणे संजय । कीं स्वधर्म धनंजय । नेणे काय परंतप ॥ ११० ॥ पर जे शत्रु त्यांतें ताप । करिसी तूं धरिसी जो प्रताप । शत्रु स्वजन तरी काय पाप । हें कैसें नेणे अर्जुन ॥ ११ ॥ एवं हृषीकेशें प्रेरिला ॥ हाचि सिद्धांत सिद्ध जाला । आतां श्रीकृष्ण बोलिला । तें संजय वदे या श्लोकीं ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

॥ टीका ॥ तो भ्रांत नव्हे लेश । परंतु कृष्ण हृषीकेश ॥ करावया गीतोपदेश । प्रेरी जया ॥ १३ ॥ तयातें हें वचन । हृषीकेश मनमोहन । बोले हांसूनि गहन । तें हास्य वर्णी संजय ॥ १४ ॥ हांसे हांसिल्याचेपरी । ऐसा हांसत बोले हरी । जाणों देखोन हास्य करी । मूर्खत्व त्याचें ॥ १५ ॥ स्वयें तो नेणोनि निजधर्म । जरी युद्ध मानिता अधर्म । तरी हांसणें उचित कर्म । तैसें नाहीं ॥ १६ ॥ जो जाणत असोनि । त्यांच

१ प्रज्ञावीन, २ आत्मानात्मविवेक, इ०.

मोहिला ह्मणोनि । यास काय हांसावें मनीं । भाव ऐसा ॥ १७ ॥ पर्ण वाटावें त्याला । कीं माझ्या मूर्खत्वासि हांसला । ह्मणोनि हांसिल्याचे परी दाविला । हास्यभाव ॥ १८ ॥ "प्रहसन्निव" ह्मणोनी । या इव शब्देंकरूनि । संजय निजभाव उघडूनि । एथें दाखवी ॥ १९ ॥ सर्वदा सर्वांच्या मती । प्रेरी हाचि विश्वपती । परी प्रेरकत्व दों रीती । हें पुढें स्पष्ट होईल ॥ १२० ॥ पाप पुण्य करवी देव । आणि फळ भोगी जीव । तेव्हां निर्दय वासुदेव । हें तों अयुक्त ॥ २१ ॥ प्रेरी सर्वांस तो ऐसा । कीं नेत्रं वर्तवी रवि जैसा । रोगियास शंख पीतसा । दिसे रोगें आपल्या ॥ २२ ॥ बुद्धि प्रकाशी श्रीहरी । ते वासनानुरूप कर्म करी । पुण्यें जीवां गति बरी । पापें नरक ॥ २३ ॥ आतां याच्याच कर्माचें फळ । प्रारब्धरूप प्रबळ । तें भोगाया केवळ । प्रेरी शक्ति ईश्वराची ॥ २४ ॥ किंवा कल्पवृक्ष स्वभावा । भक्त ह्मणती दे भक्ति देवा । नाशूनि त्यांच्या कुभावा । देतसे सद्भाव ॥ २५ ॥ श्रुति ह्मणे आत्मा रथी ॥ देह रथ बुद्धि सारथी । अर्जुनें बुद्धिस्थानीं रथी । परमात्मा प्रार्थिला ॥ २६ ॥ ह्मणूनि दावूनि कृपालेश । करूं पाहे उपदेश । त्यास निमित्त हृषीकेश । हें करी ॥ २७ ॥ प्रेरिली ऐशी बुद्धि । तो कंटाळला युद्धीं । या प्रसंगें कराया समृद्धी । ब्रह्मविद्येची ॥ २८ ॥ स्वयेंचि त्याच्या चित्तीं । हे उपजली नाहीं भ्रांति । तरी हांसेल श्रीपति । काय त्याला ॥ २९ ॥ परी त्यास वाटावें अंतरीं । कीं आपणास हांसे हरी । ह्मणोनि हांसल्याचे परी । हास्य वर्णी संजय ॥ १३० ॥ हांसल्याचे परी अजी । हांसत दों सैन्यांमाजी । हें वचन बोले कृष्णजी । तो भगवान् षड्गुण ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।

॥ टीका ॥ शोक न करावा ज्यांचा । शोक करितोसि तूं तयांचा । व्यर्थ आपल्या जीवाचा । आटे करिसी ॥ ३२ ॥ ऐसियांकारणें शोक । करिती अत्यंत मूर्ख लोक । तूं चतुर पुण्यश्लोक । काय रडसी यांकारणें ॥ ३३ ॥ ह्मणावास मूर्ख जरी । तरी पांडित्ययुक्ति नानापरी । प्रज्ञावंतांच्या कुसरी । शास्त्र अवलंबूनि बोलसी ॥ ३४ ॥ भीष्माशीं झगडों कैसा । आणि द्रोणाशीं ह्मणशी ऐसा । ज्यांशीं न बोलवे शब्द सरसा । शर कैसे टाकूं त्यांवरी ॥ ३५ ॥ इत्यादि पांडित्याचे बोल ।

---

१ पिवळट. २ वाईट वासना. ३ ब्रह्मज्ञानाची. ४ संताप. ५ युक्ति. ६ झगडा.

पाहतां अवघेच फोलें । वाटती तुज सखोल । विचारितां उथळ अत्यंत ॥ ३६ ॥ काय सर्वही विवेक । जाणसी तूंचि एक । वेडे तुझेच कुलतिलक । भीष्मादि सर्व ॥ ३७ ॥ हाच भीष्म पाहें । गुरूशीं भांडला आहे । हात तुझा न वाहे । ज्यावरी ॥ ३८ ॥ भीष्म न होय आपला पती । म्हणोनि परशुरामाप्रती । शरण गेली अंबा सती । जो राम गुरु भीष्माचा ॥ ३९ ॥ स्त्री करीं म्हणे आचार्य । हा न सोडी ब्रह्मचर्य । तेव्हां भीष्म आणि भृगुवर्य । झगडले ॥ १४०॥ भीष्म गुरूस हाणी बाण । तूं त्याहूनिही मोठा सुजाण । टाकूं पाहसी प्राण । त्याशीं झगडतां ॥ ४१ ॥ इत्यादि भाव पोटीं । भगवद्वाणी सखोल मोठी । या भावें म्हणे खोटी । बुद्धि तुझी अर्जुना ॥ ४२ ॥ कीं शोक न करावा ज्यांचा । शोक करिसी तूं त्यांचा । व्यर्थ आपल्या जीवाचा । आट करिसी ॥ ४३ ॥ अरे भीष्म ब्रह्मचारी । गुरुवचनें वरिता नारी । तरी पतित न होता विचारी । पावता गृहस्थाश्रम ॥ ४४ ॥ तथापि आपली प्रतिज्ञा । न सोडी मोडी गुरूची आज्ञा । त्या गुरुवरा सर्वज्ञा । बाण हाणे ॥ ४५ ॥ त्या भीष्मावरी बाण । टाकितां जाती तुझे प्राण । जो जाला अंगत्राण । दुर्योधनाचा ॥ ४६ ॥ अरे गुरु परशुराम । शिष्यवत्सल निष्काम । अल्प प्रतिज्ञेसाठीं भीष्म । झगडला त्याशीं ॥ ४७ ॥ यांस तों दुर्योधनें । पोसूनि आपल्या धनें । भीष्म द्रोण साधनें । केलीं तुमच्या वधासी ॥ ४८ ॥ त्यांवरी कैसे टाकूं शर । म्हणूनि बोलसी तूं चतुर । जालासि ऐसा शोकातुर । देखोनि त्यांला ॥ ४९ ॥ त्यांशीं झगडणें उचित । आणि वृथा होसी दुश्चित्त । अरे हा धर्म वृद्धसंमत । व्यर्थ शोक हा तुझा ॥ ५० ॥ एवं हा तुझा शोक । विचारितां अत्यंत अविवेक । आतां आश्रय एक । या शोकासि दीसतो ॥ ५१ ॥ कीं हे आपले आप्त । यांस मारणें जालें प्राप्त । यानिमित्त संतप्त । जालासि तूं ॥ ५२ ॥ तरी हें निपट अज्ञान । न यांत धर्म न यांत ज्ञान । ममता अहंता अभिमान । रडवी तुज ॥ ५३ ॥ कीं ज्यांचे गेले प्राण । आहेत त्यांसही मरण । असे म्हणूनि सुजाण । शोक न करिती पंडित ॥ ५४ ॥ या श्लोकाच्या उत्तरार्धीं । ये गीतेची अर्थसिद्धी । या अर्थापासूनि समृद्धी । तत्त्वज्ञानाची ॥ ५५ ॥ ज्ञानरीतीकरूनि । कोणी मरणारचि नाहीं म्हणोनि । बोलतो आतां एथूनि ।

---

१. पोकळ. २ उथळे. ३ काशीराजाची ज्येष्ठ कन्या. ४ परशुराम. ५ रक्षक कवच. ६ शिष्यावर प्रीति करणारा. ७ वृद्धांस मान्य. ८ केवळ. ९ महाज्ञानाहदचा.

देवाधिदेव ॥ ५६ ॥ मरणें मारणें दोन्ही । ज्ञानमार्गी लटकीं ह्मणोनि । बोलोनि धर्मन्यायेंकरूनि । युद्ध करणें स्थापील ॥ ५७ ॥ पाहतां सर्व लटिकें । पुण्य पाप कर्म जितकें । परी अज्ञानें केलें असेकें । अज्ञास सत्य ॥ ५८ ॥ रज्जू न कळतां होय साप । भय उपजवी तैसें पाप । बोबडी वळे सुटे कांप । सर्प ह्मणोनी ॥ ५९ ॥ जों न कळे अधिष्ठान । तों पाप पुण्य अज्ञान । पाहों जातां ज्ञानें । नसती दोन्ही ॥ १६० ॥ परी जों होय जागृत । तों स्वप्न साचें निश्चित । सुखदुःखहेतु अत्यंत । खरें तोंवरी ॥ ६१ ॥ जो स्वप्नीं क्षुधाक्रांत । तो स्वप्नींच्या अन्नें होय शांत । स्वप्नींचा देह स्वप्नजळांत । बुडे सर्वथा ॥ ६२ ॥ तैसे स्वर्गादि विषय । पुण्यें होती हा निश्चय । जरी विषय पुण्यसंचय । दोन्ही मिथ्या ॥ ६३ ॥ तैसेंचि मिथ्या पाप । मिथ्या नरक संताप । परी कर्माचा ऐसा प्रताप । कीं दुःख अवश्य भोगवी ॥ ६४ ॥ एवं दुःखदायक धर्म । सुखदायक शुद्ध धर्म । तेव्हां धर्मास अनुकूळ कर्म । सर्वथा करावें ॥ ६५ ॥ दों प्रकारीं तो धर्म । काम्य कर्म निष्काम कर्म । काम्यें बंध निष्कामें ब्रह्म । हें रहस्य ॥ ६६ ॥ यालागीं मुख्य फळ । ब्रह्मज्ञान केवळ । परंतु चित्त निर्मळ । निष्काम कर्मे जरी होय ॥ ६७ ॥ तें वर्णाश्रमांस उचित । करावें तेव्हां शुद्ध चित्त । ह्मणूनि ज्ञान आणि विहित । धर्मोपदेश एथूनि ॥ ६८ ॥ एवं ज्ञान आणि धर्म । दोहींस संमत हें कर्म । हें न कळोनि अर्जुन सभ्रम । म्हणतो न करीं युद्ध मी ॥ ६९ ॥ हें युद्ध धर्मानुकूल । हें पुढें बोलणें प्रबळ । प्रस्तुत मनीं हेंचि केवळ । धरूनि शोक निषेधिला ॥ १७० ॥ एवं वृथा शोकप्रसंग । पूर्वार्धी निषेधी श्रीरंग । उत्तरार्धापासूनि अंतरंग । ज्ञान उपदेशूं पाहतो ॥ ७१ ॥ शास्त्र आणि ज्ञानवृद्ध । त्यांस संमत हें युद्ध । यालागीं धर्मविरुद्ध । शोक तुझा ॥ ७२ ॥ आतां एका गुणें प्राप्त । शोक जाला कीं हे आप्त । मारावे कैसे ह्मणून तप्त । जाला अससी ॥ ७३ ॥ तरी यांस मारणें उचित । ऐसें असोनि कां दुश्चित्त । हा शोक अनुचित । हें सिद्ध जालें ॥ ७४ ॥ अधर्म नव्हे हें मारण । परी स्वजन पावती मरण । शोक असेल याकारण । बहुतेक ॥ ७५ ॥

---

१ सर्गऴें. २ दोरी. ३ आधार, स्थान. ४ भुकेलेला. ५ काम्यकर्म. ६ फलेच्छेनें केलेलें कर्म. ७ फलेच्छा न धरितां केलेलें कर्म. ८ शास्त्रप्रतिपाद्य. ९ लक्ष्मीपति, १० अंतर्यामी.

तरी हाही शोक उचित । भल्यास नव्हे निश्चित । म्हणोनि बोलतो अच्युत । या उत्तरार्धे ॥ ७६ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥११ ॥

॥ टीका ॥ ज्या देहांचे गेले प्राण । ज्यांचे आहेत त्यांहिकारण । शोक पंडितांचे गण । सर्वथा न करिती ॥ ७७ ॥ कीं पंडितांच्या मतें । स्वप्नतुल्य सर्व भूतें । असत्य अशाश्वतें । कां रडावें त्यांलागीं ॥ ७८ ॥ स्वप्नीं सखे सोयरे । काय न वाटती खरे । तैसे हेही लोक सारे ॥ शोक करावा किमर्थ ॥ ७९ ॥ स्वप्नींचीं इंद्रियें हेंचि मन । ज्या मनें निर्माण केला जन । जागृतींतही मनोनयन । स्वप्नजन दिसे आठवितां ॥ १८० ॥ तैसें स्थूलें देहाचे दृष्टी । जरी देखिली मिथ्या सृष्टि । मेल्या जित्याकारणें कष्टी । कां ते होती पंडित ॥ ८१ ॥ आपण आत्मा अतींद्रिय । इंद्रियें स्वप्न आणि विषय । स्वप्नदृष्टि स्वप्नप्रत्यय । जागृतास ॥ ८२ ॥ एवं ज्याचे गेले प्राण । आणि जिवंतास पुढें मरण । ऐसें म्हणोनि दोहींकारण । शोक न करितीं पंडित ॥ ८३ ॥ इत्यादि भाव चित्तीं । तों ऐसें म्हणे यदुपति । कीं पंडित शोक न करितीं । जित्या मेलियाचा ॥ ८४ ॥ यापुढें जो श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । तेंही निमित्त सुज्ञ लोक । परिसोत ऐसें ॥ ८५ ॥ वाखाणिला पूर्वश्लोक । त्या श्लोकीं उत्तमश्लोक । अर्जुनाचा निषेधी शोक । धर्मविरुद्ध म्हणोनि ॥ ८६ ॥ त्यांत मेले आणि जीवंत । दोहींकारणें पंडित । शोक न करिती तूं अत्यंत । मूर्ख कीं शोक करिसी ॥ ८७ ॥ हा उत्तरार्धाचा अर्थ । एकीकडूनि होतो व्यर्थ । कीं ते मरतील म्हणोनि पार्थ । शोक न करी ॥ ८८ ॥ यांस मी मारूं कैसा । इतकाच शोकाचा वळसा । हे मरती कीं शोक ऐसा । न करी अर्जुन ॥ ८९ ॥ ऐसा वाखाणितां अर्थ । हा दोष ठेविती समर्थ । याचा अर्थ यथार्थ । वाखाणिला ऐसा ॥ १९० ॥ कीं यांस मारणें धर्म । तेव्हां शोक करणें अधर्म । तरी शोकाचें मूळ भ्रम । कीं हे मरती म्हणोनि ॥९१॥ न हें अर्जुनाचे मनीं । परी माथां स्थापलें येऊनी । कीं कैसा मारूं म्हणोनी । अंगीं न करवे शोक ॥ ९२ ॥ हे मरती कीं ऐसा शोक । स्थापितो हा उत्तमश्लोक । कीं न करिती पंडितलोक । शोक मेल्या जित्याचा ॥९३॥ तरी कोण्या ज्ञानें शोक । न करिती

---

१ मनाच्या डोळ्यानें. २ मनुष्यदेह. ३ इंद्रियांनीं जाणण्याजोगा नव्हे तो. ४ विळखा.

पंडित लोक । हें अतःपर उत्तमश्लोक । बोलेल तें आइका ॥ ९४ ॥ शोक माझा व्यर्थ । त्याचा कोणे परी तरी हा अर्थ । सिद्ध करील समर्थ । तरी हो असाचि ॥ ९५ ॥ या प्रसंगें ज्ञान । सांगेल करुणानिधान । कीं शोक पंडितजन । न करिती कैसा ॥ ९६ ॥ ऐसा सादर श्रोता । श्रीगुरु देखोनि आतां । वदेल नित्यानित्यता । आत्मानात्मविवेकें ॥ ९७ ॥ कोणे दृष्टीं पंडित । शोक न करिती अनुचित । तें अर्जुना सांगे निश्चित । या श्लोकीं ॥९८॥

॥ श्लोक ॥ न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतःपरम् ॥ १२ ॥

॥ टीका ॥ मीं तूं हे जनाधिप । अगा अनादि नित्यस्वरूप । सर्वांस एक एक रूप । लागलेंचि असे ॥ ९९ ॥ मागें कधीं आह्मी नव्हतों । सर्वथाही न घडे अर्जुना हें तों । जे आतां देहधारी दिसतों । तेचि होतों पूर्वींही ॥ २०० ॥ पूर्वींही एक एक देह । आह्मांस होता निःसंदेह । तैसेंच आतां ज्याचा स्नेह । दुर्लभत्वें अपंडितां ॥ १ ॥ आतां हीं रूपें जाती । पुढें आणिक न होती । हेंही न घडे मागुती । होती देह सर्वांसी ॥ २ ॥ आत्मा नित्य शाश्वत । देह पुनः पुनः निश्चित । मेल्याकारणें पंडित । शोक न करिती यालागीं ॥ ३ ॥ या श्लोकीं जीवांमाजी । श्रीकृष्ण आपणास मोजी । कीं कालत्रयीं कृष्णजी । तोही करी अवतार ॥ ४ ॥ आणि जीव वेगळेसे । हा भेद दृष्टी न दिसे । याकारणें शब्द ऐसे । निघती मुखामधूनि ॥ ५ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । तें निमित्तही सुज्ञ लोक । परिसोत अर्थासहित ॥ ६ ॥ आत्मा अनादि शाश्वत । पुनः पुन्हा देह निश्चित । परी एक जाऊनि एक प्राप्त । जाला यासी ॥ ७ ॥ पूर्वील देह सोडावा । नवा एक जोडावा । ऊर कैसा न फोडावा । आजि या शोकें ॥ ८ ॥ ह्मणेल ऐसें अर्जुन । यालागीं श्रीजगज्जीवन । या मोहाचेंही निरसन । करितसे या श्लोकीं ॥ ९ ॥

॥ श्लोक ॥ देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

॥ टीका ॥ याच देहीं अर्जुना । देहांतराची भावना । एथें कोणी मा-

---

१ यापुढें. २ दयानिधि. ३ शाश्वत आणि अशाश्वतपणा. ४ चैतन्य आणि जड यांच्या विवेकानें. ५ राजे. ६ शाश्वत. ७ देहांत जे फेरफार होतात त्यांची. ८ अवस्था.

नीना। देहांतर ॥ २१० ॥ देहास जाणे देही। नाना अवस्था त्याच देहीं। पुढिले अवस्थेमाजी नाहीं। रूप मागिले अवस्थेचें ॥ ११ ॥ न दिसे कांहीं बालपण। शरीर होतां तरुण। वृद्ध होतां पूर्व लक्षण। कांहींच न दिसे ॥१२॥ देहीं अवस्था नाना। पालटती स्वयें पालटेना। तैशी देहांतरभावना। द्रष्टा तोचि ॥ १३ ॥ बाल्य जातां मेला। कीं तारुण्य येतां उपजला। तैसा देहांतरा गेला। पूर्व देह टाकूनि ॥ १४ ॥ एथें मोहे अधीर। न मोहे जो पुरुष धीर। कीं दृश्य तितकें नव्हे स्थिर। द्रष्टा अविनाशी सर्वदा ॥ १५ ॥ एथें कां फुटावा ऊर। एक जातां दुजें शरीर। आत्मा नित्य म्हणोनि धीर। न मोहती एथें ॥ १६ ॥ यापुढें जो श्लोक। तो कां बोले उत्तमश्लोक। तें निमित्त सुज्ञ लोक। अर्थ संयुक्त समजोत ॥ १७ ॥ आत्मा नित्य शाश्वत। देह देहापुढें निश्चित। तथापि शोक उचित। एक गुणें ॥ १८ ॥ कीं आपला सखा सोयरा। त्यास देह प्राप्त दुसरा। परी ते सोयरीक यदुवीरा। भंगेल कीं ॥ १९ ॥ यांस पाहतां सुखी नेत्र। यांच्या शब्दें सुखी श्रोत्रें। यांस आलिंगितां गात्रें सौख्य पावे ॥ २२० ॥ देहांतर प्राप्त त्याला। जो एक देह त्यजोनि गेला। जीवंत सुहृद यांला। तें सुख कैंचें त्यावरी ॥ २१ ॥ आणि यांच्या दर्शनें। सुखी होतीं त्याचीं नयनें। त्वचा आलिंगनें। सुखी होती ॥ २२ ॥ एवं देहांतरा जाणें। कां नव्हे शोकाकारणें। नराचा हा शोक नारायणें। हरिजेला या श्लोकीं ॥ २३ ॥

श्लोक ॥ मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः।
आगमापायिनो नित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥

॥ टीका ॥ मेले आणि जीवंत। शोक दोहींचाही पंडित। कां न करिती याचा अंत। एथवरी आला ॥ २४ ॥ कीं शोक न करणें उचित। परी इंद्रियद्वारा चित्त। सुख घेत होतें निश्चित ॥ अंतरलें ॥ २५ ॥ तरी बाप तेचि पंडित। जिहीं विषय इंद्रियजनित। सुख तें दुःख निश्चित। मानिलें ॥ २६ ॥ आणि जाले विरक्त। तरीच ते युक्त। शोक न करूनि मुक्त। जितांचें जाले ॥ २७ ॥ कीं हीं विषयेंद्रियें। शीतोष्णसुखाच्या निश्चयें।

---

१ जीव, प्रतिबिंब, आत्मा. २ देहास पाहणारा आत्मा. ३ कान. ४ अंग. ५ सोयरे. ६ कातडी. ७ अर्जुनाचा. ८ इंद्रियांपासून झालेले. ९ विषयभोगांवरून ज्यांची प्रीति उडाली आहे. १० जीवंत असून.

दुःख देती जीं स्वयें । केवळ रूपेंचि दुःखाचीं ॥ २८ ॥ उष्णकाळीं शीत । सुख दाखवी निश्चित । वस्तुतः तें अत्यंत । दुःखरूप ॥ २९ ॥ शीतकाळीं उष्णता । सुख दाखवी देहवंता । वस्तुतः ते पाहतां । दुःखरूप ॥ २३० ॥ एवं विषयेंद्रियें । हीं दुःखरूपें निश्चयें । त्यांत वाटे सुख तें स्वयें । आत्मसुख ॥ ३१ ॥ मृग मृगजळातें धांवती । मार्गी नदीचें जळ पिती । धांवतां उरीं फुटती । मृगजळाकारणें ॥ ३२ ॥ ज्याकारणें ऊर फुटे । सुख त्याच्याच पानें वाटे । जळ नदीचें प्यालें वाटे । तें वेगळें हें नेणती ॥३३॥ तैसेंच आत्मगत सुख । विषय इंद्रियें केवळ दुःख । हें नेणती बहिर्मुखें । अनुभवी जाणती ॥३४॥उष्णशीतातें परिहरी । शीत उष्णातें हरी । सुख वाटतें अंतरीं । आत्मसुख ॥ ३५ सुषुप्तीसारिखें सुख । प्रपंचीं नसे आणिक । इंद्रियविषयांचें सुख । न दिसे तया सुषुप्तींत ॥ ३६ ॥ विषयेंद्रियांरहित । सुख आहे निश्चित । हें जाणती पंडित । अनुभवी जे ॥ ३७ ॥ विषयेंद्रियां उत्पत्ति नाश । त्यांत कैंचा सुखाचा लेश । आणि अनित्य ज्यांचा भ्रंश । होय मरणापूर्वीही ॥ ३८ ॥ अंध होतां रूप नाहीं । बधिर होतां नाइके कांहीं । ऐशीं अनित्य तिहीं । काय सुख द्यावें प्राण्यास ॥ ३९ ॥ मेले त्यांचा वियोग । होतां विषयेंद्रियभोग । अंतरे ह्मणोनि नित्य योग । इच्छिसी अनित्याचा ॥ २४० ॥ हे गोष्टी जाली सिद्ध । जें सर्व दुःखबीज प्रसिद्ध । दुःखसंसारबद्ध । जो तो याच गोष्टीनें ॥ ४१ ॥ कीं ज्या भोगीं सुख । निश्चित त्याच भोगीं दुःख । सुखीं मातें आणिक । घाबरा होय दुःखांत ॥ ४२ ॥ ह्मणोनि इच्छी सुख । न हो ह्मणे कधीं दुःख । या चिंतेनेंचि मुख । विश्रांतीचें न ओळखे ॥४३॥ ऐसा कोण विषय । कीं भोगितांच तृप्त इंद्रिय । वियोग होतां तरी होय । अत्यंत दुःख ॥ ४४ ॥ विषयवियोगें रडावें । त्या रडें काय घडावें । कां धैर्य धरूनि न पडावें । समाधानीं ॥ ४५ ॥ न होतांही वियोग । घडतां विषयेंद्रिययोग । दुःख उपजवी तोचि भोग । शीतोष्णरूपें ॥ ४६ ॥ शीतकाळीं पहाटे । उष्ण अत्यंत गोड वाटे । दुपारां चालतां वाटे । दुःख भोगी तयाचेंच ॥ ४७ ॥ त्या उष्णें पावे दुःख । तों अस्तमानीं सूर्यमुख । मार्गीं न दिसतां सुख । मानी उष्णें पीडिला ॥ ४८ ॥ जों अंगींचा उष्मा जाय । तों शीतस्पर्शी

१ विषय आणि इंद्रियें. २ सुख आत्म्यांत आहे. ३ आत्मा न जाणून बाहेरचे विषयच मात्र पाहणारे. ४ गाढ निद्रा. ५ नाश. ६ संग. ७ मातलों.

होय । त्याच शीतें हाय हाय । करूं लागे घडिभरां ॥ ४९ ॥ उष्ण आठवी शीतीं । उष्णीं स्मरे शीत चित्तीं । सुख दावूनि अंतीं । भोग तितका दुःख दे ॥ २५० ॥ भोगीं होतां सुख । माते फुगे आणिक । तेथेंचि होतां दुःख तळमळूं लागे ॥ ५१ ॥ विषयसुखीं मातला । तों दुःखें चिंतेंत घातला । मातेना तो भला । नव्हे दुःखीं घाबरा ॥ ५२ ॥ जरी घाबरा जाला । दुःखभोग न सोडी त्याला । ह्मणोनि विवेकी भला । दोन्ही गोष्टी सोशितो ॥ ५३ ॥ ह्मणोनि विषयेंद्रियां । सोशीं तूं ऐसा धनंजया । कीं हीं टाकितांही तयां-। वांचूनि वर्तणें घडेना॥५४॥तरी तूं सोशीं यांतें । साहें योगावियोगातें । कीं सुखीं मातणें दुःखीं चित्तें । घाबरें होणें तें नको ॥ ५५ ॥ एवं स्वजनवियोग । होतां अंतरे विषयभोग । हें सोसूनि राहतां योग । महासमाधानाचा ॥ ५६ ॥ कीं सर्वही अनित्य । वियोग होणें हें सत्य । यालागीं हें अगत्य । सोशीं तूं ॥ ५७ ॥ कीं ज्या भोगांत सुख । त्याच भोगांत दुःख । शीतांत उष्ण आणिक । शीतही तैसें उष्णांत ॥ ५८ ॥ जितां स्वजनदेह । नेत्रसुख दे लावी स्नेह । मृत देखतां सुख स्नेह । न नेत्रांसी ॥५९॥ आलिंगितां जिता देह । त्वचेस उपजे सुख स्नेह । शव[1] आलिंगितां निःसंदेह । दुःख कोटि त्वचेसी ॥ २६० ॥ जितां जयाच्या गोष्टी ॥ कर्णी पडती अमृतवृष्टी । मेल्या करिती अत्यंत कष्टी । त्याच गोष्टी परिसतां ॥ ६१ ॥ एवं जितां जयाचा स्नेह । न धरी आणि तो मरे देह । तरी दुःखही न उपजे संदेह । काय एथें ॥ ६२ ॥ ह्मणोनि तूं अर्जुना । नित्य न मानी स्वजना । आणि स्नेह न लावीं मना । तरी मेल्या न होसी संतप्त ॥ ६३ ॥ टाकोनि यांची असोसी[2] । योग वियोग यांचा सोसीं । तरीच सुखी राहसी । अगा भारता ॥ ६४ ॥ अर्जुनासि एथें भारता । ह्मणे भरतवंशप्रसूता[3] । भाव कीं तूं तत्त्वता । समर्थ आहेस हें सोसीं ॥ ६५ ॥ आतां पुढील श्लोक । जो कां बोले उत्तमश्लोक । तें निमित्त पुण्यश्लोक । भावार्थेंशीं परिसोत ॥ ६६ ॥ इंद्रियां विषयभोग । यांचा योग आणि वियोग । एथें सम[4] पाहणें योग । समाधानाचा ॥ ६७ ॥ सम होणें कठिण आहे । तरी तूं सोसूनि राहें । ऐसें बोलोनि भाव पाहे । अर्जुनाचा ॥ ६८ ॥ तों त्याच्या मनीं हे गोष्टी । कीं न ह्मणों आम्ही सुखी कष्टी । परी या समाधानें दृष्टी ।

---

१ मृत. २ उत्कंठा, हाव. ३ भरताच्या वंशांत उत्पन्न झालेल्या. ४ समान, तुल्य.

सुख कांहीं दिसेना ॥ ६९ ॥ सुख न मानूं होतां सुख । कीं सुख ह्मणतां होय दुःख । या समाधानें आणिक । सुख कांहीं दिसेना ॥ २७० ॥ आणि टाकोनि असोसी । ह्मणतो हे गोष्टी सोसीं । सोसूं तरी आह्मांसी । सुख काय ॥ ७१ ॥ आतां हें सोसणें । सुखदुःखीं समाधान असणें । या कांजीचें उसणें । अमृत फेडी ॥ ७२॥ ऐसा अर्थ श्रीहरी । बोलोनि हा संदेह हरी । कृष्ण भवगजकेसरी । या श्लोकीं ॥ ७३ ॥

॥ श्लोक ॥ यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते॥ १५ ॥

॥ टीका ॥ विषयेंद्रियांचें सोसणें । तें सुखदुःखीं समान असणें । सोसितां हा सद्योगुण । कीं त्यांची व्यथा स्पर्शेना ॥ ७४ ॥ देहींच उठला फोड । तो खाजवितां वाटे गोड । खाजवितां उठती मोड । तिडकांचे त्यांतूनी ॥ ७५ ॥ ऐसें भोगसुखीं सुख । आणि भोगदुःखीं दुःख । मानितो तों आणिक । दुःखें कोटि उपजती ॥ ७६ ॥ फोडा खाजवूं हे असोसी । धैर्य धरूनि जो सोसी । व्यथा न देतां तयासी । बरा होय ॥७७॥ ऐसा सुखदुःखीं सम । धैर्यें राहे साधकोत्तम । त्यास विषयेंद्रियसंगम । व्यथा न करी ॥ ७८ ॥ याकारणें अगा पार्था । सुखदुःख तुल्य ज्या समर्था । त्या धीरपुरुषा व्यथा । न देती विषयेंद्रियें ॥ ७९ ॥ तो पुरुष मोक्षा दुर्लभा । योग्य होतो पुरुषर्षभा । तूं पुरुषश्रेष्ठा प्रभा । संपादीं ऐसी ॥ २८० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । भावार्थासहित परिसोत ॥ ८१ ॥ एथोनि तत्त्वोपदेश । करितो श्रीहृषीकेश । पूर्वानुसंधानलेश । अवलंबूनी ॥ ८२ ॥ स्वजनमरणीं दुःख । हें कीं दर्शनादि सुख । त्याचें अंतरलें आणिक । हेतु नाहीं शोकासी ॥ ८३ ॥ हा हेतु सिद्ध होतां जो सम । तो मोक्षसाधकोत्तम । योग्य होतो हा नियम । जगद्गुरु बोलिला ॥ ८४ ॥ पूर्वश्लोकीं हरी । बोले ऐसी वैखरी । ते अर्जुनें बरी । कानीं घेतली ॥ ८५ ॥ कृष्ण कृपेची माउली । पार्थवत्साकडे आली । जगाकारणें पान्हा घाली । सुखकामधेनु प्रथम ॥ ८६ ॥ चातक

१ तांवळांची पेज. २ संसाररूप हत्तीचा नाश करणारा सिंह. ३ तात्कालिक गुण. ४ मोक्षसिद्धीविषयीं फारच प्रवृत्त. ५ पुरुषश्रेष्ठा. ६ सामर्थ्य. ७ वाचा.

उतावेळ अर्जुन । कीं मेघश्यामकृपाघन । मुक्तिप्रद ज्ञानजीवन । शीघ्र वर्षो मजवरी ॥ ८७ ॥ मुखचंद्राचे किरण । शब्दरूपें करिती स्फुरण । पार्थचकोर श्रवण । घेऊं ह्मणे ॥ ८८ ॥ मोक्षा योग्य पुरुष । त्यास जें ज्ञानपीयूष । हा श्रवणीं परमपुरुष । तें उपदेशू मजप्रती ॥ ८९ ॥ ऐसें मन उतावेळ । तें जाणे श्रीमेघनीळ । ह्मणोनि ज्ञान केवळ । उपदेशितो या श्लोकीं ॥ २९० ॥

॥ श्लोक ॥ नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।

॥ टीका ॥ जडास नाहीं सत्ता । जडास नाहीं नित्यता । सत्ता नित्यता तत्त्वतां । सद्वस्तूसचि ॥ ९१ ॥ सत्ता म्हणजे असणें । नित्यता म्हणजे न नासणें । जें न दिसे सत्तेविणें । तेंचि अनित्य ॥ ९२ ॥ सोनें तेंच असे । ह्मणोनि सत्ता त्यास दिसे । अलंकार त्याविण न भासे । सत्ता नाहीं तयाला ॥ ९३ ॥ ज्याला नाहीं सत्ता । तें असत् त्याला न नित्यता । दोन्ही गोष्टी पाहतां । अलंकारीं ॥ ९४ ॥ अलंकार आकार दिसे । विचार करितां तो नसे । नुसतें सोनेंचि गवसे । दुसरें नाहीं ॥ ९५ ॥ अलंकाराविण । असों जाणे सुवर्ण । आपणामाजी आपण । असे हे सत्ता ॥ ९६ ॥ सोन्याविण अलंकार । कांहीं नसतो आकार । असद्वस्तुप्रकार । ये रीती त्याचा ॥ ९७ ॥ ऐसे दृष्टांत वेदीं । अभेद जेथें नानाभेदीं । आणि मिथ्यात्व कार्यवृंदीं । कारणीं सत्यत्व ॥ ९८ ॥ ब्रह्म न घडे न मोडे । धातु मोडे आणि घडे । ह्मणोनि ह्मणती कोणी वेडे । कीं दृष्टांत साजेना ॥ ९९ ॥ दृष्टांत एकदेशी परी । आकार मिथ्या धातु खरी । घडी मोडी सत्य जरी । घडेमोडेना धातुपण ॥ ३०० ॥ दुधाचें जालें दहीं । तें दहीं दूध नव्हे कधींही । ऐसें तों सोन्यास कांहीं । न दिसे रूपांतर ॥ १ ॥ आकाराचाच आकार । सोनें स्वयें निर्विकार । घडणें मोडणें हे प्रकार । त्याच्या शक्तीस न तया ॥ २ ॥ नव्हतें घडलें कडें । तेव्हां सोनें केवढें । वाटोळें लिंबाएवढें । लांब केळ्यासमान ॥ ३ ॥ गोटी ह्मणतां वाटोळें । सळा ह्मणतांचि लांबोडें । त्रिकोण चतुष्कोण यावेगळें । निखिळ सोनें तें कैसें

---

१ मुक्ति देणारें ज्ञान हेंच पाणी. २ ज्ञानामृत. ३ मेघश्याम कृष्ण. ४ खरी वस्तु, ब्रह्म. ५ खरी नव्हे जी. ६ भेदरहित. ७ खोटेपणा. ८ विकाररहित.

॥ ४ ॥ जरी वाटोळ त्याचें रूप । तरी लांबोडें नव्हे हेमस्वरूप । ऐसें पुसतां सरली रूपें । स्वरूप त्याचें न बोलवे ॥ ५ ॥ आतां जे पीतच्छाया । तेच कनकाची काया । तरी ते लांब वाटोळी कीं या-। वेगळी त्रिकोण चतुष्कोण ॥ ६ ॥ पीतच्छाया लांबोडी । तरी नासावी होतां वाटोळी । लांब आंखुड नव्हाळी । तेव्हां न घडे सुवर्णाची ॥ ७ ॥ लंबत्व अथवा वर्तुलत्व । जरी सुवर्णाचें सुवर्णत्व । तें नासतां न नासे धातुत्व । घडलें मोडलें तें काय ॥ ८ ॥ एवं दुधाचें दहीं । तैसें न होय सोन्याचें कांहीं । सुवर्णत्वीं हानि नाहीं । हानि नाहीं ब्रह्मत्वीं ॥ ९ ॥ ब्रह्मत्वीं हानि नाहीं । तेव्हां घडमोडी नाहीं कांहीं । मृत्तिकाहेमदृष्टांतही । वेदसिद्ध ॥ ३१० ॥ ॥ श्रुति ॥ यथा सोम्यैकेन मृत्पिंडेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्याद्वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥ श्रुत्यर्थ ॥ कळतां एक मृत्पिंड । कळले घटादि उदंड । ज्यांत त्यांत मातीच अखंड । आकार लटिके शब्दमात्र ॥ ११ ॥ आकार लटिके खरी माती । तैसें ब्रह्म सर्वांभूतीं । भूतें मिथ्या होऊनि जाती । देखतां ब्रह्म ॥ १२ ॥ याकारणें सोनें असे । तें सत् आणि असत् अलंकार दिसे । कीं तो नाहीं त्यांत गवसे । एक सोनें ॥ १३ ॥ ऐसें असत् ज्याला सत्ता । नसे ह्मणोनि नाहीं नित्यता । सत् तेंचि असे नित्यता । त्यास कीं सत्ता तेची ॥ १४ ॥ एवं दृश्य प्रकार । देहादि नाना विकार । हा असत् अनित्य आकार । नाहीं भाव जडास या ॥ १५ ॥ दिसोनिही पटाचा भाव । तंतूंच भाव पट अभाव । तैसा नसे सद्भाव । जडास या ॥ १६ ॥ "नासतो विद्यते भाव" । या भावें ह्मणे देव । आतां जें सत् तया अभाव । नाहीं ह्मणतो तो स्वयें ॥ १७ ॥ सत् ब्रह्म तेंचि आहे । तें आहे ह्मणणेंही न साहे । परी बुद्धि त्यास पाहे । तन्मय होउनी ॥ १८ ॥ जें जडाहूनि विलक्षण । बुद्धि अनुभवी विचक्षण । तें जड असत् ब्रह्मलक्षण । सत् ह्मणोनि तें बुद्धि वर्णी ॥ १९ ॥ सत् ह्मणजे सत्य । असत् ह्मणजे असत्य । असत् अनित्य सत् नित्य । अभाव नसे तयाला ॥ ३२० ॥ जें सत् सत्ता निराकार । त्याचाच आणीक एक प्रकार । सत् ह्मणणें हा प्रकार । दोहींसही ॥ २१ ॥

---

१ धैर्य. २ पिवळी कांति. ३ नवेपणा. ४ खरें. ५ अस्तित्व. ६ दिसणारे. ७ सूत. ८ नाहींपणा. ९ त्यानें पूर्ण, त्यासारखी. १० आकार नाहीं ज्याला.

श्रुति ॥ सदेव सोम्येदमग्र आसीत् ॥ श्रुत्यर्थ ॥ हे सामवेदींची श्रुति । उद्दालक श्वेतकेतूप्रति । ह्मणे हे सृष्टि आदीं होती । सद्वस्तुमात्र ॥ २२ ॥ कीं द्रष्टा नव्हता जेधवां । हा सर्प रज्जूच होता तेधवां । श्रुत्यर्थ ऐसा सदैवा । ब्रह्मनिष्ठासचि कळे ॥ २३ ॥ प्रस्तुतीं हेचि गोष्टी । कीं जेव्हां नव्हती जीवदृष्टी । नव्हती मिथ्याभास सृष्टी । होतें ब्रह्मचि सत् एक ॥ २४ ॥ तें सत् ब्रह्म केवळ । तेथें प्रगटे मायामृगजळ । सूर्यकिरणीं कल्लोळ । उठती जेवीं मध्यान्हीं ॥ २५ ॥ तें ब्रह्मीं ईश्वरपण । आणि मायात्रिगुणीं सत्त्वगुण । त्यांत जो ईश्वर आपण । प्रतिबिंबला तो जीव ॥ २६ ॥ तो सत्त्वगुण निर्मळ । नाना घटीं जैसें जळ । नाना जळीं रविमंडळ । ईश्वर तैसा या देहीं ॥२७॥ श्रुति॥ यथा ह्ययं ज्योतिरात्मा विवस्वानापो भिन्ना बहुधैकोनुगच्छन्। उपाधिना क्रियते भेदरूपो देवः क्षेत्रेष्वेवमजो यमात्मा ॥ श्रुत्यर्थ॥ जैसा हा ज्योतिर्मंडळ । जो सूर्य नभीं केवळ । तो पावोनि भिन्न भिन्न जळ । एक बहुधा होतसे॥२८॥ नाना क्षेत्रीं ऐसे भेद। देव पावला ह्मणे वेद । ते हे जीव ज्यांस खेद । उपाधियोगें ॥ २९ ॥ श्रुति ज्योतिर्मय मंडळ । सूर्यास ह्मणे कीं तैसेंचि उज्वळें । प्रतिबिंब दिसे प्रतिजळ। प्रकाशूनि या ॥ ३३० ॥ एवं सत्स्वरूप बिंब । तैसें सत्स्वरूप प्रतिबिंब । कीं ज्याचा धरूनि अवलंब । जड अहंकार मी ह्मणे ॥ ३१ ॥ एवं एक सत् तें बिंब । सत् दुसरें प्रतिबिंब । सुख दुःखभोगावलंब । सत् दुसरें तयासी ॥ ३२ ॥ अवलंबोनि मीपणा । प्रतिबिंबात्मा आपणा । नेणोनि सत्यपणाच्या खुणा । मी जडदेह ह्मणतसे ॥ ३३ ॥ त्यास बंध तो हाच । कीं देह आपण मानी साच । ते देहात्मता अहोंच । सत् असत् वेगळें कळतां ॥३४ ॥ ह्मणोनि ह्मणे देव । कीं "नासतो विद्यते भाव" । आणि जें सत् तया अभाव । कधीं नाहीं ॥३५॥ ह्मणत होता मी देह । आत्मपणें तयाचा स्नेह । तो फिटला संदेह । या विवेकें करूनी ॥ ३६ ॥ देह असत् क्षेत्र । जड मिथ्या दृश्यमात्र । विकार ज्याचे विचित्र । क्षेत्रज्ञ सत् जाणे जाणता याचा ॥ ३७ ॥ आपणास नेणे देह । अथवा ज्यास आपला स्नेह । त्यासही नेणे निःसंदेह । या विवेकें करूनी ॥ ३८ ॥ मी माझें ह्मणोनी । या जडास आपण मानुनी । अहंपणें

---

१ खरें वस्तु ब्रह्म. २ दोरी. ३ ब्रह्मस्वरूपीं ज्याची निष्ठा त्यास. ४ झोंत, लाट. ५ आकाशांत. ६ देहीं. ७ प्रकाशित. ८ आश्रय. ९ जीवात्मा. १० उगीच, व्यर्थ.

अभिमानूनी । जाणे ह्मणावें सत् तया ॥ ३९ ॥ मी एक आहें ऐसें पाहे । प्रकाशवंत तोचि आहे । हे सत्ता ज्यास त्यास साहे । सत् ह्मणवणें॥३४०॥हें सत्पण नाहीं जया । असत् जड ह्मणावें तया । जाणे आपणा आणि दु-जिया । सत् ह्मणावें तयासचि ॥ ४१॥ हे दोन्ही मिळोनि एक । समजणें हाचि अविवेक । जैसें दूध आणि उदक । भिन्न न दिसे ॥४२॥ हीं दोन्ही निवडी हंस । जगद्गुरु देवोवंतस । तथापि हा परमहंस । हंसाहूनी ॥ ४३ ॥ हंस निवडी जळ क्षीरें । तथापि उरवी भिन्न नीरें । गुरु निवडोनि न करी उशीर । अमृत करी दोहींसी ॥ ४४ ॥ पूर्वार्धी या विवेकीं हंस । तोचि उत्तरार्धी परमहंस । दोहींचें तत्त्व अवतंस । ब्रह्मादिहंसांचा बोलतो ॥४५॥ हा जडचैतन्याचा विवेक । या ज्ञानाचें नांव व्यतिरेक । आतां या दोहींचें तत्त्व एक । तें अन्वयज्ञान बोलावें ॥ ४६ ॥ असत् जड सत् चैतन्य । जें विपरीत लक्षणें अन्योन्य । तें एकाहूनि एक अन्य । वेगळीं दिसती ॥ ४७॥ हे दोन्ही ज्यापासुनी । जें मुख्य सत् ह्मणोनी । वेद वर्णिती सत्ता जुनी । नवी नित्य ॥ ४८ ॥ तें ब्रह्म कळावें यावरी । ह्मणोनि ह्मणतो श्रीहरी । कीं असत् सत् कळलें परी । कळावें तत्त्व दोहींचें ॥ ४९ ॥ हा शरणागता उपदेश । करीतसे श्रीहृषीकेश । परी या शरणागतीं लेश । न्यूनत्व असे ॥ ३५० ॥ कीं भीष्मादिकांस कैसा । मी मारूं ह्मणोनि ऐसा । धर्मसंकटीं जाला पिसा । आला शरण यास्तव ॥ ५१ ॥ तेविषयींच उपदेश । त्यास करी हृषीकेश । परी हृदयीं कृपालेश । कीं अनादि अज्ञान नाशावें ॥ ५२ ॥ परंतु ब्रह्मनिष्ठापासीं । ये शास्त्रमंत्र मागायासी । ज्ञान न इच्छी तों तयासी । न सांगती ब्रह्म ॥ ५३ ॥ जो जें पुसे जैसें । त्यास तेंचि सांगती तैसें । ज्ञान मागतां कृपारसें । सांगती ब्रह्म ॥ ५४ ॥ ''किं तद्ब्रह्म'' ऐसा प्रश्न । अष्टमाध्यायीं अर्जुन । करील तेव्हां करुणाघन । अपरोक्षामृतातें वर्षेल ॥ ५५ ॥ प्रस्तुत युद्धसंदेह । स्वजनांचा उपजला स्नेह । तो परिहरूनि देह । आत्मा नव्हे हें सांगतो ॥ ५६ ॥ कीं आत्मा तो नित्य । देह मरणाराचि अनित्य । आणि स्वधर्में तों अगत्य । क्षत्रियें तुवां मारावें ॥ ५७ ॥ हें सांगणें प्रस्तुत । आणि अपरोक्ष सांगणें निश्चित । दोहीं

---

१ देवांचें शिरोभूषण. २ दूध. ३ पाणी. ४ वेडा. ५ दयेचा मेघ. ६ आत्मज्ञान हेंच अमृत त्यास.

पक्षीं आदीं उचित । जडचैतन्य सांगणें ॥ ५८ ॥ तें त्या श्रीउत्तमश्लोकें । सांगितलें पूर्वार्धश्लोकें । सत् असत् कृपावलोकें । लक्षणांसहित वर्णिलें ॥ ५९ ॥ आतां या दोहींचें तत्त्वं[1] । तत्त्वांत ज्यास पूर्णत्व । त्याचें जाणती अनुभवी महत्त्व । हें उत्तरार्धें बोलतो ॥ ३६० ॥

॥ उत्तरार्ध ॥ उभयोरपि दृष्टोंतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ हें असत् सत् ह्मणोनी । जें तुज बोलिलों दोनी । त्यांचें तत्त्व अनुभवेंकरूनी । अनुभवी तत्त्वदर्शी[2] जाणती ॥ ६१ ॥ या दोहींचा जो अंत । अंत ह्मणजे तत्त्वसिद्धांत । तत्त्वसिद्धांत ह्मणजे ज्यांत । सत्त्वत्वें जें असे ॥ ६२ ॥ ह्मणोनि ह्मणतो अनंत । कीं या दोहींचाही अंत । देखिला असे याच दोंत । तत्त्वदर्शी जे तिहीं ॥ ६३ ॥ माती जैसी घटीं । कीं तंतु जैसा पटीं । कारणें असती शेवटीं । नसेचि कार्य ॥ ६४ ॥ घटाहूनि पूर्वी माती । मातीच उरे अंतीं । घटकाळींही नुसती । मातीच दिसे ॥ ६५ ॥ ऐसी प्रपंचीं ब्रह्मसत्ता । उघडी देखती गा तत्त्वतां । तत्त्वदर्शी याकरितां । ह्मणिजेतें त्यांतें ॥ ६६ ॥ प्रपंच इंद्रियां भासे । बुद्धीस नुसतें ब्रह्म असे । मृगजळ दृष्टी दिसे । उष्ण[3] असे बुद्धीनें ॥ ६७ ॥ हातीं गुळाचा भेला[4] । रसना[5] चाटीतसे ज्याला । दृष्टि रस नेणे तरी त्याला । काय भेला ह्मणेल ॥ ६८ ॥ मनुष्यदृष्टी मृगजळ । दिसोनिही तें केवळ । उष्ण वाटे परि जळ । कधीं न वाटे ॥ ६९ ॥ उष्ण सूर्याचें केवळ । हरिणास वाटे सत्य जळ । तैसें अज्ञजनांसि निखिळ । जडचि सत्य ॥ ३७० ॥ तत्त्वदर्शी तत्त्व । देखती तें द्रष्टृत्व[6] । ऐसें कीं बुद्धि सत्त्व । तोचि डोळा तयांचा ॥ ७१ ॥ ज्या इंद्रियास जो विषय । त्या विषयासहित तें इंद्रिय । बुद्धीस दृश्य परि अदृश्य । ब्रह्म देखे दोहींत ॥ ७२ ॥ एवं प्रपंच दृश्य सविकार । हें असत् यांत निर्विकार । ब्रह्म देखती सार । असारींही ॥ ७३ ॥ असत् जड हें याचा । याचमध्यें अंत साचा । ऐसा देखती ह्मणोनि वाचा । गीता ह्मणे मुकुंदाची ॥ ७४ ॥ ऐसें असत् हें क्षेत्र । याचे विकार नाना विचित्र । यांस जो जाणे त्यास शास्त्र । ह्मणे क्षेत्रज्ञ ह्मणोनी ॥ ७५ ॥ याच गीतेमाजी । अध्याय तेरावा तेथें कृष्णजी । असत् याला अर्जी । क्षेत्र ह्मणेल ॥ ७६ ॥ यापुढील तेथें दुजा श्लोक । त्या श्लोकीं उत्तम श्लोक । उघड करूनि तत्त्वाव-

१ सार. २ ब्रह्मवेत्ते. ३ ऊन. ४ गुळाची ढेप. ५ जिव्हा. ६ पाहणारेपणा.

लोक । यामध्येंच याचा सांगेल ॥ ७७ ॥ ॥ त्रयोदशाध्यायश्लोक ॥ क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत। क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥१॥ टीका ॥ एथें या श्लोकीं अनंत । ह्मणे क्षेत्रक्षेत्रज्ञ यांत । जें ज्ञान आहे स्फुरत । त्या ज्ञानातें ज्ञान मत माझें ॥ ७८ ॥ यांत असत् क्षेत्र जड । त्यांतहि ज्ञान विरळ सुघड । देखे हें परम अवघड । कळस सकळा ज्ञानाचा ॥ ७९ ॥ याचा जो अनुभव । तें ब्रह्मविद्येचें वैभव। तें बोलिला स्वयमेव। टीकेंत याच श्लोकाच्या ॥ ३८० ॥ आतां जो क्षेत्रज्ञ । अहंता ममता जाणे अभिज्ञ । त्यांत जें ज्ञान तें तों सुज्ञ । वळखती तत्काळ ॥८१॥ प्रस्तुतीं सत् ह्मणोनी । असत् देह त्यावेगळा करूनी । क्षेत्रज्ञ हाच स्ववचनीं । जगद्गुरूनें वर्णिला ॥ ८२ ॥ आणि याचा अंत। अंत ह्मणजे तत्त्वसिद्धांत । याचमाजी ह्मणे अनंत । तो ऐसा ॥ ८३ ॥ मी माझें ह्मणोनी । वर्ते स्वरूपज्ञानेंकरूनी । ते अहंताशार्वरी नीवरूनी । चैतन्यचंद्र देखावा॥८४॥ मीपणापासूनि शब्द । त्यावेगळें सत् अशब्द । गुरुमुखावांचूनि कोटि शब्दें । पंडितांहीं जें न आकळे ॥८५॥ तें याचें तत्त्व यांत । तत्त्वदर्शी देखती संत । असत् सत् या दोहींचा अंत । याच माजीं तो ऐसा ॥८८॥ असत् सत् दोहींचा विवेक । करितां तत्त्व दोहींत एक । सत् उमजे करितां व्यतिरेक । असत् पटतंतु-अन्वयें ॥ ८७ ॥ हें तत्त्वदर्शी पाहूनी । ह्मणोनि बोले यदुपती । कीं याची अपरोक्षानुभूती । पुढें सांगणें यास्तव ॥८८॥ "किं तद्ब्रह्म" हा प्रश्न । अष्टमीं करील अर्जुन । तेव्हां अपरोक्षज्ञान । उपदेशील ॥ ८९ ॥ हेचि गोष्टी त्रयोदशीं । क्षेत्रक्षेत्रज्ञ उपदेशीं । क्षेत्रज्ञ मी मज जाण ऐसी । देव याचा बोलेल॥३९०॥ हें तत्त्वदर्शी जाणती। एथें ऐसें ह्मणे श्रीपती ।प्रस्तुत युद्धीं धरावी प्रवृत्ती। नित्यानित्यविवेक यास्तव॥९१॥आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । भावार्थयुक्त परिसोत ॥ ९२ ॥ मेले आणि जीवंत लोक । यांचा पंडित न करिती शोक । कीं नित्यानित्यविवेक । ते जाणती ॥ ९३ ॥ तों उपजला संदेह । कीं आत्मा नित्य उदंड देह। परी दर्शनादिसुखें स्नेह । तो शोक तदर्थ करणार ॥ ९४ ॥ यावरूनि विषयेंद्रियें । दुःख देती निश्चयें । सुखदुःखीं सम तो

१ कुशल. २ मर्मज्ञ. ३ खांदी. ४ वर्षे. ५ परमेश्वर तो मीच असा अनुभव. ६ आत्मज्ञान. ७ शाश्वत काय आणि अशाश्वत काय याविषयीं विचार.

स्वयें । मुक्त होय ऐसें कथियेलें ॥ ९५ ॥ परी मुक्त कोणत्या ज्ञानें । मनीं इच्छितां हें अर्जुनें । पूर्वश्लोकीं चैतन्यघनें । अपरोक्षही परोक्ष । उपदेशिलें ॥ ९६ ॥ त्यांत असत् देह अनित्य । जीव सत् तो नित्य । या दोहींचें तत्त्व सत्य । जाणती हेंही वर्णिलें ॥ ९७॥ जरी सत् असत् दोहींचें । तत्त्व एक जें साचें । तरी तें नित्य यास कैचें । नित्यत्व अर्जुना वाटलें ॥ ९८ ॥ कीं दोहींचें एक तत्त्व । यांत एकास अनित्यत्व । तेव्हां दुज्यासही नित्यत्व । नसो गे ॥ ९९ ॥ एवं देह जेव्हां मारवेल । त्याचाहि नाश करवेल । तेव्हां शोकाग्नि निवेल । पंडितांचा ॥ ४०० ॥ तरी यांस कैसें मारावें । आप्तवधीं कैसें भरावें । युद्ध आतां करावें । कशास्तव ॥ १ ॥ अर्जुनमनीं हा भाव । उपजतां उमजला देव । संदेह हा स्वयमेव । निवारितो दों श्लोकीं ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥१७॥

॥ टीका ॥ हरावा पार्थसंशय । ऐसा करी जों निश्चय । तों एक गोष्टी अव्यय । खरी देखे ॥ ३ ॥ कीं दोहींचें जें एक तत्त्व । त्यास मानितो हा नित्यत्व । हें तों नव्हे मूढत्व । संशयांत या ॥ ४ ॥ ह्मणोनि ह्मणे अर्जुनासी । कीं तें तों जाण अविनाशी । तुझ्या वरकडा संशयासी । हरूं आह्मी ॥ ५ ॥ या भावें नारायण । ह्मणे तें अविनाशीच जाण । भाव दाखवी सुजाण । की हें आह्मी निषेधूं ना॥६॥ "अविनाशि तु तद्विद्धि" । या चरणें हे अर्थसिद्धी । आतां संशयारूढ बुद्धी । परिहार त्याचा करीतसे ॥ ७ ॥ दोहींचें एक तत्त्व । यांत एकास नित्यत्व । दुसऱ्यास कां अनित्यत्व । संदेह ऐसा ॥ ८ ॥ तरी सत् प्रतिबिंब चिद्रूप । जैसें बिंब चित्स्वरूप । अन्योन्य हें अनुरूप । बिंब तैसें प्रतिबिंब ॥ ९ ॥ याकारणें विनाशी । ह्मणों नये कदापि यासी । कीं विलक्षणत्वें कार्यासी । आलें नाहीं प्रतिबिंब ॥ ४१० ॥ असत् जड नाशवंत । कीं विलक्षण कार्य निश्चित । नश्वर ह्मणणें उचित । कारण अविनाशी तयाचें॥११॥याकारणें जडाचें कारण । तें तूं अविनाशी जाण । हें बोलाया दुसरा चरण । आरंभी या श्लोकाचा ॥ १२ ॥ द्वितीय चरण ॥ "येन सर्वमिदं ततम्" ॥ टीका ॥ ज्या वस्तुनें सर्वही हें । जड असत् व्यापिलें आहे । तें अविनाशी कीं न साहे । याचें

१नसावें. २ चैतन्यरूप. ३ ब्रह्मस्वरूप. ४ कारण कीं. ५ नाशवंत.

कार्य नित्यत्व ॥ १३ ॥ सोनें स्वयें अविनाशी । ज्यानें व्यापिलें नगांसि । नग नें साहे नित्यत्वासी । याचें कार्य ह्मणोनी ॥ १४ ॥ एवं जड प्रपंचासी । व्यापिलें तेंचि अविनाशी । त्याचें कार्य ह्मणोनि यासी । नश्वरत्व हा भाव ॥ १५ ॥ त्याचा करवेल नाश । देहकारें ज्यास भास । कार्य ह्मणोनि जडास । नश्वरत्व ॥ १६ ॥ जें सत् तया कोण नाशी । कीं तें तदंश अविनाशी । उत्तरार्धे अर्जुनासी । हे गोष्टी आतां सांगतो ॥ १७ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

॥ टीका॥ चिदंश[1] हा नाशरहित । अव्यय ह्मणावा जो निश्चित । कोणी याचा घात । करावया समर्थ असेना ॥१८॥ एवं देह जीव दोहींचें । तत्त्व एक हें जरी साचें । देह कार्य त्या कारणाचें । हा अंश ॥ १९ ॥ ह्मणोनि याचा नाश । अर्जुना न करवे कोणास । ह्मणी वाटों देशील मनास । हा मारवेल ह्मणोनी ॥४२०॥ आतां कार्यदेह त्यास । बोलिजे तो अगा नाश । हें उत्तरश्लोकीं अर्जुनास । श्रीकृष्ण सांगे ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥ अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

॥ टीका ॥ हे देह अंतवंत[2] । ज्यांस तो नित्य निश्चित । असे अंतवंत देहांत । तरी अविनाशी हा जाण ॥ २२ ॥ अविनाशी भाव याचा । ह्मणशी कां वर्णितां साचा । तरी अगा हा अप्रमेयाचा[3] । प्रतिबिंबांश अविनाशी ॥ २३ ॥ मारवेल मारितां देह । ह्मणोनि मानिसी हा मोह । तस्मात् अगा निःसंदेह । युद्ध करीं तूं या सर्वांशीं ॥ २४ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । तेच पावतील भावार्थे ॥२५॥ आत्मा देहविलक्षण[4] । तो मरेना हें लक्षण । तेव्हां मारणें हाही गुण । देह-विलक्षणाचा नव्हे याचा ॥ २६ ॥ ऐसें जालें सिद्ध । यास्तव करावें युद्ध । तरी हे गोष्टी अप्रसिद्ध । नाना शास्त्रीं॥२७॥आत्मा कर्ता ह्मणोनी । जैमिनी आणि गौतम मुनी । बोलती तेव्हां कां मनीं । आत्मा न मारी हें धरूं॥२८॥ करी कर्ममीमांसा जैमिनी। तर्क बोले गौतम मुनी । ते तों ह्मणती नेमुनी । कर्तृत्व आत्मयासी॥२९॥आणि आत्मयाचें नित्यपण। कृष्ण बोले आपण । तोच मरे

१ चैतन्याचा अंश. २ अंत आहे ज्यांस. ३ प्रमाणांनीं ज्यास ओळखतां येत नाहीं त्याचा. ४ देहाहून.

ह्मणोनि निपुण । वदे देवगुरु बृहस्पती ॥ ४३० ॥ कृष्णवाक्य मानूं साच । तरी हीं शास्त्रें होती असाच । सत्य मानितां शास्त्रप्रपंच ॥ उडतें वचन कृष्णाचें ॥ ३१ ॥ संकल्प हा अर्जुन । मनीं करी तों निगमार्जेन । सचवूनि दुर्मतखंडन । तत्काळ वदला हा श्लोक ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥ य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९ ॥

॥ टीका ॥ हा आत्मा मारणार । हा आत्मा मरणार । यातें ऐसें जाणणार । ते जाण नेणते दोघेही ॥ ३३ ॥ कीं हा मारीत नाहीं । मरेल हा न घडे हेंही । ह्मणती मारी मरे ते कांहीं । जाणते दोघेही न ह्मणावे ॥ ३४ ॥ श्लोकाचा इतकाच अर्थ । मतें दूषावीं तीं किमर्थ । ऐसें बोलती त्यांतें समर्थ । श्रीहरीच उत्तर देतसे ॥ ३५ ॥ जे ह्मणती साधारण । आत्मा देह त्यास मरण । देहें देहास मारण । त्यांलाच वाटे ॥ ३६ ॥ मरणार ह्मणे जो स्वयें । मारणारही ह्मणे निश्चयें । दों गोष्टींस दोघे अव्ययें । नेणते वर्णिले कांहीं ॥ ३७ ॥ आतां देहात्मवादी । ज्यांस विश्वास नाहीं वेदीं । आत्मदेह त्या मंदीं । मरे मारीही ह्मणावा ॥ ३८ ॥ प्रमाण ज्या मतीं वेद । तथापि मानिती भेद । आत्मा अकर्ता ह्मणतां खेद । ते मानिती ॥३९॥ त्यांच्या मतें जीव नित्य । देहावेगळा ह्मणती सत्य । परी अकर्ता ह्मणती असत्य । कर्ताच ह्मणती ते सर्व ॥ ४० ॥ एवं आत्मा मारणार । सकळ भेदवादी ह्मणणार । आणि आत्मदेह मरणार । चार्वाक ह्मणती॥ ४१ ॥ भेदवादी पक्ष एक । आणि एक पक्ष चार्वाक । या दों गजभारावरी हांक । गीताश्लोकीं हरीची ॥४२॥ हे दोनी पक्ष नेणते । भगवद्वाणी ऐसें ह्मणते । नेणते कैसे कोणते । टीकाकारीं दूषावे ॥ ४३ ॥ प्रकृतिपुरुषभेद । हा सांख्यशास्त्रवाद । परी तो नेदी भल्यास खेद । ज्ञानोपयोगी ह्मणोनी ॥ ४४ ॥ प्रकृतिपुरुषां भेद । तरीच अकर्तृता वदे वेद । 'या भेदें साधे अभेद । हे एथें न दूषिले ॥ ४५ ॥ हे तों जैमिनी गौतम । जरी ऋषि दोघे उत्तम । तिहीं अगत्यास अधम । भेदपक्ष धरिला ॥ ४६ ॥ वेदव्यास महामुनी । त्याचा शिष्य जैमिनी । कळत गुर्वाज्ञा ह्मणोनी । भेद त्याणें स्थापिला

१ पसारा. २ वेद आहेत मुख्य ज्याचें. ३ कुमत. ४ ईश्वरानें. ५ देह हाच आत्मा असें बोलणारे. ६ आत्म्यास कर्तृता देणारे. ७ देह तोच आत्मा. ८ हत्तींच्या कळपांवर. ९ सिंहाची. १० अकर्तेपणा.

॥ ४७ ॥ व्यासें केला वेदांत । ज्ञान मुख्य हा सिद्धांत । ज्ञान आलिया तयांत । आदर नसे कर्माचा ॥ ४८ ॥ ज्ञानाहूनिही पहिलें । काम्यकर्म अमान्य केलें । ज्ञानेंचि मोक्षफळ लिहिलें । वेदांतशास्त्रीं ॥ ४९ ॥ परी या कैवल्येवाटे । अधिकारी विरळा भेटे । गोड भलो त्यास वाटे । एकादा निघे या मार्गीं ॥ ४५० ॥ मुख्य मोक्षाच्या मार्ग वाटे । आणि निघेना नैष्कर्म्यवाटे । काम्यही टाकी तो वाटे । उभयभ्रष्ट ॥ ५१ ॥ शुद्धाधिकारियाकारण । केलें अद्वैतनिरूपण[4] । परंतु काम्यत्यागें साधारण । वायां जाती ॥ ५२ ॥ याकारणें महामुनी । स्वशिष्य ऋषि जैमिनी । त्यास सांगे नेमुनी । कीं प्रवर्तवीं कर्ममार्ग ॥ ५३ ॥ न धरितां आमची भीड । मोक्ष फटकाळ ऐसी बडबड । करूनि काम्यचि गोड । वाटे ऐसें बोल तूं ॥ ५४ ॥ त्याणें कर्ममार्ग केला । जन काम्याकारणें भुकेला । नाहींसा करूनि टाकिला । मोक्षमार्ग ॥ ५५ ॥ तेथें आत्मा अकर्ता । ह्मणतां उडे काम्यवार्ता । ब्रह्मात्मतेचा ठसा वरता । तत्काळ पडे ॥ ५६ ॥ कर्तृत्वाचा विकार । मी कर्ता हा अहंकार । त्याचा निषेध करितां सार । ब्रह्मात्मबोधीं मन निघे ॥ ५७ ॥ ह्मणोनि अहंप्रत्यय । निखिल आत्मत्वाचा निश्चय । करितां आयता सक्रियें । सिद्ध जाला ॥ ५८ ॥ हाच तार्किकांचा निश्चय । कीं आत्मस्वरूप अहंप्रत्यय । कीं त्याच्या व्यतिरेकें अद्वय । ब्रह्मचि सांपडे ॥ ५९ ॥ भेदवादियाचे बोल । एथें ऐसेच तितके फोल । साधारणांस हेचि खोल । वाटती उथळ अत्यंत जे ॥ ४६० ॥ मी ह्मणतां आत्मा स्फुरे । तो तूं ह्मणतां काय झुरे । तूं ह्मणतां कोठें उरे । अहंस्फुरण ॥ ६१ ॥ मी ह्मणतां तूं नसे । तूं ह्मणतां मी न गवसे । स्फुरणीं स्फुरण अन्य वसे । हें ह्मणणेंचि मूर्खत्व ॥ ६२ ॥ मी ह्मणे त्यास तूंपण । निमिषार्धकाळीं स्फुरण । त्यास वाटे स्वाहंस्फुरण । होतेंचि तेव्हां ॥ ६३ ॥ अखंड आत्मप्रत्यय । अहंरूप तेथें आशय । तो न खंडे ऐसा निश्चय । मानितो आत्मा न कळतां ॥ ६४ ॥ अहंप्रत्यय आत्मता । त्यास वाटे आत्मा कर्ता । कृष्ण ह्मणे पांडुसुता । नेणते ते यास्तव ॥ ६५ ॥ त्यांचाच हा अन्याय । येविषयीं

---

१ मुक्ति. २ या ओवीच्या चतुर्थ चरणांतील मार्ग शब्दाचें लिंग येथें लाविलें आहे. अर्थ.—ज्या एकाद्यास तो ज्ञानमार्ग गोड आणि भला वाटे तो त्या मार्गीं जातो. ३ फलेच्छारहित कर्म. ४ जीव आणि ब्रह्म यांचें ऐक्य. ५ ब्रह्म तें मीच. ६ आत्मता, आत्मा कर्ता असा अनुभव. ७ क्रियावान्.

मानाचा काय । आणोनि अर्हतसंप्रदाय । कोणी ऐसेंचि बोलती ॥ ६६ ॥ हा त्रिविध अहंकार । देह मी हा तामस विकार । इंद्रियात्मत्व हा संस्कार। राजस अहंकार बोलिला ॥ ६७ ॥ मी पाहतों चाखतों । आइकतों हुंगितों । मी शीतोष्णस्पर्श घेतों । हा इंद्रियाभिमानी राजस ॥ ६८ ॥ मी नव्हे देह इंद्रियें । यांवेगळा मी स्वयें । ऐसा तरी अहं निश्चयें । अहंकार म्हणावा सात्विक ॥ ६९ ॥ काढितां अहंकाराची साली । सत्त्ववृत्ति वाटे निघाली । ते आत्मानुभव पावली । तरी तीहूनही पलीकडे आत्मा ॥४७०॥ विरळा जाणे हे खूण । न शुद्ध आत्मा अहंस्फुरण । कर्मतत्त्व-ग्रंथीं हें निरूपण। विशद असे ॥ ७१ ॥ शुद्ध आत्मा अहंस्फुरण । तेव्हां हेंचि निरहंकारपण । तरी साहंकारलक्षण । तें कैसें ॥ ७२ ॥ आदीं शुद्ध अहंप्रत्यय । दुजें हें स्फुरण अहंमय । अहं अहं प्रत्ययद्वय । ऐसें तुजला वाटावें ॥ ७३ ॥ तरी तूं निरहंकारी ज्ञानी । आतां जे साहंकार अज्ञानी । ते अहं अहं म्हणोनि दोनी । अहंस्फुरणें तों नेणती ॥ ७४ ॥ यालागीं हे वेडेचार । हा नव्हे शुद्ध आत्मविचार । अहंप्रत्यय असार । टाकितां स्फुरे शुद्ध आत्मा ॥ ७५ ॥ असोनि वेदांतमार्गी । ऐसा भ्रम तयांलागीं । ते तों भेदवादी जगीं । अभिमानेंचि वर्तती ॥ ७६॥ एवं आत्मा कर्ता । तोचि मारी ऐशी वार्ता । बोलती तयां मजांवरता । चपेटा हेरिचा हा ऐसा ॥ ७७ ॥ आतां आत्मा मरे । म्हणणार चार्वाक खरे । शापें बृहस्पतीची वावरें । जिव्हा ऐसी ॥ ७८ ॥ आणि दिसतें तेंचि साच । हें तों म्हणे भलताच । बृहस्पति बोले तसाच । प्रबळ करी पूर्वपक्ष ॥७९ ॥ मेळवूनि सकळ सेना । जों शत्रु युद्धास येईना । तों शत्रुशेष तुटेना । मारितांही ॥ ४८० ॥ त्यांत भेदी आपला । मिळे जो तो त्यांस वाटे भला । आइकोनि त्याच्या बोला । आबाल येती युद्धासी ॥ ८१ ॥ मग ते सकळ । संहारावे खळ । तरी पृथ्वी निखिळ । निष्कंटकप्राय होणार ॥ ८२ ॥ तैसा बृहस्पती । प्रत्यक्षवादीं घाली मती । त्यास अनुकूळ युक्ती । लिही तितक्याही ॥ ८३ ॥ वैदिकीं तें शास्त्र । खंडावें जें प्रत्यक्षमात्र । या भावें स्वयें पवित्र । शास्त्र अपवित्र तो मांडी ॥ ८४ ॥ प्रत्यक्ष जें जें दिसे । तेंचि प्रमाण त्याला असे । देह उपजे नासे । हाचि आत्मा ॥ ८५ ॥ आत्मा

१ अहंस्फुरण जर शुद्ध आत्मा. २ सिंहाचा; पक्षीं कृष्णाचा. ३ बोले. ४ जें दिसतें तेंच साच आहे असें ज्याचें मत.

देहावेगळा । तो तो दिसत नाहीं डोळां । म्हणोनि पंचभूतमेळा । हा देह आत्मा ते म्हणती ॥ ८६ ॥ देह जैसा पाषाण । आपणास नेणे आपण । मी देह म्हणे हा कवण । पुसतां बोलती ते ऐसें ॥ ८७ ॥ कीं सुपारी कात चूर्ण । यांसहित चावितां पर्ण । उपजोनि घाटे तांबडेपण । तांबूलाचें ॥८८॥ मिळतां शुक्रशोणित । पंचभूतीं होय भूत । त्यांत जाणीवकळा अद्भुत । म्हणती उत्पन्न होतसे ॥ ८९ ॥ तें नसतां अहंस्फुरण । देहास येतें मरण । प्रत्यक्ष एथें प्रमाण । बोलती ऐसें ॥ ४९० ॥ म्हणोनि म्हणती जों जिवावें । ऋण करूनि घृत प्यावें । पुन्हा जन्मा कोणें यावें । देह भस्म जालिया॥९१॥ चार्वाकश्लोक ॥ ॥ यावज्जीवं सुखं जीवेदृणं कृत्वा घृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥ टीका ॥ मत ऐसें अवलक्षण । ज्यांस प्रत्यक्ष मात्र प्रमाण । वाद त्यांशीं करणार कोण । न मानिती प्रमाण जे वेद ॥ ९२ ॥ बोलोनि युक्ति विचित्र । आपणही प्रत्यक्ष मात्र । प्रमाण धरूनि त्यांचें शास्त्र । दूषणें द्यावीं ॥ ९३ ॥ हा अनादि अविद्याभेद । चार्वाकांचा प्रत्यक्षवाद । कीं हा पूर्वपक्ष वेद । प्रसंगोपात्त दूषिती ॥ ९४ ॥ शत्रु मेलाचि असे । आणि जीवंतसा दिसे । तेव्हां सर्वज्ञ बोलती ते ऐसें । कीं हा कैसा जीवंत ॥ ९५ ॥ तेव्हां मरणाचीं लक्षणें । त्याचे ठायीं विचक्षणें । लक्षोनि मस्तक कापणें । उचित जैसें ॥ ९६ ॥ तैसें जे स्थळीं हें मत । खंडिलें जाय निश्चित । तें स्थळ श्रुति करिती श्रुत । ये रीती ॥ ९७ ॥ श्रुतिः ॥ सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् । तद्धैक आहुरसदेवेदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ॥ कुतस्तु खलु सोम्यैव स्यादिति होवाच कथमसतः सज्जायेत ॥ श्रुत्यर्थ ॥ या छांदोग्य उपनिषच्छ्रुती । जगत्कारण उपपादिती । चार्वाकमत खंडिती । प्रसंगीं या ॥९८॥ कीं हें विश्व आदीं । सद्वस्तूच होतें तदीं । द्रष्टा नव्हता जदीं । जीवब्रूंब ॥ ९९ ॥ सर्प दिसतो हा आदीं ॥ रज्जूच होता तदीं । द्रष्टा नव्हता जदीं । नेणता रज्जूचा ॥५००॥ या न्यायें या श्रुती । जगत्कारण ऐसें बोलती । कीं सद्वस्तु एकलीच होती । जे चिद्वस्तू कारण जडाचें ॥ १ ॥ सिद्धांत बोलोनि निश्चित । पूर्वपक्ष याचा विपरीत । तें तों हें चार्वाकमत । ते बोलती दूषाया ॥ २ ॥ कीं हें पंचभूतरूप । जें केवळ जडस्वरूप । जड माय

१ खायाचें पान. २ रेत. ३ वांचावें. ४ सद्वस्तु ब्रह्म. ५ प्रतिपादितात. ६ पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश या भूतांचें रूप.

जडदेह बाप । जडचि अवघें ॥ ३ ॥ आतां जैसें दिसतें । ऐसेंचि सर्वदाही असतें । यास जाणतें तें उपजतें । यापासूनि चैतन्य ॥ ४ ॥ जड अवघें एक आदीं । होतें चैतन्य नव्हतें तदीं । ह्मणजे हें पहावें तदीं । प्रथम जडचैतन्य तदुपरी ॥ ५ ॥ ऐसेंही एक बोलती । ह्मणोनियां ह्मणती श्रुती । दूषण याचें सूचविती । या प्रसंगीं ॥६॥ श्रुति ह्मणती या मिसें । कीं कोणे युक्तीनें घडे ऐसें । जडापासोनि चैतन्य कैसें । उत्पन्न होय ॥ ७ ॥ कीं कार्य चैतन्य जालें । कारणत्व जडा आलें । हें विरुद्धत्व मांडलें । प्रत्यक्षासीं ॥ ८ ॥ कारण कार्यास वर्तवी । कीं कार्य कारणातें वागवी । प्रत्यक्ष तुमचें मत नागवी । एथें तुह्मां ॥ ९ ॥ चैतन्य वर्तवी देह । हें प्रत्यक्ष निःसंदेह । जें धरूनि देहाचा स्नेह । रक्षी तयास शीतोष्णीं ॥ ५१० ॥ कारण कार्याधीन । हें प्रत्यक्ष तुमचें अज्ञान । अलंकाराधीन कांचन । ह्मणतां विरुद्ध प्रत्यक्षीं ॥ ११ ॥ चैतन्य ह्मणावें कारण । त्याआधीन देहाचे गुण । सुवर्णाआधीन भूषण । जे रीती॥१२॥ कारणद्वय वर्तमान । एक निमित्त दुजें उपादान । निमित्त सोनार आणि कांचन । उपादान कारण अलंकारीं ॥ १३ ॥ सोडितां निमित्तकारण । कार्यास घडे वर्तन । सोनारा सोडोनि भूषण । जाय जैसें ॥ १४ ॥ सोनें न सोडी भूषण । भूषण सोडीना सुवर्ण । या उपादानकारण । प्रत्यक्ष ह्मणती ॥ १५ ॥ तैसें देह आणि चैतन्य । कारण कार्य अन्योन्य । देह कारण चैतन्य अन्य । कार्य उत्पन्न त्यापासूनि ॥ १६ ॥ निमित्तकारणत्व घडे । तरी कांहीं सवड सांपडे । देह उपादान तेव्हां पडे । तुमचें मत ॥ १७ ॥ अलंकारें सोनें दिसे । कीं सुवर्णें अलंकार भासे । कारणेंचि कार्य गवसे । प्रत्यक्षीं ॥१८॥ तरी चैतन्यें दिसे देह । चैतन्यास त्याचा स्नेह । जडेंकरूनि निःसंदेह । चैतन्य न दिसे॥१९॥चैतन्य आपण आपणा । जाणोनि जाणे देहपणा । जैसें आदीं सुवर्णा । देखोनि आकार देखिजे ॥५२०॥ तरी चैतन्य कारण ह्मणा । कार्य देहचि गणा । प्रत्यक्षविरुद्ध जाणा । स्वमत हें॥२१॥इत्यादि मतखंडन । वैदिकमताचें मंडन । पुरे हें मुंडमुंडन । आत्मा मरे तो या मतीं ॥ २२ ॥ एवं हे चार्वाक एक । भेदवादी ते अनेक । दोहींस यदुकुलतिलक । ह्मणे कांहीं न जाणती ॥ २३ ॥ ह्मणोनि अगा अर्जुना । आत्मा मरेना मारीना ।

---

१ स्थापन. २ यदूच्या कुळाचा टिळा, कृष्ण.

पावोनियां समाधाना । युद्ध करीं ॥ २४ ॥ खंडोनि चार्वाकादि मत । तद्विपरीत श्रुतिसंमत । स्वमत बोलेल अच्युत । या श्लोकीं ॥ २५ ॥

॥ श्लोक ॥ न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२० ॥

॥ टीका ॥ आत्मा उत्पन्न होत नाहीं । कधीं मरेल न घडे हेंही । देह उपजतां कांहीं । हा न उपजे ॥ २६ ॥ देह उत्पन्न होतसे । त्या देहीं आत्मा वसे । त्यासवें उपजला दिसे । परी न उपजे उपजोनि ॥ २७ ॥ राजा ह्मणती चालिला । तो तों सुखासनीं बैसला । चालोनि नाहीं घडला । चालण्याचा प्रसंग ॥२८॥चालोनि चाले न कांहीं । तैसा होऊनि होत नाहीं । देहासवें अगा पाहीं । होऊनि होत नाहीं तो ऐसा ॥ २९ ॥ एकदांच नव्हे हेंही । पुन्हा होऊनि होत नाहीं । प्रत्यक्षवादी मोहीं । वृथा पडे हा भाव ॥ ५३० ॥ एक देह होतां हा जाला । तो देह मरतां ह्मणती मेला । तरी हा पुनःपुन्हा उपजला । तरी उपजोनि उपजेना ॥ ३१ ॥ कीं स्वयें हा अज[1] । याला न जन्म सहज । देहास जैसा उपज । यास नाहीं ॥ ३२ ॥ मरण नाहीं यास्तव । कीं हा नित्य ज्यास्तव । ह्मणती चार्वाकदानव । कीं देह मरतां हा मरे ॥ ३३ ॥ देह जन्मतां नसे उपजत । देह वाढतां नसे वाढत । ह्मणोनि हा शाश्वत । कीं वृद्धिक्षय असेना ॥ ३४ ॥ आत्मा ह्मणतां शाश्वत । मत जें जें भेदाश्रित । तें तें खंडिलें निश्चित । कीं भ्रांत आत्मा न कळतां ॥ ३५ ॥ आपण कोण न कळे ज्याला । भ्रांत ह्मणती जगीं त्याला । जें मत नेगे आत्मयाला । तें भ्रांत सर्वही सर्वत्र ॥ ३६ ॥ आत्मा न ह्मणतां शाश्वत । क्षय वृद्धि तितकें नाशिवंत । ह्मणोनि आत्मा अत्यंत । सूक्ष्म ह्मणती सर्वही ॥ ३७ ॥ या गोष्टीनें सूक्ष्म थोर । जें जेव्हढें शरीर । यांत आत्मा मातो हा प्रकार । सिद्ध होतो ॥ ३८ ॥ परंतु थोर थोर शरीरीं । भोग भोगितो कैसेपरी । पुसतां ह्मणती झडकरी । पावे जेथें सुखदुःख ॥ ३९ ॥ कित्येकांचा पक्ष ऐसा । परी हा उडे शब्दासरिसा । सर्वांग टोंचितां कैसा । एकाच समयीं हा पावे ॥ ५४० ॥ एकांचा पक्ष ऐसा । कीं चंदनाचा बिंदु जैसा । व्यापी सर्वांग तैसा । हा व्यापक ॥ ४१ ॥ देहीं अणुप्रमाण वसे । परी सर्वांगही व्यापीत असे । एक बोलती ऐसें । भेदवादी ॥ ४२ ॥ चंदनबिंदु एकत्र । व्यापी शैत्य सर्वत्र । धुतां चरण अणुमात्र ।

---

१ जन्म ज्यास नाहीं.

ओला कर्पाळीं तो नव्हे ॥ ४३ ॥ कांटा रुपतां पायीं । जरी तो असेल हृ-
दयीं । त्याणें दुःखी ते ठायीं । होऊं नये ॥ ४४ ॥ चंदनाचे परी । दीपली
एकत्र घरीं । प्रकाश सर्वत्र करी । व्यापी चंदनासारिखा ॥ ४५ ॥ प्रका-
शीं फुंकितां देखा। ते न हाले दीपशिखा । हा एकदांच सुखदुःखा । सर्वां-
गाच्या भोगितो ॥ ४६ ॥ अग्नि एक प्रभा दुसरी । उदक ओते प्रभेवरी ।
न विझे तोंही विझे जरी । अंगारावरी जळ पडे ॥ ४७ ॥ काष्ठ अत्यंत
थोर । एकत्र लागला वैश्वानर । अन्यत्र ओतितां नीर । अग्नि अन्यत्र न
विझे ॥ ४८ ॥ अग्निप्रभा तरी । सर्वत्र त्या काष्ठावरी । न पेटे न विझे
परी । फुंकितां भिजवितां अन्यत्र ॥ ४९ ॥ होय काष्ठाचा इंगळ । व्यापी
सर्वत्र अनळ । फुंकितां पेटे पडतां जळ । विझे सर्वत्र तेधवां ॥ ५५० ॥
एवं जीव एकत्र । व्यापुनि भोगी सर्वत्र। ऐसें ह्मणणार मतमात्र । शाश्वत-
पदें उडविलें ॥ ५१ ॥ अजी आत्मा शाश्वत । परी दुःख भोगितो निश्चित ।
त्यास ह्मणतां उचित । कीं भोक्ता अंश प्रतिबिंब ॥ ५२ ॥ तेव्हां देहाप्रति
नवा । लहान थोर होतो ह्मणावा । तरी शाश्वत कैसा गणावा। प्रतिबिंबांश
हा ॥ ५३ ॥ येविषयीं श्रीकृष्ण । ह्मणे कीं तो पुराण । पुराणबिंब तेव्हां
जाण । पुराण त्याचें प्रतिबिंबही ॥ ५४ ॥ जेव्हां जळीं दिसे । तेव्हांच
प्रतिबिंब असे । न दिसे जळीं तेव्हां वसे । बिंबींच प्रतिबिंब ॥ ५५ ॥ बिंब
पुराण पुरातन । तैसें हेंही नित्य नूतन । थोर आणि लहान । उपाधियोगें
॥ ५६ ॥ सूक्ष्म उपाधि नसे । तरी त्याच बिंबीं हें पैसे[2] । थोर नाशतांही
गवसे । त्याच बिंबीं ॥ ५७ ॥ एवं बिंब शाश्वत । तेव्हां हेंही तेंचि निश्चित।
कदापि हें वेदमत । नव्हे बाधित युक्तीसी ॥ ५८ ॥ जीं धरूनि मनीं मतें ।
शंका मानिली पार्थें चित्तें । तीं खंडोनि अच्युतें । स्वमतें केलें समाधान
॥ ५९ ॥ या लागीं ह्मणतो पार्था । देह मारितां हा सर्वथा । न मारिला
जाय कथा । अन्य मताची विरुद्ध ॥ ६० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां
बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । परिसोत ॥ ६१ ॥ नित्य
आणि अकर्ता । आत्मयाच्या या दोन्ही वार्ता। बोलिला श्रीकृष्ण शोकार्ता।
अर्जुनातें ॥ ६२ ॥ त्यांत याचें नित्यत्व । पार्थास वाटे तत्त्व । परी आलें
नाहीं अकर्तृत्व । प्रत्यया ॥ ६३॥ कीं हा विचारलेश। परोक्षरीती हृषीकेश।
बोले अपरोक्ष उपदेश । अद्यापि नसे ॥ ६४ ॥ तो ह्मणे देह इंद्रियें । आ-

१ दिव्याची ज्योत. २ असतें.

त्मयास नसती निश्चयें । परी मारीन ऐसी इच्छा स्वयें । आत्माचि धरितो ॥ ६५ ॥ हेंही संकल्पात्मक मन । शुद्ध आत्मा मानी अर्जुन । जों अपरोक्ष नाहीं ज्ञान । तों हाचि वाटे शुद्धात्मा ॥ ६६ ॥ हें अर्जुनास न कळे । अकर्ता आत्मा नाढळे । ह्मणूनि हृदयीं खेळे । संदेह ऐसा ॥ ६७ ॥ देह इंद्रियें वेगळीं । परी ह्मणे आत्मा हाचि चाळी । कर्म करीन हेही उकळी । आत्मयाची ॥ ६८ ॥ मी आत्मा न मारीं यातें । परि मारवीन देहाच्या हातें । कीं शर भेदी परातें । तरी धनुर्धर मारक ॥ ६९ ॥ अकर्तृत्व कैंचें ह्मणोनी । ऐसें अर्जुनें धरिलें मनीं । अंतर्यामी हें जाणोनी । बोलतो आतां हा श्लोक ॥ ५७० ॥

॥ श्लोक ॥ वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥ २१ ॥

॥ टीका ॥ अगा न कळतां आत्मता । तुज कळेना अकर्तृता । या भावें पांडुसुता । कृष्ण ह्मणे ॥ ७१ ॥ कीं आत्मत्वाचें गुज । मी बोलिलों अर्जुना तुज । तें तुवां आइकिलें सहज । तथापि अनुभवें नेणसी ॥ ७२ ॥ अविनाशी अज अव्यय । ऐसा अनुभवें ये प्रत्यय । त्यास अकर्तृत्वाचा निश्चय । अगा बाणे ॥ ७३ ॥ ऐशा आत्मयातें जाणे । त्यास अकर्तृत्वही बाणे । तुजऐसे लौकिकी शाहणे । ते हें कैसें जाणती ॥ ७४ ॥ या भावें देव ह्मणे । कीं या अजा अव्यया जाणे । अगा त्यास तों ऐसें बाणे । कीं अकर्ता आपण ॥ ७५ ॥ जेथें नसे मारण । जेथें नसे मारवण । तेथें कोणास कोण । मारी अथवा मारवी ॥ ७६ ॥ मारीन मारवीन ह्मणणें । अगा हें तों मीपणें । तें तूं मानिसी आपणें । शुद्ध आत्मा ह्मणोनी ॥ ७७ ॥ मारीन मारवीन । हे जागृति अथवा स्वप्न । सुषुप्तींत हें तुझें मन । सांग कोठें ॥ ७८ ॥ सुषुप्तींत जो तूं उरसी । तो कोणास रे मारिसी । अथवा कोणास मारविसी । कोण्या देहें ॥ ७९ ॥ सुषुप्तींत उरला अद्वय । तो अज अविनाशी अव्यय । जन्म नाश अवांतर व्यय । मीतूंपणासी ॥ ५८० ॥ आत्मा सुषुप्तिगम्य । गुरुकृपेवीण अगम्य । सेविले ज्याणें चरण रम्य । तो जाणे ऐसें आपणा ॥ ८१ ॥ या भावें परमपुरुष । ह्मणे यातें जो पुरुष । जाणे तो आत्मा निर्विशेष । मारी मारवीही कवणासी ॥ ८२ ॥ या पुढिलिया श्लोकीं । श्रीकृष्ण ऐसें बोलेल कीं । जुनीं टाकुनि वस्त्रें लोकीं । जैसीं नवीं

१ सुषुप्तींत ओळखितां येतो.

धरिजे तीं ॥ ८३॥ तैसीं आत्मा शरीरें । टाकूनि जीर्ण कलेवरें । नवीं धरि-तो नाना प्रकारें । स्वयें तोचि ॥ ८४ ॥ एवं जीवातें पुनः पुन्हा । देह धरणें असे अर्जुना । बोलणें असे कमलनयना । या श्लोकीं ॥ ८५ ॥ पूर्वश्लोकीं तरी । जो आत्मा जाणे बरवेपरी । तो कोणास मारवी मारी । बोलिला ऐसें ॥ ८६ ॥ आणि वर्णिलें आत्मयासी । कीं अज अव्यय अविनाशी । तो शरीरें धरी कैशीं । हें आतां बोलेल ॥ ८७ ॥ मागेंही प्रसंगोपात्त । हेंचि बोलिला अच्युत । कीं एका देहीं अवस्था बहुत । तैसे देह द्रष्टयासी ॥८८॥ तेंचि पुन्हा बोलतां । पुनरुक्ति दिसेल संतां । परी निमित्त आणखी आतां । बोलिजेल ॥ ८९ ॥ मेलियाचा शोक । न करी पंडितलोक । या प्रसंगीं उत्तमश्लोक । बोलिला नित्यत्व आत्मयाचें ॥ ६९० ॥ देहनिमित्त शोक भले । न करिती कीं सर्वत्र लागले । त्यास दृष्टांत ऐसा बोले । अवस्था जैशा देहाच्या ॥ ९१ ॥ कीं बाल्यें गेलें । तारुण्य आलें । तारुण्य जातां बहिलें । पातलें वृद्धत्व ॥ ९२ ॥ शोक याचा कां मना । ह्मणूनि ह्मणतां अर्जुना । संदेह जाला कीं जुना । देह होऊं लागला ॥ ९३ ॥ कीं प्राणी चिंतातुर । होय देखतां वृद्ध शरीर । जीर्ण आणि जर्जर । जों जों होय ॥ ९४ ॥ या दृष्टांतें जेव्हां शोक । हा परिहारी उत्तमश्लोक । तेव्हां शोक त्यागीं हा विवेक । न दिसे बरा ॥ ९५ ॥ पुढें आणखी प्रसंग । बोलों लागला श्रीरंग । हे शंका अंतरंग । धरूनि राहिली पार्थाचें ॥ ९६ ॥ लागलें शस्त्रक्षत । औषध लाविलें न शोधित । किल्मिष राहिलें त्यांत । तें क्षत काळें फुटे पुन्हा ॥९७॥ "मात्रास्पर्शास्तु" हा श्लोक । मागें बोलिला उत्तमश्लोक । कीं मृतजनदर्शनादिशोक । प्रबळ देखिला ॥ ९८ ॥ याकरितां हरी । ते शंका एथें हरी । कीं जुना देह गेला जरी । देही नवा देह धरितो ॥ ९९ ॥

॥ श्लोक ॥ वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही॥२२॥

॥ टीका ॥ अविनाशी अव्यय अज । पूर्वश्लोकीं आत्मा तुज । सांगितला याचें गुज । कीं जडदेहविलक्षण ॥ ६०० ॥ जड देह हा विनाशी । तद्विपरीत हा अविनाशी । देह उपजे या आत्मयासी । अज ह्मणावें यास्तव

१ देह, शरीरें. २ बाळपण. ३ अंतःकरण. ४ घाय. ५ मेलेल्या लोकांच्या भेटीचा इ०.

॥ १ ॥ देहास अवांतर व्यय । क्षीण रोड होतां निश्चय । अविनाशी होऊनि अव्यय । हा आत्मा ॥ २ ॥ ऐसा आत्मा स्वलक्षण । देह धरी विलक्षण । टाकी होतां काळें क्षीण । धरी आणखी नवा देह ॥ ३ ॥ थोडिया वयाचा देह । तोही जीर्ण निःसंदेह । लोक मूढ धरिती स्नेह । तत्त्व न कळे ॥ ४ ॥ कणसाची नव्हाळी । परी मूषक लागला मुळीं । दाणा न येतां ते काळीं । वाळोनि जाय ॥ ५ ॥ ज्यास आला काळें । तो देह होय फटकाळ । ज्यास डसला महाव्याळ । तोचि जीर्ण ॥ ६ ॥ अंगास स्पर्शमात्र । होतां जुनें होय वस्त्र । मीपणा स्पर्शलें गात्र । दिवसेंदिवस तें जीर्ण ॥ ७ ॥ वस्त्र टाकूनि जीर्ण । नवें घेणें हाचि गुण । तें धोंगडें तरी निपुण । नवेंचि धरिती ॥ ८ ॥ त्याकारणें जो रडे । दाटूनि दुःखार्णवीं बुडे । विवेकी यास न घडे । करणें शोक ॥ ९ ॥ इत्यादि भाव पोटीं । धरूनि ह्मणे अगा किरीटी । टाकूनि जीर्णदेह कोटी । नवे धरी हा आत्मा ॥ ६१० ॥ जैसीं वस्त्रें जुनीं । लेणार नर टाकूनी । नवीं धरी त्रिभुवनीं । देह तैसे हा धरी ॥ ११ ॥ कीं शरीरें जुनीं । हा आत्मा त्यजूनी । नवीं धरी ह्मणोनि । देही शरीरधारी हा आत्मा ॥ १२ ॥ पुढल्या श्लोकीं श्रीपती । अविनाशित्व मागुती । बोलेल परी पुनरुक्ती । न ह्मणती संत ॥ १३ ॥ शंकानुरूप उत्तर । देतो अनादि चतुर । आत्मा नित्य अनित्य शरीर । प्रसंगें पुनः पुन्हा बोलतो ॥ १४ ॥ नित्यानित्यअभ्यास । घडवी श्रोतयांस । पुनरुक्तीचाही भास । दिसों नेदी ॥ १५ ॥ जैसीं वस्त्रें जुनीं । पुरुष देतो टाकुनी । नवीं वस्त्रें घेउनी । वर्ततो ॥ १६ ॥ तैशीं शरीरें जुनीं । हा आत्मा टाकुनी । नव्या देहातें पावोनी । वर्ततो ॥ १७ ॥ हें आइके अर्जुन । तों साशंक जालें मन । कीं देह जरी वस्त्रासमान । आत्मयाला ॥ १८ ॥ तरी वस्त्रें जीर्ण टाकितां । नवीं वस्त्रें धरितां । नाश नव्हे नाशवंता । देहाही ॥ १९ ॥ पाहतां वस्त्राकडे । अविनाशित्व देहा घडे । अमरत्वाचा ठसा पडे । देवां जैसा ॥ ६२० ॥ लोक मरती जाती । अमर कौतुकें पाहती । तेही मृत्यूच्या हातीं । सांपडती काळेंकरूनी ॥ २१ ॥ तथापि त्यांस अमर । ह्मणती वेद ऋषीश्वर । तैसा देह टाकितां अंबर । अमर दिसे ॥ २२ ॥ तैसीं टाकी शरीरें । नवीं धरी जेवीं अंबरें । स्वयें न नासे त्या नरेंवरें ।

---

१ ढवढवीतपणा. २ उंदीर. ३ मृत्यु. ४ निरुपयोगी, जुना. ५ मृत्यु. ६ जाडें भरडें. ७ देह धारण करणारा. ८ वस्त्र. ९ नाशवंत.

हा अविनाशी वास्तव ॥ २३ ॥ आणि बोलिलाहीं कृष्ण । कीं नवा धरी टाकूनि जीर्ण । तरी स्वभावें टाकितांच मरण । नसे या आत्मया ॥ २४ ॥ परी शरीरावरील वस्त्रें । तोडूं जातां महाशस्त्रें । छेदिलीं जातील गात्रें । वस्त्रें छेदितां ॥ २५ ॥ अंगावरील अंबर । जेव्हां जाळील वैश्वानर । जळेल तेव्हां शरीर । वस्त्र जळतां ॥ २६ ॥ अंगावरील अंबर । ओलें करील जेव्हां नीरें । । ओलें होईल शरीर । तें वस्त्र भिजतां ॥ २७ ॥ देहीं ओल्या अंबरा । वाळवील जेव्हां वारा । वाळवील तेव्हां शरीरा । वाळवितां वस्त्र ॥ २८ ॥ तैसा शस्त्रें छेदितां । देह अग्नीनें जाळितां । देह उदकींहि भिजतां । आत्मा तुटे जळे भिजेचि ॥ २९ ॥ एवं अमरां अमरपण । तैसा जीव अविनाशलक्षण । तो कौरवतधार्थ कमलेक्षण । मज ऐसा चाळवितो ॥ ६३० ॥ हा समजोनि भाव । हें नाश निषेधाया देव । बोलतो देवाधिदेव । हा श्लोक ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥ नैनं छिंदति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ शस्त्रें न तोडिती यातें । न जाळी अग्नि आत्मयातें । न जळ भिजवी अव्ययातें । वारा न शोषी ॥ ३२ ॥ आइकोनि हेंही वचन । चित्त न पावे समाधान । पुढील श्लोक यदुनंदन । बोलतो यालागीं ॥ ३३ ॥ अर्जुन ह्मणे मनीं । देह शस्त्रादिकेंकरूनी । नासे छेदादि पावोनी । आत्मा न नासे तो कां ॥ ३४ ॥ हा समजोनि भाव । अविनाशित्वीं देव । निमित्तें सांगे देवाधिदेव । दीड श्लोकें ॥ ३५ ॥ दुसरिया श्लोकींचें उत्तरार्ध । त्यांत ह्मणेल आत्मा शुद्ध । कळल्यावीण मन अशुद्ध । शोक करी ॥ ३६ ॥ तो आत्मा कळे । तेव्हां चित्त वळे । पुरती सकळ सोहळे । ह्मणूनि बोलेल या श्लोकीं ॥ ३७ ॥

॥ श्लोक ॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ छेदावया जाळावया । भिजवावया शोषावया । योग्य नव्हे त्या आत्मया । अनित्यसम पाहशी त्या नित्यासी ॥ ३८ ॥ अरे रत्नें नव । परी हिऱ्याची शक्ति अभिनव । त्याचें अभंगत्ववैभव । इतरां न ये ॥ ३९ ॥ घणें फुटे मोतीं । तैसीच हिरियाची ज्योती । तरी हाही फुटेल ऐसी भ्रांती ।

१ अग्नि. २ पाणी. ३ अपूर्व. ४ पाणी, तेज.

देहसम आत्मा पाहणें ॥ ६४० ॥ अगा देह स्वयें अनित्य। तरी वस्त्रनाशें नाश सत्य। आत्मा तैसा हा नव्हे नित्य। नाशशंका अयोग्य ॥४१॥ नित्य ह्मणतां आत्मया। हेही गोष्टी गेली वांया। दृष्टांताविण धनंजया। न वाटे साच ॥ ४२ ॥ ह्मणुनि ह्मणे अच्युत। कीं आत्मा सर्वगत। कीं सर्वगत आकाश निश्चित। अविनाशी ॥ ४३ ॥ वस्त्रनाशें नाश। देहास साधे सावकाश। परी देहांतील आकाश। सर्वगतत्वें नासेना ॥ ४४ ॥ ऐसा त्याही नभासें। जो व्यापुनि असे निराभास। तो आत्मा रज्जूसर्पाभास। अवकाश हा ॥ ४५ ॥ देहासवें गगन। हें न नासे देखे जन। देहनाशें नासतां वसन। तरी कां नासे आत्मा सर्वगत ॥ ४६। सर्वगत ह्मणतां अर्जुन। समजे निःशंक होय मन। कीं सर्वनाशीं गगन। सर्वगत हें न नासे ॥ ४७ ॥ परी अनुभवी हा दृष्टांत। न सोशिती कीं सर्वगत। आकाश सर्वत्र परी निश्चित। सर्व नव्हे आकाश ॥ ४८ ॥ ह्मणूनि सर्वगतशब्दापुढें। स्थाणुपद घातलें गाढें। कीं भक्त अनुभवी तेंचि गुढें। हीं माझीं समजती ॥ ४९ स्थाणु ह्मणजे वृक्ष। तो पुरुषाकार प्रत्यक्ष। भासे दृष्टीस अपरोक्ष। असोनि परोक्ष वृक्ष होय ॥६५० ॥ पुरुषाचे सर्व अवयव। दिसती दृष्टी अभिनव। सर्वगत त्यांत तो स्वयमेव। असे स्थाणु ॥ ५१ ॥ सर्वगत स्थाणु निश्चित। हा जैसा दृष्टांत। आत्मा तैसा सर्वगत। दार्ष्टांतिकीं ॥ ५२ ॥ दृष्टांतेंचि निगम। तत्त्व बोलती दुर्गमें। "द्वा सुपर्णा" श्रुति विहंगम। उगेंचि ह्मणे दोनी ॥ ५३ ॥ दोनी सुपर्ण जीवेश्वर। अनुभवी बोलती चतुर। पिप्पल भक्षी गगनचरें। एक एक ह्मणे न भक्षीं ॥ ५४ ॥ पिप्पलवृक्ष जग। जीवेश्वर दोघे विहंग। दृष्टांतशब्दीं प्रयोग। न बोलतां दार्ष्टांतिक ॥ ५५ ॥ सर्वगत स्थाणु हरी। एथें बोले यापरी। अर्थरचना दुसरी। ते अचल पदें निरसितो ॥ ५६ ॥ स्थाणुशब्दें अचलत्व। अचलशब्देंही निश्चलत्व। दोहीं पदीं नसे चंचलत्व। अर्थ हाचि ॥ ५७ ॥ तरी अचलशब्दें अचंचल।

---

१ सर्वव्यापी. २ सर्वव्यापीपणानें. ३ आकाशास. ४ भासत नाहीं असा. ५ दोरीवर सर्पाचा भास झाल्यासारिखा. ६ अंतर. ७ वस्त्र. ८ कबूल करीत नाहींत. ९ वृक्षाचें कांडें. १० कठिण. ११ परोक्ष अप्रत्यक्ष, परोक्ष नव्हे तें अपरोक्ष; प्राकृतांत बहुतकरून याचा उलट अर्थ घेतात. १२ ज्याविषयीं दृष्टांत दिला आहे तो. १३ समजण्यास कठिण. १४ पक्षी. १५ जीव आणि ईश्वर. १६ पिंपळाचें फळ.

स्थाणुशब्दें निखळ। अधिष्ठान जें केवळ। विश्वविवर्ती सर्वगत ॥ ५८ ॥ उपपादितां अविनाशित्व। हेतु तेथें अचलत्व। कीं जें नळे नश्वरत्व। घडे त्यासी ॥ ५९ ॥ म्हणूनि आत्मा अचल। जो अविनाशी केवळ। तो स्थाणु अधिष्ठान निष्कल[1]। विवर्तरूप पुरुषाचें ॥ ६६० ॥ आतां अचळ पाषाणही। त्यास अविनाशित्व न घडे कांहीं। तरी पाषाणादिकां नाहीं। शाश्वतत्व ॥ ६१ ॥ शाश्वतत्व असे याला। याकारणें आत्मयाला। सनातन म्हणे जयाला। प्रकारांतरत्व न घडे ॥ ६२ ॥ अविनाशित्वीं हेतु। आणीकही आइक तूं। म्हणोनि बोले भवसिंधुसेतु[2]। हा श्लोक ॥ ६३ ॥

॥ श्लोक ॥ अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

॥ टीका ॥ अर्जुना व्यक्ति[3] वर्ण[4] ज्याला। नाश म्हणवेल गा तयाला। व्यक्ति म्हणजे मूर्ति याला। नसे आत्मा अव्यक्त ॥ ६४ ॥ व्यक्ति नाहीं जरी। चिंतावा हा कवणेपरी। अर्जुना ऐसें म्हणसी तरी। आत्मा हा अचिंत्य ॥ ६५ ॥ ज्या सत्तेनें सचेतन। होऊनि मन करी चिंतन। त्यास तें मन अचेतन। चिंतील काय ॥ ६६ ॥ अरे जया नेत्रांकरितां। उपनेत्रांस येतें पाहतां। तीं उपनेत्रें आतां। कैशीं देखती नेत्रांतें ॥ ६७ ॥ रज्जूवरील सर्पाकृति। हे तों दृष्टीमधील कांहीं भ्रांति। ते भ्रांति त्या रज्जूप्रति। काय पाहे ॥ ६८ ॥ रज्जूस दृष्टि स्पर्शली। आहेच तेव्हां भ्रांति गेली। तैसी चिच्छक्ति[6] लागली। आहेच आत्मवस्तूतें ॥ ६९ ॥ आकाराचें चिंतन। राहतां आत्माकार मन। ते उन्मनी[7] तें उन्मन। जाणवेल परी चिंतवेना ॥ ६७० ॥ आकार कल्पी मन। त्यास म्हणिजे चिंतन। ज्या शरीराचें केलें दहन। तेंही मन अगा कल्पीतसे ॥ ७१ ॥ परि ज्या सत्तेनें कल्पना। ते सत्ता तों चिंतवेना[5]। उपनेत्रांस पाहवेना। नयनयुग्म[8] जैसें ॥ ७२ ॥ म्हणूनि म्हणावा अविकार्य[9]। कीं हें कारण यास कार्य। न करवे म्हणूनि आर्य। तिहीं आत्मा ऐसा बोलिजेतो ॥ ७३ ॥ संतीं ऐसा बोलिजेतो। तुज जो ठाउका नाहीं तो। त्या कारणास्तव आम्ही सांगतों। कीं या आत्मयातें तूं जाण ॥ ७४ ॥ आतां बहु बोलोनि काय। अर्जुना संतां शरण जाय। अनन्यभावें त्यांचे पाय। धरूनि आत्मा तूं जाण ॥ ७५ ॥ देव या भावें बोलतो। कीं आत्मा

---

१ कलारहित. २ संसारसमुद्राचा सेतु. ३ मूर्ति. ४ रंग. ५ चिंतवेना असा. ६ ज्ञानशक्ति. ७ आत्माकार मन होणें. ८ दोन्ही डोळे. ९ विकाररहित.

ऐसा बोलिजेतो । तूं जाणोनि आत्मा तो । होसी शोकाविमळा ॥ ७६ ॥ जाणें आत्मा अविनाशी । अगा शोकास तोचि नाशी । नारद सनत्कुमार दोघांसी । सामवेदीं ऐसें बोलणें ॥ ७७ ॥ वेद स्वयें अनादि । परी होणार तें वेदीं । असे आतां या संवादीं । चित्त दीजे ॥७८॥श्रुति॥ ॥ शोकस्य पारं तारय ॥ श्रुत्यर्थ ॥ शोकसागराच्या पैलपारीं । मी पावें ऐसें तारीं । सनत्कुमारातें यापरी । नारद ह्मणे ॥ ७९ ॥ ब्रह्मयाचा मानस । पुत्र सनत्कुमार त्यास । प्रश्न करी ऐसा सुरस । ब्रह्मसुत तोही नारद ॥ ६८० ॥ ऐसें पुसे जों नारद । तों ब्रह्मविद्याविशारद । सनत्कुमार वरद । गुरुवर्य उत्तर देतसे ॥८१॥ श्रुति ॥ सुखं त्वेव विजिज्ञासितव्यम् ॥ ॥ श्रुत्यर्थ ॥ ह्मणे सनत्कुमार । जरी शोक तरोनि पैल पार । पावणें, तरी करीं विचार । सुख जाणावयाचा॥८२॥श्रुति॥ सुखं भगवतो विजिज्ञासे ॥श्रुत्यर्थ॥ नारद ह्मणे तूं भगवंत ।तुजपासूनीच मी निश्चित । सुख जाणेन ह्मणतो अत्यंत । कृपा करीं गुरुवर्या॥८३॥ ॥ श्रुति ॥ यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति भूमैव सुखम् ॥श्रुत्यर्थ॥ सनत्कुमार ह्मणे अंत । ज्यास नाहीं तो अनंत । त्यास भूमा ह्मणती संत । जो भूमा तें सुख ॥ ८४ ॥ ज्यास देशें काळें अंत । तें प्राकृत नाशवंत । तें अल्प त्यास ह्मणती संत । कीं त्या जडीं सुख नाहीं ॥ ८५ ॥ तरी तो भूमा जो अनंत । तो तूंचि सांगसी भगवंत । ह्मणोनि नारद अत्यंत । शरण आला ॥ ८६ ॥ तेव्हां जो अनंत भूमा । तो त्या नारदाचा निजात्मा । गुरुमुखें जाणोनि स्वमहिमा । तरला शोकसागर ॥ ८७ ॥ या भावें ह्मणे श्रीहरी । कीं सर्वगत शाश्वत यापरी । बोलिजेतो आत्मा तरी । तो तूं जाण ॥ ८८॥ आणि शोकाचा सागर । हा तूं तर सत्वर । कीं योग्य अधिकारी नरवर । आहेस तूं॥८९॥धरूनि ऐसा भाव मनीं । ह्मणे या आत्मयातें जाणोनी । शोकयोग्य न होसी ह्मणोनी । जाणायास तूं योग्य ॥ ६९० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । पाहोत ऐसें ॥ ९१ ॥ कीं अविनाशीसा कळला । अर्जुन कांहींएकसा बकळला । परी मागुती खवळला । मनोभाव ॥ ९२ ॥ कीं हा आत्मा जरी नित्य । तरी देह लागले ते अनित्य । देह उपजे मरे सत्य । उपजे मरे हाही त्यांसवें ॥ ९३ ॥ अर्जुना याही भावें व्यर्थ । शोक तुझा ऐसें समर्थ । बोलों पाहतो अर्थ । या दों श्लोकीं ॥ ९४ ॥

---

१ ब्रह्मज्ञानांत व्युत्पन्न. २ पुरुषश्रेष्ठ. ३ उचंबळला.

॥ श्लोक ॥ अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

॥टीका॥अथ ह्मणजे यानंतरें । आत्मनित्यत्व[1] वदलों खरें । तें आइकोनिही बरें । शोकचि करिसी ॥ ९५ ॥ अगा देह उपजतां तो उपजला । पुनः पुन्हा तो मरतां मेला । आत्मा ऐसा जरी मानिला । तरी न शोकायोग्य तूं ॥ ९६ ॥ कीं हें जरी चुकेसें असे । करी यत्न कांहीं जरी दिसे । वृथा मन शोकीं बुडतसे । बोलिल हें या दुज्या श्लोकीं ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥ जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥

॥टीका॥ अगा जो उपजला । एक अढळपद असे त्याला । मृत्यु ह्मणोनि ज्याला । कीं मृत्यु न टळे कदापि॥९८॥आणि जो मेलाच पाहीं । अढळपद काय त्यासही नाहीं । कीं तो देह न घे कांहीं । न उपजे पुन्हा हें घडेना॥९९॥ आतां ह्मणसी ज्ञान जालें । त्यात्रे हे शरीर उपजलें । आणि तें दिसतेंही मेलें । तरी काय जन्म त्यालाही ॥ ७०० ॥ तरी हें अज्ञानियास । दोन्ही नसती ज्ञानियास । दोन्ही मिथ्या जयास । जन्ममरण त्यास कैंचें ॥ १ ॥ ह्मणूनि तूतें घडिघडी । गुह्य गोष्टी ही बोलतों उघडी ॥ कीं आत्मा जाणोनि हे तोडीं । बेडी जन्ममरणाची ॥ २ ॥ आत्मा कळला अर्जुना । ज्यास तो दोन्ही जाणेना । देह मरतां मेलों ह्मणेना । जन्म कैंचा पुन्हा त्यास ॥ ३ ॥ उपजलों उपजतां देह । हा ज्ञान नसतां जो मोह । तो स्वप्नदेहसंदेह । या जागृतीस न करी ॥ ४ ॥ लटकें जालें उपजणें । नुपजे त्यास कैंचें मरणें । न मरे त्यास जन्म घेणें । घडे कैंवी ॥ ५ ॥ ऐसें जो कळेना । तो दोन्ही अढळ अर्जुना । मी उपजलों वाटे मना । त्यास मरेन हें वाटेच ॥ ६ ॥ यालागीं जो उपजला । अढळ मृत्यु आहे त्याला । जो आत्मा न कळतां मेला । अढळ त्याला गर्भवास ॥ ७ ॥ हे ज्ञानाज्ञानप्रसंग । असोत या भावें श्रीरंग । ह्मणे प्रस्तुत तुझें अंतरंग । दुःखी मरणाकारणें ॥ ८ ॥ तरी उपजे त्यास मरणें । मेलियास पुन्हा जन्म घेणें । हें अढळ अपरिहारपणें । परिहार याला असेना ॥ ९ ॥ ज्यास नाहींच परिहार । त्याचा शोक वेडेचार । ह्मणूनि ह्मणतों वारंवार । शोक कराया न योग्य तूं ॥ ७१० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । याचें निमित्त पुण्यश्लोक ।

1 आत्म्याचा शाश्वतपणा.

पाहोत विशद अर्थाशीं ॥ ११ ॥ जन्ममृत्युस परिहार । नसे हा कळला विचार । तरी शोकाचा एक प्रकार । उरला वाटे ॥ १२ ॥ कीं बळवंत अर्थ कांहीं । नेतो जरी परिहार नाहीं । तथापि संताप देहीं । उपजेच ॥१३॥ तैसा बळवंत काळ । देहमूषका तो गिळी व्याळ । तथापि खेद तो होतो विशाळ । अर्जुन ह्मणे ॥ १४ ॥ हा मनाचा भाव । जाणोनि देवाधिदेव । या शोकपरिहारीं वासुदेव । बोलतसे हा श्लोक ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥ अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

॥ टीका ॥ आपला अर्थ जातां मना । शोक वाटे ये अर्जुना । परावा ने आपल्या धना । धनंजया त्याचा कां शोक ॥ १६ ॥ देखिलीं राजयाचीं धनें । त्याचा लोभ धरिला मनें । त्याचीं तो नेतां नयनें । सजल होती कोणाचीं ॥ १७ ॥ अरे हीं सकल भूतें । पंचभूतांश निश्चितें । तीं अहंकाराचीं त्यांतें । उत्पन्न करी महत्तत्व ॥ १८ ॥ त्या महत्तत्वाची उत्पत्ति । ज्यापासूनि ते मूळप्रकृति[2] । ते अव्यक्त कीं नसे व्यक्ती । तिये मूळप्रकृतीला ॥ १९ ॥ तें अव्यक्त ज्यांचा आदि[4] । तीं हीं कार्यें तें कारण अनादि । त्या अव्यक्तीं मांदी । या तत्त्वांची लय पावे ॥ ७२० ॥ अव्यक्ततत्त्व अनल । महत्तत्त्वादि त्याची ज्वाळ । ज्वाळ अग्नींत मिळतां लोळ । कोण करी जीवाचा ॥ २१ ॥ अगा अव्यक्ततत्त्व जळ । कालवायूचे हे कल्लोळ । जळीं मिळतां कल्लोळ लोळ । कोण करी जीवाचा ॥ २२॥ सकळ तत्त्वांचाही लय । ज्यास ह्मणिजे महाप्रलय । त्याचा वृथा खेद हा निश्चय । लय होतां पंचभूतमात्रांचा ॥ २३ ॥ मरणास पंचत्व ह्मणती । कीं पंचभूतांश पंचभूतीं । देह नासतां जाऊनि मिळती । इतर असती सर्व तत्त्वें ॥ २४ ॥ मन बुद्धि इंद्रियें । शब्दादि तन्मात्रा ते विषय । प्रतिदेहीं तेचि हा निश्चय । नाश पंचभूतमात्रांचा ॥ २५ ॥ एवं अव्यक्तीं सकळ लय ॥ मरण नव्हे तो तो प्रलय । मरण तो पंचभूतीं भूतलय । होतां जाय काय आपलें ॥ २६ ॥ जें जयाचें वित्त । तो तें नेणार निश्चित । शोकसंयुक्त निजचित्त । कां करावें ॥ २७ ॥ आपलेंसें परधना । मानूनि

१ द्रव्य. २ मूळमाया. ३ मूर्ति नाहीं जिला. ४ आरंभ. ५ समूह, ६ अग्नि. ७ लाटा.

गोंवुनि ममा । ज्याचें तो नेतां अर्जुना । शाहणे काय शोक करिती ॥२८॥ देखोनि धन आरसींचें । झुरे आणि निजधन साचें । जें प्रकाशक मानसाचें । तें न पाहे ॥ २९ ॥ तो काय पार्था शाहणा । अरे तो पंडितांचा राणा । जो पाहे निजधन आपणा । शाहणा तो एक ॥ ७३० ॥ जें धन सांडितां सुटेना । जें निजधन तोडितां तुटेना । जें निजधन फोडितां फुटेना । अरे अनुभवाचें तें धन ॥ ३१ ॥ या भावें उत्तमश्लोक । बोले यापुढें श्लोक । जेथें आश्चर्यावलोक । आत्मसुखाचा ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥ आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥

॥ टीका ॥ अरे आत्मा आपला । आश्चर्य काय पाहतां याला । तथापि धन्य तो आत्मयाला । पाहे जाणों आश्चर्य ॥ ३३ ॥ अनादि ज्याचा स्नेह । त्यास ह्मणत होता देह । तो सर्वदा असे विदेह[३] । आश्चर्य हें ॥ ३४ ॥ एक देहच आपण । मानीं धरूनि मीपण । त्यास सर्वत्र देखे निपुण । आश्चर्य हें ॥ ३५ ॥ सर्वी असोनि तोंचि सर्व । नसोनि दावी अपूर्व । जग होऊनि यथापूर्व । आश्चर्य हें ॥ ३६ ॥ इत्यादि आश्चर्य कोटी । ज्याच्या श्रवणें वाटती पोटीं । ब्रह्मपद लाळ घोंटी । ज्याच्या सुखाच्या ॥ ३७ ॥ जें चित्त त्यास पाहे । चिन्मय[४] जगन्मय[५] होऊनि राहे । त्यास त्याचें वाटताहे । आश्चर्य तरी आश्चर्य काय ॥ ३८ ॥ इत्यादि आश्चर्य तेंचि असे । नवें नाहीं कीं आश्चर्य दिसे । तथापि आश्चर्येचि भासे । पाहे आश्चर्यासारिखा ॥ ३९ ॥ त्याच्या आत्मयास गुरुवर्य । शिष्यास सांगे आचार्य । आश्चर्यासारिखेंचि आश्चर्य । तोही बोलतो ॥७४०॥ शिष्य गुरूतें ह्मणे । कीं मी स्वामी आत्मा नेणें । नेणें ह्मणूनि ऐसें जाणे । मागुती नेणें ह्मणतसे ॥ ४१ ॥ तेंचि त्याचें त्याला । श्रीगुरु बोलों लागला । आश्चर्य नसोनि आचार्याला । वाटे आश्चर्यासारिखें ॥ ४२ ॥ आतां जो आइके कानीं । तोही आश्चर्यासारिखें मानी । आइके आश्चर्य मानुनी । आश्चर्य नसतां ॥ ४३ ॥ जो देखे आणि जो दावी । ते दों चरणीं दोघे अनुभवी । सांगितली जिज्ञासुपदवी[६] । हे तृतीय चरणीं तिसरियाची ॥ ४४ ॥ आइके जों जों गुरुमुखें । तों तों मानी महासुखें ।

---

१ ममाचें. २ आत्म्याला. ३ देहरहित. ४ ज्ञानमय. ५ विश्वमय. ६ जाणण्यास इच्छितो त्याची.

सहज परी आश्चर्यासारिखें । आइके परम आश्चर्य ॥ ४५ ॥ एवं आश्चर्य आत्मज्ञान वाटे । तरी त्रिभुवनीं आनंद दाटे । चित्त अनुभवाचे वाटे । लागे सर्वदा ॥ ४६ ॥ जरी आत्मा कळला । भाव आश्चर्येंवीं न वळला । तो मागुती खळवळला । देहात्मभावीं ॥ ४७ ॥ जो जो होतो अनुभव । तो तो आइता नव्हे अभिनव । तथापि संसारियास वैभव । प्राप्त जालें ईश्वराचें ॥ ४८ ॥ सर्व भूतांचा आत्मा स्वयें । हा ईश्वरानुभव निश्चयें । तो यास जाला निःसंशयें । कैसें नव्हे आश्चर्य ॥ ४९ ॥ ऐसें असोनि ज्याला । आश्चर्ये आल्हाद नाहीं जाला । आत्मा कळोनि त्याला । भ्रांति पडे मागुती ॥ ७५० ॥ ह्मणोनि चौथे चरणीं । अनादि अविद्येची निःसीम करणी । सांगतो कीं गुरुचरणीं । लागोनिही भ्रष्ट होय ॥ ५१ ॥ कोणेएकीं आइकिला । देहातीत चिदात्मा नाहीं कळला । आइकोनिही नाहीं थारला । आत्मबोध ॥ ५२ ॥ चित्तास चैतन्ययोग । सर्वदा आहे नाहीं वियोग । रज्जु देखे तेव्हां भुजग । दृष्टी पाहे ॥ ५३ ॥ शरीरी आणि शरीर । निवडूनि सांगतां काय उशीर । वेगळें करणें क्षीर नीर । हा स्वभावचि हंसाचा ॥ ५४ ॥ संतकृपेचें घन । सर्वत्र वर्षती जीवन । पालथा घट करटा जन । दोष नव्हे हा तयाचा ॥ ५५ ॥ चंद्र देखोनि आनंद । पावे सकळ जनवृंद । विषयतस्कर मंद । सुख न मानिती देखोनिही ॥ ५६ ॥ एवं आत्मज्ञान कानीं । पडोनीही कितीएकांनीं । गमाविलें कीं मनीं । अनुताप नाहीं उपजला ॥ ५७ ॥ अधिकारी अनधिकारी । वर्णूनि दोघांतें मुरारी । ह्मणे त्यांत जे अधिकारी । आश्चर्य मानिती आत्मयाचें ॥ ५८ ॥ एक आश्चर्यवत् पाहती । एक आश्चर्यवत् बोलती । एक आश्चर्यवत् आइकती । अरे अर्जुना ॥ ५९ ॥ या आत्मयाचें आत्मपण । जो विचारितो आपण । त्या निजधना पाहोनि निपुण । परधनशोकी तूं होसी ॥ ७६० ॥ जें पूर्वशोकीं निरूपिलें । कीं अव्यक्तापासोनि उपजलें । शरीर अव्यक्तींच तें मिळालें । यांत गेलें तुझें काय ॥ ६१ ॥ त्याचा वृथा शोक । करणें हाचि अविवेक । आत्मा पाहणें हाचि विवेक । अगा अर्जुना ॥ ६२ ॥ या भावें हा श्लोक देव । बोलिला आतां देवाधि-

---

१ नूतन. २ ईश्वर असा अनुभव. ३ ज्ञानमय असा. ४ आत्मा. ५ मेघ. ६ पाणी. ७ दैवहीन. ८ लोकसमूह. ९ चोर. १० पश्चात्ताप.

देव । यावरूनि श्रीवासुदेव । दृढ करील पूर्वोक्त ॥ ६३ ॥ कीं आत्मा हा सर्वदेहीं । याचा वध होणार नाहीं । ह्मणोनि शोक न करीं कांहीं । ऐसें बोलेल या श्लोकीं ॥ ६४ ॥

॥ श्लोक ॥ देही नित्यमवध्योयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

॥ टीका ॥ अरे जो आत्मा वर्णिला । तो हा देहधारीच कीं आपला । देह जो तो असे धरिला । याणेंचि ॥ ६५ ॥ यालागीं ह्मणावा देही । कीं हाचि असे सर्वांचे देहीं । आतां उरले देह तेही । त्याच आत्मयापासुनी ॥ ६६ ॥ देहास कारणें भूतें । तीं त्यापासोनि निश्चितें । आतां तूं दोहीं निमित्तें । शोक कराया न योग्य ॥ ६७ ॥ अर्थ एथें आणिक एक । कीं तस्मात् कारण सर्वभूतशोक । नको करूं हें उत्तमश्लोक । सर्व भूतां-विषयीं बोलिला ॥ ६८ ॥ तरी सर्वभूतांस मरण । होणार कीं याकारण । शोक करितों मी आपण । स्वजन मारूं कसा ह्मणे ॥ ६९ ॥ आतां सर्व-भूतें ह्मणिजे । हे स्वजन मिळाले जे जे । ऐशी क्लिष्टकल्पना[१] कां कीजे । मुख्य अर्थ साधतां ॥७७०॥ "तस्मात्सर्वाणि भूतानि" । ह्मणजे सर्वभूतें त्यापासूनी । जैसें मृगजळ किरणांवांचोनी । भासेना अथवा दिसेना ॥ ७१ ॥ तैसीं आत्मयावांचुनी । कोण ह्मणेल भूतें ह्मणोनी । यास्तव ऐसीं आत्मया-पासूनी । सर्व भूतें ॥ ७२ ॥ मातीपासूनि घट । न दिसे मातीविण निपट । पाहतां मातीच आहे प्रकट । दिसोनिही घट असेचिना ॥ ७३ ॥ एवं मिथ्या भूतगणें । मिथ्या मारणें मिथ्या मरणें । ह्मणोनि शोका न करणें । पाहणें आत्मा पूर्वोक्त ॥ ७४ ॥ कीं शोक हा अयोग्य । तो कराया न तूं योग्य । आहेस अधिकारी सभाग्य । आत्मत्व जाणावया ॥ ७५ ॥ हा भाव दावी अव्यय । त्यावरूनि धनंजय । युद्ध कराया निश्चय । मनीं धरी ॥ ७६ ॥ संदेह गेला सकळ । परी कृपा उरली पुष्कळ । याकारणें मेघनीळ । उप-देशितो हा श्लोक ॥ ७७ ॥

॥ श्लोक ॥ स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ दयाही करावया । योग्य नव्हसी धनंजया । स्वधर्म पाहतां

---

१ सरळ नव्हे अशी कल्पना.

क्षत्रिया । धर्मयुद्ध ॥ ७८ ॥ यालागीं दया कराया । योग्य न होसी कुरु-वर्या । धर्मयुद्धाहूनि क्षत्रिया । श्रेय आणिक न दिसे ॥ ७९ ॥ श्रेय मुख्य परलोक । तो सिद्ध सद्य असतां शोक । काय करिसी ऐसें उत्तमश्लोक । या श्लोकीं बोलतो ॥ ८० ॥

॥ श्लोक ॥ यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ अरे जो धर्मयुद्धीं मेला । तो निश्चित स्वर्गासि गेला । आजि तरी मोकळाच केला । देवीं दारवंटा स्वर्गाचा ॥ ८१ ॥ कीं मरणार एथें फार । किती उघडावें वारंवार । ह्मणोनि एकसरें स्वर्गद्वार । उघडेंचि ठेविलें ॥ ८२ ॥ अरे जें जपल्या न घडे । तें स्वर्गद्वार अनायासें उघडे । भाग्यें ऐसें सांपडे । धर्मयुद्ध क्षत्रियां ॥ ८३ ॥ ज्यास ऐसा शोकसंशय । नसे तो सुखी क्षत्रिय । त्यास भाग्यें धर्ममय । युद्ध ऐसें सांपडे ॥ ८४ ॥ उभयलोकपुरुषार्था । हें युद्ध देणार गा पार्था । हें न करितां अनर्था । पावसी ह्मणे चौं श्लोकीं ॥ ८५ ॥

॥ श्लोक ॥ अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ श्रीचतुर्भुज भुज । उभारूनि ह्मणे आह्मी तुज । बोलिलों वेदशास्त्रगुज[१] । अर्जुना ॥ ८६ ॥ आतां यानंतर जरी । हें न करिसी धर्म-युद्ध तरी । गोष्टी नव्हे बरी । सांगतों ॥ ८७ ॥ स्वधर्म आणि कीर्ती । टाकोनि पावोनि अपकीर्ती । पाप पावसी तूं धर्ममूर्ती । त्याकरितां ॥८८॥

॥ श्लोक ॥ अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति ते व्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ अपकीर्ति तुझी भूतें । बोलती जे कधीं नाशातें । न पावे ऐशा अपयशातें । आचंद्रार्क[२] पावसी ॥ ८९ ॥ सर्वीं सर्वत्र मानिला । त्याचा अपकीर्तिघोष जाला । तो मरणाहूनि त्याला । अधिकतर ॥ ७९० ॥

॥ श्लोक ॥ भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ कीं रण देखोनि भ्याला । तरीच तोंडींचा निघाला । ऐसें मानितील तुजला । महारथ ॥ ९१ ॥ जे तुज देती बहुमान । वर्णिती तेच अपमान । लाघैव[३] पावसी वर्तमान । काळांत याहि ॥ ९२ ॥

---

१ वेदशास्त्रांचें रहस्य. २ चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत. ३ लहानपण.

॥ श्लोक ॥ अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।
निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ बोलों नये ते परी । तुज बोलती तुझे वैरी । सामर्थ्य निंदिती याहीवरी । दुःख अधिक तें कोण ॥९३॥ युद्ध न करितां अनर्थ । यां श्लोकीं बोलिला समर्थ । दों पक्षींहि पुरुषार्थ । युद्ध करितां ह्मणे या श्लोकीं ॥९४॥

॥ श्लोक ॥ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

॥ टीका॥ मरसील हें तों न घडे । कीं मी आहें तुजकडे । अथवा रणीं मस्तक पडे । तरी पावसी तूं स्वर्ग ॥ ९५ ॥ अथवा न मरतांच जया । पावसी तूं धनंजया । तरी पृथ्वी भोगिसी संदेह या । गोष्टीस काय ॥ ९६ ॥ या दोहीं कारणांवरी । दृष्टि देऊनियां वरी । कौंतेया ऊठ झडकरी । युद्धनिश्चय करूनियां ॥९७॥ कुंतीची लेकी असती । ते वेडेपणें हसती बैसती । तरी आह्मी तीप्रती । कां ऊठ ह्मणतों ॥ ९८ ॥ तूं तों अगा कौंतेय । कन्या नव्हेस तिचा तनय । ह्मणूनि ह्मणतों युद्धनिश्चय । करूनि ऊठ हा भाव ॥ ९९ ॥ गेला या गोष्टीनें भ्रम । युद्धही वाटे स्वधर्म । परी ह्मणे जाणावें ब्रह्म । कर्म बंधक अनिवार ॥ ८०० ॥ जितां राज्य मेल्या स्वर्ग । दोन्ही बंधाचेच उपसर्ग । अंतीं कर्मफलवर्ग । दुःखहेतु ॥ १ ॥ दुःख तितुकें पाप । स्वर्गीं शेवटीं तरी ताप । युद्ध स्वधर्म तरी पश्चात्ताप । फल बंधरूपें देणार ॥ २ ॥ हा अर्जुनाचा भाव । जाणोनि सर्वसाक्षी देव । याचा परिहार देवाधिदेव । यापुढें आतां बोलेल ॥ ३ ॥ कीं होऊनि निरहंकारें । जय अपजय दोन्ही प्रकार । समें मानी तरी हा निर्धार । कीं पाप ऐसें न पावसी ॥ ४ ॥ पाप ऐसें न पावसी । या श्लोकीं ह्मणेल अर्जुनासी । हें मारितां स्वजनांसी । पाप होणार तें पाप ह्मणवेना ॥ ५ ॥ पाप वाटतें जरी। स्वधर्म त्यास एथवरी । न ह्मणतां सर्वथा हरी । स्वजनहत्येसी ॥ ६ ॥ स्वधर्म कां टाकिसी । वारंवार गोष्टी ऐसी । जो बोले तो कैसी । पापवार्ता बोलेल ॥ ७ ॥ हें पाप ह्मणोनी । बोलेल जेव्हां अंगीकारूनी । तेव्हां या अध्यायाच्या आरंभापासुनी । जें बोलिला तें व्यर्थ ॥ ८ ॥ स्वजनहत्याही स्वधर्म । क्षत्रियांस परी हेंही कर्म । बंध करणार हेंचि वर्म । पापशब्दें ये स्थळीं ॥ ९ ॥ बंध कर्माचें नाम । पाप ह्मणती निगमागम । त्याचा परिहार

१ पापरूपानें. २ अहंकाररहित. ३ समान, तुल्य. ४ वेदशास्त्रें.

पुरुषोत्तम । बोलेल आतां ॥ ८१० ॥ कीं सुखदुःखीं सम । होऊनि करा हा स्वधर्म । ऐसें पार्थास सगुणब्रह्म । बोलेल आतां या श्लोकीं ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ अर्जुना करितांही स्वधर्म । फलबंध जोडीच कर्म । हें सकल वेदांचें वर्म । बंध ह्मणजे पाप ॥ १२ ॥ परि या पापाचा हेतु । एक कामना जाण तूं । हा स्वधर्मी जो किंतू । तो निष्कामता परिहरी ॥ १३ ॥ कामनारूप तें हें कीं । मज सुख हो उभयलोकीं । आणि दुःख न हो इतुकी । मूळप्रतिमा कामनेची ॥ १४ ॥ दुःख न हो हो सुख । यामुळें इंद्रें आणिक । जयांत सुख अपजयांत दुःख । या युद्धीं कामना इतुकीच ॥ १५ ॥ तरी होई सुखदुःखीं सम । टाकीं जयापजयांचा भ्रम । निरहंकार होऊनि संग्रामें । आरंभीं त्यावरी ॥ १६ ॥ पुण्यांतही वधरूप । अर्जुना घडे जें पाप । ऐसा होतां तूं संताप । तोही न पावसी ॥ १७ ॥ ऐसा निष्काम धर्म । यांत बहु संदेहाचा भ्रम । तें सकळ सगुणब्रह्म । छेदूं ह्मणे स्वशरणाचें ॥ १८ ॥ आतां यापुढें जो श्लोक । त्या श्लोकीं उत्तमश्लोक । करूनि हा कृपावलोक । हेंचि बोले ॥ १९ ॥

॥ श्लोक ॥ एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ अर्जुना एथवरी । जे हे बुद्धि वदलों वरी । हींत सांख्याख्या कुसरी । सांख्यरीतीं बोलिलों ॥ ८२० ॥ सांख्य ह्मणजे गणना । सकल तत्त्वांची अर्जुना । ज्या शास्त्रांत हे रचना । सांख्य ह्मणावें तें शास्त्र ॥२१॥ असत्पदें जड क्षेत्र । त्यांत गणिजे जडतत्त्वमात्र । क्षेत्रज्ञ जाणे जो हें विचित्र । तो सत्पदें वर्णिला ॥२२॥ तें क्षेत्र देह नाशवंत । क्षेत्रज्ञ साक्षी शाश्वत । जाणोनि तो सर्वगत । शोक टाकीं ऐसें बोलिलों ॥ २३ ॥ हे सांख्यरीतीची बुद्धी । बोलिलों जिणें मोक्षसिद्धी । परी या अनुभवाची समृद्धी । चित्तशुद्धीनें ॥ २४ ॥ ते चित्तशुद्धि कर्म । ह्मणजे विहितधर्म । त्यांत बंधक सकाम । निष्कामकर्मी चित्तशुद्धी ॥ २५ ॥ त्याचेंही स्वल्पमात्र गुज । पूर्वश्लोकीं बोलिलों तुज । परी तितक्यानें बरा उमज । जाला नसे तूतें

१संशय.२ युद्ध.३ आपणास जो शरण आला त्याचें.४सर्वव्यापी ५मुक्तीची सिद्धि.

॥ २६ ॥ आतां त्या कर्मयोगीं । बुद्धि सांगतों तुजलागीं । बुद्धीनें तूं कर्मप्रयोगीं । पार्था तोडिसी कर्मबंध ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥ नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

॥ टीका ॥ अर्जुना हा सुगम पंथ । धोकाच नाहीं कांहीं जेथ । कीं जें आरंभिलें एथ । त्यास अपूर्णता असेना ॥ ८२८ ॥ कीं एक कर्म आरंभिलें । त्यास मध्यें विघ्न आलें । तरी तें नासोनि नाहीं नासलें । पूर्णचि जालें जाणावें ॥ २९ ॥ सत्कर्में होय संतुष्ट । ईश्वर दे फल अभीष्ट । यास कांहींच नाहीं इष्ट । ईश्वराविण ॥ ८३० ॥ हा फल अपेक्षिता । तरी फलासारिखें कर्म पाहता । पूर्ण होतें तरीच देता । फल ईश्वर ॥ ३१ ॥ फुका सेवा करूं लागे । आणि फळ कांहीं न मागे । विहित आज्ञेमध्यें वागे । फुकाची ॥ ३२ ॥ पूर्ण होतांही फळ । जो न इच्छीच केवळ । पूर्ण न होतां काय विकळ । होणार त्याचें ॥ ३३ ॥ कर्म करितां कांहीं । चुके तरी प्रत्यवाय नाहीं । फुकट राबे त्याचीही । चुकी कोणीं काढावी ॥ ३४ ॥ एथें मनीं ह्मणे पार्थ । तरी काय त्याचें करणें व्यर्थ । तो उत्तरार्धें समर्थ । तेंही बोले ॥ ३५ ॥ करितां हा निष्काम धर्म । त्याचें जें स्वल्पही कर्म । त्याणें शुद्धचित्त पावे ब्रह्म । सुटे महद्भयापासूनी ॥ ३६ ॥ धरोनि हा भाव मनीं । ह्मणे श्रीकृष्ण हांसोनी । कीं रक्षी थोर भयापासुनी । स्वल्पही कर्म या धर्माचें ॥ ३७ ॥ आतां सुखास उपयोगी । बुद्धि निष्कामकर्मयोगीं । त्यास कामुकाच्या बुद्धि बजांगी । दोन्ही वर्णितों या श्लोकीं ॥ ३८ ॥

॥ श्लोक ॥ व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयो व्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ अगा हे कुरुनंदना । कौरवकुळाच्या मंडनां । धन्य कीं तूं या भवखंडना । मोक्षमार्गास आइकसी ॥ ३९ ॥ एक सर्वेश्वरकृपा । तारील या निश्चयरूपा । बुद्धि पावे हा मार्ग सोपा । आणीक ऐसा असेना ॥ ८४० ॥ एका ईश्वराचे चरण । त्यास एकनिष्ठ असणें शरण । त्या कारणेंचि कर्म करणें । अन्य नलगे ॥ ४१ ॥ हें एक बुद्धीचें लक्षण । आतां तिचें निश्चयात्मिकपण । हें कीं निश्चित आपण । या भवसमुद्रीं बुडेना ॥ ४२ ॥ ऐशी निश्चयात्मिका । बुद्धि गा कुरुकुलाच्या टिळका । सुखहेतु

---

१ इच्छिलेलें. २ फलेच्छूच्या. ३ तापट, तामसी. ४ भूषणा. ५ संसारनाशना.

न मनीं एका । ईश्वराविण ॥ ४३ ॥ न जया हा एक निश्चय । त्याच्या बु-द्धीचे आशय । अनंत आणी नाना काममय । फांटे तया आशयाचे ॥४४॥ एका एका मनोरथासाठीं । यत्न करिती कोटि कोटी । मागुती निश्चय पोटीं । कार्यसिद्धीचा असेना ॥ ४५ ॥ होईल कीं नव्हे फळ । या चिंतनेनें तळमळ । कधीं होईल हे हळहळ । सुख कैंचें तयातें ॥ ४६ ॥ एक निश्चय नसे जया । त्याची बुद्धि साह्य न तया । पीडी ऐसी धनंजया । अनंत शाखा होउनी ॥ ४७ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कोण्या निमित्तें उत्तमश्लोक । बोलेल हें निष्काम लोक । परिसोत ॥ ४८ ॥ अर्जुन ह्मणे मनीं । कीं काम्य वाईट ह्मणोनी । कां निंदितो जें महाजनीं । श्लाघ्य केलें ॥ ४९ ॥ जें जें वेद-प्रमाण । बोलती चतुर सुजाण । वेदशास्त्रप्रवीण । तें निंद्य कैसें ॥८५०॥ हा अर्जुनमनोभाव । जाणे सर्वसाक्षी देव । तो पुसे तों स्वयमेव । बो-लतसे हा श्लोक ॥ ५१ ॥

॥ श्लोक ॥ यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ अर्जुनास भवभंजन । ह्मणे जे दिसती महाजन । त्यांचा भाव जो गहन । तो उथळ अत्यंत पाहतां ॥ ५२ ॥ अरे ते वेदवादींच र-त । पुष्पास ह्मणती फळ निश्चित । मोक्ष नाहींच ऐसें मत । अगा त्यांचें ॥ ५३ ॥ आणि मूढही नसती । वेदांचा अर्थही वदती । परंतु सर्वज्ञ न-व्हती । अदीर्घदर्शी असर्वज्ञ ॥ ५४ ॥ अर्जुना कर्म ह्मणजे वेल । स्वर्गादि पुष्प मोक्ष फल । आधीं वेलास येतें फूल । फळ शेवटीं ॥ ५५ ॥ फळ आलियावरी । वेल वाळे ज्यापरी । ज्ञान झालिया उपरी । जळे कर्म ॥ ५६ ॥ जें ज्ञान तेचि मुक्ति । तेचि जागृति तेचि स्वप्ननिवृत्ति । परी ते ब्रह्मात्मताप्राप्ती । चित्तशुद्धीनें ॥ ५७ ॥ चित्तशुद्धि कर्ममूळ । एवं परंप-रेनें मोक्षफळ । तोचि मोक्ष केवळ । आत्मबोध ॥ ५८ ॥ फळ पक्व होतां वेल । वाळे त्यांत न उरे ओल । परी फळाहूनि पूर्वीं येतें फूल । तें घेऊं न-ये ॥ ५९ ॥ ज्याणें तोडिलें फूल । त्यास कैंचें होय फळ । परी बाळांस सद्यः कोमळ । पुष्प तोडणें आवडे ॥ ८६० ॥ फळाकारणें वेल । लावा

१ उत्तम. २ अर्जुनाच्या मनांतील आशय. ३ संसारनाशन. ४ लांबचें पहा-णारे नव्हत. ५ सुषुप्ति. ६ उन्मनी. ७ तत्काळ.

ह्मणे बाप वडील । बाळक नाइकती बोल । साध्य बहुकाळें ह्मणोनी ॥ ६१ ॥ बाळांस आवडती फुलें । बापही त्यांस तैसाच्च बोले । वेल लावा ह्मणे येती फुलें । शीघ्र उपयोगी खेळावया ॥ ६२ ॥ मग ते लाविती वेल । आइकती पितयाचा बोल । नेणती बोलांत जो खोल । भावार्थ फळींच्च पितयाच्चा ॥ ६३ ॥ वेद जगाच्चा पिता । मोक्षार्थं कर्मयोगाच्चा वक्ता । तो विषयभोगरता । नावडे मोक्ष ॥ ६४ ॥ पापें नरकास जाणें । त्याहूनि बरें स्वर्ग भोगणें । पापें अपुत्र अभाग्यपणें । पुण्यें सभाग्य पुत्रवंत ॥ ६५ ॥ तोंडोत कामनेच्चीं फुलें । परी कर्मं करोत आपल्या बोलें । ह्मणूनि काम्य ह्मणे भलें । ते वाच्चा पुष्पिता वेदाची ॥ ६६ ॥ मोक्षफळ मुख्य कारण । तें ज्या वच्चनीं न बोलणें । काम्य पुष्पच्चि मुख्यत्वें सांगणें । ते वेदाच्ची आज्ञा पुष्पिता ॥ ६७ ॥ हा कर्मकांडसिद्धांत । अंगीकारी शास्त्र वेदांत । कीं वैदिक कर्म मोक्षानिमित्त । वेदप्रमाण येविषयीं ॥ ६८ ॥ श्रुति ॥ तमेतमात्मानं वेदानुवच्चनेन ब्राह्मणा विविदिषंति । यज्ञेन दानेन तपसा नाशकेन ॥ ॥ श्रुत्यर्थ ॥ श्रुति ह्मणे या आत्मयातें । जाणों इच्छितात्ति ज्ञानपंथें । तो ज्ञानपंथ एथें । बोलिला ऐसा ॥ ६९ ॥ कीं ब्रह्मलक्षणें जया वच्चनीं । त्या वेदानुवच्चनेंकरूनी । ब्राह्मण जाणों इच्छितात्ति आणी । यज्ञादिकीं ॥ ८७० ॥ जाणों इच्छिती ज्या मनीं । तें शुद्ध नसे ह्मणोनी । यज्ञादिकीं शुद्ध करूनी । जाणों इच्छिती ॥ ७१ ॥ ह्मणूनि ह्मणे भगवंत । कर्म मोक्षफळानिमित्त । स्वर्गादिक पुष्प निश्चित । मुख्य फळ हें नव्हे ॥ ७२ ॥ तथापि जेथें कामना । त्या वेदाच्चिया वच्चना । पुष्पित ह्मणावें अर्जुना । कीं मुख्य फळ नव्हे तें ॥ ७३ ॥ ज्या अशा पुष्पिता वाचा । तितक्याच्च धरिती अर्थ त्याच्चा । काम्य फळच्चि साचा । पुरुषार्थ ह्मणती ॥ ७४ ॥ जरी ह्मणविती पंडित । ते असर्वज्ञ निश्चित । न कळोनि वेदसिद्धांत । पुष्पास फळ मानिती ॥ ७५ ॥ सर्वज्ञांतें तें असंमत । जे वेदवादीं रत । वेदीं जे अर्थवाद तयांत । रत होउनी राहिले ॥ ७६ ॥ निंब पाजितां पिता । लाडू देईन ह्मणे सुता । निंबपानफळ तत्त्वता । लाडूच मानी बाळक ॥ ७७ ॥ ऐसा पितयाच्चा शब्द । त्यास ह्मणावें अर्थवाद । परी आरोग्य इच्छी पिता वेद । मोक्षमार्गी जो लावी ॥ ७८ ॥ आरोग्य न कळे बाळा । परी हात पसरी गुळा । वेदाची ऐसी नाकळे कळा । रत अर्थवादीं ह्मणूनि ते ॥ ७९ ॥ पार्था स्वर्गादि फळ । वेद पिता दावी गूळ ।

आणीक नाहीं हाचि केवळ । पुरुषार्थ ह्मणती ॥ ८८० ॥ आणि पाहतां सुज्ञ । न ह्मणवे ते केवळ अज्ञ । परंतु नव्हती सर्वज्ञ । कीं अमुख्यास मुख्यचि ह्मणती ॥ ८१ ॥ मनुष्याहूनि जीवित्व । अधिक ह्मणूनि अमरत्व । देवांस जैसें अक्षय्यत्व । कर्मफळास वेदीं वर्णिती ॥ ८२ ॥ श्रुति ॥ अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति ॥ ॥ श्रुत्यर्थ ॥ चातुर्मास्य यज्ञ यजिती । त्यांचीं सुकृतें अक्षय्य ह्मणे श्रुति । ते हेंच तत्त्व मानिती । परंतु नव्हती सर्वज्ञ ॥ ८३ ॥ कीं अमरत्व देवां जैसें । कर्मफळ नित्यत्वें तैसें । तरी मोक्षनित्यत्व ऐसें । कां नव्हे ह्मणती ॥ ८४ ॥ मोक्षास नश्वरता । वेद बोले तत्त्वतां । तरी मोक्षही ह्मणिजे ता । नश्वर ॥ ८५ ॥ कर्मफळ नाशवंत । वेद बोलती निश्चित । हेतु दाविती अत्यंत । नश्वरत्वीं ॥ ८६ ॥ ॥ श्रुति ॥ तद्यथेह कर्मजितो लोकः क्षीयते । एवमेवामुत्र पुण्यजितो लोकः क्षीयते ॥ श्रुत्यर्थ ॥ कर्म करूनि इहलोकीं । देश संपादिला नासेच कीं । तैसा पुण्यें परलोकीं । लोक मेळविला नासेच ॥ ८७ ॥ इहलोकीं साधे देश । शत्रु आक्रमी तोच नाश । अथवा आपण वश । मृत्यूस होतो ॥ ८८ ॥ एवं मेळविला देश । इहलोकीं त्यास एथेंचि नाश । स्वर्गी सरतां पुण्यलेश । ढकलूनि देती ॥ ८९ ॥ श्रुति ह्मणे इहलोक । तैसाच नासे परलोक । कर्मफळ नश्वर सशोक । श्रुति ह्मणे ॥ ८९० ॥ मोक्षही ऐसी श्रुति । जरी कोठें तरी नाशवंत ह्मणती । तरी मोक्षाचीही स्थिति । होती अमरांचसारिखी ॥ ९१ ॥ कर्मफळाप्रति । बहुत श्रुति नाश ह्मणती । अक्षय्य ह्मणे एक श्रुति । तें अमरत्व जैसें अमरांचें ॥ ९२ ॥ ऐसा श्रुतीचा विचार । न करूनि करिती बेडेचार । असर्वज्ञ त्यांस सर्वेश्वर । स्वमुखें ह्मणे याकरितां ॥ ९३ ॥ याकारणें पार्था । ते भले न मानीं सर्वथा । आणीक त्यांची कथा । आईक जे मी बोलतों ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥ कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ मानवी स्त्रिया इह लोकीं । देवांगना भोगूं परलोकीं । कामसमुद्राच्या उदकीं । मन बुडालें जयांचें ॥ ९५ ॥ जो स्वर्ग नाशवंत । तो पुरुषार्थ अत्यंत । कर्में करोनि होती भ्रांत । त्या स्वर्गाकारणें ॥ ९६ ॥ भोगैश्वर्य साधावया । आरंभिती ज्या ज्या क्रिया । त्या त्या अगा धनं-

---

१ भोग आणि ऐश्वर्य.

जया । दुःखें देती अगणित ॥ ९७ ॥ दुःख नरकापरिस । अधिक ऐसा गर्भवास । अवश्य घडे तयांस । त्या क्रियेनें ॥ ९८ ॥ एवं शंका वाटे मना । सहज गर्भवास असे जनां । कां निंदावी वेदोक्त कामना । तरी भावार्थ परिसा कृष्णाचा ॥ ९९ ॥ कीं वासनानदीची धारा । जन्ममरणप्रवाहीं नरा । सहज वाहवी विशेष वारा । सुटला वेदोक्त काम्यकर्माचा ॥ २००॥ लागावया तीरा । यत्नही करूं नेदी नरा । ऐसा कामनेचा वारा । काम्यशास्त्रें सोडिला ॥ १ ॥ जरी टाकी कर्मकामना । तरी मोक्षशास्त्र रुचे जना । तेव्हां मोक्षाच्या साधना । झोंबों लागे ॥ २ ॥ कामना तितकी फूल । ऐसा वेदार्थ समजे सखोल । तरी मोक्षफळ मुख्य फळ । जन मानी ॥ ३ ॥ तेव्हां वासनानदीची धारा । सोडूनि लागावें तीरा । तैसी बुद्धि होय नरा । तों वारा सुटला हें शास्त्र ॥ ४ ॥ वेग जाला प्रवाहीं । तीरीं लागावया यत्न नाहीं । यत्न असोनि न सुचे कांहीं । मोक्षमार्गाचा ॥ ५ ॥ मोक्षाचा यत्न न सुचे । न चुकती गर्भवास त्यांचे । निंघोनि वेदमार्गीही त्यांचे । पडले गर्भाचिया ॥ ६ ॥ ऐसा पोटीं भाव । म्हणूनि म्हणे देव । कीं गर्भवास पुनर्भव । काम्यक्रिया आचरतां ॥ ७ ॥ जरी पावला स्वर्गास । तरी दारुण नरक त्यास । कीं न चुके गर्भवास । जो अधिक नरकाहूनिही ॥ ८ ॥ त्या गर्भनरकाबाहेरी । तो प्राणी आल्याहि उपरी । नर जन्म पावेल केव्हां तरी । दारवंटा मोक्षाचा॥९॥ तेथेंही पूर्वसंस्कार । प्राप्त होतां तो नर । काम्यकर्मीच आदर । धरी नेटें ॥९१०॥ काम्यकर्मेंचि केवळ । करितां पावे तैसेंच फळ । पुन्हा गर्भवास अढळ । दारुण नरकापरीसही ॥ ११ ॥ जन्मकर्मफलप्रदा । काम्यक्रिया ऐशा सदा । त्या भोगैश्वर्यसंपदा । प्राप्तीकारणें आचरती ॥१२॥ भोग ऐश्वर्य हीं तों फळें । पुन्हा जन्म कर्म यांच्याचमुळें । त्यावेगळ्या घननीळें । साधनक्रियाही निंदिल्या ॥ १३ ॥ कीं भोगैश्वर्य पावावया । आचरती ज्या ज्या क्रिया । त्याही अगा धनंजया । जन्मकर्मफळ देती ॥ १४ ॥ जन्मकर्मफलप्रदा । हे काम्यकर्माची वेगळी निंदा । कीं फळ हो न हो जनवृंदा । परी जन्मकर्मफळ चुकेना ॥ १५ ॥ द्यावें जन्मकर्मफळ ।

---

१ किनाऱ्याला. २ फलेच्छाशास्त्र. ३ कर्माची इच्छा. ४ निघोनि. ५ पुनः होणें. ६ फलेच्छेनें केलेलें कर्म. ७ जन्म आणि कर्म हीं फलें देणाऱ्या. ८ फलेच्छेनें केलेल्या क्रिया. ९ भोग आणि ऐश्वर्य यांच्या साधनार्थ ज्या क्रिया, कर्में. १० लोकसमूहास.

तें काम्यकर्मफळ अढळ । अनादिशक्ति प्रबळ[2] । अंगीं काम्यकर्माच्या ॥१६॥ भोग ऐश्वर्य फळ । कर्म सांग होतां सफळ । सांग न होतां निष्फळ । परी अढळ जन्मकर्म ॥ १७ ॥ मागें निष्काम धर्म । तुज बोलिलों तें वर्म । चुको वांको तरी ब्रह्म । पाविजे ईशप्रसादें ॥ १८ ॥ काम्य सफळ हो निष्फळ । जन्ममरण हें तों अढळ । अज्ञान आधींच प्रबळ । त्यासही बळ या क्रियांचें ॥१९॥ त्याही सोपिया क्रिया । नव्हती अगा धनंजया । कष्ट लागती तयां । अत्यंत ॥९२०॥ क्रियाच कठिण अत्यंत । त्यांचेही विशेष बहुत । "क्रियाविशेषबहुलां" ह्मणे अनंत । या भावें ॥ २१ ॥ देशकालादि सकळ । जों जों बरें तों तों फळ । कांहीं चुकतां सर्व विफळ । प्रायश्चित्तें त्याकारणें ॥ २२ ॥ ऐसें करितां कर्म । सांग होतां साधे धर्म । कांहीं चुकतां अवघा श्रम । व्यर्थ होय ॥ २३ ॥ यालागीं निष्काम वाट । बरी जेथें कांहीं कचाट । नसे आणि फळ अचाट । कीं चुकती नरकवास ॥ २४ ॥ ईश्वरीं एकनिष्ठ बुद्धि । त्यास तेचि सद्यः समाधि । सकामास ते नसे सिद्धी । तें या श्लोकीं बोलतो ॥ २५ ॥

॥ श्लोक ॥ भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

॥ टीका ॥ भोगैश्वर्य नाशवंत । कामना त्यांचीच अत्यंत । आयुष्य वेंचिती अत्यंत । आसक्त ऐसे ॥ २६ ॥ मोक्षफळातें लपविती । स्वर्गादिपुष्प फळ ह्मणती । ऐसी वेदवाचा तुजप्रती । जे पुष्पिता मागें बोलिलों ॥ २७ ॥ या वेदवाचेनें त्यांची । बुद्धि हरिली कामुकांची । निश्चयात्मता कैंची । त्या बुद्धीस त्यांचिया ॥ २८ ॥ एकनिष्ठ जे बुद्धी । तेचि ह्मणावी समाधी । ते निश्चयरूप सिद्धी । यांच्या बुद्धीस न घडे ॥ २९ ॥ ह्मणूनि काम्याची खटपट । टाकूनि धरीं तूं मार्ग नीट । शुद्ध मोक्षाची वाट । दावी अर्जुनास या श्लोकीं ॥ ९३० ॥

॥ श्लोक ॥ त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

॥ टीका ॥ अर्जुना हे वेद । ज्ञान द्यावया अभेद । प्रवर्तले त्रिगुणभेद । बंध हरावया जीवांचा ॥ ३१ ॥ तमोगुण विषय । रजोगुण तें इंद्रिय । मन

---

१ माया. २ फार बळकट. ३ पूर्ण. ४ पुष्कळ. ५ भेदरहित.

सत्त्व तें रजतममय । वासना विषयभोगाची ॥ ३२ ॥ एवं विषय इंद्रिय मन । या त्रिगुणचक्रींच जे जन । त्यांस त्रैगुण्य ह्मणून । अर्जुना ह्मणावें ॥ ३३ ॥ जे ऐसे त्रिगुणमय । वेद त्यांचे जाले विषय । कीं पुष्पीं फळाचा निश्चय । दाविती त्याला ॥ ३४ ॥ तरी ते तूं सोडीं वाट । टाकीं काम्याची खटपट । आणि निस्त्रैगुण्य[1] निपट । होईं तूं ॥ ३५ ॥ ह्मणसी टाकूनि तिन्ही गुण । कोणे परी असों आपण । तरी सांगतों तेंहि खूण । अर्जुना ॥३६॥ त्रिगुणांचें मूळ आहे । तें या तिहीं वेगळें पाहें । या नित्यसत्त्वीं तूं राहें । अगा अर्जुना ॥ ३७ ॥ जैसा पडला दोर । तो दृष्टीस दिसे सर्प थोर । दृष्टिभ्रमें सर्पाकार । रज्जूच दिसतो दृष्टीसी ॥३८॥ दृष्टींत आहे भ्रम । तोचि भासे भुजंगम । तथापि रज्जुचा संगम[2] । असे दृष्टीसी ॥ ३९ ॥ रज्जू कळला असता । तरी कां सर्प दिसता । सर्प भासे तरी तत्त्वता । दृष्टि स्पर्शली रज्जूतें ॥ १४० ॥ तोचि कळला दोर । मिथ्या जाला सर्पाकार । तेव्हां हा दोर निर्विकार । दिसे तेथें दृष्टीसी ॥ ४१ ॥ जाणे नेणे तरी सत्य । रज्जू साच दिसे जीस नित्य । तीस तों ह्मणावें अगत्य । नित्यदृष्टि ह्मणोनी ॥ ४२ ॥ नित्यसत्त्वाचें लक्षण । ऐसें जाणती विचक्षण । ज्यांस सर्वदा ईक्षण[4] । आत्मयाचें ॥ ४३ ॥ बुद्धीस ह्मणावें सत्त्व । जें स्पर्शोनि आत्मतत्त्व । पावोनियां सचेतनत्व । विषय पाहे ॥ ४४ ॥ रज्जू नेणतां भ्रम । दृष्टींत करी भुजंगम । तैसा सत्त्वांत इंद्रियग्राम । विषय जड पाहे अज्ञानें ॥ ४५ ॥ स्पर्शोनि आत्मयातें । इंद्रियद्वारा विषयांतें । सत्त्व पाहे तयातें । नित्य सत्त्व ह्मणिजे ॥ ४६ ॥ ज्ञानदर्शतही तत्त्व । पाहों लागे तेंचि सत्त्व । तें नित्यसत्त्व आत्मत्व । नित्य दिसे जयाला ॥ ४७ ॥ जड पाहतां मिश्रसत्त्व । आत्मा पाहतां शुद्धत्व । तें दोन्ही रूपीं एकत्व । नित्यसत्त्वा तयातें ॥ ४८ ॥ या नित्यसत्त्वीं राहणें । जेथें नसती तिन्ही गुण । यालागीं ह्मणे श्रीकृष्ण । कीं निस्त्रैगुण्य होईं तूं ॥ ४९ ॥ कांहीं तांबें कांहीं रजत । सुवर्णीं असतां मिश्रित । हीन सोनें तें निश्चित । मिश्रसत्त्व ऐसें रजतमीं ॥ १५० ॥ तें सोनें पुटीं घालितां । रुपें[5] तांबें वेगळें करितां । शुद्ध सोनें उरे तत्त्वतां । अनुभवीं ऐसें शुद्धसत्त्व ॥ ५१ ॥ ज्या सत्त्वास मिश्रत्व ।

---

१ विषय, इंद्रियें आणि मन यांविरहित, ह्म० सत्त्व, रज, तम या गुणांविरहित. २ संयोग. ३ शाश्वत, खरी. ४ पहाणें. ५ रुपें.

त्यासच जेव्हां शुद्धत्व । तेव्हां गुणद्वयातीत सत्त्व । निस्त्रैगुण्य नव्हे हे शंका ॥५२॥ कीं गेलें रज तम । सत्त्वाचि उरलें उत्तम । दों गुणांचाचि अतिक्रमें । नित्यसत्त्वीं होतसे ॥ ५३ ॥ निस्त्रैगुण्य निश्चित । होऊं सांगे अच्युत । मागुती शुद्धसत्त्वांत । राहों सांगे ॥५४॥ टाकिलें जेव्हां रज तम । सत्त्व न गेलें त्यां दोस-म । गुणत्रयाचा अतिक्रम । जाला कैसा ॥५५॥ या तीन ओंवियांचि शंका । हरील तो शब्द आइक । कीं हीनपण शुद्ध कनका । टाकूनि गेलें ॥ ५६ ॥ रुपें तांबें जळे । हीनपण त्यासांगातें टळे । शुद्धसुवर्णी नाढळे । हीनपण तिसरा दोषही ॥ ५७ ॥ टाकिलें जेव्हां रज तम । तोचि मिश्रस-त्त्वाचा अतिक्रम । अनुभवीं उरलें उत्तम । सत्त्व तेव्हां ॥ ५८ ॥ निस्त्रैगुण्य होउनी । गुणत्रयातें अतिक्रमूनी । नित्यसत्त्वीं राहें ह्मणोनी । या भावें ह्मणे श्रीकृष्ण ॥ ५९ ॥ त्रिगुणांचे वेद विषय । तूं निस्त्रैगुण्य होय । आणि नि-त्यसत्त्वीं राहें निश्चय । ऐसा बोले श्रीकृष्ण ॥ ९६०॥ तेव्हां तामस विषय । आणि राजस जें इंद्रिय । आणि मन रजतममय । टाकावीं तिन्ही ॥ ६१ ॥ तेथें वाचा तेही राहे । आपण आपणातें पाहे । त्या अनुभवीं कोठें आहे । शब्दस्वरूप हा वेद ॥ ६२ ॥ तो तूं आत्मा स्वयें ॥ सत्त्वें पहावा जो निश्चयें त्या सत्त्वा विषय इंद्रियें । स्पर्शलीं नसती ॥ ६३ ॥ तरंग उदकीं मुरे । तैसें सत्त्व स्वरूपीं स्फुरे । तेंही वेगळें नुरे । नित्यसत्त्व ऐसें ॥ ६४ ॥ मन आणि इंद्रियें । तेथें स्फुरे वेद स्वयें । अनुभवीं ऐशा निश्चयें । वेद नसती ॥ ६५ ॥ वेदवाणीही न साहे । त्या अनुभवीं सत्त्व आहे । जो आत्मा आत्माकार हो-ऊनि राहे । श्रुतिही बोले ऐसेंचि ॥ ६६ ॥ ॥ श्रुति ॥ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह । आनन्दं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कदाचन ॥ श्रुत्यर्थ ॥ वाचा चारी न पावती । मनासांगातें परतती । अनुभवी तेथें जा-णती । ब्रह्मानंद ॥६७ ॥ अनुभव सत्त्वाविण । नव्हे हे सिद्ध खूण । परी क-ल्पना शब्दस्फुरण । नसे तेथें ॥ ६८ ॥ जेथें कल्पना तेथें शब्द । तेथेंच जाणावे अगा वेद । तूं टाकूनियां सर्व भेद । राहें त्या नित्यसत्त्वींच ॥६९ ॥ या नित्यसत्त्वीं राहें । स्वस्वरूप सर्वदा पाहें । परंतु एथें विघ्न आहे । वश नको होऊं तयासी ॥९७०॥ होऊनि रजतमातीत । नित्य सत्त्वीं तूं निश्चित । राहसी तें अनुभवामृत । जतन करीं अर्जुना ॥ ७१ ॥ शीतोष्ण मानाप-

१ तीन गुणांविरहित. २ नाश. ३ रजतमांवेगळा.

ज्ञान । सुखदुःख हें द्वंद्व समान । पाहसी तरीच देहाभिमान । न खेवळे तुझा अर्जुना ॥ ७२ ॥ जोंवरी रज्जूची स्मृति । तोंवरी न दिसे सर्पाकृति । त्याची पडतां विस्मृति । भय सर्प करी तत्काळ ॥ ७३ ॥ प्रारब्धभोग देह । जरी टाकिसी त्याच्या स्नेह । परंतु भोग उपजवी हा । सुखीं दुःखीं मीपणा ॥ ७४ ॥ सुखीं वाटेच मी सुखी । दुःखीं वाटेच मी दुःखी । भोगसमयीं आणखीं । न उपजे प्रत्यय ॥ ७५ ॥ त्या मीपणाची जाती । सुखीं ह्मणे हो हें मागुती । दुःखीं ह्मणे हे दुःखप्राप्ती । कधीं न हो ।। ७६ ॥ या चिंतेंत पडला । अनुभव त्याचा विघडला । जाऊनि मागुती जोडला । देहात्मभाव ॥७७॥ प्रारब्धाचा भोग । तो करीच सुखदुःखयोग । जोंवरी होय वियोग । शरीराचा ॥ ७८॥ ह्मणूनि त्यास उपाय। हाच कीं निर्द्वंद्व होय । कीं भोगूनि भोग नव जाय । अनुभव नित्यसत्त्वाचा ॥ ७९ ॥ बाळास लागे क्षुधा । रडे होतां दुःखबाधा । पितां मातेची स्तनसुधा । हांसों लागे ॥ ९८० ॥ मज नलगे ऐसी क्षुधा । हें न ह्मणे होतां क्षुधेची बाधा । सदा मिळो हे स्तनसुधा । स्तन पितां हेंही ह्मणेना ॥ ८१ ॥ होऊनि गेला सुखभोग । न ह्मणे पुन्हा तोचि हो योग । अथवा न हो रोग । जाला होता जो मला ॥८२ ॥ अर्जुना ऐसे परी । सुखदुःखें भोगिसी जरी । थारसी नित्यसत्त्वीं तरी । निर्द्वंद्व हो यालागीं ॥ ८३ ॥ ऐसें बाळाचे परी ॥ सुखदुःख भोगिसी जरी । अनुभव सर्वां अवसरीं । थारेल तुझा ॥ ८४ ॥ द्वंद्वीं जालासि धीर । तरी आहे शरीर । त्याच्या रक्षणार्थ भार । झणीं वाहसी चिंतेचा ॥ ८५ ॥ जे जे काळीं जें जें । देहनिर्वाहास पाहिजे । तें मेळवाया न कीजे । यत्न कांहीं अर्जुना॥८६॥ नाहीं तें मेळवावें । अगा यास योग्य ह्मणावें । मिळावें तें जतन करावें । क्षेम ह्मणावें त्यालागीं ।। ८७ ॥ दोन्हीं मिळोनि योगक्षेम । येविषयीं न करीं श्रम । कीं त्या श्रमें उपजे भ्रम । संपादितां अर्थ ॥ ८८ ॥ यत्नही केला नाहीं । आणि उगेंचि मिळालें कांहीं । जतन करावया तेंही । न करीं यत्न ॥ ८९ ॥ कीं येणार तें येईल । जाणार तें निश्चित जाईल । यत्न करितां वृथा होईल । ज्ञानहानि ॥ ९९० ॥ कीं स्वप्नदेहाची चिंता । करणें लागे जागृता । तैसी योगक्षेमवार्ता । ज्ञानियासी ॥ ९१ ॥ द्वारावीण नारळ ।

---

१ ओढणें. २ उमंबळत नाहीं. ३ देह हा आत्मा असा भाव. ४ द्वंद्वरहित. रजतमावेगळा. ५ स्तन हेंच अमृत.

अकस्मात होय सजळ । गजभुक्तकपित्थफळ । दरफेल होय हातावांचुनी ॥ ९२ ॥ होणार तें धनंजया । होईल घरीं बा निश्चया । आणि सर्वथा टाकीं या । योगक्षेमचिंतेसी ॥ ९३ ॥ इत्यादि भाव पोटीं । धरूनि ह्मणे किरीटी । चिंता न करीं देहासाठीं । होईं निर्योगक्षेम तूं ॥ ९४ ॥ करूनि बरवें मनन । वश करूनि आपुलें मन । नित्यसत्त्वीं आत्मचिंतन । करीं निस्त्रैगुण्य होउनी ॥ ९५ ॥ त्रैगुण्यविषय वेद । जाले ह्मणूनि न करीं खेद । नित्यसत्त्वीं अभेद । अनुभवीं ब्रह्मात्मतेचा ॥ ९६ ॥ तें वेदाचें वेदपण । कीं त्रिगुणांसहित आपण । मागें सरोनि निर्गुण । दाविती याच्या सत्त्वासी ॥ ९७ ॥ जैसी लेकीस माता । नेउनी एकांतीं कांता । तूं ह्मणे भोगीं मी आतां । एथूनि मागें परतत्ये ॥ ९८ ॥ तैसें गुरुमुखें वेद । निरसूनि जडउपाधिभेद । अनुभवितां ब्रह्मीं अभेद । परतती मागें ॥ ९९ ॥ तरीच ह्मणावे वेद । कीं वेद विती अकळ भेद । तूं हा नको करूं खेद । कीं त्रैगुण्यविषयक कां जाले ॥१०००॥ आतां कळलें ब्रह्म केवळ । तथापि वेदोक्त फळ । तें तों न घडे हे तळमळ । टाकीं ह्मणतो या श्लोकीं ॥ १॥

॥ श्लोक ॥ यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ अर्जुना एक मोठें तळें । त्याभोंवतीं नाना जळें । तीं आश्रयेंच त्याच्या सकळें । नाना रूपें पाझरती ॥ २ ॥ वापी कूप विहिरे । सर्वत्र तेंचि पाणी पाझरे । ब्रह्मसुखाश्रयें अरे । विषयसुखें हीं अवघींच ॥ ३ ॥ परी जळ तळ्याचें पुष्कळ । पूर्ण करी काम सकळ । तैसा ब्रह्मानंद केवळ । पूर्ण करी मनोरथ ॥ ४ ॥ विहिरींत एका पादपाणी । धुतां होतें गढुळ पाणी । गोड कूपाचें गोडवणी । न करवे स्नान त्यामाजी ॥ ५ ॥ वापींत केलें स्नान । परी न करवे वस्त्रक्षालन । न पाजवे वापींचें जीवन । तृषितां गाईस आपल्या ॥ ६ ॥ इत्यादि कार्यें सकळ । तळ्यामध्यें होती सफळ । अक्षोभ्य ज्यांतील जळ । ऐसा ब्रह्मानंद हा ॥ ७ ॥ विहिरी वापी कूपजळ । तैसे स्वर्गादि विषय सकळ । जें जें जेथें सुखफळ । ब्रह्मानंदीं सर्व तें ॥ ८ ॥

१ हत्तीनें गिळलेलें कवीट. २ गररहित. ३ मिळवून ( योगक्षेमासाठीं ) जतन करून ठेवणें याविषयीं काळजी. ४ ब्रह्म आणि आत्मा यांचें ऐक्य. ५ हातपाय. ६ विहीर. ७ धुणें. ८ तान्हेल्या.

अनंतानंत वेद । अनंतानंत सुखभेद । ते सर्वही जेथें अभेद । अनुभवी ज्ञाता ब्राह्मण ।। ९ ।। ब्रह्मनिष्ठ जो कोणी जाला । तोचि ब्राह्मण बोलिला । ज्या ज्ञानियास अनुभवा आला । ब्रह्मानंद ।।१०१०।। नाना क्षुद्रें जळें । जे जे साधिती क्षुद्र फळें । कार्ये घडती सकळें । जळीं खोल एकाची ।। ११ ।। नाना क्षुद्र कामना । सिद्ध होतां जें सुख जना । तें अनुभवितां एका निरंजना । सकळ सुखें ब्रह्मनिष्ठातें ।। १२ ।। कीं हीं सुखें सकळ । ब्रह्मसुखेंचि गा केवळ । थोरा तळ्याभोंवतीं जळ- । पाझर तयाच उदकाचे ।। १३ ।। टाकितां क्षुद्र उदकें । सर्व घडे महाजळें एकें । तैसीं ब्रह्मानंदीं सुखें अनेकें । श्रुति ह्मणती ।।१४।। ।। श्रुति ।। सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान् कामान् सह ब्रह्मणा विपश्चितेति ।। श्रुत्यर्थ ।। सत्यज्ञानादि ब्रह्मलक्षण । श्रुति दावी अर्थ विस्तीर्ण । वर्णिजे तो याकारण । जो अर्थ उपयोगी प्रस्तुत ।। १५ ।। कीं जो जाणे ऐसें ब्रह्म । जो बुद्धिगुहेंत आहे परम । तो भोगितो सर्वकाम । एकसरीं ।। १६ ।। भोगितो सर्व कामातें । तरी काय विषयभोग तयातें । ऐसी शंका जनातें । ह्मणीं होय ।। १७ ।। याकारणें श्रुतिही हे । सह ह्मणोनि ह्मणता-हे । सहपदाचा अर्थ पाहे । शंका हरे तयाची ।। १८ ।। सह ह्मणजे सांगातें । एकेच काळीं सकळ कामातें । तो भोगितो तेव्हां विषयांतें । भोगणें ऐसें कैसें घडे ।। १९ ।। खातो जेव्हां आम्रफळ । भक्षितो तेव्हांच गूळ । करूनि भक्षितां उभय फळ । उभयविलक्षण स्वाद तो ।। १०२०।। जे गोडी गुळीं । ते नाहीं केळीं । दोनी कालवितां निजी वेगळी । ते गोडी नसे दोहींस ।। २१ ।। एकेच वेळे सकळ । भोग घडणें बाष्कळ । अनुभवितां ब्रह्म पुष्कळ । सकळ सुखें त्या तृप्तींत ।। २२ ।। विषयसुखीं नाहीं तृप्ती । सुख ह्मणतां दुःखप्राप्ती । ब्रह्मानंदीं समाप्ती । अवघिया कामाची ।। २३ ।। एक पावला फळ । तो दुसरियाकारणें तळमळ । हे न आढळे हळहळ । ब्रह्मानंदीं ।। २४ ।। ज्या फळसुखाची प्राप्ती । त्याची दिसे पुढें समाप्ती । हें न आढळे ज्यांस तृप्ती । ब्रह्मानंदीं ।। २५ ।। याकारणें अर्जुना । टाकीं सकळ कामना । निस्त्रैगुण्य होऊनि मना । करीं एकाग्र या सुखीं ।।३६।। आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक ।

---

१ भंग ज्याला नाहीं. २ ईश्वरास. ३ सर्वसुखें. ४ एके समयींच. ५ आंबा. ६ तिसरी.

धरोत हृदयीं भावार्थे ॥ २७ ॥ वेद त्रैगुण्यविषय । तूं निस्त्रैगुण्य होय । या श्रवणें करील निश्चय । कर्मत्यागीं अर्जुन ॥ २८ ॥ वेदोक्त सुखाच्या कोटी । आटल्या ब्रह्मसुखाच्या पोटीं । या गोष्टीनें लाळ घोटीं । त्या सुखातें अर्जुना ॥ २९ ॥ मनीं ह्मणे मीं अधिकारी । ब्रह्मसुखाचा आहें तरी । मज ह्मणतो हा श्रीहरी । कीं निस्त्रैगुण्य होईं तूं ॥१०३०॥ तरी मीं टाकोनि कर्म । अनुभवीन जाणोनि ब्रह्म । एथें मला कळलें वर्म । कीं मज नसे कर्मी अधिकार ॥ ३१ ॥ जाणोनि भाव श्रीहरी । ह्मणों पाहतो कीं जरी । निष्कामकर्मे करिसी तरी । निस्त्रैगुण्य होसील ॥ ३२ ॥ जाणेन जो ह्मणे ब्रह्म । तोचि करावया निष्कामकर्म । अधिकारी ऐसें वर्म । बोले श्रीकृष्ण या श्लोकीं ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

॥ टीका ॥ पावेन ह्मणसी निराकार । यालागीं कर्माच तुज अधिकार । आणि कर्मफळसंस्कार । नसे अधिकार तुज एथें ॥ ३४ ॥ नाना कर्मी नाना फळें । परी कितीएक फळें जीं अढळें । तीं काम्यें करितां सकळें । न सोडिती ॥ ३५ ॥ जन्मकर्मफलप्रदा । सर्वक्रिया सर्वदा । हें मागेंही एकदां । बोलिलों तूतें ॥ ३६ ॥ यालागीं कर्माचें फळ । जें जन्ममरण अढळ । त्याचा हेतु तूं कुशळ । ह्मणी होसी ॥३७ ॥ मनीं धरिसी कामना । तेव्हां तुझा तूंचि अर्जुना । होसी हेतु जन्मनिधना । आपणातें आपण ॥ ३८ ॥ सांगकर्मे उक्त फळ । सांग नव्हतां कर्म विफळ । परी जन्ममरण अढळ । फळ सकळ काम्यकर्माचें ॥ ३९ ॥ या कर्मफळाचा हेतू । ह्मणतो ह्मणी होसील तूं । सर्वथा फळें नको चिंतूं । कर्मेचि करीं ॥१०४०॥ कर्मेचि ह्मणसी न करीं । ज्याचें अढळ फळ ऐसें परी । कर्मत्यागार्थ ऐसा अंतरीं । धरिसी ह्मणीं तूं संग ॥ ४१ ॥ समुद्र बुडवी खरा । तथापि जाती द्वीपांतरा । धनें मेळवूनि येती घरा । दृढनौकाआश्रयें ॥ ४२॥ कर्मे करितां जन्ममरण । तथापि निष्कामपण । भवसमुद्रीं तारूं जाण । पाववी ब्रह्मात्मतेसी ॥४३॥ राजसेवेविण । लभ्य नव्हे थोरपण । तेथें जे घातक गुण । ते तारेकर्यादि टाकावे ॥ ४४ ॥ हे गोष्टी आइकतां । भिऊनि आपल्या घाता । राजसेवाच टाकितां । पदप्राप्ति न घडे ॥४५ ॥ अर्जुना याकारणें । अगत्य

१ जन्ममरणास. २ चोरटेपणादि. ३ पदवीची प्राप्ति.

निष्कामकर्म करणें । कर्म न करीं ऐसा न धरणें । हृदयीं संग ॥४६॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । तें निमित्त आणि विवेक । परिसा निष्कामकर्माचा ॥४७॥ हो न हो काम्यफळ । परी जन्ममरणफळ अढळ । या गोष्टीनें तळमळ । सुटली आणीक अर्जुना ॥४८॥ कीं हो न हो काम्यफळ । जन्ममरण जेव्हां अढळ । तेव्हां कांहीं फळाचें मूळ । निष्कामींही असों-ये ॥४९॥ कीं धरितां काम । कर्म होय सकाम । टाकितां काम निष्काम । तेंचि होय ॥ १०५० ॥ तेव्हां सकामनिष्कामपण । दोनी कर्मकर्त्याचे गुण । तथापि आपला गुण आपण । कर्मही निश्चित दाखवी ॥ ५१ ॥ कर्मी स्वतःसिद्ध शक्ती । नसतां फळाची आसक्ती । धरितांही फळ नव्हे युक्तीं । प्रत्यक्षसिद्ध हें दिसतसे ॥ ५२ ॥ आंगास उष्ण लागो जळ । ह्मणतांही लागे सीतळ । कीं द्यावया उष्णत्वफळ । शक्ति जळीं असेना ॥ ५३ ॥ शक्ति धरी तें जळ । आंगास लागे सीतळ । नको ह्मणतांही अढळ । तें फळ प्राप्तचि होणार ॥ ५४ ॥ न ये जे शक्ति नाहीं । न जाय आहे ते शक्ति कांहीं । ऐसेंचि वाटे कर्मही । अर्जुन ह्मणे ॥ ५५ ॥ कीं कर्मी जे नसेल शक्ती । ते न ये धरिली जरी आसक्ती । तेव्हां धरितांही विरक्ती । नको ह्मणतांही फळ होय ॥ ५६ ॥ अरे विषा होईं भला । आणि मारूं नको मला । ऐसें ह्मणोनि भक्षी त्याला । तरी मारीच विष तें ॥ ५७ ॥ अमृत पितां नर । ह्मणे मज करूं नको अमर[1] । तरी तें अजर[2] अमर । करीच कीं ॥ ५८ ॥ कर्ता निष्काम जाला । परी कर्म गोंवीच त्याला । या गुणें कर्मास आला । दोष मोठा ॥ ५९ ॥ याकारणें कर्मजाळ । सकाम निष्कामही फटकाळ । हृदयसंदेह विशाळ । सर्वसाक्षी समजला ॥१०६०॥ धन्य अर्जुन सभाग्य । कीं विचार केला यथायोग्य । हें नेणती अभाग्य । अभक्त निष्कामही करणारे ॥ ६१ ॥ कर्म न अर्पितां ईश्वरीं । तें अवश्य आपला गुण करी । जन्ममरण हें तरी । अढळचि कीं ॥ ६२ ॥ आजन्म[3] निष्कामकर्मी[4] । आणि न अर्पी सगुणब्रह्मीं । त्यास पितृलोक शब्दब्रह्मीं[5] । वेदीं बोले हे श्रुती ॥ ६३ ॥ ॥ श्रुति ॥ कर्मणा पितृलोकः ॥ श्रुत्यर्थ ॥ कर्में पितृलोक । हा श्रुतीचा बोल एक । त्यास कर्म अमुक । न ह्मणे कांहीं ॥ ६४ ॥ कीं ज्या कर्मी जो काम । तें त्याचें फळ हाचि नेम । पितृलोक फळ बोले

---

१ मृत्युरहित. २ जरेवेगळा. ३ जन्मापासून. ४ निष्काम कर्म करणारा. ५ वेदांत.

निगम । अनार्पित निष्कामकर्मांचें ॥ ६५ ॥ कर्म अर्पितां ईश्वरीं । फळरूपें बंध तें न करी । हें नेणोनि अंतरीं । अर्जुनें शंका मानिली ॥ ६६ ॥ हा भाव उत्तमश्लोक । समजोनि याचा विवेक । बोलावया हा श्लोक । स्वमुखें आत्तां बोलतो ॥ ६७ ॥

॥ श्लोक ॥ योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥

॥ टीका ॥ मनीं ईश्वराचे चरण । सर्वभावें त्यास शरण । जें ऐसें अंतःकरण । योग ह्मणावें त्याला ॥ ६८ ॥ राहोनि योगीं तया । कर्में करीं गा धनंजया । कर्म करितां प्रकारें या । बंधक नव्हे तें कर्म ॥ ६९ ॥ भाव ऐसा एथें । कीं ईश्वरीं चित्त जेथें । तो योग कर्म तेथें । राहोनि करितां बंध नव्हे ॥ १०७० ॥ ज्या चित्तें कर्म घडे । तें चित्त ज्या चरणीं जडे । सहजचि अर्पण घडे । त्या चरणीं त्या कर्मांचें ॥ ७१ ॥ धान्य पात्राअंतरीं । तें ठेवितां वैश्वानरीं । धान्य भाजे त्यावरी । पेरितांही तें न उगवेचि ॥ ७२ ॥ कर्मशक्ति बंध करी । सर्वथा हे तों गोष्टी खरी । ईश्वरचरणीं अर्पिजे तरी । बंध करूं ते शकेना ॥ ७३ ॥ बचनाग विष मारी । तो देतां वैद्याचे करीं । त्याचा तो रस करी । ज्या रसें आरोग्य देहासी ॥७४॥ विष्णूस अर्पिलें कर्म । तें बंध सर्वथा न करी हें वर्म । बोलेल सगुणब्रह्म । अध्याय यापुढें तयांत ॥ ७५ ॥ त्याही स्थळीं हरी । ह्मणेल कीं तेंही जरी । निष्काम अर्पिजे तरी । बंधक नव्हे ॥ ७६॥ ॥ तृतीयाध्याय श्लोक ॥ यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः । तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ टीका ॥ " यज्ञो वै विष्णु " ऐसी श्रुती । त्याकारणें कर्म करिती । यावेगळीं बंधकें होती । कर्में समस्त लोकांसी ॥ ७७ ॥ कर्म त्याहीकारणें । फळसंग टाकूनि करणें । इत्यादि याचें विवरण । होणार पुढें ॥ ७८ ॥ एथें त्या भावें हरी । ह्मणे योगस्थ कर्में करीं । योग तो कीं चित्त जरी । चरणीं लागे ईश्वराच्या ॥ ७९ ॥ ईश्वरीं अर्पितां चित्त । त्या चित्तीं कर्मवित्त । तें अर्पिलें होय निश्चित । हा भाव ॥ १०८० ॥ लौकिक आणि वेदोक्त । कर्म अवघें ईश्वरार्पित । करावें हें पुढें अच्युत । नवमाध्यायीं वर्णील ॥ ८१ ॥ हा अध्याय दुसरा । सकळ गीतार्थ एकसरां ।

---

१ कृष्ण. २ सगळ्या गीतेचा अर्थ. ३ एकसारिखा.

संक्षेपें एथें गुरुवरा । बोलणें असे गूढार्थें ॥ ८२ ॥ एवं या श्लोकीं प्रथम चरणीं । ह्मणे "योगस्थःकुरु कर्माणि" । दुसरिया चरणीं चक्रपाणी । येविषयीं आणीक बोलतो ॥ ८३ ॥ ईश्वराचे चरणीं चित्त । अर्पितां कर्महीं अर्पित । तरी होय जरी निश्चित । संग नसे फळाचा ॥ ८४ ॥ देउनी संचितार्थ । विकत मागे पदार्थ । तरी तो मानी किमर्थ । आपणास दिधलें ह्मणोनी ॥ ८५ ॥ फलसंग कर्मी निश्चित । आणि करी ईश्वरार्पित । होय तें तों निमित्त । जन्ममरणासी ॥ ८६ ॥ याकारणें धनंजया । फळाचा संग टाकूनिया । योगस्थ करीं गा तूं या । कर्मयोगातें ॥ ८७ ॥ आतां फलेच्छारहित । कर्मी प्रवर्त्तेच ना चित्त । हे गोष्टी तों निश्चित । परी उपायें ऐशा प्रवर्ते ॥ ८८ ॥ कीं योगस्थ कर्म करणें । ह्मणजे ईश्वरीं तें अर्पिणें । चित्तशुद्धीनें पावणें । ब्रह्मानंदासी ॥८९॥ बुद्धीस हा लाभ कळे । तरी उघडती विवेकाचे डोळे । मग अनायासें वळे । निष्कामकर्मी ॥ १०९० ॥ तेव्हां वेदोक्त स्वर्गादि सिद्धी । ईश्वरीं अर्पितां त्याच्या असिद्धी । दोनी समान मानी बुद्धी । निष्कामकर्मी जे प्रवर्ते ॥ ९१ ॥ या भावें ह्मणे हरी । सिद्ध्यसिद्धींत तूं याउपरी । सम होऊनियां करीं । निष्काम कर्मे ॥ ९२ ॥ सम जालियाचें फळ । कीं ईश्वरीं चित्त अचळ । राहे तेव्हां पावे अढळ । ब्रह्मानंद पूर्वोक्त ॥ ९३ ॥ याकारणें समत्व । तोचि योग हें तत्त्व । नुरे कर्मास कर्मत्व । जया योगीं ॥ ९४ ॥ चित्त अर्पूनि ईश्वरीं । तया योगीं कर्म करी । तें बंधक नव्हे परी । तो योग ह्मणे जरी हें समत्व ॥ ९५॥ अपेक्षितां कर्मसिद्धी । न थारे ईश्वरीं बुद्धी । निष्कामीं देखे असिद्धी । तरी काम्यकर्म करूं लागे ॥ ९६ ॥ यालागीं उभय सम । त्यास साधे योग उत्तम । याकारणें योग नाम । प्राप्त जालें समत्वासी ॥ ९७ ॥ मुख्य तो तोचि योग । कीं ईश्वरीं चित्तसंयोग । या समत्वें नव्हे वियोग । चित्तास ईशचरणाचा ॥ ९८ ॥ यालागीं हें समत्व । योग ह्मणावें हें तत्त्व । मुख्य योगाचें योगत्व । कीं चित्त लागे ईश्वरीं ॥ ९९ ॥ चित्तास योग ईश्वरीं । त्या योगीं जो कर्म करी । त्यास तें बंध यापरी । कर्म निष्कामही करीना ॥ ११०० ॥ अन्यथा जैसें सकाम । तैसेंचि बंधक कर्म निष्काम । हें पुढें मेघश्याम । विशदही बोलेल

---

१ समानपणास.

॥ १ ॥ आतां यापुढें उत्तमश्लोक । यालागीं बोले हे दोनि श्लोक । कीं अर्जुनासि कर्मचि एक । मुख्यत्वें वाटलें ॥ २ ॥ कर्मप्रशंसा फार । आइकिली वारंवार । ब्रह्म जाणावें हा निर्धार । विसरला ॥ ३ ॥ ह्मणुनी ज्ञानाचा बडिवार । कर्म नीच त्याहूनि फार । काम्यकर्म तों निपट निःसार । ऐसें बोलतो या श्लोकीं ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥

॥ टीका ॥ बुद्धिचैतन्ययोग[1] । यासि ह्मणावें बुद्धियोग । बोलिलों हा तो कर्मयोग । नीच त्याहूनि बहु फार ॥ ५ ॥ अगा याचिकारणें । तें चैतन्य तुवां विचारणें ॥ तुज रक्षणार तें आत्मपणें । धनंजया ॥ ६ ॥ तें बुद्धीच माजी आहे । परी अगा धुंडूनि पाहें । ह्मणसी लोक कां हे । न विचारिती तयासी ॥ ७ ॥ तरी हे जाले दीन । काम्यकर्मफळभोगाधीन । नेत्र असोनि नेत्रहीन । जाले फळभोगहेतूनें ॥ ८ ॥ परी तूं तसा नको होऊं । कर्मीच वायां नको जाऊं । ज्ञानमार्ग नको गमावूं । भाव हा ॥ ९ ॥ थोर अगा बुद्धियोग । बहुत नीच कर्मयोग । काम्यकर्मफळभोग । हा तों तुच्छ अत्यंत ॥ ११९० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । याचें निमित्त पुण्यश्लोक । आइकोत ॥ ११ ॥ आतां ह्मणसी निष्कामधर्मे । ईश्वरीं अर्पितां कर्म । कर्मबंध तुटेल कां ब्रह्म । वळखों सांगतां ॥ १२ ॥ तरी ईश्वरास अर्पणें कर्म । तें न साहे काम्यधर्म । ऐसा जेथें असेल नेम । कैंची वार्ता पापकर्म अर्पायाची ॥ १३ ॥ वेदोक्तकर्म लौकिककर्म । भगवदर्पणीं भागवतधर्म । परी जरी नसे कामना हें वर्म । भगवदर्पणाचें ॥ १४ ॥ सकाम अर्पणें न सोसे । त्यास पापकर्म अर्पितो कैसें । सर्वकर्मार्पणीं ऐसे । हे गूढ भाव ॥ १५ ॥ पापफळ लोखंडबेडी । पुण्य सुवर्णशृंखलाजोडी[2] । ते हे शृंखला मात्र न घडी । पुण्य अर्पितां हरिपदीं ॥ १६ ॥ आणि त्या भगवदर्पणाहोनि पहिलें । जें पापकर्म असेल जालें । आणि जन्मांतरीं[3] असेल सांचलें । तें न नासे विना ज्ञानें ॥ १७ ॥ तैसेंचि नानाजन्मकृत । जें पुण्यही संचित । तेंही ज्ञानें नासे निश्चित । ब्रह्म वळखावें यालागीं ॥ १८ ॥ तें नित्य निष्काम अर्पितां हरी । संतुष्ट होऊनि लौकरी । ज्ञान देऊनि संहरी । पुण्य पाप सकळही ॥ १९ ॥ एवं जन्मजन्मांतरकृतें । पुण्यें पापें समस्तें ।

१ बुद्धीचा आणि चैतन्याचा संयोग. २ सांखळ. ३ मागल्या जन्मीं.

ज्ञानेंचि नासती या निमित्तें । ज्ञान थोर म्हणतो या श्लोकीं ॥ ११२० ॥

॥ श्लोक ॥ बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।

॥ टीका ॥ बुद्धीकरूनि युक्त । तो द्विविधही कर्मसंचित । पापपुण्यें दोनी निश्चित । नाशितो जितांचि इहलोकीं ॥ २१ ॥ बुद्धियुक्त म्हणजे । स्वयें ज्या बुद्धीस प्रकाशिजे । जीकरितां आपणास अनुभविजे । तीकरूनि युक्त तो ऐसा ॥ २२ ॥ दृष्टांत लोणीं असे । परी मथन करितांचि दिसे । बुद्धीस अनुभवीं गवसे । जड चैतन्य निवडितां ॥ २३ ॥ काष्ठादियोगाविना । नुसता अग्नि जैसा दिसेना । सत्त्वोविणें अनुभवा येना । आत्मा आपला आपणा ॥ २४ ॥ काष्ठांत अग्नि असे । मथन करितां प्रगट दिसे । बुद्धीस अनुभवीं गवसे । जड चैतन्य निवडितां ॥ २५ ॥ मथन केल्याविना । तो त्या काष्ठास जाळीना । न जाळितां काष्ठ तो दिसेना । जाळितां दिसे काष्ठयुक्त ॥ २६ ॥ बुद्धींत आत्मा असे । तो ते बुद्धीतेंचि न दिसे । दिसे तेव्हां जळतसे । कर्मासहित ते बुद्धी ॥ २७ ॥ बुद्धींत कर्माची राहणी । तरीच वुद्धि कर्मानुसारिणी । स्वप्नसृष्टीची खाणी । जे रीतीं ॥ २८ ॥ जागृतींत नाना प्रकार । बुद्धींत जडती संस्कार । स्वप्नीं कल्पी ते ते प्रकार । यथायोग्य अथवा विपरीत ॥ २९ ॥ चित्त बुद्धि मन अहंकार । एका सत्त्वाचे प्रकार । या चौंचेच स्वप्नविकार । भेद नसे या चौंसी ॥ ११३० ॥ प्रस्तुतीं बुद्धियुक्त । ज्ञानियास म्हणे भगवंत । ज्यालागीं कर्माचें संचित । स्वप्नदृष्टांतें बुद्धिमाजी ॥ ३१ ॥ स्वप्नसृष्टि करणार । तो बुद्धीमधील संस्कार । जागृतींत न दिसे तैसा विस्तार । तीमधील न दिसे कर्माचा ॥ ३२ ॥ स्वप्नप्रपंच जाला । तो तीचमाजी होता ठेविला । तैसा कर्मभोग आपला । न दिसोनि निघे बुद्धींतुनी ॥ ३३ ॥ बुद्धिसाक्षी ईश्वर । तेथेंच कर्माचा प्रसर । जीवास पडला विसर । परमात्मालेश विसरेना ॥ ३४ ॥ पूर्वीं अनेक जन्म । सांचलें तें संचितकर्म । कांहीं धर्म कांहीं अधर्म । जें सुकृत दुष्कृत म्हणवी ॥ ३५ ॥ प्रस्तुत मनुष्यजन्म । या जन्मीं जें होतें कर्म । तें क्रियमाण धर्माधर्म । देहीं देह पडिजे तों असे ॥ ३६ ॥ टाकूनि एक घर । दुजे गृहांत जातां नर । खांदीं घेऊनि परिकर । त्या घरींचा ने

---

१ सत्त्वगुणावांचून. २ वास्तव्य. ३ पापपुण्याचा सांठा, सांचलेलें कर्माचें फल. ४ प्रस्तुत जन्मीं केलेलें कर्म. ५ जिदगी.

जसा ॥ ३७ ॥ तैसें देह सोडिजे तोंवरी । क्रियमाण असे देहाचवरी । प्रायश्चित्त तरी हरी । देह धुतां पापमळ देहाचा ॥ ३८ ॥ ऐसें क्रियमाण नूतन । आणि संचित पुरातन । होतां देहावसान । क्रियमाण निघे संचितीं ॥३९॥ संचितांतूनि जगज्जीवन । प्रारब्ध करी नूतन । तें एक देह जन्ममरण । तों वरी भोग तो सुखदुःखाचा ॥११४०॥ स्वप्न जीवशक्तिकृत । प्रपंच ईश्वरशक्तिरचित । प्रपंचफळ भोगणें निश्चित । प्रारब्धकर्में ॥ ४१ ॥ तेव्हां ईश्वरशक्तिकृत । प्रारब्धफळ निश्चित । न टळे भोगिल्याविरहित । शक्ति समर्थाची ह्मणोनी ॥ ४२ ॥ ज्ञान जालें जरी । प्रतिबिंब बिंबैक्य पावे जरी । भोग प्राप्त त्या अवसरीं । प्रतिबिंबोनि बुद्धींत तो भोगी ॥ ४३ ॥ अविद्या जरी गेली । आणि विद्या जरी आली । बुद्धि असे तेचि पहिली । जीमाजी भोक्ता प्रतिबिंब ॥ ४४ ॥ तंतु कळतां पट । नाहींच जरी निपट । माती कळतां नाहीं घट । तरी पट घट दीसती ॥ ४५ ॥ सर्वगत बुद्धीस कळला । तरी प्रपंच नाहीं गेला । जों संहारकाळ नाहीं आला । असे जों असे स्थितिकाळ ॥ ४६ ॥ लटक्या काळें लटकें जग । लटक्या लोहसाधनीं लटका नग । तथापि नग न पावे भंग । मिथ्या लोहशस्त्रावांचुनी ॥४७॥सोनें साच नग असत्य । तैसीं शस्त्रें मिथ्या लोह सत्य । असत्यें असत्य घडला अनित्य । असत्यें असत्य मोडावें ॥ ४८ ॥ मिथ्या सर्प रज्जूवरी । मिथ्या भ्रमें दृष्टि करी । भ्रम जातां दृष्टि हरी । मिथ्या भुजंगा ॥ ४९ ॥ घट पट अलंकार । दृष्टी देखेच आकार । अधिष्ठान देखोनि संहार । न करूं शके परकृतांते ॥११५०॥ एवं प्रपंच कालकृत । ज्ञानियांसही दिसे निश्चित । दृष्टांतेंही उचित । बोलती श्रुतीही ऐसेंची ॥५१॥ ॥श्रुति॥ प्रपंचो यदि विद्येत निवर्तेत न संशयः । मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः ॥ श्रुत्यर्थ ॥ ज्ञान जाल्यावरी । प्रपंच दिसे जरी । काय संशय तरी । कीं तो न निवर्तेच ॥ ५२ ॥ अज्ञान दृष्टीस प्रवर्ते । सत्यत्वें प्रपंच वर्ते । ज्ञानीं पाहतां निवर्ते । माती पाहतां घट जैसा ॥ ५३ ॥ कीं मायामात्र हें द्वैत । सत्य परमार्थें अद्वैत । घटादि द्वैत मिथ्या निश्चित । परमार्थ सत्य मृत्तिका ॥ ५४ ॥ याकारणेंचि श्रुती । घटादि दृष्टांत बोलती । कीं नसोनि मिथ्या दिसती । याहीविषयीं हे श्रुती ॥५५॥ ॥श्रुति॥ यथा सोम्यैकेन० ॥श्रुत्यर्थ॥ कळतां एक मृत्पिंडगोळ । कळे सकळ मृन्मय भूगोळ । माती खरी इतर कल्लोळ ।

१ मृत्यु. २ रिघे. ३ बिंबांत मिळालें. ४ वेळीं. ५ सर्वव्यापी.

लटके जैसे समुद्राचे ॥ ५६ ॥ या श्रुतीपुढें श्रुतीं । धातूचेचि दृष्टांत बोलती । कीं अधिष्ठान कळतांही दिसती । विवर्त नाना ॥ ५७ ॥ प्रपंच जीवन्मुक्ता । दिसे प्रस्तुतीं ज्या बुद्धियुक्ता । भगवद्वाणी वर्णी कीं सुकृत-दुष्कृता । नाशितो ह्मणोनी ॥ ५८ ॥ तें सुकृतदुष्कृत । क्रियमाण आणि संचित । प्रारब्ध तिसरें जें निश्चित । भोगणें लागे ॥ ५९ ॥ परी ज्ञानी सर्वगत । भोग एके देहीं अनुगत । आणि सर्वगतास निश्चित । भोग न घडे ॥११६०॥ जडास न घडे भोग । घडे चैतन्यास जरी देहयोग । तेव्हां प्रतिबिंबदेहसंयोग । होतां भोग बोलावा ॥ ६१ ॥ तरी अविद्या जातां भोग । आणि बुद्धि प्रतिबिंबयोग । न घडे कीं अविद्यावियोग । होतां प्रतिबिंब कांहींच असेना ॥ ६२ ॥ ऐसें संदेहाचें स्थळ । यालागीं हें बोलणें सकळ । कीं कळोनीही ब्रह्म केवळ । घटपटन्यायें जग दिसे ॥ ६३ ॥ भोगसाधनें असतां । प्रतिबिंबकारणीं ही असे मती । जळीं डळमळी रविबिंबाकृती । तैसा भोगीं प्रतिबिंबांश ॥ ६४ ॥ आतां प्रपंच गत्वसो । प्रतिबिंबांश भोग सोसी । परी भोग साचा नये दिसों । विद्यायुक्त बुद्धीसी ॥ ६५ ॥ भोग तों साचा दिसे । कीं सुखदुःख होतसे । ज्ञानी जालें तरी कैसे । ह्मणतील मिथ्या ॥ ६६ ॥ संशयाचा ठाव साचा । परंतु ऐसा विचार याचा । कीं भोग अज्ञानदशेचा । कर्मसंचय देतसे ॥ ६७ ॥ ज्या मापें घ्यावें । त्याच मापें उसणें द्यावें । केल्या प्रकारें भोगावें । पूर्वकर्म ॥ ६८ ॥ भोगवी समर्थ ईश्वर । भोगी प्रतिबिंब होउनी नर । तेथें बुद्धि ऐसी चतुर । ज्ञानी करी ॥ ६९ ॥ कीं कर्म करितां मी कर्ता । त्याचें फळ वाटे मी भोक्ता । कर्म साचें मानिलें तत्त्वता । भोग साचा तरी गमे ॥ ११७० ॥ हें ईशशक्तीचें बळ । कीं ज्ञानियांसही भोगवी फळ । वस्तुतः पाहतां सकळ । मिथ्या असे ॥ ७१ ॥ आतां प्रतिबिंब निरंश । करूनि बिंबीं प्रवेश । कैसा निघेल हा संदेहलेश । तोही निरासितो ॥ ७२ ॥ अति निर्मळ सत्त्व जळ । तमकर्दमीं होय गढूळ । त्यास ह्मणावें सुषुप्तिकाळ । बिंबैक्य तेव्हां प्रतिबिंबा ॥७३॥ गढूळ होतां वारी । प्रतिबिंब न दिसे ते अवसरीं । तेव्हां बिंबैक्य बोलावें कीं तरी । दिसे पुन्हा निर्मळत्वीं सत्त्वाच्या ॥ ७४ ॥ ऐसेंचि बोलती श्रुती । आणि प्रलयींही ऐक्य पावती । उपाधि होतां प्रतिबिंबती । मागुती जळीं उपाधीच्या ॥ ७५ ॥ तैसाचि तमाचा चिखल । तळीं बस-

१ तमोगुण हाच चिखल त्यांत. २ पाणी. ३ सत्वगुणाच्या.

तां सत्त्वसलिल । नितळ होतां चिज्ज्ञानुमंडळ । जागृतीं मागुतीं प्रतिबिंबे ॥ ७६ ॥ गेली जरी अविद्या । आली जरी विद्या । तथापि सत्त्वशक्ति अनाद्या । आहेचि जीवन्मुक्ताची ॥ ७७ ॥ प्रतिबिंब जाणे जरी बुद्धी । तथापि काय अज्ञानाची सिद्धी । प्रतिबिंबांशाची समृद्धी । नेणे काय परमेश्वर ॥ ७८ ॥ प्रतिबिंबासहित सृष्टी । देखेच सर्वसाक्षीची दृष्टी । ते काय अज्ञानें कष्टी । होते ह्मणावीं ॥ ७९ ॥ तैसी हेही बुद्धी । तीस तों नाहींच भोगसिद्धी । प्रतिबिंब देखतां असिद्धी । काय तिच्या ज्ञानाची ॥ ११८० ॥ एवंच दोष कांहीं । प्रारब्धभोगीं दिसत नाहीं । आतां बोलों गोष्टी तेही । जे प्रस्तुत वर्णितां राहिली ॥ ८१ ॥ कृष्ण ह्मणे बुद्धियुक्त । नासी सुकृतदुष्कृत । त्यांत प्रारब्ध भोगावें निश्चित । तें ऐसें जैसें वर्णिलें ॥ ८२ ॥ नासी सुकृता दुष्कृता । तो इहलोकीं देह जितां । सुचवी देह जिता ह्मणतां । क्षय प्रारब्धकर्माचा ॥ ८३ ॥ कीं जों प्रारब्ध सरे । तोंचि ज्ञानियाचा देह उरे । सरती भोग वाईट बरे । तें इह शब्दें सूचवी ॥ ८४ ॥ प्रारब्ध नासी भोगें । संचित क्रियमाण बुद्धियोगें । तिच्या वियोगें पुन्हा संयोगें । नासे संचित क्रियमाण ॥ ८५ ॥ काष्ठ आणि अग्नी । वेगळे करावे मथुनी । हा वियोग जाळूं लागे तेथुनी । संयोगें काष्ठास काष्ठयुक्त ॥ ८६ ॥ आत्मा बुद्धीमधुनीं । निवडावा जेव्हां मथुनी । तो वियोग जाळूं लागे तेथुनी । योग बुद्धीस तो पुरुषबुद्धिसंयुक्त ॥ ८७ ॥ बुद्धींत कर्म राहे । स्वप्नहेतु संस्कार जैसा आहे । बुद्धियुक्त आपणा आपण पाहे । तों तों नासे पूर्वकर्म ॥ ८८ ॥ एवं बुद्धियुक्त दोनी । सुकृत दुष्कृत नासी ह्मणोनी । ज्ञान थोर कर्माहुनी । धनंजया ॥ ८९ ॥ जरी अर्पिलें ईश्वरीं । तें हेमबेडी न वडी परी । पापें आणि पूर्वसुकृतें नासती तरी । जरी दे ज्ञान तो ईश ॥ ११९० ॥ तथापि कर्मचि करावें । तें निष्काम ईश्वरास अर्पावें । तो ज्ञान दे यालागीं भावें । कर्म करीं ह्मणे उत्तरार्धी ॥ ९१ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

॥ टीका ॥ तस्मात् त्याकारणें अगा । ह्मणजे ज्ञानाकारणें कर्मयोगा । करीं तेणें जडवियोगा । बुद्धियोगा पावसी ॥ ९२ ॥ कर्मयोग तो ऐसे रीती । त्याची सांगतों गुह्यस्थिती । कीं कुशलता करी सुमती । कर्मे करि-

---

१ ज्ञानसूर्याचें मंडळ. २ बुद्धीचा आत्म्याशीं संयोग.

तां त्यामाजी ॥ ९३ ॥ निश्चित बंध कळे जेथें । तो बंधीं पडेना तेथें । तो कुशल प्रस्तुतीं एथें । कुशलता ऐसीच ॥९४॥ कर्म केल्याविण । राहे ऐसा आहे कवण । त्या बंधीं न सांपडे आपण । ते कुशलाची कुशळता ॥ ९५ ॥ एक काम्य एक नित्य । नित्यकर्म करावें अगत्य । कां राजाज्ञा सत्य । नरक न करितां नित्यकर्म ॥ ९६ ॥ काम्यकर्में राजमळा । जो विकत घेतो ज्या फळा । तें देती न घेतां गळा । कोणीं न बांधे ॥९७॥ परी तें खातां फळ । वासना रोग होतो प्रबळ । क्रियाधनें तळमळ । कां दाटुनी साधावी ॥९८॥ ईश्वर राजा सार्वभौम । त्याचें हे इंद्रियग्राम । क्षेत्रें शरिरें शेतें सकाम । क्षेत्रज्ञ कृषि करणारे ॥ ९९ ॥ देह क्षेत्रीं शेतकरी । तो राजद्रव्य नेदी जरी । यमधर्म नेऊनि मारी । दंडधर सार्वभौमाचा ॥ १००० ॥ आणि जो नीं नित्यकर्में । करी वर्णाश्रमोचित धर्में । त्यास पितृलोक यमधर्में । देइजेतो सुखार्थ ॥ १ ॥ त्यास आज्ञा पारमेश्वरी । कां दोनी सफळ या दोंपरी । त्यास वेद ऋषि अधिकारी । दोनी सूचना करावया ॥ २ ॥ हे राजयाची आज्ञा । ठाउकी वेदा ऋषिसर्वज्ञा । ह्मणुनी नित्यकर्में सर्वां क्षेत्रज्ञां । अवश्य करा ते ह्मणती ॥ ३ ॥ नित्यकर्में चुके दुःख । न होय नरक होय पितृलोकसुख । परी येणें न चुके आणिक । यावें गर्भवासनरकातें ॥ ४ ॥ एवं काम्यकर्म हे कनकबेडी । नित्यकर्महीं तैसी घडी । तेव्हां काय विशेष जोडी । नित्यकर्में करूनिही ॥ ५ ॥ एवं नव्हे बंधन । ईश्वरीं अर्पितां कर्मधन । परी काम्य मानी जगज्जीवन । मोल स्वर्गादि फळभोगाचें ॥ ६ ॥ न करितांही कामना । पितृलोक नित्यकर्में जना । तें तो प्रजासन्माना । कारण वस्त्र तांबुल ॥ ७ ॥ तें नित्यकर्म धन । यमधर्मादि अधिकारी जन । पावले देखोनि तांबुल वसन । पितृलोक देती प्रजांसी ॥ ८॥ जो पावे राजापासीं । मोक्ष प्राप्त होय त्यासी । परी नित्यकर्म राजधनासी । न देतां दंडी यमधर्म ॥ ९ ॥ दंड होत असतां । नये राजापासीं जातां । तें सहज रीती फेडितां । ओढोनि नेती पितृलोका ॥ १०१० ॥ याकारणें राजधन । नित्यकर्में जो जन । राजचरणींच अर्पूनि मन । राजसन्मानींही न ठेवीं ॥ ११ ॥ तुझ्या सेवेविना । न घें कांहीं जगज्जीवना । ऐसें ह्मणतां करुणाघना । कर्मार्पणीं कृपा उपजेच ॥ १२ ॥ होतां ईश्वराची दया । पाहें

१ कर्म हेंच द्रव्य त्यानें. २ जाति आणि आश्रमाला योग्य अशा धर्मानें. ३ परमेश्वराची.

न शकती कोणीं तया । नरक पितृलोक भोगावया । नव जाय हे गोष्टी ते किती ॥ १३ ॥ गुरुरूपें परमेश्वर । भेटतां पुन्हा गर्भकुहर । स्वप्नीं न दिसे चराचर । तरंग त्याचे तो सिंधू ॥ १४ ॥ जो प्रस्तुतीं बुद्धियुक्त । पूर्वार्द्धीं वर्णिला जीवन्मुक्त । तदर्थ ह्मणतो नित्यमुक्त । कर्म करीं या कुशलतेनें ॥ १५ ॥ अज्ञानाची विषेलता । ज्ञानें छेदावया हे कुशलता । कर्मी करावी ऐसें बोलता । जाला श्रीकृष्ण या भावें ॥ १६ ॥ सकळही बुद्धियुक्त । ऐसेच होती मुक्त । ह्मणुनी बोलतो नित्यमुक्त । या श्लोकीं या भावें श्रीकृष्ण ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥ कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥ ५१ ॥

॥ टीका ॥ नित्यकर्मे करितांही । फळ होतें जें कांहीं । तें ईश्वरार्पणें होत नाहीं । कृपा होते तयाची ॥ १८ ॥ तें ईश्वरार्पणें कर्मफळ । टाकूनि बुद्धिमंत विमळ । बुद्धियुक्त होती केवळ । ते परमपदातें पावती ॥ १९ ॥ पुनरावृत्ति चिंतामय । रोग त्यास ह्मणजे आमय । तो नसे ऐसें अनामय । ते पदा पावती बुद्धियुक्त ॥ १२२० ॥ न अर्पितां नित्यकर्म । बंध करी हें गूढ वर्म । तृतीयाध्यायीं सगुणब्रह्म । विशद बोलेल ॥ २१ ॥ त्यावरूनि एथें अर्थ । वाखाणिला तो समर्थ । कीं निष्कामही होय व्यर्थ । काम्यासमान ईश्वरीं न अर्पितां ॥ २२ ॥ कर्मज ह्मणजे कर्मफळ । टाकूनि पावती पद केवळ । हें या श्लोकीं बोले घननीळ । हेंच सिद्ध करावया ॥ २३ ॥ काम्य कर्मे करूनी । त्याचें फळ टाकुनी । पद ते पावती ह्मणोनी । ह्मणतां नये ॥ २४ ॥ काम्यकर्मेचि समूळ । टाकावीं जेव्हां सकळ । तो संन्यास हें मेघनीळ । वचनांबु वर्षेल अष्टादशीं ॥ २५ ॥ ॥ अष्टादशाध्यायश्लोक ॥ काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः । सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ टीका ॥ काम्यकर्मत्यागास । ज्ञाते बोलती संन्यास । आणि त्याग ह्मणती तयास । कीं सकळ कर्मफलें टाकिजे ॥ २६ ॥ हे दोंपरीचे त्याग । एक कर्मचि एक कर्मफलसंयोग । कर्मचि टाकावें त्यातें श्रीरंग । काम्य ह्मणे अति स्पष्ट ॥ २७ ॥ आतां सर्वकर्मफलत्याग । तो त्याग निष्कामफलसंयोग । अष्टादशीं हा श्रीरंग । विशद अर्थही बोलेल ॥ २८ ॥ नि-

१ गुहा. २ विषाची वेल. ३ मलरहित. ४ मुक्तीस. ५ पुनः जन्मास येणें. ६ रोग, व्याधि. ७ रोगरहित. ८, ९ वाणीचा पाऊस.

त्य निष्कामफलत्याग । नव्हे विनाकृष्णार्पणयोग । हें तृतीयाध्यायीं अव्यंग । स्वयें श्रीरंग बोलेल ॥ २९ ॥ कर्मज फळ टाकुनी । परमपदा पावती म्ह-णोनी । प्रस्तुत श्लोकीं या वचनीं । नित्यकर्मफलत्याग सूचवी ॥ १२३० ॥ कीं कर्में तरी करिती । फळें तरी टाकिती । ते परमपदा पावती । बुद्धि-युक्त ॥ ३१ ॥ तेव्हां काम्यें टाकिलीं । नित्यकर्मेंचि आरंभिलीं । फळें त्यांचींही त्यजिलीं । ईश्वरार्पणें ॥ ३२ ॥ एवं अवघे अध्याय अठरा । जेथें जेथें कर्मकांडपसारा । बंध नाहीं म्हणतां ईश्वरा । अर्पितां मोक्षहेतु जाणावें ॥ ३३ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त मुमुक्षुलोक । अवलोकोत यापरी ॥ ३४ ॥ एक अनादि वासना । दुसरी भोगकामना । उभय-लक्षणें मना । सज्जनीं आणावीं ॥ ३५ ॥ अन्न मागे क्षुधाक्रांत । त्यास पुसावें कीं अमृत । अपेक्षितें कीं नाहीं चित्त । तो म्हणेल नाहीं म्हणोनी ॥ ३६ ॥ तें असाध्य म्हणोनी मन । न करी अमृताचें चिंतन । साध्य यत्नें भोजन । साध्य, त्याची अपेक्षा ॥ ३७ ॥ सांपडे जरी अमृत । पिऊं लागे निश्चित । असाध्य म्हणोनि उचित । यत्न करी अन्ना-चा । ३८ ॥ साध्य अन्नाची इच्छा मना । ते म्हणावी कामना । अमृताची वासना । झांकली असाध्य म्हणोनी ॥ ३९ ॥ तत्रापि जे भोग कानीं । आइ-किले[1] त्यांची मनीं । कामना उपजे पुण्येंकरूनी । परलोकीं साध्य परिसतां ॥ १२४० ॥ स्वर्गकामना याग करुनी । देवांगना भोगूं अमृत पिउनी । वेद बोलती यावरुनी । कामना धरिती श्रुतफळीं ॥ ४१ ॥ अश्रुतफळें या वेगळीं । श्रवणीं पडतां त्याही फळीं । इच्छा उपजे ते वासनाकळी । कामना पुष्प होणार ॥ ४२ ॥ एवं श्रुतफळाची कामना । अश्रुतफळाची वासना । दोनी ज्ञानियाच्या मना । न स्पर्शती ॥ ४३ ॥ हेचि जीवन्मुक्त-दशा । याकारणेंचि गीतोपदेशा । करणें असे हृषीकेशा । अर्जुनालागीं ॥ ४४ ॥ तो अर्जुन सभाग्य । या श्रवणा जाला योग्य । हृदयीं जयाच्या वैराग्य । उपजलेंही ॥ ४५॥ इतकियानेंचि हळहळ । दूर जाली तळमळ । परी मागुती हे मळमळ । होणार बोधावांचुनी ॥ ४६ ॥ चिखलामध्यें मासोळी[2] । जळांशें जीवे परी तळमळी । ते टाकावया गंगाजळीं । सजळ घटीं घातली ॥ ४७ ॥ चिखलामधूनि निघाली । परी जों गंगा नाहीं पा-वली । नेणारास नाहीं वाटली । तोंवरी सुखी अत्यंत ॥४८ ॥ कीं ते सुखी

१ ऐकलेलें. २ मासा.

घटजळीं । हे अस्थिर सुखाची कळी । गंगोदकींच हे मासोळी । अत्यंत सुख पावेल ॥ ४९ ॥ जालें नाहीं ज्ञान । तोचि सुख पावे अर्जुन । आइकोनि हें कृष्णवचन । या न्यायें ॥ १२५० ॥ तों हांसोनि उत्तमश्लोक । करूनि लव कृपावलोक । अर्जुनाप्रति हा श्लोक । बोलतो ॥ ५१ ॥

॥ श्लोक ॥ यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

॥ टीका ॥ आइकोनि आमुच्या वचना । सुखी जालासि अर्जुना । कांहींच नलगे ऐसें मना । वाटलें तुझ्या वाटतें ॥ ५२ ॥ परी हें काय सुख मानिसी । सुख तें पुढें पावसी । जेव्हां अज्ञानमोहडोहासी । बुद्धि तुझी तरेल ॥ ५३ ॥ प्रथम मोह हा अविवेक । कीं देह आत्मा वाटे एक । वेगळेपणें व्यतिरेक । आधीं कळावा दोहींचा ॥ ५४ ॥ हा एक मोह गेला । तों दुसरा मोह आहे उरला । कीं आत्मा रज्जू तोचि टाकिला । वेगळा देह म्हणोनी ॥ ५५ ॥ तोही मोह निरसे । अलंकारीं हेम समरसे । तैसा चराचरीं गवसे । आत्मा जेव्हां ॥ ५६ ॥ आइकोनि गुरूची वाचा । हा गहन समुद्र मोहाचा । बुद्धि तुझी तरेल साचा । तेव्हां आनंद पावसी ॥ ५७ ॥ तेव्हां श्रुतफळाची कामना । अश्रुतफळाची वासना । टाकोनि बुद्धि तुझी अर्जुना । निवळ वैराग्य पावेल ॥ ५८ ॥ वाटे आतांच नलगे फळ । परी हें होणार चंचल । पावसी पद हे बुद्धि निश्चळ । होतां म्हणतो या श्लोकीं॥५९॥

॥ श्लोक ॥ श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचलाबुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

॥ टीका॥ अर्जुना नाना फळश्रुती । आइकोनियां तुझी मती । धांवे ज्या त्या फळाप्रती । होती ऐसी ॥ १२६० ॥ ते या श्रवणें वळली । वाटे नाहीं खवळली । परी अद्यापि नाहीं [१]स्थिरावली । सत्य जाण ॥ ६१ ॥ हे पुढें जेव्हां निश्चळ । राहेल अचळ । समाधींत राहतां केवळ । योग तेव्हां पावसी ॥ ६२ ॥ आधीं होईल निश्चळ । मग समाधींत अचळ । तेव्हां म्हणे योग केवळ । पावसी याचा अर्थ हा ॥ ६३॥ आइकोनि नाना फळ । आधीं होती व्याकुळ । ते आतां जाली निर्मळ । वचनें आमुच्या ॥ ६४ ॥ हें पुराण वैराग्य । स्वहित तत्काळ वाटे योग्य । परी जो थोर सभाग्य । हें बुद्धि त्याची न विसरे ॥ ६५ ॥ ऐसी तुझी बुद्धी । धरूनि हे विवेकाची समृद्धी ।

---

१ एकरस होतें; विरतें.

राहेल निश्चळ तई सिद्धी । जाली जाण या भ्रवणाची ॥ ६६ ॥ मग ते आत्मबोधीं । एकाग्रता बुद्धि साधी । यास ह्मणावें समाधी । अचळ समाधींत त्या होय ॥ ६७ ॥ आत्मसमाधींत बुद्धी । पावे जेव्हां अचळत्वसिद्धी । तेव्हां पावसी योगसमृद्धी । कर्में नासती ज्या योगीं ॥ ६८ ॥ याहोनि पूर्वी बुद्धियुक्त । बोलिलों कीं नाशी सुकृतदुष्कृत । तो योग पावसी निश्चित । तत्त्वीं होतां स्थिरबुद्धी ॥ ६९ ॥ समाधि आणि योग । एक परी नासावया कर्मभोग । कर्तृत्वादि वियोग । कर्मी पाहणें हें एक ॥ १२७० ॥ कीं आत्मज्ञानी आधीं । एकाग्रता स्वरूपीं साधी । ते सविकल्प निर्विकल्प समाधी । ज्ञानसिद्धि या नांवें ॥ ७१ ॥ मग तो नित्य समाधिस्थ । अकर्ता करोनि कर्में समस्त । नाशी पूर्वील सुकृत दुष्कृत । समाधीवरील हा योग ॥ ७२ ॥ पूर्वी वर्णिला जीवन्मुक्त । कीं जिता देह सुकृत दुष्कृत नाशी तो योग निश्चित । समाधिअवस्था भेदची ॥ ७३ ॥ एवं समाधींत स्थिरबुद्धी । त्यास स्थितप्रज्ञतासिद्धी । त्याची वर्तण्याची प्रसिद्धी । ते योगशब्दें जाणावी ॥ ७४ ॥ कीं हें श्रीकृष्णवचन । आइकोनियां अर्जुन । ऐसाच करीतसे प्रश्न । स्थितप्रज्ञाविषयीं ॥ ७५ ॥

॥ श्लोक ॥ अर्जुन उवाच । स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

॥ टीका ॥ प्रज्ञा ह्मणजे बुद्धी । जिला समाधींत स्थिरत्वसिद्धि । ते ज्याची तयास समृद्धी । स्थितप्रज्ञतेची ॥ ७६ ॥ त्यास प्रपंच भगवद्रूप । अलंकारीं हेमस्वरूप । इंद्रियदृष्टीं थिजलें तूप । रसनेस तेथें न रसभंग ॥ ७७ ॥ हा समाधीस विकल्प । विकल्पीं नुसतें निर्विकल्प । हें परोक्षरीतीं स्वल्प । अनुभव नसोनिही समजला ॥ ७८ ॥ ऐसा नित्य समाधिस्थ । जो बुद्धियुक्त नाशी सुकृतदुष्कृत । देह धरूनि वर्ते कीं निश्चित । हेंही अर्जुनें आइकिलें ॥ ७९ ॥ ह्मणुनी ह्मणतो केशवा । स्थितप्रज्ञ[3] ऐसा माधवा । जो नित्य समाधिस्थ यादवा । बोलिलासी ॥ १२८० ॥ अजी त्याचीं जीं लक्षणें । तीं सांगावीं कमलेक्षणें । तो काय बोले संभाषणें । ताही वदावीं ॥ ८१ ॥ तो असतो काय करुनी । तो वर्ततो काय ह्मणुनी । हें स्वमुखें निगमवचनीं । केशवा स्वामि वदावें ॥ ८२ ॥ शाहणें होय लेंकरूं । लागे

---

१ आत्मरूपीं एकाग्रता. २ स्थैर्य. ३ समाधींत स्थिर बुद्धि ज्याची. ४ वेदवाणीनें.

समस्त प्रश्न करूं । तें प्रेम न सकती सांवरूं । मायबापें ॥ ८३ ॥ तैसा एथू-
नि अर्जुन । करूं लागला अध्यात्मप्रश्न । सुखावलें अत्यंत मन । जगद्गुरू-
चें परिसतां ॥ ८४ ॥ कीं मुख पसरी पिलूं । माय लागे चारा घालूं । तैसा
कृपेनें लागला उकलूं । प्रश्न एथूनि भगवंत ॥ ८५ ॥ आधीं श्रीकमलेक्षण ।
सांगतो त्याचीं लक्षणें । उत्तर देतो विचक्षण । प्रथम प्रश्नाचें ॥ ८६ ॥

॥ श्रीभगवानुवाच । प्रजहाति यदा कामान् सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

॥ टीका ॥ पार्था प्रथम वैराग्य । ज्यास तो ज्ञानायोग्य । त्यांत वेगळा
सभाग्य । स्थितप्रज्ञ होतो ॥ ८७ ॥ मन धांवे विषयांवरी । श्रवणबळें ज्ञा-
नी आवरी । मन ऐसें सांवरी । तो साधक परि नव्हे स्थितप्रज्ञ ॥ ८८ ॥
मनीं ज्या ज्या कामना । तो ओकिला ओक वाटे मना । जों ज्ञानी ऐसा होई-
ना । तों न ह्मणवे स्थितप्रज्ञ ॥ ८९ ॥ जे जे मनीं कामना होते । जेव्हां टाकी
सकळही ते । अगा पार्था तेव्हां येते । स्थितप्रज्ञता ॥ ९० ॥ परंतु टाकणें
सर्वकाम । हे गोष्टीचेंचि नव्हे काम । कीं मनें सुखाचें धाम । विषय
मानिलें ॥ ९१ ॥ दुःख मेरूसमान । सुख मोहरीसमही मन । विषयांत
पावे तें जीवन । मानूनि ऐसें ॥ ९२ ॥ चिखलामाजी मासोळी । जरी
दुःखें तळमळी । ते टाकितां शुष्क स्थळीं । वांचेच ना ॥ ९३ ॥ नाकीं
तोंडीं केवळ । चिखल त्याणें करी तळमळ । तथापि लवलेश जें जळ ।
जीवन मत्स्यास तें वाटे ॥ ९४ ॥ ते टाकितां गंगाजळीं । नाठवी चिख-
ल मासोळी । ब्रह्मानंदीं केवळीं । विषय नाठवी मन ऐसें ॥ ९५ ॥ याला-
गीं सर्व कामना । टाकूनि आत्मत्वीं मना । लावी संतुष्ट राहे अर्जुना ।
स्थितप्रज्ञ तेव्हां बोलिजे ॥ ९६ ॥ हें सिद्धाचें सहज लक्षण । साधकें ऐसें
क्षण क्षण । वैराग्य धरूनि आत्मपण । लक्षूनि तृप्ति मानावी ॥ ९७ ॥ या
भावें ह्मणे यदुवीर । कीं मनांतील काम अवघे नर । टाकूनि आत्मत्वीं निरं-
तर । संतुष्ट राहे जेधवां ॥ ९८ ॥ तेधवां स्थितप्रज्ञ तो । अगा पार्था
ह्मणिजेतो । याहूनि पूर्वी असतो । साधक होऊनि सिद्धीचा ॥ ९९ ॥
तत्त्वज्ञ होऊनि ज्यास । वैराग्य आणि अभ्यास । दोनी नसती तयास ।
दुर्लभ हे स्थितप्रज्ञता ॥ १३०० ॥ वैराग्य हृदयीं धरावें । मन आत्मत्वीं
स्थिर करावें । विषय स्मरतां आवरावें । वैराग्यें आणि अभ्यासें ॥ १ ॥

---

१ ब्रह्मज्ञानविषयक प्रश्न. २ समाधींत ज्याची स्थिर बुद्धि असा.

जेव्हां या यत्नाविण । बुद्धि स्वरूपीं स्थिरपण । पावे तेव्हां तो आपण । स्थितप्रज्ञ सिद्ध बोलावा ॥ २ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त पुण्यश्लोक । आइकोत ॥३॥ विचाराच्या बळें काम । सर्व टाकील निष्काम । आत्मस्वरूपीं आत्माराम । स्थितप्रज्ञ करूं शके ॥ ४ ॥ हे यत्नसाध्य गोष्टी दिसते । परी प्रारब्धाची तनु असते । भोगितां आले भोग ते । दुःखी सुखी होऊनिया ॥ ५ ॥ दुःख तें घाबरेंचि करी । स्पृहा उपजवी सुख अंतरीं । कीं ऐसेंचि सुख हो तरी । स्थितप्रज्ञ तेव्हां तो कैसा ॥ ६ ॥ ऐसें ह्मणेल पार्थ । हें जाणोनि यदर्थ । बोले सर्वज्ञ समर्थ । हा श्लोक ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥ दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

॥ टीका ॥ नव्हे घाबिरा दुःखीं । स्पृहा न धरी जाल्या सुखीं । विषयप्रीति भय आणखी । क्रोधही नसे जयाला ॥ ८ ॥ तो स्थितप्रज्ञ ह्मणोनी । बोलिजेतो मुनी । कीं तो मुनि मननेंकरूनी । विचारें ऐसा सिद्ध जाला ॥ ९ ॥ युक्तिदृष्टांतेंकरूनी । विचार सिद्ध करी मनीं । हें मनन जाणे तो मुनी । हे साधकदशा सिद्धाची ॥ १३१० ॥ आत्मा कळला व्यापक । तेव्हां जीव ईश्वर दोघे एक । प्रतिबिंबासि वेगळीक । नसे बिंबीं हें देखे ॥११॥ भोगोनि अज्ञानें दुःख । ज्ञानीं पावला आत्मसुख । विश्रांति पावतां आणिक । तत्त्व गोष्टीचें समजला ॥ १२ ॥ कीं ईश्वर ब्रह्म सगुण । दुःख भोगितां प्रतिबिंबपणें । विंबैक्य आपलें आपण । पावोनि पावतो नि[४]जानंद ॥ १३ ॥ राजा दाटूनि वनांत । पारधींत होतो श्रांत । क्लेशी क्षुधातृषाक्रांत । दाटूनि होतो ॥ १४ ॥ परतोनि येतां गृहा । श्रमपरिहारीं सुख महा । पावतो कीं उपचार हा । सुखतरें पूर्विल्याहूनिही ॥ १५ ॥ तेचि शीतळ छाया । पूर्वी ऐसी सुखी काया । न करी उष्ण श्रम हराया । सुखस्पर्श जैसी होतसे ॥ १६ ॥ इत्यादि राजोपचार । पहिल्याहूनि सुख फार । देती ऐसें सुख अपार । जीवन्मुक्तत्वीं ईश्वरा ॥ १७ ॥ ऐशा युक्तीचें मनन । करी ज्या मुनीचें मन । तें कां होय उद्विग्न । दुःख भोगितां ॥१८॥ नाशवंत दुःखाचें स्मरण । तों नित्य सुखाचें स्फुरण । त्याचें घाबरें अंतः-

१ यत्नानें साधलेली. २ देह. ३ इच्छा. ४ आत्मानंद, ब्रह्मानंद. ५ दमलेला.

करण । होय कां ॥ १९ ॥ ऐसी सुखींही स्पृहा । कां मननसंपन्न मानील हा । कीं कंडू खाजवितां देहा । सुख तैसें विषयांत ॥१३२०॥ अर्जुना वैश्यवृत्ति । करितां स्वल्पही धनप्राप्ति । इच्छूनि जातां संतेप्रति । न गुंते गृहीं गृहसुखा ॥ २१ ॥ स्त्री वाढी मिष्टान्न । परी याचें सांतेंत फिरे मन । तरुणी दे आलिंगन । मन याचें सांतेंत ॥ २२ ॥ कामी कराया स्त्रीसंग । जातां इतर भोगप्रसंग । आड आले तरी अंतरंग । न धरी स्पृहा तयांची ॥२३॥ दरिद्री जाला राजा । पहिल्या वाकळेच्या सेजा । स्पृहा न देती त्या महाराजा । कदाचित प्राप्त होतांही ॥ २४ ॥ इत्यादि दृष्टांत कोटी । श्रीकृष्ण धरूनि पोटीं । ह्मणे अगा किरीटी । सुखीं न धरी तो स्पृहा ॥ २५ ॥ कीं विषयीं अनुराग । न इच्छी कांहीं भोग । कीं खरूज खाजवणें रोग । कां अँसोसी निरोगिया असेल ॥ २६ ॥ निरोगीही देह । क्वचित् खाजवितां स्नेह । न धरी तैसा निःसंदेह । विषयसुखीं सुख तो न मानी ॥२७॥ वीतरागशब्दें स्पृहा । सुख भोगितांही न धरीच हा । दुःख प्राप्त होतां देहा । नव्हे घाबरा निर्भय ॥ २८ ॥ देह लटिका हा निश्चय । तो पडला तरी न मानी भय । तो दुःखी उद्विग्न होय काय । हें निर्भयशब्दें सूचवी ॥ २९ ॥ क्रोध घाबरेपणें । कीं स्पृहेच्याही गुणें । हा दोहींरहित आपण । क्रोध नसे यास्तव ॥१३३०॥ दुःखीं नव्हे घाबरा । सुखीं स्पृहा न ज्या धीरा । तो क्रोधी नसे पांडुकुमारा । याचिलागीं ॥ ३१ ॥ हे सिद्धाचे सहज गुण । साधकें व्हावें मननिपुण । दुःखीं सुखीं ऐसें आपण । असावें भावार्थ हा पोटीं ॥ ३२ ॥ एवं सर्वकाम त्यागी । संतुष्ट जो निजात्मयोगी । निर्भय अक्रोध वीतरागी । सम सुखदुःखीं स्थितप्रज्ञ ॥ ३३ ॥ स्थितप्रज्ञ तो कैसा । ह्मणूनि पुशिलें तरी तो ऐसा । प्रथम प्रश्नोत्तरठसा । बसला मनीं पार्थाच्या ॥ ३४ ॥ प्रश्न दुसरा धनंजय । करीं कीं तो बोले काय । याचें उत्तर अव्यय । देत असे आतां या श्लोकीं ॥ ३५ ॥

॥ श्लोक ॥ यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

॥ टीका ॥ अगा प्रयोजनाविणें । काय घडे बोलणें । आतां अहंता म-

१ इच्छा. २ उपजीविका. ३ जत्रा, मेळा, बाजार. ४ अंतःकरण. ५ जीर्ण वस्त्राच्या. ६ उत्कंठा.

मला गुणें। मीं माझें ह्मणावें ॥ ३६ ॥ तरी देहीं नसे अहंता। त्यास कैंची अन्यत्र ममता। स्नेहपाश नसे चित्ता। जो कांहीं दाटूनि बोलवी ॥ ३७ ॥ स्वदेह पुत्र कलत्र। स्नेह न धरी सर्वत्र। तो कां बोलेल चित्र विचित्र। शब्द लोकांसारिखे ॥ ३८ ॥ कीं सुखाची असे स्पृहा। तरी कांहीं बरें वाटतां देहा। बोलोंच लागे उत्तर हा। नावरे सर्वथा ॥ ३९ ॥ कीं दुःख न हो हे जपणी। जरी असे अंतःकरणीं। तरी अनुभव होतां कांहीं वाणी। बोलोंच लागे ॥ १३४० ॥ जो प्राप्त होतां शुभ। संतुष्ट नव्हे मानूनि लाभ। स्वसुखीं सर्वदा स्वयंभ। तो काय बोलेल कोणाशीं ॥ ४१ ॥ जो अशुभासही भोगुनी। हें वाईट हें तें ह्मणोनी। द्वेष न करी कीं वाईट न मानी। तो काय बोलेल कोणाशीं ॥ ४२ ॥ न हर्षे जो शुभ पावतां। वाईट न मानी अशुभ होतां। त्याचीच प्रज्ञा प्रतिष्ठिता। जाली पावली जे स्थैर्य ॥ ४३ ॥ भाव ऐसा निघाला। कीं जो ऐसा नाहीं जाला। तों तो साधक बोलिला। साधन करावें त्या नरें ॥ ४४ ॥ सर्वत्र टाकावा स्नेह। साक्षित्वें पारका पाहवा देह। स्त्री पुत्र धन गेहें। स्वप्न पहावें जागरीं ॥ ४५ ॥ प्रारब्धें देह गेह। न सुटे तरी त्यजावा स्नेह। स्वरूपीं जागे त्यास मोह। स्वप्न न करी स्वप्नदृष्टीनें ॥ ४६ ॥ आत्मा स्वयें अतींद्रिय। स्वप्नसृष्टि देहेंद्रियें। स्वरूपीं जागा हा निश्चय। धरितां स्नेह कवणाचा ॥ ४७ ॥ सुखदुःखांस रूपें दोनी। त्यांत जे ममतेकरूनी। स्त्रीपुत्रदुःखें दुःखी ह्मणोनी। न मानूं शके आपणा ॥ ४८ ॥ जरी कळला विवेक। तरी देहास सुखदुःख। होतां दिसेच मुख। देहात्मतेचें ॥ ४९ ॥ तरी हें प्रारब्धऋण। जैसें घेतलें तैसें उत्तीर्ण। होतां देहात्मपण। प्रारब्धबळें वाढतें ॥ १३५० ॥ जीवन्मुक्तिपदा। विघ्न करी हे आपदा। परंतु विवेकाची संपदा। मेळवूनि पद तें पावावें ॥ ५१ ॥ ऋणी याचें ऋण। फेडावें भलत्या गुणें। सिंहासनारूढ आपण। होऊनि कां न फेडावें ॥ ५२ ॥ दुःखीं न मानितां दुःख। सुखीं न मानितां सुख। दृष्टीस देहात्मतेचें मुख। पडलें तरी तें बाधीना ॥ ५३ ॥ स्थितप्रज्ञत्वासिंहासनीं। साम्राज्यपदीं बैसोनी। प्रारब्धऋणापासूनी। मुक्त न व्हावें कां सुखें ॥ ५४ ॥ या सुखास न ह्मणावें सुख। या दुःखास न ह्मणावें दुःख। त्यक्त-

---

१ बुद्धि. २ अडळ. ३ घर. ४ इंद्रियांस अगोचर. ५ देह आणि इंद्रियें. ६ आत्मस्वरूपीं. ७ देहास आत्मा समजणें. ८ दुःख. ९ निष्कंटक राज्य.

स्नेहास आणिक । बोलणें उरलें तें काय ॥ ५५ ॥ ऐशा विवेकें नर ऐसा । साधकही होय सरसा । साधक ह्मणावा कैसा । स्थितप्रज्ञही तो मग होय ॥५६॥ तो कांहींच नाहीं बोलत । असे स्वानंदें डोलत । उपदेश हरिकथा तो निश्चित । नव्हे बोली प्रपंचाची ॥ ५७ ॥ शुक स्थितप्रज्ञ भागवत । सांगे श्रीमद्भागवत । ब्रह्मोपदेश हरिचरित । हरिभक्तचरित्रें ज्यामध्यें ॥ ५८ ॥ ज्यांत अवतारमाला । नवरस श्रीकृष्णलीला । रासक्रीडा गोपाळकाला । ज्यामध्यें ॥५९॥ ऐसे स्थितप्रज्ञ योगी । होऊनि गेले नाना जगीं । न चाळिती वाणी उगी । उपदेश हरिकथा न वर्णितां ॥१३६० ॥ न बोलायाचें स्थळ । तें तेंच निवडी मेघनीळ । कीं सर्वत्र स्नेह अचळ । वाणी ज्याची शुभाशुभीं ॥ ६१ ॥ इत्यादि गहन भाव । सुचवूनि बोले देव । आतां तृतीय प्रश्नीं स्वयमेव । तोचि उत्तर देतसे ॥ ६२ ॥ काय करूनि असतो । जो स्थितप्रज्ञ ह्मणावा तो । उत्तर याचें आतां देतो । या श्लोकां ॥ ६३ ॥

॥ श्लोक ॥ यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

॥ टीका ॥ अनायासें भोग करी । अनायासेंचि आवरी । स्थितप्रज्ञ ऐशा परी । असतो अर्जुना ॥ ६४ ॥ येविषयीं दृष्टांत । स्वमुखें बोले रमाकांत । सिद्ध साधक सिद्धांत । सुचवूनि बोले ॥ ६५ ॥ कीं जेव्हां इंद्रियांतें । भोगितां सकळ विषयांतें । आवरी जैसा निजांगातें । कांसव जलचर ॥ ६६॥ क्षणांत बाहेर काढी । क्षणांत आंत ओढी । काढाओढींत न पडे गाढी । काढी ओढी अनायासें ॥ ६७ ॥ भोगिल्याविणें नव्हे क्षय । प्रारब्धाचा हा निश्चय । विनायत्न प्राप्त विषय । त्या भोगीं इंद्रियें वर्तवी ॥ ६८ ॥ चेंडू भूमीवरी पडे । तो भूमि स्पर्शतां उडे । परी त्या भूमीस न जडे । मृत्पिंड जैसा ॥ ६९ ॥ विषयभूमि स्पर्शोनी । मन उडे चिद्गगनीं । अज्ञमन मृत्पिंड होऊनी । विषयभूमीतें जडतसे ॥ १३७० ॥ चिखलाचा गोळा पडे । तो भूमीस लागोनि जडे । परतोनि पडतांही न उंचचडे । मन तैसें अज्ञाचें ॥ ७१ ॥ स्थितप्रज्ञाचे दृष्टी । विषय नाहींच परी अदृष्टीं । भोगणें तेथें न होतां कष्टी । इंद्रियें वर्तवी अनायासें ॥ ७२ ॥ भोग भोगितांचि दिसती । मग जाणों इंद्रियेंच नसती । कीं भोगवासनेची वस्ती । इंद्रियांत

१ ज्यानें स्नेह सोडिला त्यास. २ भगवद्भक्त.

त्याच्या असेना ॥ ७३ ॥ रजोगुणाचें तें इंद्रिय । रजोगुणच वासनामय । वासनेविण इंद्रियनिश्चय । घडेचि ना ॥ ७४ ॥ विषय इंद्रियें सकळ । प्रपंच दिसे ब्रह्म केवळ । त्यास इंद्रियग्राम ओंगळ । दिसे कैंचा ॥ ७५ ॥ कांसव आंगें आवरी । नसतींच जाणों तोंवरी । आणि कांहींच न करी । श्रम आंगें आवरितां ॥ ७६ ॥ कामनेनें विषय । टाकिती त्यांचे दृढनिश्चय । विषय भोगितां इंद्रिय । न निघे कधीं ॥ ७७ ॥ आपणास जन्मांतरीं । राज्यपद लाधावें हें अंतरीं । ह्मणूनि भोग न करी । विषयांचे ॥ ७८ ॥ ब्रह्मर्षी ऋषीश्वरी । न ह्मणतां तपश्चर्या करी । अति प्रयत्नें चित्त हरी । मेनका विश्वामित्राचें ॥ ७९ ॥ इंद्रियां भोगीं प्रवृत्ति । न घडतां मेनका चित्तवृत्ति । हरितां तींच नावरती । विश्वामित्रा ॥ १३८० ॥ आटोपूं शकता इंद्रियें । तरी कां होता कुतरा स्वयें । प्रवृत्ति निवृत्ति हीं निश्चयें । नसे सकामा स्वाधीन इंद्रियांची ॥ ८१ ॥ अनादि मायाविलास । श्वान करी विश्वामित्रास । श्वानमैथुनन्याय ज्यास । घडोनि आला ॥ ८२ ॥ असोनि मैथुनवासना । सदा न करवे श्वाना । कालविशेषें घडतां निघेना । शिश्न योनीबाहेरी ॥ ८३ ॥ स्वस्त्री तरुण सुंदरी । टाकूनि धनार्थ देशांतरीं । कुरूप पुंश्चलीसंग करी । न सोडी सोसूनि दंडही ॥ ८४ ॥ स्वस्त्रीशीं रतिप्रवृत्ती । धनाशा बद्ध करूं न शकती । परदारगमननिवृत्ती । ती तों स्वाधीन नसेची ॥ ८५ ॥ विषय प्राप्त जो न्यायें । आणि अनायासें स्वयें । तें प्रारब्ध मानूनि इंद्रियें । वर्तवी स्थितप्रज्ञ ॥ ८६ ॥ वासनारहित अंतःकरण । त्यास कां घडे यत्नकरणें । असोनि न दिसे इंद्रियगण । आवृतें कूर्मांगें जे रीती ॥ ८७ ॥ हें सिद्धाचें लक्षण । साधकें होऊनि विचक्षण । कंडू इंद्रियांची क्षण । सोसूनि स्वरूपीं चित्त द्यावें ॥८८ ॥ नाहींत विषय नाहींत इंद्रियें । अवघा आत्मा आहे स्वयें । जळीं तरंग या न्यायें । आत्मयांत विश्व स्मरावें ॥ ८९ ॥ क्षत खाजवितां सुख । परी तत्काळ उपजे दुःख । जेव्हां चढे नखाचें विख । दुःख ये रीतीं विषयभोगीं ॥ १३९० ॥ निश्चय असावा अंतःकरणीं । तें योजे चिदात्मस्फुरणीं । तेव्हां ते सिद्धाचीच धरणी । साधकासही साधेच ॥ ९१ ॥ पाठ एकास वेदऋचा । तेच अभ्यासकाची घोकींव वाचा । विसर न पडतां तिचा । तोही

१ सर्व इंद्रियें. २ व्यभिचारिणीशीं संयोग. ३ घाय, खरूज.

होय त्यासम॥९२॥एकाचा अभ्यास जाला। एकास अभ्यास आहे लागला। परंतु अभ्यासकर्ता वहिला। हाही होय स्थितप्रज्ञ॥ ९३॥ एवं "यदा संहरते"। आणि "स्थितप्रज्ञस्तदोच्यते"। या कृष्णवचनीं निघते। टीका ऐसी॥ ९४॥ कीं जेव्हां कूर्म अंगें जैसा। आवरी इंद्रियें तैसा। तेव्हां स्थितप्रज्ञ ऐसा। भाव कीं तत्पूर्वी साधक॥ ९५॥ अनायासें भोगी। अनायासेंचि त्यागी। ऐसें करोनि सर्वात्मयोगीं[१]। असतो स्थितप्रज्ञ गा॥ ९६॥ हें तिज्या प्रश्नाचें उत्तर। जालें परंतु अर्जुन चतुर। संदेह मानी युक्ततर। तो पुढिलिया श्लोकीं हरेल॥ ९७॥ अनायासें प्रवर्तती। अनायासें परतती। इंद्रियें स्थितप्रज्ञाचीं ये रीती। देवाधिदेव बोलिला॥ ९८॥ सकामाचीं इंद्रियें। न प्रवर्तती काम्य निश्चयें। विषयासक्त जो स्वयें। न परतती इंद्रियें तयाचीं॥ ९९॥ अनायासें वर्तवी। अनायासें परतवी। ऐसा स्थितप्रज्ञ गोसावी। पूर्वश्लोकीं ऐकिला॥ १४००॥ आइकोनि धनंजयें। संदेह मानिला कीं इंद्रियें। विषयीं वर्तवी भलता स्वयें। नवल काय या गोष्टीचें॥ १॥ कठिण इंद्रियें परतणें। स्थितप्रज्ञ सिद्ध या गुणें। तरी हें अन्यत्रही लक्षणें। दिसे काय तोही स्थितप्रज्ञ॥ २॥ ज्वरित आणि उपवासी। हेंही न घेती विषयासी। विषय भोगही मानसीं। नाठवे जयां॥ ३॥ तेव्हां हा काय अधिक। कीं हें आइकावें कौतुक। हा भाव यदुकुलतिलक। समजोनि बोले हा श्लोक॥ ४॥

॥ श्लोक ॥ विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥ ५९॥

॥ टीका ॥ ज्या इंद्रियाचा जो विषय। तो तदाहार[२] हा निश्चय। निराहारशब्दें हे उभय। उपवासी लंघनीं ज्वरितही॥ ५॥ निराहार या प्रकारीं। देहाभिमानी देहधारी। स्रक्[४] चंदन आणि नारी। न लगती तयांसी॥ ६॥ ते समयीं तो विषय। परतले परंतु निश्चय। पुढें भोगायाचा त्यांचा जय। जाला नाहीं॥ ७॥ वासनेस म्हणती रस। मनीं त्या रसाचा असे वास। जरी केला उपवास। काय जालें॥ ८॥ परतला विषयांचा विलास। परी परतला नाहीं वासनारस। स्थितप्रज्ञाचा तोही विरस। वासनारस असे ज्याला॥ ९ म्हणसी वासनारस। कीं जाला त्याचा विरस।

१ समाधींत बुद्धि ज्याची स्थिर. २ सर्वात्मस्वरूपाच्या समाधींत. ३ त्याचें खाणें. ४ हार.

तरी आत्मरस सुरस । सेविला याणें ॥ १४१० ॥ अमृत पिऊं लागे रसना । तरी कांजी कां विरस होईना । राग तो विराग जाला अर्जुना । देखतां परमात्मयातें ॥ ११ ॥ स्वरूपगोडी लागतां मना । सकळ जाती कामना । भोगेच्छा सर्वथा असेना । स्थितप्रज्ञासी ॥ १२ ॥ आत्मा बरा कळल्यावरी । विषयवासने कैंची उरी । तो इच्छा धरील कां परी । ऐसें श्रुतिही बोलती ॥ १३ ॥ एवं कूर्मांगाचे परी । अनायासें इंद्रियें आवरी । तो स्थितप्रज्ञ हेचि खरी । गोष्टी अगा अर्जुना ॥ १४ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सर्वज्ञ लोक । तेही परिसोत भावार्थें ॥ १५ ॥ आत्मज्ञानी होउनी । इंद्रियें अनायासें आवरूनी । असे तेव्हां स्थितप्रज्ञ ह्मणोनी । तृतीय प्रश्नोत्तर बोलिला ॥ १६ ॥ तरी जो ज्ञानीच जाला । सर्वही ब्रह्म कळलें ज्याला । इंद्रियें आटोपेनि त्याला । असणें कां लागलें ॥ १७ ॥ हे शंका मानील पार्थ । ऐसें जाणे समर्थ । हे श्लोक दोनी तदर्थ । बोलतसे ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥

॥ टीका ॥ आईक गा कुंतीसुता । कळतां अधिष्ठान आत्मसत्ता । जग विवर्त[1] कळतां तत्त्वतां । तो सर्वज्ञ जाला हें खरें ॥ १९ ॥ श्रवणमनननिदिध्यासें । आत्मा ओळखिला मानसें । त्याला सर्व कळलें ऐसें । श्रुतिही बोलती ॥१४२०॥ बृ० श्रुति ॥ मैत्रेयात्मनि खल्वरे दृष्टे श्रुते मते विज्ञात इदं सर्वं विदितम् ॥ ॥ श्रुत्यर्थ ॥ याज्ञवल्क्य मुनी । त्याची स्त्री मैत्रेयी ह्मणोनी । तीस ह्मणे श्रवणादिकीं करूनी । जीस कळला आत्मा आपला ॥२१॥ आत्मा कळतां केवळ । विदित होय हें विश्व सकळ । कीं ओळखितां समुद्रजळ । ओळखिले तरंग सर्वही ॥ २२ ॥ कळतां तंतु एक । पट कळले अनेक । कळतां एक कनक[2] । अलंकार सर्व कळतीच ॥ २३ ॥ कळतां एक माती । कळल्या घटादि सर्व जाती । आत्मा कळतां चराचरमूर्ती । अवघ्याच कळल्या ॥ २४ ॥ याकारणें आत्मज्ञ । तोचि जगीं सर्वज्ञ । सर्वज्ञास ह्मणती अभिज्ञ । विपश्चित् ह्मणूनी ॥२५॥ या श्लोकीं विपश्चिच्छब्द । ज्ञानियास ह्मणे मुकुंद । त्याचा अर्थानुवाद । ये रीतीं ॥२६॥

---

१ जगत्परिवर्तन. २ सुवर्ण.

विपश्चित् स्वयें सर्वज्ञ सर्वेश्वर । किंवा विपश्चित् सर्वज्ञ नर । दों सर्वज्ञांत अंतर । काय असे ॥ २७ ॥ अलंकार घडी सोनार । ते कशीं लावी पारखी नर । दोघे जाणती कीं अलंकार । सकळही एक सुवर्णाचि ॥२८॥ आतां चराचर अलंकार । निर्माण करायाचा प्रकार । आणि सर्वसाक्षित्वादि सर्वेश्वर । तोचि जाणे ॥ २९ ॥ तरी जो ज्ञानी नर । त्यास त्याचा काय आदर । हा स्वयें मोक्षींच तत्पर । तो याच सर्वज्ञत्वें साधतो ॥ १४३० ॥ दुसरियाचें मन । भूत भविष्य वर्तमान । हें कळणें नव्हे अपरोक्षज्ञान । न खोळंबे मुक्ति याविणें ॥ ३१ ॥ या सिद्धीचेही अंश । ज्ञानियांस लभ्य होती लेश । परी श्रीगुरूचा उपदेश । कीं पाहों नको त्यांकडे ॥ ३२ ॥ आत्मलाभावांचोनी । आणिकही लाभ मानी । तो सकाम देहाभिमानी । तत्काळ होय ॥ ३३ ॥ एवं याच्या कार्यसिद्धीपुरता । हा सर्वज्ञत्वीं जाला सरता । कीं सर्वही मिळोनि एक सत्ता । इतकें कळतां हा मुक्त ॥ ३४ ॥ अलंकार आले हाता । सोनें प्राप्त जालें तत्त्वतां । सोनाराची सर्वज्ञता । न पावे तरी धनवंत ॥ ३५ ॥ एवं जो आत्मज्ञ । तोचि विपश्चित् सर्वज्ञ । विपश्चिच्छब्दें अभिज्ञ । अर्थ वाखाणिती ये रीतीं ॥ ३६ ॥ अर्जुनास ह्मणे हरी । कीं सर्वज्ञ ऐसाही जरी । कूर्मांगासम इंद्रियें नावरी । तोंवरी नव्हे स्थितप्रज्ञ ॥ ३७ ॥ कीं सर्वही ब्रह्म खरें । कळलें जरी ऐसें बरें । अगा तरी दुर्निवारें । पूर्वसंस्कारें इंद्रियें ॥ ३८ ॥ तें इंद्रिय आणि विषय । आणि भोगही ब्रह्म अद्वय । तथापि नव्हतां इंद्रियजय । स्थितप्रज्ञता साधेना ॥ ३९ ॥ अविद्या मरण जन्म । हें अवघें जरी ब्रह्म । तरी न चुकती भव-भ्रम । ज्ञानाविणें ॥ १४४० ॥ तैसें कळलें कीं सर्वही ब्रह्म । आणि मोकळा सोडी इंद्रियग्राम । ब्रह्म विसरोनि पावे भ्रम । यत्न करावा यालागीं ॥४१॥ ज्ञानी सर्वज्ञ ऐसे परी । इंद्रियजया यत्नही करी । तरी बळवंतें बलात्कारीं । इंद्रियें हरती मन त्याचें ॥ ४२ ॥ मन विवेकीं दडे । तेथें इंद्रियांची उडी पडे । मथन करितां लोणी सांपडे । तैसें पडे हातीं इंद्रियांच्या ॥ ४३ ॥ मनास मथिती ऐसीं । इंद्रियें विषयाचीं पिसीं । हीं मथनशीळ यांसी । प्रमाथी ह्मणावें यालागीं ॥ ४४ ॥ एवं सर्वज्ञ यत्नशीळ । मन तयाचेंही इंद्रियकुळ । हरणार ऐसीं प्रबळ । कुंतीसुता हीं इंद्रियें ॥ ४५ ॥ कुंतीसु-

१ आवरण्यास कठीण. २ वेडीं. ३ मथनशील.

ता कौंतेया । ह्मणूनि ह्मणतां शब्दांत या । सुचवी कीं अनादि माया । तिच्या प्रबळशक्ति इंद्रियें ॥ ४६ ॥ अगा इंद्रियांचीच वासना । स्त्रीसंग करवी सर्वां जनां । इंद्रिययोगेंचि अंगना । पुरुष इच्छी ॥ ४७ ॥ सृष्टिप्रवाह ऐसा । हा इंद्रियांचा वळसा । इंद्रियें नसतीं तरी कैसा । कुंतीस होतास तूं पुत्र ॥ ४८ ॥ ऐशा अनादि इंद्रियशक्ति । मायाबळाच्या अभिव्यक्ति । यास अभ्यास आणि विरक्ति । उपाय तिसरा असेना ॥ ४९ ॥ ऐसा सर्वज्ञ विरक्त । त्याचेंही ओढोनि नेती चित्त । स्थितप्रज्ञ यानिमित्त । आवरूनि असतो इंद्रियें ॥ १५५० ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । तें परिसोत सर्वज्ञ लोक । ज्ञानाभिमान टाकुनी ॥ ५१ ॥ पूर्वश्लोकीं आत्मज्ञ । होऊनियां सर्वज्ञ । इंद्रियनिग्रहही अभिज्ञ । करणार जो कां वर्णिला ॥ ५२ ॥ इंद्रियें त्याचेंही मन । हरिती करोनि मथन । हें आइकोनि अर्जुन । सशंक जाला ॥ ५३ ॥ कीं जालें आत्मज्ञान । आणि इंद्रिय जयाचें साधन । तेंही करितां मन । हरती जेव्हां इंद्रियें ॥ ५४ ॥ तेव्हां कांसवाचेपरी । इंद्रियें अनायासें आवरी । त्यास उपाय कोण तरी । हें विचारावें ॥५५ ॥ ऐसा मनींचा भाव । जाणोनि देवाधिदेव । न पुसतां स्वयमेव । स्वभजनमहिमा सांगेल ॥ ५६॥ कीं अर्जुना इंद्रियजय । करायास हे दोनी उपाय । तरावया भवसिंधु काय । उपाय तिसरा मी सांगों ॥ ५७ ॥ याही नावेवरी । पुरुष न बसे जोंवरी । तोंवरी तरेल केशापरी । अगा अर्जुना ॥ ५८ ॥ परी ते नाव नेणार । मीं सर्वेश्वर कर्णधार[२] । माझेठायीं जो सादर । तो पैलपार पावे त्याचि नावेनें ॥ ५९ ॥ यालागीं पूर्वोक्त दोनी । उपायही असोनी । मीच थोर ह्मणोनी । भजे मातें ॥ १५६० ॥ तो कूर्मांगाचे परी । मग मत्प्रसादें आवरी । इंद्रियें ह्मणूनि हरी । बोलतसे या श्लोकीं ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥ तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

॥ टीका ॥ अगा तीं इंद्रियें आवरूनि[१] । स्वस्वरूपीं चित्त योजूनि । असतो मत्पर होऊनि । सगुणभजनीं सादर ॥ ६२ ॥ कीं इंद्रियांतें नेमूनि । आणि स्वस्वरूपीं चित्त योजूनि । असतां तिहीं मन हरूनि । न्यावेंचि परी असे मत्पर ॥ ६३ ॥ मन ज्याचें मत्पर । तेथें मी सर्वेश्वर । प्रकटतां सगु-

१ आकर्षण, दमन. २ सुकाणूं धरणारा.

ण सुंदर । न हरती इंद्रियें मनातें ॥ ६४ ॥ मीचि आत्मा हा निश्चय । परंतु निर्गुण निर्विषय । मन उदक नीचभूमि विषय । तें धांवे तिकडेची ॥ ६५ ॥ इंद्रियांच्या वृत्ती । त्या मनाच्याच शक्ती । विषय कांहीं कल्पिती । तेधवां लागे तिकडेची ॥ ६६ ॥ विवेकें विषय सोडी । तथापि निर्गुणीं न घे गोडी । ह्मणूनि इंद्रियग्राम जोडी । मागुती गोडी विषयांची ॥ ६७ ॥ मी निर्गुणाचि अर्जुना । आकार कल्पूनि दावीं जनां । परी तो आकार निरंजना । आत्मयासी भेटी करी ॥ ६८ ॥ ज्ञान जालियाही हें सगुण । स्मरतां स्फुरेचि निखिल निर्गुण । सुवर्णमूर्तीत सुवर्ण । झांकेल काय ॥ ६९ ॥ जळास नव्हता विकार । मृदुजळ होय कठिण गार । असोनिही निराकार । साकार दिसे ॥ १४७० ॥ कठिण गार लागे हाता । धोंडा दिसे दृष्टीं पाहतां । परंतु रसनेनें चाखतां । मृदु गोड रस निर्विकार ॥ ७१ ॥ मनास दिसे सगुण । परी त्यास निर्गुणत्वाचें स्फुरण । सुवर्णाकारितां जैसें भूषण । निर्गुणें स्फुरें सगुण मी ॥ ७२ ॥ मन भुले सुंदरपणा । तों निर्गुण स्फुरतां आपणा । विसरे तेथें इंद्रियगणा । ठाव कैंचा ॥ ७३ ॥ अगा ऐसा मत्पर । ज्ञानी यत्नशील नर । कूर्मांगासम चतुर । असतो इंद्रियें आवरूनी ॥ ७४ ॥ मीच थोर जया तो मत्पर । ज्ञानी सगुणीं सादर । त्यास तारितों मी सर्वेश्वर । निरूपण होणार हें पुढें ॥ ७५ ॥ एवं ऐसा मत्पर । ज्ञाता प्रयत्नीं नर । त्यास इंद्रियपरिकर । वश होतो ॥ ७६ ॥ ज्यास वश इंद्रियें । तोचि स्थितप्रज्ञ स्वयें । प्रतिष्ठा पावली निश्चयें । प्रज्ञा त्याची ॥ ७७ ॥ एवं जो ध्यानतत्पर । तो स्थितप्रज्ञ नर । विषयध्यानाचें अंतर । तरीच पडे मनासी ॥ ७८ ॥ मन नव्हतां सगुणतत्पर । तें निर्गुणीं नव्हे स्थिर । ज्ञानियाचें मनही पसरे । धरी ध्यानीं विषयांच्या ॥ ७९ ॥ विषयध्यानें भ्रम । उपजे तेव्हां केले श्रम । व्यर्थ होती हा क्रम । बोले श्रीकृष्ण दों श्लोकीं ॥ १४८० ॥

॥ श्लोक ॥ ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

॥ टीका ॥ विषयाचें ध्यान नर । जो करी त्यास सत्वर । विषयीं उप-

---

१ प्रारब्ध नाहीं ज्याला, ईश्वर. २ विस्तार.

जे आदर । संग ह्मणावें तयासी ॥ ८१ ॥ विषय भोगणें बरें । यासंगें विषयआदरें । भोगेच्छा एकसरें । उपजे तीव्र तो काम ॥ ८२ ॥ जों तीव्र नाहीं काम । तों मनास मुरडूं सके नेम । ज्या नेमें मानिलें क्षेम । भोगत्यागीं ॥ ८३ ॥ तीव्र होतां कामना । कांहीं नियम नाठवे मना । हें कृष्ण सांगे अर्जुना । याउपरी ॥ ८४ ॥ संग तोचि काम । काम तीव्र कामाचें नाम । तीव्र कामचि धाम । क्रोधाचें ॥ ८५ ॥ काम तेथें विघ्नकोटी । विघ्न होतां क्रोध पोटीं । उपजे ते वृत्ति खोटी । तमोगुणाची ॥ ८६ ॥ क्रोधें मोह उपजे । कार्य अकार्य तेव्हां न समजे । बरें वाईट कांहीं नुमजे । नियमस्मृति मग कैंची ॥ ८७ ॥ स्मृति नियमाची सांपडे । तरी भोगापासूनि मन मुरडे । मन मुरडतां ठायीं पडे । निश्चयात्मिका स्वबुद्धि ॥ ८८॥ ते स्मृतींत पडतां भ्रम । न होतां मनाचा संयम । नासे बुद्धि उत्तम । स्वहितनिश्चयाची ॥८९॥ स्वहिताच्या निश्चयें । गुरुशास्त्रबोधें स्वयें । इंद्रियमनाच्या जयें । होता मार्गी मोक्षाच्या ॥ १४९० ॥ तो भरला विषयवासनारानीं । फाडूनि खादला लांडग्यांनीं । एवंच जाला देहाभिमानी । यथापूर्व ॥ ९१ ॥ ह्मणूनि त्यजूनि विषयाचें ध्यान । करूनि इंद्रियांचें दमन । आत्मस्वरूपीं योजूनि मन । स्थितप्रज्ञ व्हावें ॥ ९२ ॥ आतां निराकारीं मन । गोडी न घेतां इंद्रियदमन । करितांही बळेंकरून । इंद्रियें हरिती मनातें ॥ ९३ ॥ ह्मणूनि ह्मणे हरी । कीं मत्पर होय जरी । निर्गुणैक्यें सगुणध्यान करी । अनायासें आवरी इंद्रियें ॥ ९४ ॥ माझें सगुण ध्यान । करितां निर्गुणीं मन । होय तत्काळ उन्मन । आत्मज्ञानियाचें ॥ ९५ ॥ अन्यथा जरी आत्मज्ञ । जडही ब्रह्म कळतां सर्वज्ञ । इंद्रियें आवरूंही जाणे अभिज्ञ । तरी इंद्रियें मनातें हरितीच ॥ ९६ ॥ कीं विषयांचें घडे ध्यान । त्या ध्यानें थिटें[3] जालें साधन । तें हातींचें जातां इतर जन । तैसाच होतो यथापूर्व ॥ ९७ ॥ तदर्थ हे दोनी श्लोक । बोलिला श्रीउत्तमश्लोक । अत एव अव्यक्तोपासक । क्लेशी बहुत हें पुढें बोलेल ॥ ९८ ॥ पुढें अध्याय द्वादश । तेथें हाच उपदेश । कीं अव्यक्तोपासका क्लेश । होती बहु मोक्षमार्गी ॥ ९९ ॥ आणि जे ज्ञानी होऊनि नर । सगुणभजनीं सादर । जे एथेंही बोलिला मत्पर । ह्मणेल हे तरतील अनायासें ॥ १५०० ॥

---

१ वळविण्यास, परतविण्यास. २ समान स्थिति, हमन. ३ आंखुड. ४ निर्गुणोपासक.

निर्गुणवादाभिमानी । एथें ऐसा अर्थ न मानी । पुसणार भेटतां निदानीं । अंगीकारी हाचि अर्थ ॥ १ ॥ मत्परशब्दें निर्गुणपर । ह्मणावा तरी तो सर्वज्ञ नर । त्यासही इंद्रियें बळवंतें अनावर । तो निर्गुणपर नव्हे काय ॥ २ ॥ आधीं निर्गुणज्ञान । मग निर्गुणात्मत्वचिंतन । तदर्थ इंद्रियदमन । तें वश होतां स्थितप्रज्ञ ॥ ३ ॥ तेव्हां तो निर्गुणतत्पर । जालाचि साधक नर । अव्यक्तोपासक जया सर्वेश्वर । पुढें द्वादशीं वर्णील ॥ ४ ॥ तशासही इंद्रियें । अनावरें बोलोनि निश्चयें । दुसऱ्या श्लोकीं ह्मणतो स्वयें । कीं आवरूनि असतो मत्पर ॥ ५ ॥ यत्न करितांही अनावरें । स्वयेंचि हा बोलिला खरें । मागुती आवरूनि असतो हेंही बरें । स्पष्ट वदला स्वयेंची ॥ ६ ॥ यत्न यासि दोनी । अभ्यास वैराग्य ह्मणोनी । षष्ठाध्यायीं स्ववचनीं । श्रीकृष्णचि बोलेल ॥ ७ ॥ अव्यक्तोपासक जन । स्वयत्नें जिंकू ह्मणती मन । त्यांस दोनीच साधनें । अभ्यास आणि वैराग्य ॥ ८ ॥ तें नकरितां सगुणभजन । इंद्रियें अनावरें हरिती मन । त्यांस घडेच विषयध्यान । क्रमें भ्रष्टती ऐसे ॥ ९ ॥ भ्रष्टोनि कितीएक काळ । पुन्हा आरंभिती योगजाळ । द्वादशाध्यायीं बहुसाल । क्लेश वदेल ते हेची ॥ १५१० ॥ आतां वैराग्याभ्यासपर । आणि भगवद्भजनीं तत्पर । त्यास ह्मणे एथें मत्पर । तो इंद्रियें आवरूनि असतो ॥ ११ ॥ आतां सर्व यत्न करणार । तो वाखाणावा अज्ञानी नर । तेव्हां आत्मज्ञानी निर्गुणपर । आवरूनि असतो इंद्रियें ह्मणावें ॥ १२ ॥ तेव्हां अर्थ ऐसा होतो । कीं दरिद्री ज्या क्षुधेनें कष्टतो । तेही क्षुधा नासूनि असतो । अन्न भक्षूनि भूपती ॥ १३ ॥ मुंगीस ओढितां कष्ट । तें हस्ती मोडितो काष्ठ । हें बोलणें दिसतें स्पष्ट । कीं सर्वज्ञ ऐसें न बोले ॥१४॥ आवरूं न सके अज्ञानी । तीं हीं इंद्रियें आवरी ज्ञानी । श्रीकृष्ण सर्वज्ञ होउनी । ऐसें वदेल हें न घडे॥१५॥ यालागीं न घडे अर्थ । पांडित्य याविषयीं व्यर्थ । तेव्हां अर्थ हाचि समर्थ । कीं मत्पर ह्मणजे सगुणपर ॥ १६ ॥ आत्मज्ञानी नर । इंद्रियें आवरी अनावर । तो अनायासें आवरी मत्पर । कीं यत्नसिद्धिदाता मी तयाचा ॥ १७ ॥ निर्गुणत्वें सगुणचिंतन । न करितां घडे विषयध्यान । त्याचें थितें[1] नासे साधन । क्रमें श्लोकद्वयोक्त ॥ १८ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । तें

---

१ असलेलें.

परिसोत सुज्ञ लोक । अर्थासहित ॥ १९ ॥ ज्ञानी अभ्यासतत्पर । आणि कृष्ण ह्मणे मत्पर । जरी इंद्रियें अनावर । अनायासें आवरती तयास ॥ २० ॥ न करितां सगुणचिंतन । अवश्य घडे विषयध्यान । तेव्हां आत्मज्ञानी साधक जन । अवश्य पावे भ्रष्टता ॥ २१ ॥ एवं ज्ञानी सगुणतत्पर । जरी इंद्रियनिग्रहपर । तरीच स्थितप्रज्ञ नर । हें तृतीयप्रश्नीं सिद्ध जालें ॥ २२ ॥ एथें अर्जुनास संदेह । कीं जों जिता प्रारब्धाचा देह । तोंवरी इंद्रियसमूह । आवरे कैसा ॥ २३ ॥ त्यजील भोगेच्छा विचक्षण । परी न सुटे देहाचें रक्षण । ध्याननिष्ठ तरी क्षण । चाळीच इंद्रियें आपलीं ॥ २४ ॥ कूर्मांगाचे दृष्टांतें । देहरक्षणार्थ इंद्रियांतें । विषयांत सोडील तेव्हां यातें । आढळतील रस विषयांचे ॥ २५ ॥ गोडास गोड इंद्रियें । वाइटास वाईट ह्मणती निश्चयें । तेव्हां अहंकारही स्वयें । तोंड दावी ॥ २६ ॥ ऐशास सर्वेश्वर । निर्गुणत्वें सगुण सुंदर । नये ध्याना तेव्हां सगुणतत्पर । नव्हतां न घडे प्रसादही ॥२७ ॥ नव्हतां ईश्वर प्रसन्न । प्रसन्न होय न कधीं मन । ऐसें शंकतां अर्जुन । हे दोनी श्लोक बोलतो श्रीकृष्ण ॥ २८ ॥

॥ श्लोक ॥ रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६५ ॥

॥ टीका ॥ अर्जुना विषयलालसा । ज्यास त्यालाच अनर्थ ऐसा । जो सेवितो स्वात्मरसा । त्याचा विषयभोग आइक ॥ २९ ॥ विषय लागला गोड । तरी तो न मानी कोडें । कीं खाजवितां फोड । गोड वाटोनि दुःख दे ॥ ५३० ॥ फेडूनि दोनी ऋणें । ज्यास साम्राज्यपदा जाणें । कां गुंतावें त्याणें । उभयपक्षीं ऋण फेडितां ॥ ३१ ॥ विषयसुखें पुण्यऋण । फेडितां न मानी ऐसें निपुण । कीं दावूनि येऊ हाचि गुण । ऋणकरी हा मागुती ॥ ३२ ॥ विषय गोड वाटेना । परी न भोगितां प्रारब्ध सुटेना । दुष्ट धनिकाचें फिटेना । ऋण क्लेशभोगावांचुनी ॥ ३३ ॥ तें न फिटो ऋण । ऐसें न ह्मणे विचक्षण । कीं ऋण फिटतां निपुण । साम्राज्यपदा जाणार ॥३४ ॥ कष्टी जाल्याविण । नव्हे फिटणार जें ऋण । द्वेष न करी निपुण । कीं जाणार साम्राज्यपदवीतें ॥ ३५॥ निर्गुणत्वें सगुण । भजतां जीवन्मुक्तपण। फिटतां प्रारब्धनिपुण । राग द्वेष कां मानी ॥ ३६ ॥ जो रागद्वेषयुक्त ।

---

१ अतिशयित इच्छा. २ कौतुक.

तो केवीं होय जीवन्मुक्त । याकारणें रागद्वेषरहित । इंद्रियसमूह शमि-याचा ॥ ३७॥ गोड वाटतां विषय । पुन्हा भोगायाचा निश्चय । न करितां विगतैराग होय । समूह इंद्रियांचा ॥ ३८॥ गोड न वाटतां विषय । तो वाईट ह्मणूनि द्वेष निश्चय । न करितां विगतद्वेष होय । समूह इंद्रियांचा ॥ ३९ ॥ रागानुराग ह्मणजे प्रीती । द्वेष वाईट ह्मणे यामती । हे दोनी इंद्रियांस नसती । जयाचिया ॥ १५४० ॥ जो इंद्रियग्राम स्ववश । त्या इंद्रियां जरी विषयप्रवेश । आत्मत्वें सगुण हृषीकेश । ध्याता पावे तत्प्रसादा ॥ ४१ ॥ मन हृषीकेशाकडे । प्राप्त विषयही भोगी रोकडे । रागद्वेषरहित निवडे । इंद्रियग्राम भोगार्थ ॥ ४२ ॥ ऐशा इंद्रियें करूनि योगी । प्रारब्धलब्ध विषय भोगी । मन वश जयालागीं । केलें तैसें तें होय ॥ ४३ ॥ निर्गुणत्वें सगुणध्यान । करितां ऐसीं इंद्रियें मन । ज्याचीं त्यास जगज्जीवन । प्रसन्न होय ॥४४॥ ज्या प्रसादें जीवन्मुक्तता । ज्ञानी पावे भजतां । त्या प्रसादातें तत्त्वतां । तो पावतो ॥ ४५ ॥ प्रसाद ह्मणजे प्रसन्नता । ज्या प्रसादें जीवन्मुक्तता । द्यावी वाटे अनंता । प्रसाद एथें या नांव ॥ ४६ ॥ प्रसाद होतां ये रीती । त्याची होय कैसी स्थिती । ते सांगतो स्वयें श्रीपती । या दुसरिया श्लोकीं ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥ प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

॥ टीका ॥ प्रसाद पावतां ज्ञानी । होय सर्व दुःखाचीं हानी । चित्त त्या प्रसादेंकरूनी । प्रसन्न ज्याचें ॥ ४८ ॥ त्या प्रसन्नचित्ताची बुद्धि । पावते प्रतिष्ठा सिद्धि । जीवन्मुक्ति सुखसमृद्धि । जे बुद्धि त्याची अनुभवी ॥ ४९ ॥ दुःखाचें बीज वासना । ज्या वासनेनें लिंगदेहरचना । ते निःशेष जातां असेना । दुःखलेश ॥ १५५० ॥ वासना जातां चित्त । स्वरूपीं स्थिर निश्चित । तें स्वरूप सर्वगत । हाचि निश्चय बुद्धीचा ॥ ५१ ॥ चैतन्य सर्वगत असे । तोचि आत्मा सर्वत्र गवसे । तेव्हां चित्तास न दिसे । प्रतिबिंबांश ॥ ५२ ॥ समुद्राचे तीरीं । दरडीच्या रूपें भूमीवरी । दरडीचें प्रतिबिंब नीरीं[४] । तें न दिसे जल स्पर्शतां दरडीतें ॥ ५३ ॥ भरतें येतां दरडीवरी । पाणी चढतां प्रतिबिंब नीरीं । न दिसे सर्वत्र खरी । जलाधार

१ गेला आहे राग ज्याचा. २ द्वेषमात्र. ३ तुटलेली जमीन. ४ पाण्यांत. ५ भरती.

भूमि एक ॥ ५४ ॥ तैसें चित्तांत प्रतिबिंब । तें चित्त देखे सर्वगत बिंब । ते वेळे त्यांत अवलंब । प्रतिबिंबाचा दिसेना ॥ ५५ ॥ चैतन्यें दोन्ही सारिखीं। प्रसन्नचित्त हें पारखी । या निश्चयें नांव आणखी । बुद्धि ह्मणोनि तैंचि पावे चित्त ॥ ५६ ॥ दीप पहात होती । ते दृष्टि देखे सूर्यप्रती । सूर्यप्रभेनेंच जगती । पाहों लागे ॥ ५७ ॥ सूर्यप्रकाशें सृष्टि । देखतां दीप नाठवे दृष्टी। सर्वगतीं चित्ताची मिठी । पडतां नाठवे प्रतिबिंब ॥ ५८ ॥ आत्मा तो सर्वगत । ऐसा निश्चय प्रसन्नचित्त । करितां त्यातेंचि निश्चित । बुद्धि निश्चयात्मिका ह्मणिजेते ॥ ५९ ॥ सत्त्वाचे चारी प्रकार । चित्त बुद्धि मन सात्विकाहंकार । निश्चयरूप निर्धार । बुद्धि ह्मणावी ते वृत्ति ॥ १५६० ॥ ते सर्वत्र आत्माचि पाहे । कीं सर्वही कार्य तें कारणचि आहे । अलंकार आहे ह्मणणें न साहे । आत्मसुवर्णचि जडालंकाररूपी देखे ॥ ६१ ॥ त्यास ब्रह्मत्व निर्गुण । आणि ईश्वरत्व सगुण । जीवोपाधि त्रिगुण । निर्गुण दिसती हे सर्व ॥ ६२ ॥ या दृष्टीस अंतर । पाडी विषयवासना असार । ते बुद्धि जातां निराकार । आकारमात्रीं देखे तें ॥ ६३ ॥ तेव्हां बुद्धि प्रतिष्ठा पावते । कीं स्वरूपींच स्थिर राहते । ज्ञानियास हे सिद्धि होते । प्रसादें सगुणाच्या ॥ ६४ ॥ तो प्रसाद सगुणध्यानें । तें ध्यान निर्गुणज्ञानें । जो वर्णिला जगज्जीवनें । मत्पर ह्मणोनि तो ऐसा ॥६५॥ एथें ज्ञानाभिमानी । ह्मणती कीं जो जाला ज्ञानी । तो कां सगुणध्यानीं । लावील मन ॥ ६६ ॥ प्रसाद पूर्वश्लोकीं । कृष्ण वदला त्यास ह्मणती कीं । चित्त विषयवासन टाकी । तो प्रसाद चित्ताचा ॥ ६७ ॥ भगवत्प्रसादाविण । चित्तप्रसन्नता पावे कोण । ऐसें पुसतां ह्मणती आपण । कीं हें ज्ञानाहूनि पूर्वी ॥ ६८ ॥ मागुती पुसावी गोष्टी वरी । कीं ज्ञान जाल्यावरी । चित्तप्रसाद कां तरी । पुन्हा होणें लागला ॥ ६९ ॥ रागद्वेषरहितें । इंद्रियेंकरूनि विषयांतें । सेवितो तैसाच सगुणातें । भजणें हा कां यत्न करूं नये ॥ ७० ॥ चित्तप्रसादोपाय । करितां भजला हरीचे पाय । तरी त्यास दोष काय । कीं अंगीं न करा हा अर्थ ॥ ७१ ॥ ज्ञानी न भजे सगुण । तरी उपाय केले ते काय निर्गुण । काय बोलतां आपण ह्मणूनि निपुण । श्रुतियुक्तीसही विरुद्ध ॥ ७२ ॥ श्रुति ॥ ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते

---

१ आश्रय. २ चोरी.

कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥ भुत्यर्थ ॥ भक्ति देवाचे ठायीं । जैसी तैसीच गुरूचे पायीं । या दा भक्तीच्या उपायीं । गुरु बोलिला ते अर्थ प्रकाशती ॥७३॥ दसोडीच्या रूपें एक । तंतु दावितो व्यापक ।पटीं तैसें कौतुक । जडीं चैतन्याचें दाखवी॥७४॥सुवर्णाचें पीतत्व । दावूनि भूषणीं व्यापकत्व । दाखवी तैसें चिदात्मत्व । जडीं दावी ॥ ७५ ॥ इत्यादि नाना अर्थ । जे गुरु बोलिला समर्थ । ते देवगुरुभजनें यथार्थ । अनुभवी याला प्रकाशती ॥ ७६ ॥ आधीं होय उपदेश । मग गुरु आणि हृषीकेश । भक्ति त्यांची करितां प्रकाश । होय त्या उपदेशरहस्याचा ॥ ७७ ॥ असो पुढें द्वादशीं । बोलणें विशद येविशीं । ज्ञान जालियाही गुरुदेवासी । भजतां स्थितप्रज्ञ होइजे ॥ ७८ ॥ आत्मा कळतांचि आत्मज्ञ । जरी होय तो स्थितप्रज्ञ । तरी हे उपाय कृष्ण सर्वज्ञ । कां वदे त्याला ॥ ७९ ॥ न भजतां श्रीकृष्णाचे पाय । जितके वर्णिले उपाय । ते सकळही होती अपाय । क्लेश अधिक हे अगुणोपासकां॥१५८०॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सुज्ञ लोक । आइकोत॥८१॥ज्यास जालें आत्मज्ञान । निर्गुणत्वें सगुणध्यान । त्या प्रसादें चित्त प्रसन्न । तेव्हां प्रतिष्ठा बुद्धीची ॥ ८२ ॥ यास साधनभूतें । इंद्रियें रागद्वेषरहितें । हें आइकोनि अर्जुनातें । वाटलें ऐसें ॥ ८३ ॥ कीं जालें आत्मज्ञान । तेणेंकरूनि सगुणध्यान । ध्यानबळें करावें इंद्रियदमन । रागद्वेष मग कां उपजती ॥८४॥ आत्मज्ञानें ध्यान । करितां कृपा कृपाघन । करील तेव्हां इंद्रियदमन । सहजचि होणार ॥ ८५ ॥ हा भाव उत्तमश्लोक । जाणोनि बोलतो हा श्लोक । कीं इंद्रियजय हाचि एक । उपाय जीवन्मुक्तीसी ॥ ८६ ॥

॥ श्लोक ॥ नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

॥ टीका ॥ रागद्वेषविरहित । तो इंद्रियग्रामसंयुक्त । ज्याचा इंद्रियग्राम अयुक्त । अयुक्त ह्मणावा तो पुरुष ॥८७॥ अयुक्त नरा नसे बुद्धि । बुद्धि जया तया ज्ञानसिद्धि । ज्ञान असोनिही असिद्धि । अयुक्त नरा ज्ञानाची ॥ ८८ ॥ मथूनि काष्ठाचे वेगळा । जोंवरी न काढिजे अनळा । तों काष्ठीं असोनि दाहककळा । न दिसे तया अग्नीची ॥ ८९ ॥ जों न जाळी काष्ठातें । तों काष्ठीं नाहींच ह्मणावें त्यातें । विझों लागे लागोनि काष्ठातें ।

---

१ दशी; आंचळी. २ पिंवळेपण. ३ चिदात्मपणा. ४ अग्नीस.

लोकी तैसा ॥ १५९० ॥ वारा जाला निश्चळ । पेटतां राहिला अनळ । काष्ठीं असोनि त्यास फळ । काय जो विझों लागला ॥ ९१ ॥ आत्मविद्याग्नि ऐसा । काढिला काष्ठांतूनि अग्नि जैसा । तो बुद्धीस लागला तैसा । अग्नि जैसा काष्ठासी ॥ ९२ ॥ इंद्रियसंयमसमीर । न लागतां विद्यावैश्वानर । विझों लागे तो अयुक्त नर । नसे ह्मणावी बुद्धि तया ॥ ९३ ॥ इंद्रियें पिसीं भोगें । बुद्धि लागली तयामागें । अविद्यासंस्कार विद्यायोगें । न नासी बुद्धि अयुक्ताची ॥ ९४ ॥ ये रीती अयुक्त । बुद्धिहीन विषयासक्त । ह्मणसी सगुण नित्यमुक्त । ध्यातां तो इंद्रियें आवरील ॥ ९५ ॥ मग वश होईल बुद्धि । तरी अयुक्तास न घडे ज्ञानसिद्धि । जों नव्हे इंद्रियशुद्धि । तों ध्यान कैसें बाणेल ॥९६॥ जों न घडे ध्यान । तों शांतिपदीं । न बसे मन । शांतीवांचूनि नसे निधान । दुसरें सुखाचें ॥ ९७ ॥ अशांतास नसे सुख । विषयासक्तास सर्वत्र दुःख । इंद्रियजयें शांतिसुख । देखतां सुखचि सर्वत्र ॥ ९८ ॥ भावनाशब्दें ध्यान । या श्लोकीं सर्वही जन । वाखाणिती परी ह्मणीं मन । मानी ध्यान निर्गुणाचें ॥ ९९ ॥ भाविजे ते भावना । ह्मणजे सगुणध्यानकल्पना । भावनाशब्दें घडेना । निर्गुणध्यान ॥ १६०० ॥ कल्पवेल सकळ । परी न कल्पवे चैतन्य केवळ । स्वतःसिद्ध पाहतां निवळ । कल्पक मन होय उन्मन ॥ १ ॥ आणखी एथें पांडित्य । केलें तरी तें असत्य । असो तें बोलावें अगत्य । परी ग्रंथ वाढेल बहु फार ॥ २ ॥ एवं इंद्रियें आवरी । सगुणध्यान बाणे तरी । तें ध्यान मांडी जरी । इंद्रियें आवरती अनायासें ॥ ३ ॥ एवं विषयाचें भोजन । इंद्रियें करितां सावध मन । नसतां अनर्थसाधन । होणार ह्मणतो या श्लोकीं ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥

॥ टीका ॥ राग द्वेष नसोनिही । इंद्रियें सेविती विषय कांहीं । तथापि मन त्या प्रवाहीं । पडों न दीजे ॥ ५ ॥ कीं एकाही इंद्रियाकडे । जरी मनाची उडी पडे । स्वरूपाहूनि बुद्धि मुरडे । होय विषयीं आसक्त ॥६॥ एकचि इंद्रिय परी । प्रज्ञा ऐसी हरी । कीं वारा जैसा सागरीं । नावची

---

१ इंद्रियांची समान स्थिति करणारा वारा. २ ज्ञानाग्नि. ३ मायेचा किंवा अज्ञानाचा संस्कार. ४ वळते. ५ बुद्धि.

नावें ॥ ७ ॥ अगा बुद्धि ह्मणोनि नांव । परी ते भवसमुद्राची नाव । जरी विषयवासना कुभावें । वारा सुटेना ॥ ८ ॥ वासनेवेगळा विषयवारा । तो प्रारब्धलब्ध इंद्रियांचा चारा । तथापि मन कर्णधार बरा । सावध असावा ॥ ९ ॥ तो होतां असावध । जालाच नावेचा वेध । प्रारब्धाचा तों संबंध । भोगिल्यावांचून सुटेना ॥१६१०॥ मन एक इंद्रियांकडे । लागतां ऐसा अनर्थ जोडे । जरी सर्वांवरी उडी पडे । तरी घडेल तें काय सांगावें ॥ ११ ॥ तृतीय प्रश्नाच्या उत्तरीं । प्रसंग आला एथवरी । कीं अनायासें आवरी । इंद्रियें स्थितप्रज्ञ ॥ १२ ॥ एवं सिद्धांत हाचि एक । ह्मणूनि बोलोनि उत्तमश्लोक । त्या प्रश्नांतीं हाचि श्लोक । सिद्धांत करूनि बोलतसे ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥ तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

॥ टीका ॥ अर्जुना तस्मात् कारण । सर्व विषयांपासूनि गणें । इंद्रियाचा आटोपला सुलक्षण । त्याची प्रज्ञा प्रतिष्ठा पावली ॥ १४ ॥ तरी तूंही हा यत्न करीं । ऐसा भाव अंतरीं । अगा महाबाहो ह्मणे हरी । याचि भावें ॥ १५ ॥ कीं मोठे तुझे बाहुदंड । शत्रु वश करिसी उदंड । ते काय गा हा प्रचंड । वश करीं ग्राम इंद्रियांचा ॥ १६ ॥ आतां स्थितप्रज्ञ कैसा । वर्त्ततो चौथा प्रश्न ऐसा । या प्रत्युत्तरीं ज्ञानठसा । उत्तमश्लोक दावी या श्लोकीं ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥ या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥

॥ टीका ॥ तो वर्ततो ऐसा अगा । कीं स्वस्वरूपीं नित्य जागा । चित्त चैतन्ययोगा । न विसरे कधीं ॥ १८ ॥ अगा निद्रा तेचि राती । दिवस तेचि जागृती । तो जागतो कैसा सुमती । तें सांगतों ॥ १९ ॥ ब्रह्मनिष्ठा अर्जुना । ऐसी जाली सर्वां जनां । कीं राती निजेला त्याच्या नयना । दिसेना कांहीं ॥ १६२० ॥ ब्रह्मनिष्ठा सर्वांस राती । त्या राती याला जागृती । आवरूनि इंद्रियांच्या गती । स्वस्वरूपीं जागवी बुद्धीतें ॥२१॥ हा जगत्कारण चैतन्यसूर्य । जग मृगजळ याचें कार्य । दिवस रातीं आश्चर्य ।

१ नौका. २ दुर्वासना. ३ सुज्ञाण्या. ४ नाश. ५ समुदाय. ६ बुद्धि आणि आत्मा यांच्या संबंधास.

दोनी न या सूर्यासी ॥ २२ ॥ ब्रह्मनिष्ठां लोकांस राती । तेथें जागा हा आ-
त्ममती । विषयनिष्ठेंत सर्वां जागृती । ते निशा यास दिवस लोकांतें ॥२३॥
ते विषयनिष्ठा हा नेणे । परी विषयपटांतील तंतु हा जाणे । ब्रह्म सर्व हा
बोध बाणे । तई कैसा न देखे विषयांतें ॥ २४ ॥ तथापि विषयाची वास-
ना । तिचा विसर याच्या मना । ते विषयनिष्ठा ज्ञाननयना । दि-
सेना याच्या ॥ २५ ॥ एवं विषयनिष्ठा यासी राती । कीं वासना-
रहित याची मती । तथापि न निजे कीं स्वरूपीं जागृती । विषय देखे ब्र-
ह्मत्वें ॥ २६ ॥ विषय सर्वही जाणे । परी त्यांतील कामलोभादि नेणे ।
स्थितप्रज्ञता बाणे । तयासी ॥ २७ ॥ नेत्रीं दिसे अंधकार । परी अंधका-
रीं जे जे प्रकार । ते न दिसती तैसे विकार । विषय दिसोनि त्यांतील न
दिसती ॥ २८ ॥ या भावें कृष्ण ह्मणे । कीं " सा निशा पश्यतो मुनेः" ।
विषय देखोनि वासना नेणे । न दिसे तमीं जेवीं कांहीं ॥ २९ ॥ एवं विषय
मात्र दिसे । त्यावरी भोगवासना नसे । दृष्टि कारणींच वसे । पाहतां गवसे
कार्यही ॥ १६३० ॥ जरी दिसती विषय । मन नसे वासनामय । कीं हा
संयमी कोणीं इंद्रिय । न सोडी वासनेनें ॥ ३१ ॥ दृष्टींत वासना न राहे ।
आणि ब्रह्मभावें विषय पाहे । कीं मनन निदिध्यास घडला आहे । मुनि
ह्मणे हरि यास्तव ॥ ३२ ॥ सुवर्णक्रयविक्रय करी । अलंकार त्या सरा-
फाच्या घरीं । वेश्यांची दृष्टि अलंकारीं । सराफ लक्षी सोनें ॥ ३३ ॥ वे-
श्या देखे सरी । गळां घालायाची इच्छा करी । कांकणें देखतां करीं । लेऊं
पाहे ॥ ३४ ॥ सराफ सोनेंचि लक्षी । देखोनि आकारातें उपेक्षी । जन भो-
गचि अपेक्षी । ज्ञानी पाहे ब्रह्मत्वें ॥ ३५ ॥ स्तनपान करितां बाळ । पिता
न घोटी लाळ । पशु धांवे तृण कोमळ । विषय न वाटे मनुष्यासी ॥ ३६ ॥
किंबहुना ओकिला ओक । श्वानें मक्षिका भक्षिती अनेक । घडोनीही त्या-
चा अवलोक । काय वासना उपजेल ॥ ३७ ॥ यालागीं तो संयमी । ह्मणे
वैकुंठनायक स्वामी । विषय देखोनीही भ्रमीं । न पडे भोगवासनेच्या
॥ ३८ ॥ अर्जुना पुससी कीं तो । स्थितप्रज्ञ कैसा वर्ततो । तरी ब्रह्मचि
जग पाहतो । विनावासना संयमी ॥ ३९ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां
बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त अभिज्ञ लोक । आइकोत ॥ १६४० ॥
संयमी ह्मणजे इंद्रियें । आवरूनि वर्ते स्वयें । हें आइकोनि धनंजयें । मा-

---

१ रात्र. २ इंद्रियें आवरून वर्तणारा. ३ विकत घेणें आणि विकत देणें.

निली शंका ये स्थळीं ॥ ४१ ॥ कीं इंद्रियें आवरूनि वर्ते । त्याणें विषय टाकिले पुरते । प्रारब्धभोग ते तों परते । न होणार ॥ ४२ ॥ भोग इंद्रियग्रामीं । होतां ह्मणवे कैसा संयमी । याचें त्रैलोक्यनाथ स्वामी । समाधान करितो ॥ ४३ ॥ कीं काशीस पावला । तो काय ह्मणावा वाट चुकला । विषय भोगूनीही चढला । शांतिपदीं ॥ ४४ ॥ वाट चुकवी वासना । ते ज्या पुरुषा असेना । त्याणें भोगिले विषय नाना । तरी पावेच तो शांति ॥ ४५ ॥ भोगीं वासनारहित । तो संयमीच जाणावा निश्चित । या प्रकारें अच्युत । समाधान करितो या श्लोकीं ॥ ४६ ॥

॥ श्लोक ॥ आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥७०॥

॥ टीका ॥ अर्जुना नद्या कोटी कोटी । निघती समुद्राचे पोटीं । तरी स्वमर्यादा जे तटीं । न बुडवी तीर्तें ॥ ४७ ॥ ऐसी प्रतिष्ठा अचळ । महानद्यांस न करवे चंचळ । त्यांत पर्जन्यबिंदूनें जळ । प्रवेशे जैसें ॥ ४८ ॥ तैसा जो आत्माराम । प्रवेशती त्यांत सकळ काम । तरी वासनायुक्त इंद्रियग्राम । नव्हे त्याचा ॥ ४९ ॥ त्या निजसुखाच्या समुद्रा । आत्मतृप्तीची नित्य मुद्रा । ते न लंघी भोगितां क्षुद्रा । विषयभोगातें ॥ १६५० ॥ संपूर्ण पृथ्वीचीं नीरें । महानद्या एकसरें । मिळतां अचळ असिजे सागरें । जे रीतीं ॥ ५१ ॥ सार्वभौम रायापासुनी । देव आणि देवांचे गुरु मुनी । यांचीं सुखें यांत मेळवूनी । सुख ब्रह्मपदवीचें ॥ ५२ ॥ ब्रह्मनिष्ठाच्या सुखाचा अंश । तयापुढें हे दिसती लेश । ह्मणोनि विस्तारें हा उपदेश । ब्रह्मवल्ल्युपनिषदीं ॥ ५३ ॥ या आनंदें तृप्त । ते तृप्ति ज्याची गुप्त । त्यास हें विषयसुख आप्त । काय वाटे ॥ ५४ ॥ ऐसा आपूर्यमाण अचळ । त्यांत विषयपर्जन्यजळ । प्रवेशतां होईल चंचळ । हें काय घडे ॥ ५५ ॥ तो शांतीतें पावतो । पावतो ह्मणजे अनुभवितो । ऐसा होऊनि मग तो । पुढें शांति पावतो हें न ह्मणवे ॥ ५६ ॥ याचेंच नांव शांति । कीं ऐशा भोगांत अचळ मति । शांतीची त्यास उरली प्राप्ति । हें घडे तरी घडे तेंही ॥५७॥ जो नसे ऐसा संयमी । जो आसक्त इंद्रियग्रामीं । तो न अनुभवी कामकामी । या शांतीतें ॥ ५८ ॥ तो जैसा क्षुद्र ओहळ । ज्यास स्वयें माहे

---

१ महावसान. २ परिपूर्ण.

जळ । तैसें निजसुख केवळ । ठावें नसे कामकामिया ॥ ५९ ॥ वाहों लागे ओहळ । पडतां विषयमेघाचें जळ । भेटतां नदीजळ पुष्कळ । उफराटा वाहों लागतो ॥ १६६० ॥ स्वयें भोगूं लागे विषय । वरी कांहीं धनाचा संचय । गर्वे फुगोनि धनाश्रय । मानूनि चाले उफराटा ॥ ६१ ॥ असो तो कामकामी । एवं पूर्वश्लोकोक्त संयमी । त्यास संतांचा स्वामी । समुद्र ह्मणे ॥ ६२॥ आत्मानंदेंचि परिपूर्ण । ब्रह्मादिसुखें पूर्यमाण । तो विषयांचे कण । भोगितां मानील सुख काय ॥ ६३ ॥ ब्रह्मादिसुख पाहे । तरी स्वसुखांशा-चीही सरी न लाहे । तो तों उगलाच राहे । मी ऐसा ऐसें ह्मणेना ॥ ६४ ॥ आदींच निजसुखें पूर्ण । ऐशा समाधानें पूर्यमाण । तो भोगितां विषयांचे कण । काय सुखी ह्मणेल ॥ ६५ ॥ एवं भोगिले विषय । तरी तो संयमी हा निश्चय । या गोष्टीनें धनंजय । समाधान पावला ॥ ६६ ॥ परी ह्मणे हे पदवी । साधकें कैसी पावावी । हा मनोभावही गोसावी । जगद्गुरु समज-ला ॥ ६७ ॥ ह्मणोनी सिद्धाचें लक्षण । तेंचि साधकास साधकपण । साधन सांगेल आपण । या श्लोकीं ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥ विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥

॥ टीका ॥ टाकोनि सकळ काम । स्वरूपसुखें सहज निष्काम । स्पृहेर-हित इंद्रियग्राम । जो ऐसा वर्तवी ॥ ६९ ॥ कोठें नसे ममता । देहीं नसे अहंता । तो शांतीतें तत्त्वतां । स्थितप्रज्ञ अनुभवी सिद्ध ॥१६७०॥ साधक टाकोनि काम ॥ विचारें होय जो निष्काम । करूनि निस्पृह इंद्रियग्राम । जो पुरुष वर्ततो ॥ ७१ ॥ सर्वत्र मोडितो ममता । टाकितो देहींची अहंता । तो शांतीतें तत्त्वतां । अगा पावतो ॥ ७२ ॥ हे स्थितप्रज्ञाची स्थिति । जे उपदेशिली अर्जुनाप्रति । तिचा महिमा श्रीपति । वर्णितो या श्लोकीं ॥ ७३॥

॥ श्लोक ॥ एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।

॥ टीका ॥ पार्था हे तुजप्रति । सांगितली स्थितप्रज्ञाची रीति । हे परब्र-ह्मींची स्थिति । जाण तूं ॥७४ ॥ हे ज्यास त्यास आहे । परंतु बुद्धि ऐसें न पाहे । पाहे तरी न राहे । ब्रह्मस्थितींत ॥ ७५ ॥ ब्रह्म आत्मा आपुला । स्थितप्रज्ञें नाहीं आणिला । इतरीं नाहीं गमाविला ।परी बुद्धि तन्मय स्थित-

---

१ पूर्ण. २ समुद्र, ब्रह्मरूप.

ब्रह्माची ॥ ७६ ॥ ब्रह्मीं नसे मूळवासना । कैंची तथ भोगेच्छा कामना । बुद्धि कोणाची ओळखेना । ब्रह्म ऐसें ॥ ७७ ॥ जरी ओळखे बुद्धि सत्त्व । आत्मत्वें शुद्ध ब्रह्मतत्त्व । तरी पूर्वसंस्कारें अहंता ममत्त्व । उपजवी विषयवासना ॥ ७८ ॥ धरी वैराग्य करी अभ्यास । सगुणप्रसादें त्या निर्गुणास । झोंबोनि बुद्धि आपणास । विसरोनि ब्रह्मीं ब्रह्म होय ॥ ७९ ॥ तरी जेव्हें निर्धर्म । त्रिगुणरहित परब्रह्म । टाकितां वेगळें रज तम । बुद्धि ब्रह्मीं ब्रह्म होय ॥ १६८० ॥ तेव्हां ब्रह्मस्थिति । ते पावली ह्मणावी शुद्धमति । तेथें पावतां तृप्ति । मग न मोहे कदापि ॥ ८१ ॥ कीं अमृताचे सागरीं । बुडी दिधलिया उपरी । तरंग बुद्बुद कोणेपरी । वेगळे न देखे ॥ ८२ ॥ हे स्थिति पावल्या उपरी । पुरुष मोहेल कां परी । यालागीं ह्मणतो श्रीहरी । कीं तो मग कधीं न मोहे ॥८३॥ ब्रह्म वाटतां आपण । तेथें न वासना न मीपण । त्या स्थितीमाजीं निपुण । राहतां मोहे कां परी ॥८४ ॥ ऐसा सिद्ध महाराज । साधकें धरावी ऐसी लाज । कीं आपण ब्रह्म कळोनि काज । वासनेचें कैसें धरावें ॥ ८५ ॥ रजतमरहित सत्त्व । करूनि आपलें निर्गुणत्व । तेथें बुद्धीचें स्थिरत्व । संपादावें सर्वथा ॥८६ ॥ साम्राज्यसिंहासना । पावोनि भिक्षेचीच वासना । धरितों मी ऐसा लाजेना । तत्त्वज्ञही तो अज्ञतुल्य ॥ ८७ ॥ आतां ह्मणसी यास । बहु काळ करावा अभ्यास । करितां बहु आयास । या स्थितीस पावावें ॥ ८८ ॥ तरी तैसीही नव्हे दुर्लभ । हे ब्रह्मस्थिति अति सुलभ । ह्मणूनि ह्मणतो श्रीवल्लभ । या उत्तरार्धें ॥ ८९ ॥

॥ उत्तरार्ध ॥ स्थित्वास्यामंतकालेपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥

॥ टीका ॥ अगा अंतकाळीं एक घडी । विषयवासनेंत न टाकीं उडी । स्वस्वरूपीं मन दे बुडी । पावे तोही कैवल्य ॥ १६९० ॥ अगा काळाचाही काळ । आपण परब्रह्म केवळ । ऐसें न कळोनि फटकाळ । पडती मुखीं मृत्यूच्या ॥ ९१ अर्जुना देहावसानीं । भाग्यें भेटे ब्रह्मज्ञानी । त्याच्या मुखें आत्मत्व समजोनी । एक घडी राहे या स्थितींत ॥ ९२ ॥ तोही जेव्हां कैवल्य लाहे । यांतही काय श्रम आहे । जो बहुकाळ या मार्गी राहे । तो

---

१ सत्त्वगुण. २ मीपणा. ३ बुद्धि. ४ बुडबुडे.

हों जितांच होय मुक्त ॥ ९३ ॥ परी हा अंतकाळ । अगा उशाचा भुकेला व्याळ । दूरि मानी तो फटकाळ । मुमुक्षु न ह्मणवे ॥ ९४ ॥ मोक्ष इच्छितो मुमुक्षु । जैसा भोजन अपेक्षी बुभुक्षू । अतिशीघ्र लागे भक्षूं । सकळ भोग टाकुनी ॥ ९५ ॥ ऐसी जया जाली मुमुक्षा । मृत्यु समीप त्या दक्षा । वाटतो सर्व उपेक्षा । करी धरी अपेक्षा या स्थितीची ॥ ९६ ॥ स्थिति येउनी हाता । वांचला तरी जीवन्मुक्तता । तत्काळ देह पडतां अवचिता । कैवल्य पावे ॥ ९७ ॥ यालागीं प्रतिक्षण । अंताचि मानी विचक्षण । राहे या स्थितींत आपण । तोचि तरला अगा पार्था ॥९८॥ तूं पार्थ पृथेचा सुत । धन्य ते आमुची आत । कीं हें आइकसी तूं पोटांत । जन्मलासि तिच्या ॥ ९९ ॥ वंश धन्य हे तों जननी । भाव ऐसा कृष्णवचनीं । कीं अत्यादरें हें जनीं । श्रवण करावें ॥ १७०० ॥ हा अध्याय दुसरा । ज्यांत संक्षेप सारा । अठरा अध्यायांच्या सारा । वदे श्रीकृष्ण ॥ १ ॥ टीका त्याचेंच वचन । त्याविगळा कैंचा वामन । हे टीका आणि मन । सकळ कृष्णार्पण यावरी ॥ २ ॥ पुढें अध्याय तिसरा । तेथें कर्मसिद्धांतसारा । वर्णील त्या नमो यदुवीरा । वामन ह्मणे ॥ १७०३ ॥

॥ वामनकृत संस्कृत श्लोक ॥

विजित्यामरानानयामास योऽगं स कृष्णोर्जुनायादिशत्सांख्ययोगम् ।
सुराचार्यमुख्यान्निरस्य द्वितीयः कृतोऽध्याय आत्मैव यत्राद्वितीयः ॥ १ ॥

इति श्रीमद्वामनपंडितविरचितायां यथार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः ॥

## अध्याय तिसरा.

श्रीमते भगवते गीताकृते श्रीविश्वात्मने शेषशायिने श्रीवासुदेवाय नमः ॥

जय जय ब्रह्मादिजनक । जय जय जगदलंकारकनक । जय जय निखिलजनैक । श्रीशेषशयन ॥ १ ॥ जय जय निगमानन । जय जय निगमावन । जय जय पतितपावन । देवाधिदेव ॥ २ ॥ जय जय कर्मबंधहर । जय जयानाद्यविद्यासंहर । जय जय सकळसंशयपरिहर । अर्जुन गुरो ॥ ३ ॥

१ विश्वालंकाराचें सोनें. २ सर्वपिता. ३ वेदरक्षक. ४ पातक्यांस पावन करणारा. ५ अनादि मायेचें हरण करणारा.

करूनि तूतें वंदन । तृतीयाऽध्यायार्थकथन । करीन जेथें कर्मबंधन । तुटे समर्पितां तूतेंचि ॥ ४ ॥ पूर्वाध्यायीं अर्जुन । कर्माहूनि थोर ज्ञान । ऐसें आइके भगवद्वचन । वारंवार ॥ ५ ॥ परंतु कर्मेंचि चित्तशुद्धि । होतां मग ज्ञानसिद्धि । ऐसी कर्मप्रशंसाप्रसिद्धि । ऐकोनिही विसरला ॥ ६ ॥ मनीं युद्ध न करणें । त्यास प्रतिकूळ कर्माचरण । ज्ञानप्रशंसाप्रकरण । आइकिलें अधिक कर्माहूनी ॥ ७ ॥ तितकाच धरिला आश्रय । युद्ध न करणें हा निश्चय । ह्मणोनि मानूनि संशय । प्रश्न करी अर्जुन ॥ ८ ॥

अर्जुन उवाच ॥ ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥

॥ टीका ॥ कर्मापरीस थोर बुद्धि । जास आत्मज्ञानसिद्धि । ऐसी ज्ञानप्रशंसाप्रसिद्धि । पूर्वाध्यायीं ऐकिली ॥ ९ ॥ पूर्वाध्यायश्लोकार्ध ॥ दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ॥ टीका ॥ बहुत दुरूनि नीच । कर्मबुद्धीपरीस साच । ऐसें बोलिलास तूंच । सर्वज्ञ सर्वेश्वर ॥ १० ॥ बुद्धियोग थोर निश्चित । कर्म नीच हें तुझें मत । जरी ऐसें तुज संमत । कां कर्मी मज योजिसी ॥ ११ ॥ कर्म नीच ज्ञान थोर । तथापि माझें कर्म अत्यंत घोर । कां करूं सांगसी कर्म क्रूर । जनार्दना ॥१२ ॥ दुष्ट जनाचें अर्दन । करणार तूं श्रीजनार्दन । परी मी कैसा करूं मर्दन । भीष्मादिकांचें ॥ १३ ॥ अगत्य स्वधर्मे तरावें । ह्मणूनि हें घोर कर्मही करावें । तरी त्याहोनि कोटिगुण वैभवें । तूंच ह्मणसी ज्ञान थोर ॥ १४ ॥ त्या ज्ञानाचा आश्रय । करीन ऐसा हा निश्चय । धरूनि ह्मणतो ज्ञान अद्वय । तरेन त्याणें मी आजि ॥ १५ ॥ आतां कर्मे करितां । प्रसन्न होती कर्मांगदेवता । त्या क्षोभती कर्म टाकितां । ह्मणोनि भिऊं ॥ १६ ॥ तरी तूं श्रीकेशव । सकळ देवांचाही देव । तो मज देवाधिदेव । भेटलासी ॥ १७ ॥ सर्वांहूनि समर्थ । या केशवनांवाचा अर्थ । त्या भावें पार्थ । आळवी एथें या नांवें ॥ १८ ॥ क ब्रह्मा ईश शिव । दोघे वश जया तो केशव । तो तूं शिरीं असतां देव । काय करितील माझें ॥ १९॥ इत्यादि भाव पोटीं । तो ह्मणे ऐसें किरीटी । कीं हे हिंसाक्रिया खोटी । कां योजिसी केशवा या कर्मी ॥ २० ॥ आतां यापुढें श्लोक । बोले पार्थ पुण्यश्लोक । त्याचें निमित्त अभिज्ञ लोक । आइकोत गूढ अत्यंत ॥ २१ ॥ बोलोनि बोल ऐसें । मुखाकडे नेत्र सरिसे ।

---

१ कर्माचें उत्तम वर्णन.

करूनि पाहतां तो हांसे । मंद मंद श्रीकृष्ण ॥२२॥ तों वाटलें ऐसें अर्जुना । कीं ऐकोनि माझ्या वचना । हास्य आलें जनार्दना । अयुक्त बोलतों ह्मणोनि ॥ २३ ॥ तीं तें आठवे मनीं । कीं क्षत्रियांस युद्धाहूनि । धर्म थोर नसे ह्मणोनी । जें पूर्वाध्यायीं हरि वदे ॥ २४ ॥ हें स्मरतां ह्मणे हरी । हेंचि स्मरोनि अंतरीं । हांसतो कीं याच अवसरीं । हें कैसें हा विसरला ॥ २५ ॥ तरी हा आपला बोल । आठवूनि मज ऐसें ह्मणेल । कीं प्रश्न तुझा फोल । बोलसी न समजोनी ॥ २६ ॥ याकारणें हेंही वचन । जें बोलिलासि ह्मणतो अर्जुन । परी या मिश्रित वाक्यें मन । मोहिलें ह्मणतो या श्लोकीं ॥२७॥

॥ श्लोक ॥ व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥

॥ टीका ॥ आजि कर्मही थोर । बोलिलासि हाही विचार । तेंही काय वारंवार । आइकिलें नाहीं ॥ २८ ॥ घडी एक ह्मणसी थोर कर्म । पुन्हा थोर जाणणें ब्रह्म । या मिश्रवाक्यें भ्रम । न हरे माझा ॥ २९ ॥ मिश्रवाक्य कानीं पडे । तों मन मोहांतचि बुडे । तूं मोहिसी ह्मणतां झडे । जिव्हा कुष्ठी होऊनि ॥ ३० ॥ ह्मणूनि तूं न मोहिसी । तरी वाक्यें तूंचि बोलसी । यालागीं मूढत्वें मानसीं । मोह करितोसि हें वाटे ॥३१॥ ऐसा भाव पोटीं । ह्मणूनि बोले किरीटी । कीं मोहितोसीच ऐसी खोटी । गोष्टी वाटते मूढत्वें ॥ ३२ ॥ तूं परम कृपेचा सागर । करावया माझा उद्धार । सकळ वेदार्थ-निर्धार । उपदेशिसी ॥ ३३ ॥ जरी माता घाली बाळासी विष । आणि विषरूप होय पीयूष । तरी मोहकत्वदोष । लागे तुज ॥ ३४ ॥ सूर्यमंडळीं थारा । जरी घडे अंधकारा । तरी या दोषाचा वारा । लागे तुज ॥ ३५ ॥ कीं या स्थावरजंगमा । जाळूं लागे चंद्रमा । तरी हा दोष पुरुषोत्तमा । लागे तुज ॥ ३६ ॥ आतां एकचि विशद । निश्चय करूनि मातें वद । कीं तो हृदयीं धरूनि शब्द । मीं श्रेय पावें ॥ ३७ ॥ आतां यापुढें श्लोक । बोलेल भगवानुत्तमश्लोक । करितां त्याचा अर्थावलोक । शोक हरितो पार्थाचा ॥ ३८ ॥ कीं मोहितोसि ह्मणूनि । ह्मणतां श्याला बहु मनीं । हा दोष त्याचा परिहरूनि । बोलों पाहतो ॥ ३९ ॥ आइकोत हें वचन । जें वदतो कृपाघन । स्वतःसिद्ध पूर्ण षड्गुण । श्रीभगवान् स्वयें ॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच ॥ लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥

॥ टीका ॥ आइक अनघा अर्जुना । अघ दोष तो तुज असेना । बोलिलासि तूं ह्मणोनि वचना । बोलोनि घावरा जालासि ॥४१॥ तरी हें मीच बोलिलों कीं । दोंपरी निष्ठा या लोकीं । कीं जे आत्मानात्मविवेकी । ज्ञानयोग त्या सांख्यांला ॥ ४२ ॥ कीं चित्तशुद्धि त्यांची जाली । आत्मता वरी कळों आली । त्यास निष्ठा म्यां बोलिली । ज्ञानयोगें ॥ ४३ ॥ कीं तिहीं करावें ध्यान । ध्यानार्थ करावें इंद्रियदमन । स्वरूपीं योजूनि मन । असावें तिहीं ॥ ४४॥ ज्यांस नाहीं चित्तशुद्धि । होणें असे ज्ञानसिद्धि । तीहीं करोनि निष्कामबुद्धि । कर्म करावें ॥ ४५ ॥ हें तुज वाटलें मिश्रित । ह्मणूनि मोहिलें तुझें चित्त । प्रश्न करितां दोष अत्यंत । मानूनि घावरा जालासी ॥ ४६ ॥ स्तन द्यावया तानयाकडे । माय येतेच तों तें रडे । पाहतां ऐसें घडे । कीं दोष लाविला मातेसी ॥ ४७ ॥ कीं न समजली बाळाची क्षुधा । तरी रडेल होतां क्षुधाबाधा । हा दोष मातेस सुद्धां । लागलाची ॥ ४८ ॥ परी त्याचा तो स्वभाव । तैसाच शिष्याचाही भाव । प्रश्न करितां नुरे ठाव । मर्यादेसी ॥ ४९ ॥ गुरूसि न करितां प्रश्न । पोटीं वाटलें तेंचि वचन । न बोलतां संशयनिरसन । घडे कैसें ॥ ५० ॥ तथापि मर्यादापालन । करूनि बोलावें वचन । बोलोनि शंकलें तुझें मन । उचितचि हेंही ॥ ५१ ॥ इत्यादि भाव पोटीं । धरूनि ह्मणे अगा किरीटी । तूं अनघा निर्दोष दृष्टि । नव्हे तुझी वाइट ॥ ५२ ॥ परंतु युद्धाची टाळणी । करावया जे बोलसी वाणी । हें न घडे ह्मणतो चक्रपाणी । या श्लोकीं ॥ ५३ ॥

॥ श्लोक ॥ न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।

॥ टीका ॥ कर्मांचा आरंभ न करीं । नैष्कर्म्यसिद्धि हे तोंवरी । न पावे गोष्टी खरी । ध्ररी धरीं मनामाजीं ॥ ५४ ॥ कर्मांची सिद्धि ज्ञान । नव्हे हें साच वचन । परंतु कर्मे शुद्ध मन । तेव्हां ज्ञान त्यास होय ॥ ५५ ॥ एवं कर्मेंचि न ह्मणवे ज्ञान । ह्मणोनि ज्ञानाचें नांव जगज्जीवन । नैष्कर्म्य ह्मणे हें भगवद्वचन । वाखाणावें या भावें ॥ ५६ ॥ आतां ज्ञानास साधन । जालें जें कां शुद्ध मन । कर्मे मनाचें शोधन । जालें पाहिजे ॥ ५७ ॥ याकारणें ब्रह्म सगुण । ह्मणे कर्मारंभाविण । न घडे ज्ञान निर्गुण । कदापि ॥ ५८ ॥ परी तें कर्म कृष्णार्पण । हें याच अध्यायीं बोलेल कृष्ण । तें निष्काम त्याचें

---

१ पापरहिता. २ आत्मा काय आणि अनात्मा काय याविषयीं विचार करणारे. ३ अर्जुना. ४ कर्मरहितपणा.

विवरण । केलें मागिल्या अध्यायीं ।। ५९ ।। कीं नेहाभिक्रमनाशोस्ति । ह्मणजे आरंभिल्या कर्माची समाप्ति । निर्विघ्न नव्हतांही फलप्राप्ति । फल तें ईश्वरानुग्रह ।। ६० ।। ईश्वरानुग्रहें शुद्ध मन । ईश्वरानुग्रहें हें ज्ञान । ह्मणूनि कर्मारंभसाधन । ह्मणे ज्ञानाचें ।। ६१ ।। आरंभशब्दें अर्थ । इतुकाच सुचवी समर्थ । हा अर्थ टाकितां व्यर्थ । आरंभ शब्द होतसे ।। ६२ ।। उगेंचि कर्माविणें । न घडे नैष्कर्म्य होणें । इतकेंचि कां श्रीकृष्णें । बोलों नये ।। ६३ ।। हें आइकोनि अर्जुन । मनीं ह्मणे मुमुक्षुजन । संन्यासें पावती ज्ञान । क्रिया वर्णोचिता टाकिती ।। ६४ ।। मज कां लाविती कर्म । मी संन्यासेंचि जाणेन ब्रह्म । तो हा मनाचा भ्रम । हरी कृष्ण उत्तरार्धे ।। ६५ ।।

।। श्लोकोत्तरार्ध ।। न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ।। ४ ।।

।। टीका ।। अरे ज्यांस संन्यासें ज्ञान । त्यांस पूर्वाश्रमीं कर्मसाधन । अशुद्ध चित्ताचें मुंडण । व्यर्थाचार ।। ६६ ।। संन्यासमात्रेंचि सिद्धि । नव्हे ज्ञानाची समृद्धी । कर्मे न करितां नव्हे शुद्धि । चित्तास ।। ६७ ।। तूं मुमुक्षु होऊनि । एकचि वद दोहींतूनि । मज ह्मणसी ह्मणोनि । हें बोलतों तुजलागीं ।। ६८ ।। सकामास एक काम्य । मुमुक्षूस कर्म आणि ब्रह्म । दोंही निष्ठाचें वर्म । पूर्वाध्यायीं वदलों यालागीं ।। ६९ ।। आतां यापुढें श्लोक । तो कां बोलेल उत्तमश्लोक । त्याचें निमित्त मुमुक्षुलोक । परिसोत ।। ७० ।। संन्यासेंकरूनि ब्रह्म । जाणोनि न करी वर्णोक्त कर्म । हा अर्जुनाचा भ्रम । पूर्वश्लोकीं निवारिला ।। ७१ ।। परी त्यास इष्ट संन्यास । कीं कंटाळला युद्धास । ह्मणूनि संन्यास त्यास । घ्यावाच वाटे ।। ७२ ।। एथें ह्मणतील संत । जे जाणती वेदाचा सिद्धांत । कीं वीतराग उपजतां पोटांत । संन्यास तेव्हांच बोलिला ।। ७३ ।। ।। श्रुति ।। यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् ।। श्रुत्यर्थ ।। श्रुति ह्मणे ज्याच दिवशीं । वैराग्य उपजे मानसीं । त्याच दिवशीं संन्यासी । जालें पाहिजे ।। ७४ ।। ऐसें असोनि संन्यास । कां घेऊं नेदी अर्जुनास । ऐसें संतांचिया मनास वाटेल एथें ।।७५।। तरी संन्यासाचा निषेध । न करूनि करवी युद्ध । कीं संन्यासाचें तत्त्व शुद्ध । हेंचि वदेल अष्टादशीं ।। ७६ ।। कीं काम्यकर्माचा न्यास । ह्मणजे टाकणें काम्यकर्मास । त्यास ह्मणावें संन्यास । संन्यासाचें हें तत्त्व ।।७७।। तेव्हां टाकूनि काम्य । करावें

१ ईश्वराची कृपा. २ जातीस जीं उचित तीं ( कर्मे ). ३ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ्य व संन्यास हे चार आश्रम. ४ खरें स्वरूप.

नित्य निष्काम कर्म । परी बंधक तोही स्वधर्म । इश्वरार्पण न करितां ॥ ७८ ॥ हें पांच श्लोकेंकरूनि । बोलावें हें मनीं धरूनि । केवळ कर्मत्याग न घडे ह्मणूनि । आधीं बोलतो या श्लोकीं ॥ ७९ ॥

॥ श्लोक ॥ नहि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ अर्जुना जरीं संन्यासी । डोई बोडोनि जालासी । तरी कैसा कर्में टाकिसी । क्षण एकही ॥ ८० ॥ लंगोटीही टाकणें । आणि नग्न होऊनि असणें । तेंही नव्हे काय करणें । अगा कर्म ॥८१ ॥ आवरूनि हात पाय । बसणें नव्हे कर्म काय । कांहीं न बोले कांहीं न खाय । तेंही कर्म ॥ ८२ ॥ घट वर्ते तरीच माती । न वर्ततां काय अन्य जाती । कर्में रचिली देहाकृती । त्याग कर्माचा तो कैसा ॥ ८३ ॥ [1]भूचर टाकूनि भूमी । ह्मणे पळोनि जाईन मी । पळतां पुढें रिकामी । भूमिच दिसे ॥ ८४ ॥ गगन टाकूनि पक्षी । उडों लागला अंतरिक्षीं । तो तें सर्वत्र लक्षी । तेंचि गगन ॥ ८५ ॥ याकारणें कोणी । कांहीं न करूनि कोणे क्षणीं । असों सकेल हे वाणी । सर्वथा मिथ्या ॥ ८६ ॥ आतां उगेंचि बसणें । आणि मौन धरूनि असणें । हें नव्हे कर्म ऐसें अंगीकारणें । जरी लागलें तुझ्या भिडेनें ॥ ८७ ॥ तरी प्रकृतीचे गुण । आपलें कर्म एवंलक्षण । न सोडिती दर्शन श्रवण । वर्जिसी कैसा ॥ ८८ ॥ प्रकृतीचे तिन्ही गुण । विषय इंद्रियें अंतःकरण । सर्वां अवशां स्ववशपणें । कर्में करविती॥८९॥ कोणी उगेच बसती । कांहींच कर्में न करिती । ह्मणोनि ह्मणसी तरी रीती । आइक त्यांची श्लोकीं या ॥ ९० ॥

॥ श्लोक ॥ कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

॥ टीका ॥ अगा वाचे न बोले । आणि पायेंकरूनिही न चाले । आणि हातही न हाले । धरितां कांहीं ॥ ९१ ॥ गुदेंद्रियें न हागे । घडी एक शिश्नहीं न जागे । मुतेही ना ऐसा वागे । [2]ग्राम कर्मेंद्रियांचा ॥ ९२ ॥ जैसें बकाचें ध्यान । मासेच आठवी मन । तैसें हें दांभिक भजन । मिथ्याचार ॥ ९३ ॥ कीं कर्मेंद्रियें आवरी । मनीं विषयाचें ध्यान करी । विषयवासनेनें अंतरीं । मूढबुद्धि ॥ ९४ ॥ कर्मावांचुनि शुद्धि । नव्हतां ऐसी दंभबुद्धि । ज्या कर्में ध्यानसिद्धि । तें ऐक या श्लोकीं ॥ ९५ ॥

---

१ स्वभावाचे. २ वश नाहीं असांला. ३ समूह.

॥ श्लोक ॥ यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेर्जुन ।
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

॥ टीका ॥ अगा मनेंचि मनीं । जो इंद्रियें आवरूनी । विहित कर्में करूनी । आरंभितो कर्मयोग ॥ ९६ ॥ कर्मफळीं नव्हे आसक्त । एका ईश्वरींच अनुरक्त । अर्जुना तो होणार मुक्त । विशिष्ट याकरितां ॥ ९७ ॥ एथें अर्जुनास हरी । अर्जुना ह्मणोनि पाचारी । कीं अर्जुनवृक्षाचें नांव तरी । ह्मणीं होसी वृक्षरूप ॥ ९८ ॥ कीं पूर्वश्लोकीं कर्मेंद्रियें । आवरूनि दांभिक मनोमयें । ज्ञानेंद्रियें चाळी स्वयें । विषयासक्त ॥ ९९ ॥ हा वृक्षाचा गुण । कीं तो कर्मेंद्रियांविण । आयुष्य कंठी क्षण । तैसाचि वैसे दांभिक ॥ १०० ॥ जरी अर्जुना वृक्षचि होणें । तरी अवश्य कर्मत्याग न करणें । जरी अर्जुना मनुष्य ह्मणवणें । तरी करीं कर्में निष्काम ॥ १ ॥ पोटीं धरूनि हा भाव । मुखीं या श्लोकीं अर्जुन नांव । बोले देवाधिदेव । अत्यंत गूढ ॥ २ ॥ निष्कामें कैसीं कोणतीं । ह्मणोनि पुससी तूं सुमती । तरी सांगतों तुजप्रती । या श्लोकें ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ नियतं कुरु कर्म त्वं कर्मज्यायो ह्यकर्मणः ।

॥ टीका ॥ न बोलोनि फलश्रुती । उगलेंच करा ह्मणती श्रुती । नियत कर्म त्यास ह्मणती । संध्यादिक ॥ ४ ॥ नियत नेमिलें नित्यकर्म । ज्यास जें तो त्याचा स्वधर्म । त्याणें शुद्ध चित्त पावे ब्रह्म । तोचि संन्यास ॥ ५ ॥ तत्त्व संन्यासाचें । काम्यत्यागरूप साचें । तेव्हां करणें नित्यकर्माचें । प्राप्त जालें ॥ ६ ॥ करितां कर्मयोग । शुद्ध चित्तास शिखासूत्रपरित्याग । न करी तरी हाचि संन्यासयोग । कीं टाकूनि काम्य नियत आचरें ॥ ७ ॥ तें नियतकर्म न करी । तरी ईश्वरदंड पडे शिरीं । करितां नियतकर्म संन्यास लौकरी । सिद्ध होय काम्य टाकितां ॥ ८ ॥ या भावेंकरूनी । नियतकर्म करीं ह्मणोनि । बोलोनि ह्मणतो न करण्याहुनी । करणें नियतकर्म थोर ॥ ९ ॥ अर्जुना हाचि संन्यास । कर्मत्यागें न ह्मणवे न्यास । कीं तो न घडेच कोणास । तो साधे केवीं तुज ॥ १० ॥ तुझ्या मनीं कर्मत्याग । तो न घडे संन्यासयोग । ह्मणूनि सर्वथा कर्मांचा वियोग । न करवे ह्मणूनि बोलिलों ॥ ११ ॥ तें लटिकें कीं खरें । आपणाचवरूनि पाहें बरें । हें बोलतों निर्धारें । या श्लोकाच्या उत्तरार्धे ॥ १२ ॥

१अनुरागविशिष्ट. २मनःकल्पित. ३संध्यादि नित्यकर्में. ४शेंडी आणि जानवें. ५त्याग.

॥ श्लोकोत्तरार्ध । शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८॥

॥ टीका ॥ कांहीं कर्मे न करिसी । आणि उगला जरी बससी । तरी काय खासी कैसा हागसी । सांग सांग ॥ १३ ॥ या भावें ह्मणे हरी । कीं शरीरनिर्वाह तोही परी । तुझा न चले जरी । कर्मे टाकूनि बैसलासी ॥१४॥ वैराग्य उपजे चित्तीं । तेचि दिवसीं ह्मणे श्रुति । कीं संन्यास घ्यावा तो श्रीपति । या श्लोकीं अर्जुनास उपदेशी ॥ १५ ॥ आतां यापुढें श्लोक । बोकां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त मुमुक्षु लोक । आइकोत इतरही निर्मत्सर ॥ १६ ॥ टाकीन ह्मणे स्वधर्म । आणि जाणेन ह्मणे ब्रह्म । त्यास अगत्य नियतकर्म । पदरीं बांधलें ॥ १७ ॥ निषेध काम्यकर्माचा । साधला न चाळितां वाचा । कीं सर्व कर्मफलत्याग साचा । करितां नियत नित्य तें कर्मचि नेमिलें ॥ १८ ॥ तरी काम्याचा जो समूळ त्याग । तो तरी होय कीं संन्यासयोग । परी नित्याचाही फलवियोग । जाला पाहिजे ॥ १९ ॥ नित्यकर्मासि श्रुति । पितृलोक फल उपपादिती । आणि पाहतांही वस्तुस्थिति । अनिवार्य गुण वस्तूचा ॥ १२० ॥ उष्ण हो चंद्रमंडळ । ह्मणतांही तें शीतळ । शीतळ हो ह्मणतां अनळ । जाळूंच लागे ॥ २१ ॥ विषाचें नव्हे अमृत । अमृतही विष नव्हे निश्चित । परी धन्वंतरि याचा हस्त । लागतां विषही पीयूष होय ॥ २२ ॥ वचनाग खातां मरती । परी उत्तम वैद्याचिया हातीं । देतां तो करी त्याची प्रकृती । पूर्वगुणास विपरीत ॥२३॥ वचनागाचा रस करी । तो थित्यां रोगातें संहरी । कर्मे नव्हे बंध तरी । जरी ईश्वरीं अर्पिजे ॥ २४ ॥ यास ह्मणावें त्याग । त्यागास अपेक्षी संन्यासयोग । त्यागेंचि जन्ममृत्युवियोग । श्रुति ह्मणे ॥ २५ ॥ श्रुति ॥ नकर्मणा नप्र जया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः ॥ कैवल्य उ०॥ श्रुत्यर्थ ॥ मोक्ष नव्हे कर्में धनें । मोक्ष नव्हे पुत्रसंतानें । कीं अपुत्रास ह्मणती परलोक गमन । असेना ॥ २६ ॥ अपुत्रास लोक नसे । वेदचि बोलती ऐसें । परी लोक शब्दें न गवसे । अर्थ मोक्षाचा ॥ २७ ॥ स्वर्ग परलोक । आणि इहलोकही लोक । मोक्ष तो अलोक । पुनरावृत्ति जेथें असेना ॥ २८ ॥ हे श्रुति याचि अनुसंधानें । ह्मणे कर्में संतानें धनें । मोक्ष नव्हे कोण्याही साधनें । त्यागें एकेंचि मोक्ष ॥ २९ ॥ मोक्ष एकलियाचि त्यागें । न धनें न

---

१ सांगतात. २ अग्नि. ३ आयुर्वेदप्रवर्तक देव, वैद्य. ४ अमृत. ५ मूळच्या असलेल्या. ६ लोक नव्हे तो. ७ पुनर्जन्म.

संतानें न कर्मयोगें । नित्यकर्मही पितृलोकभोगें । श्रुति बोलती बंधक ॥१३० ॥ मोक्ष तो मुख्य ज्ञानें । हीं ज्ञानप्राप्तीस साधनें । त्यांत त्याग वेद-वचनें । ह्मणे थोर ॥ ३१ ॥ कोणीं तेच श्रुति । त्याग संन्यास वाखाणिती । परी संन्यासाचें यदुपति । तत्त्व अष्टादशीं बोलेल ॥ ३२ ॥ काम्यकर्माचा त्याग । तोचि संन्यासयोग । पुन्हा सर्वकर्मफलत्याग । त्या संन्यासावेगळा ह्मणेल ॥ ३३ ॥ आणि त्यागावांचूनि संन्यास । नये कोण्या प्रयोजनास । कीं काम्यावेगळ्याही कर्मास । फळ देखिलें ॥ ३४ ॥ कीं सर्वकर्मफलत्याग । त्यास ह्मणावें त्याग । ऐसें स्वयें श्रीरंग । अष्टादशीं बोलेल ॥ ३५ ॥ अष्टादशाध्यायश्लोक ॥ काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः । स-र्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ टीका ॥ काम्यकर्माचा न्यास । तयास ह्मणावें संन्यास । आणि सर्वकर्मफलास । त्यागणें त्याग त्या नांव ॥ ३६ ॥ तेव्हां ईश्वरार्पणयोग । तरीच कर्मफलवियोग । एवं याचें नांव त्याग । कीं कर्मार्पण ईश्वरीं ॥ ३७ ॥ भगवद्गीतेंत समर्थ । त्याग तो हाचि यथार्थ । याकारणें श्रुत्यर्थ । हाचि साच ॥ ३८ ॥ आणि ईश्वरकृपेवीण । न ओळखवे आपणा आपण । ते ईश्वरकृपा कर्मार्पण । त्याग करितां ॥ ३९ ॥ आत्मज्ञान कोणे परी । प्राप्त नव्हे एक जरी । ईश्वर कृपा करी । तरीच हेंही श्रुति बोलती ॥ १४० ॥ त्या श्रुति आणि त्यांचे अर्थ । वर्णि-तां वाढेल अपार ग्रंथ । आणि हें प्रसिद्ध असतां व्यर्थ । कां श्रोतयां शि-णवावें ॥ ४१ ॥ एवं सर्वकर्मपसारा । समर्पितां सर्वेश्वरा । कृपा येतांच या नरा । ज्ञान उपदेशी गुरुरूपें ॥ ४२ ॥ तेव्हां पूर्वील अनर्पितें । जीं अग-णितें संचितें । तीं नासती या निमित्तें । मोक्षत्यागेंचि एकलिया ॥ ४३ ॥ एवं काम्यकर्मत्याग । आणि नित्यकर्म संन्यासयोग । तो पूर्वश्लोकीं श्रीरंग । सिद्ध करी नियतकर्मी योजितां ॥ ४४ ॥ सिद्ध होतां संन्यासयोग । त्यास सद्य अपेक्षित त्याग । त्यागाविणें फलसंयोग । अनिवार्य नियत कर्मा-चा ॥ ४५ ॥ त्या त्यागाचें लक्षण । आणि त्या त्यागलक्षणावीण । इतरास न घडे ह्मणे त्याग ह्मणणें । हें उपदेशितो या श्लोकीं ॥ ४६ ॥

॥ श्लोक ॥ यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोयं कर्मबंधनः ।

॥ टीका ॥ यज्ञ तो विष्णु सगुणब्रह्म । तदर्थ त्यास अर्पावया केलें कर्म । त्या कर्मावांचूनि सर्व धर्म । आचरतां बद्ध हा लोक ॥ ४७ ॥ विष्णु

---

१ ईश्वरार्पण केलीं नाहींत अशीं कर्मे. २ सांचलेलीं कर्मे.

ह्मणतां उगा । निर्गुण वाटेल जगा । यज्ञशब्दप्रयोगा । करूनि सुचवी श्रुति एथें ॥ ४८॥ श्रुति ॥ यज्ञो वै विष्णुः ॥ श्रुत्यर्थ ॥ यज्ञ तो विष्णु निर्धारें । श्रुति बोले या प्रकारें । तोचि जगीं यज्ञाकारें । सर्वयज्ञभोक्ता ॥ ४९ ॥ यज्ञशब्दें भगवद्वाणी । हे सुचवी कीं ह्मणोनी । कर्में समर्पितील निर्गुणीं । निर्गुणें न तुटे कर्मबंध ॥ १५०॥ निर्गुण अधिष्ठान थोर । जैसा मृषा सर्पा आधार दोर । परी त्यास साव आणि चोर । सारिखे दोघे ॥ ५१ ॥ दोरें न मरे असत्य साप । निर्गुणें न नासे पुण्य पाप । सर्प नासणें प्रताप । रज्जुज्ञानाचा ॥ ५२ ॥ दोरें सर्प केला नाहीं । दोर सर्प न दवडी कांहीं । दोरें नासे तो सर्पही । दोरांत कैसा असेल ॥ ५३ ॥ अग्नींत काष्ठ प्रकाशे । परी न राहे जळोनि नासे । न कळतां रज्जूसे सर्प भासे । कल्पांतवरी जों द्वैत जीवेश्वर ॥ ५४ ॥ रज्जूचें न जाणणें । त्याणेंचि मिथ्या सर्प होणें । कीं रज्जु जाणतां राहणें । न घडे सर्पाचें ॥ ५५ ॥ जरी रज्जु कळला असता । तरी सर्प कां हो दिसता । जरी दिसता तरी कां नासता । रज्जु कळतां तो सर्प ॥ ५६ ॥ एवं रज्जु न कळतां जाला । रज्जु कळतां नासला । कर्मप्रपंच मिथ्या भासला । निर्गुणदोरीं निर्गुणसर्प ॥५७॥ एवं कर्म ह्मणजे अविद्या । अविद्या नाशी ब्रह्मविद्या । ते विद्याशक्ति त्या आद्या । ईश्वराची ॥ ५८ ॥ तो ह्मणावा सगुण । त्याच्या चरणीं कर्मार्पण । बोलेल तें ब्रह्म सगुण । नाश अविद्याकर्माचा ॥५९॥ याच गीतेंत ब्रह्मार्पण । बोलेल तें ब्रह्म सगुण । कीं अविद्यानाशक निर्गुण । न घडे कधीं ऐसें ॥ १६० ॥ ईश्वरोपाधि आणि निर्गुण । दोहींस ह्मणावें सगुण । त्यांत फळची निर्गुणपण । मोक्षफलदाता ईश्वर ॥ ६१ ॥ धनवंत आणि त्याचें धन । धनार्थें धनिकाचें भजन । धनप्राप्तीस साधन । न घडे भजन धनाचेंचि ॥ ६२ ॥ एवं विष्णु ह्मणावा तेथें । यज्ञ बोलिला जेथें । तो सगुणच ऐसा एथें । भगवद्भाव ॥ ६३ ॥ जें कर्म नव्हे यज्ञार्थ । ह्मणजे न विष्णुप्रीत्यर्थ । तें जालें बंधनार्थ । मनुष्यलोकीं ॥ ६४ ॥ तेव्हां इतर देवतार्पण । त्या कर्मा असेच बंधकपण । कीं एका यज्ञार्थाविण । सर्वत्र बंध ह्मणतसे ॥ ६५ ॥ आतां यज्ञकुंडादि क्रियामय । तदर्थ कर्म हा निश्चय । तें एक करितां न होय । बंधक ऐसें ह्मणावें ॥ ६६ ॥ तरी यज्ञही कर्म निश्चयें । तेव्हां कर्मचि बंधक नव्हे स्वयें । अर्थ न साधे या अन्वयें । यज्ञविष्णु श्रुतिसिद्ध ॥ ६७ ॥ यज्ञ यज्ञा कारण ।

---

१ खोटया. २ पहाणारे. ३ मूळच्या.

तेव्हां कर्माकारणें कर्मकरणें । तें बंधक नव्हे ऐसें कोण । बोलों सके ॥ ६८ ॥ दरिद्रें दरिद्र फिटे । कीं अंधकारें अंधार तुटे । वायको बायकोस कोंडे । ऋतु दे पुत्रोत्पत्तीचा ॥ ६९ ॥ आतां यज्ञशब्दें इतर देवता । तरी देवतांतरभजनवार्ता । सर्वथा निषेधी हे भगवद्गीता । तेंही घडेना ॥१७०॥ नवमाध्यायींही गोष्टी ऐसी । कीं "यत्करोषि यदश्नासि । तत्कुरुष्व मदर्पण" हें पार्थासी । अन्यत्रही स्थळोस्थळीं बोलेल ॥७१॥ एवं विष्णूस कर्मार्पण । न करितां सर्वत्र बंधकपण । हाचि निर्णय ब्रह्म सगुण । श्रीकृष्ण करी ॥ ७२ ॥ आतां समर्पण सगुणा । तें नये बंधकपणा । तरी काम्यकर्मही त्याच निपुणा । विष्णूस अर्पूं ॥ ७३ ॥ कदाचित् मनीं पार्थ । धरील ऐसा अर्थ । ह्मणुनि हें निषेधितो समर्थ । श्रीकृष्ण या उत्तरार्धें ॥७४॥

॥ श्लोकोत्तरार्धं ॥ तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥

॥ टीका ॥ त्या कारणेंही कर्म । करीं टाकूनि संगभ्रमें । त्यासही न अर्पितां श्रम । न तुटे फळ बंधाचा ॥ ७५॥ अर्जुना जों नाहीं मुमुक्षा । मुमुक्षा ह्मणजे मोक्षापेक्षा । ते नसतां नेदी मोक्षा । सर्वेश्वर ॥ ७६ ॥ भोग अथवा मोक्ष । जें ज्यास सापेक्ष । तेंचि देतो कीं कल्पवृक्ष । न मागतां कांहींच नेदी ॥ ७७ ॥ ईश्वर दयाळु केवळ । ह्मणूनीच मागितलें फळ । देतो कीं सद्य विव्हळ । होय जन न देतां अपेक्षित ॥७८ ॥ फळ इच्छी अंतःकरण । आणि करी तें कर्मार्पण । तरी फळचि दे सर्वज्ञ निपुण । कल्पवृक्ष ॥ ७९ ॥ एवं विष्णूस अर्पण । आणि ज्या कर्मी निष्कामपण । यावेगळें कर्म सगुण । बंधकत्व सर्वथा न सोडी ॥ १८० ॥ यालागीं वेदोक्तही काम्य । आइकतां जें कर्णास रम्य । तें अर्पितांही सगुण ब्रह्म । बंधक फळचि देणार ॥ ८१ ॥ एवं नित्यकर्म करावें । तें विष्णूस अर्पावें । त्याणेंचि पावावें । मोक्षफळ ॥ ८२ ॥ याला ह्मणावें त्याग । काम्यत्याग संन्यासयोग । अर्जुनास ह्मणे श्रीरंग । होईं ऐसा ॥८३ ॥ टाकूनि काम्याचरणें । नियतकर्मचि करणें । हा संन्यास पूर्वश्लोकीं खुणें । न बोलतां दाखविला ॥ ८४ ॥ तें नियतही कर्म बंधक । ह्मणोनि प्रवर्तला हा श्लोक । कीं जो विष्णु सगुण एक । त्यास अर्पावें ॥ ८५ ॥ त्यांतही काम्य टाकावें । त्या कर्मास संन्यास ह्मणावें । तेंही विष्णूस अर्पावें । हा त्याग ॥ ८६ ॥ उगाच कर्मत्याग । करणें नव्हे संन्यासयोग । त्या प्रत्यवायें नरकभोग । सिद्धि नव्हे या संन्यासें

१ इतर देवांच्या भजनाची गोष्ट. २ आसक्ति.

॥ ८७ ॥ यालागीं मागें देव । "नच संन्यसनादेव" । ह्मणूनि बोलिला दे-वाधिदेव । कीं संन्यास तुज नव्हे योग्य ॥ ८८ ॥ तों अर्जुनमनोगत । संन्यासावरीच अत्यंत । ह्मणूनि पूर्वश्लोक वरी अनंत । काम्यत्याग संन्यास बोलिला ॥ ८९ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सकळ लोक । परिसोत ॥१९० ॥ सांडूनियां काम्य । सोलीव नि-यत नित्यकर्म । तेंही जें सगुण ब्रह्म । त्यास अर्पावें ॥९१ ॥ पूर्वश्लोकवरी । हा उपदेश कृष्ण करी । तों दया उपजली अंतरीं।सकळ साधारणांची॥९२॥ कीं हे भगवद्गीता । संतां सर्वांस उपयोगी तत्त्वतां । एथें निष्कामताचि सिद्ध होतां । उडालें काम्य॥९३॥अशुद्धचित्त निष्काम । होणें न घडे हा नेम । मन असोनि सकाम । ईश्वरार्पित हें निरूपिलें ॥ ९४॥ त्रिविध जन हा नेम । मुमुक्षु मुक्त सकाम । मुमुक्षूस नित्य निष्काम । ईश्वरार्पित हें निरूपिलें ॥ ९५ ॥ आतां जन सकाम । त्यांस अवश्य सकामकर्म । ह्मणूनि बोले सगुण ब्रह्म । त्यास प्रथम हा श्लोक ॥ ९६ ॥

॥ श्लोक ॥ सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

॥ टीका ॥ तूं मुमुक्षु गा अर्जुना । संन्यास बरवा वाटे मना । ह्मणूनि सां-डूनि कामना । नियतकर्म तूतें बोलिलों ॥ ९७॥ परि इतरांस निश्चित । काम्यकर्मचि उचित । येविषयीं वेदविहित । गुह्य सांगतों ॥ ९८ ॥ ऐसा भाव पोटीं । तों कृष्ण ह्मणे अगा किरीटी । ब्रह्मा निर्मितां प्रजांच्या कोटी । यज्ञही निर्मी त्यासांगातें ॥ ९९ ॥ उपजतांचि बाल मुग्ध । मातेच्या स्तनीं उपजे दुग्ध । हा मायागुण स्निग्ध । अनादि ॥ २०० ॥ तैसा प्रतिकल्पीं ब्रह्मा । सृष्टि करी हा अनादि महिमा । जीवांचिया जीवधर्मा । तोचि करी हेंही अनादि ॥ १ ॥ एवं प्रजासांगातें । ब्रह्मा निर्मी यज्ञातें । निर्मूनि ह्मणे प्रजांतें । ब्रह्मा असें ॥ २ ॥ कीं हा यज्ञ बरवा । करितां वृद्धीतें तुह्मी पावा । हा यज्ञ तुह्मी जाणावा । कामधेनु आपली ॥ ३ ॥ हा कामधेनु तुह्मां । हों ह्मणे ब्रह्मा । त्या यज्ञफलप्राप्तिक्रमा । बोलतसे या श्लोकीं ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

॥ टीका ॥ या यज्ञेंकरूनि देवां । तुह्मी यज्ञा पूजा सदैवा । ते देव फळ

---

१ अज्ञ. २ ममतेचा.

देती तेव्हां । तुह्मांसी ॥ ५ ॥ तुह्मी पुन्हा त्या देवां । त्या यज्ञोंचि करूनि भावा । ते पुन्हा तुह्मां सदैवां । पाळितील ॥ ६ ॥ ऐसी परस्पर । भावना घडतां सादर । विषयसुख वारंवार । पावाल हेंचि परम कल्याण ॥ ७ ॥ फळ देती भक्षूनि याग । मग तुह्मी नेदां त्याचा विभाग । तरी अपराधी व्हाल त्यांचा लाग । न सुटे म्हणतो या श्लोकें ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ इष्टान् भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

॥ टीका ॥ तुम्हांस इष्ट भोग । ते देव देती भक्षूनि याग । तिहीं दिधलें त्यांतूनि विभाग । त्यांचा न देतां क्षोभती ॥ ९ ॥ तिहींच दिधले पदार्थ । त्या पदार्थी यज्ञ तदर्थ । जो न करी त्यास समर्थ । ते पीडिती ॥ २१० ॥ तेव्हां अपराध लागेल थोर । जो ऐसा तो देवांचा चोर । ते न दिसती परी हा समोर । त्या देवांस सर्वत्र ॥ ११ ॥ राजद्रव्य चोरी । त्यास राजा मारी । मग देव ऐसेपरी । करिती त्यावरी शासन ॥ १२॥ यालागीं त्यांस द्यावें । तेव्हां आपण तें खावें । अन्यथा पापफल भोगावें । लागेल ॥ १३॥ आतां यापुढें श्लोक । तो स्वयें बोले उत्तमश्लोक । पूर्व श्लोकवरी कितीएक । शब्द वर्णिले ब्रह्मयाचे ॥ १४ ॥ कीं काम्ययज्ञेंमनोरथ । पूर्ण करिती देव समर्थ । परी तिहीं दिधलें जें त्याणें तदर्थ । न करितां यज्ञ ते दंडती ॥१५॥ हें ब्रह्मयाचें वर्णिलें वचन । यास देतो स्वयें अनुमोदन । आणि सन्मार्गी सर्व जन । लावितो या श्लोकीं ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥ यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।

॥ टीका ॥ वैश्वदेवादि यज्ञ करिती । वेदविहित जे आचरती । यज्ञशेष अन्न भक्षिती । ते सुटती सकळ पापापासुनी ॥ १७ ॥ प्रथम पाप थोर । कीं देवांचे होती चोर । तो चुके दंड घोर । यज्ञ करितां त्या अन्नाचा ॥ १८॥ आहुतीद्वारा देवांस तुष्टी । ते होतां करिती वृष्टी । न यजितां होती कष्टी । न वर्षती पर्जन्य ॥१९॥ जेव्हां पर्जन्य न पडे । तेव्हां फलजीवहिंसा घडे । तें सकल पाप जोडे । यज्ञ न करी त्याला ॥ २२० ॥ इतरांच्या यज्ञसुकृतें । देव वर्षती वृष्टीतें । परी तो अपराध ठेवूनि यांतें । दंड करिती ॥ २१॥ देवांस होतां संतोष । जो भक्षी यज्ञशेष । अवृष्टिजनित सर्व दोष । चुकती याचे ॥ २२ ॥ ऐशा किल्बिषपापासूनी । सुटे यज्ञशेष तें भक्षूनि ।

१ संबंध. २ फलेच्छेनें यज्ञ करणाराच्या मनांतील इच्छा. ३ पाप, दोष.

कोणीं पंचसूना किल्बिषें ह्मणूनि । एथें वाखाणिती ॥ २३ ॥ तोहि अर्थ घडे । धर्मशास्त्रास अनुकूल पडे । परी पंचसूनादोष न झडे । या प्रायश्चित्तें ॥ २४ ॥ ॥ स्मृति ॥ कंडनी पेषणी चुल्ली उदकुंभी च मार्जनी । पंचसूना गृहस्थस्य ताभिः स्वर्गं न विंदति ॥ ॥ स्मृत्यर्थ ॥ कांडणें दळणें । चुली पेटवणें जळ घटीं भरणें । पांचवी सूना सडा सारवणें । जीवहिंसा या पांचांत ॥ २५ ॥ कांडितां दळितां किडे । मरतां हिंसा घडे । काष्ठांतही सवडी सांपडे । वसती कृमी त्यांतही ॥ २६ ॥ ओलीं कांहीं गोंवरी । तों किडेच नुसते अंतरीं । इत्यादि हिंसा खरी । घडे मुळें चुलीच्या ॥ २७ ॥ शेण रगडूनि शेणीं । करितां जीवकोटींच्या श्रेणी । मरती हेही करणी । चुलीनिमित्त ॥ २८ ॥ कीं झाडणें सडासारवण । मरती जीव ते गणी कवण । हें पांचवे सूनेचें विवरण । या पंचसूना गृहस्थाश्रमीं ॥ २९ ॥ या पंचसूना यांचे दोष । जाती भक्षितां वैश्वदेवशेष । ऐसाही कांहीं घोष । प्रसिद्ध जगीं ॥ २३० ॥ तरी ज्यांस करणें दंड । पुढें आहे उदंड । तैसेही लंडभंड । हातीं धरावे कार्यार्थ ॥ ३१ ॥ कांहीं राजसेवा हातें । त्यांच्या घेती शेवटीं तयांतें । दंडिती तैसी रोडकी जनातें । हे शुद्धी ॥३२॥ क्रिमिभोजन नामक । यास बोलिले नरक । मारिले जे क्रिमि अनेक । ते नरकीं भक्षिती स्वहिंसका ॥ ३३ ॥ यास भूतदया मनीं । गृहस्थें सकुटुंबें धरूनी । पंचही कर्मं विचारूनी । करितां मरती कां क्रिमी ॥ ३४ ॥ ज्यास नाहीं भूतदया । त्याची राक्षसाची काया । व्यर्थ त्याची सर्व क्रिया । भूतद्रोहें ॥ ३५ ॥ काय या पांचचि सूना । कीं यावेगळी हिंसा घडेना । जीव कोटि काय मरेना । चालतां वाटे ॥ ३६ ॥ न मारितांही ढेकुण । आंगाखालीं होती चूर्ण । या दोषाचें गणन । कां न मोजिलें यांत ॥ ३७ ॥ पांचचि या निवडिल्या । त्या उगाच सूना कां नाहीं बोलिल्या । त्या वेगळ्याच राहिल्या । न गणितां त्यांत ॥ ३८ ॥ एवं वर्णाश्रमानुसार । कर्म चालावया अधिकार । सुचविला पापपरिहार । याचा नव्हे इतकियानें ॥ ३९ ॥ दया ज्याचिया मनीं । कंडनादिकर्में विचारूनि । करितां हिंसा न कळोनि । होतां दयाच तें पाप नाशील ॥ २४० ॥ त्या दयेनें सर्वात्मा हरी । संतुष्ट होतां अज्ञान हरी । तेव्हां सकळ कर्में संहरी । दया

१ कांडण, दळण, चूल पेटवणें, पाणी भरणें आणि शेण सारवणें यांपासून जीवहिंसादि घडतात त्यांस पंचसूनादोष ह्मणतात. २ हिंसागृह. ३ पंक्ति. ४ किडे.

घोर ॥ ४१ ॥ पिशाचाचे हातीं कोलित । तैसें हें प्रायश्चित्त । तेव्हां कां कांपेल चित्त । हिंसा करितां ॥ ४२ ॥ कंडनादि क्रिया । करितां कांहीं करावी दया । तों ऐकतां प्रायश्चित्ता या । निसंताने जालें दयेचें ॥ ४३ ॥ श्रीकृष्ण एथें हीं किल्बिषें । न ह्मणे जाती यज्ञशेषें । स्मृतीच्या अर्थवाद-घोषें । वाखाणावी कां गीता ॥ ४४ ॥ पंचसूनाप्रायश्चित्त । वैश्वदेवही घडो निश्चित । परी गीतार्थ नव्हे उचित । वाखाणणें एथें ये रीती ॥ ४५ ॥ कीं याच श्लोकाचें विवरण । तों श्लोकीं करील करुणे । तेथें नराप्रति नारायण । हेंचि बोलेल विशद ॥ ४६ ॥ एवं भक्षितां यज्ञशेष । सकळ नासती किल्बिष । अन्यथा लिप्त होती दोष । हें उत्तरार्धें बोलतो ॥ ४७ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ केवळ आपणाच कारणें । अर्जुना जो पाक करणें । तें पापचि खाताति जाण । ते पापी ॥ ४८ ॥ आतां यापुढें श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक । त्याचें निमित्त सर्व लोक । आइकोत अर्थासहितही ॥ ४९ ॥ पंचसूनादोष । वैश्वदेवें हरती हा घोष । अर्थवाद ये स्थळीं किल्बिष । परिहरे तें वेगळें ॥ ५० ॥ कीं देवां न होतां तुष्टि । न करिती पर्जन्यवृष्टि । होती सर्व जीव कष्टी । हे सर्व दोष ॥ ५१ ॥ हे दोष जाती लया । वैश्वदेवादि यजनक्रिया । करितां अगा धनंजया । हा भाव पूर्वीं काढिला ॥ ५२ ॥ हा अर्थ या दों श्लोकीं क्रमें । बोलिजे तो पुरुषोत्तमें । तिसऱ्या श्लोकीं हाचि नेमें । सिद्धांत बोलेल श्रीकृष्ण ॥ ५३ ॥

॥ श्लोक ॥ अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

॥ टीका ॥ अन्नापासोनि होती भूतें । कीं अन्नें होती शुक्रशोणितें । तें अन्न पर्जन्यें होतें । तो पर्जन्य पूर्वोक्त यज्ञेंकरूनी ॥ ५४ ॥ तो यज्ञ कर्मद्वारा । तो कर्मकलापसारा । वेदापासोनि अगा वीरा । उत्पन्न होतो ॥ ५५ ॥ अक्षरब्रह्मापासूनी । प्रतिकल्पीं उद्भवती ह्मणोनी । वेद अनादि परि लय पावोनी । तेथूनच प्रकटती ॥ ५६ ॥ त्या वेदाचे वेदपणें । कीं बोलावीं ब्रह्म लक्षणें । जरी सर्वत्रांतें ब्रह्म पूर्ण । तरी सांपडे वेदींच ॥ ५७ ॥ तस्मात् त्या-

---

१ कुलक्षय. २ करुणाकर ईश्वर. ३ रेत आणि रक्त. ४ कर्मसमूह.

कारणें । जरी सर्वगत परिपूर्ण । तरी वेदींच सगुण । निर्गुण उभयलक्षण तें असे ॥ ५८ ॥ एवं यज्ञ तेथें निगम । निगम तेथें ब्रह्म । यालागीं जेथें यज्ञधर्म । तेथें ब्रह्म प्रतिष्ठित ॥ ५९॥ दूध गायींच्या सर्व देहीं । परी स्तनीं प्रतिष्ठिलें तेंही । कीं पुच्छ पिळितां येणार नाहीं। प्राप्त दुग्ध सर्वगत ॥२६०॥ काष्टीं अग्नि सर्वगत । परी मथितांचि तो असे सांपडत । तो अग्निहोत्रींच प्रतिष्ठित । बोलावा ॥ ६१ ॥ यज्ञें होतां चित्तशुद्धी । तेव्हां वेदार्थी निर्धे बुद्धि । ते वेदयज्ञीं ज्यांत सिद्धी । ब्रह्मज्ञानाची ॥ ६२ ॥ एवं यज्ञादि धर्म । करितां पाविजे ब्रह्म । या भावें बोले सगुण ब्रह्म । कीं ब्रह्म यज्ञीं प्रतिष्ठित ॥ ६३ ॥ तेव्हां कळे निर्गुणब्रह्म । जेव्हां कृपा करी सगुणब्रह्म । तें यज्ञांत सांपडे कीं यज्ञधर्म । करितां देव संतोषती ॥ ६४॥ ते वर्षतां पर्जन्य । त्या अन्नें सुखी जन । जनसुखें भूतभावन । सगुणब्रह्म संतोषे ॥ ६५ ॥ होतां पुण्याचिया राशी । कृपा उपजे ईश्वरासी । मग तो निष्कामियासी । घाली मार्गी मोक्षाच्या ॥ ६६ ॥ ऐसी कर्मचक्रप्रवृत्ति । वर्तवूनि जे यज्ञशेष खाती । ते सर्व पापापासोनि सुटती । कीं मूळ न होती अनृष्टीसी ॥ ६७ ॥ पर्जन्य यज्ञाविणें । नव्हतां नव्हे भूतांचें जिणें । ते सुटती याकारणें । या सर्व पापापासूनी ॥ ६८ ॥ "यज्ञशिष्टाशिनः संतो" म्हणोनि । बोलिला पूर्वार्धेकरूनि । तें या दों श्लोकांवरूनि । सिद्ध जालें ॥ ६९ ॥ कीं पर्जन्य यज्ञापासूनि । न भक्षितां शेष यज्ञ करूनि । नव्हतां पर्जन्य अन्नावांचूनि । मरती जन पापें ते सर्व ॥ २७० ॥ भक्षितां यज्ञशेषें । दूरि होती हीं किल्विषें । हें प्रकट करावया विशेषें । बोलिला श्लोक हे दोनी ॥७१ ॥ "भुंजते ते त्वघं" म्हणूनि । दोष वदला उत्तरार्धेकरूनि । तें सिद्ध ज्या श्लोकावरूनि । करितो तो तृतीय हा श्लोक ॥ ७२ ॥

॥ श्लोक ॥ एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

॥ टीका ॥ ऐसें चक्र प्रवर्तविलें । तें ज्याणें नाहीं वर्तविलें । त्याचें जिणें हीं न भलें । याच लोकीं ॥ ७३ ॥ अरे तो पशुरूप मनुष्य । कीं पापरूप त्याचें आयुष्य । पुढील नरकादि भविष्य । असोनि जितो तो हें व्यर्थचि ॥ ७४ ॥ कीं तो केवळ इंद्रियारामं । जो पोषितो इंद्रियग्रामें । अन्न पा-

१ रिघे. २ कर्माच्या चक्राचा प्रघात. ३ वैश्वदेवादि यज्ञ करून राहिलेलें अन्न. ४ इंद्रियांस सुखरूपता. ५ इंद्रिय समूह.

कादि काम। वैश्वदेवादि न करितां ॥ ७५ ॥ अन्नादिकांची गोडी। घेणें इंद्रियांची सहज खोडी । परी तेचि पुण्यजोडी। वैश्वदेवादि करितां ॥ ७६ ॥ हा अर्थ जाला सिद्ध । जो एथील एथें प्रसिद्ध । पंचसूनादि विरुद्ध । प्रायश्चित्त अर्थवाद ॥ ७७ ॥ भक्षिल्या यज्ञशेषें । जीं जाती सर्व किल्बिषें। तीं सर्व किल्बिषें विशेषें । वर्णिलीं या श्लोकीं ॥७८॥ अवृष्टीनें भूतहिंसा। पुढें होणार त्याचा कैसा । आतांच दोष जातो ऐसा । पूर्वपक्ष ॥ ७९ ॥ स्त्रीसंगाविण ऋतुकाळ । अतिक्रमितां पुढें होणार बाळ। त्याची हत्त्या तत्काळ लागते ॥ २८० ॥ ऋतुकाळीं रती। करितांही नव्हे संगती । तरी पुरुष पुढें सुटती। भ्रूणहत्येपासुनी ॥ ८१ ॥ यज्ञक्रिया करी। आणि पर्जन्य न पडेही जरी । तरी हीं पातकें दूरी। होतीं भक्षितां यज्ञशेष ॥ ८२ ॥ असो आतां पुढें जो श्लोक । तो कां बोले उत्तमश्लोक। त्याचें निमित्त सुज्ञ लोक। आइकोत श्लोकार्थें ॥ ८३ ॥ मुमुक्षु जो इच्छी मोक्षा। त्यास संन्यासाची अपेक्षा । तो काम्यत्याग। ह्मणूनि शिक्षा। केली अर्जुनास नित्यकर्मांची ॥ ८४ ॥ तो नित्यकर्मयोग। ईश्वरीं अर्पितां घडे त्याग । तोही जरी निःष्काम निःसंग। तरीच त्याग ईश्वरार्पणें ॥ ८५ ॥ मुमुक्षूस हें विहित । बोलोनियां अनंत। सकामास काम्य निश्चित। प्रसंगोपात्त बोलिला ॥ ८६ ॥ आतां मुमुक्षूस कर्मविधि । कोण काळवरी त्याचा अवधि। बोलतो करुणामृतनिधि। या श्लोकीं ॥ ८७ ॥

॥ श्लोक ॥ यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

॥ टीका ॥ अर्जुना आत्मज्ञान। जालें परम पावन। आणि गोडी धरी मन । आत्मयाची ॥ ८८ ॥ विषयमात्राची प्रीती। अणुमात्रही नसे चित्तीं। ते आत्मस्वरूपरती । अव्यभिचारिणी ह्मणावी ॥८९॥ स्वपतीची आवडी। इतर पुरुषांचीही कांहीं गोडी। तरी त्या नारीची खोडी। व्यभिचारिणी ह्मणावीच ॥२९०॥ जयाची आत्मरती। शिंदळी नव्हे कधीं प्रीतीं। अनन्यभावें आवडे पती। जे रीती पति पतिव्रतेस ॥ ९१ ॥ अर्जुना पुरुषसृष्टी। पतिव्रता न देखे काय दृष्टी। परी विषय बुद्धीनें उठी। दृष्टी न करी कदापि ॥ ९२ ॥ तैसा अगा आत्मरत। जड प्रपंच देखे निश्चित। परी विषय न मानी सर्वगत। आत्माच देखे ॥ ९३ ॥ आवडीनें सोनें अपेक्षी। तो अलंकारीं

---

१ शंका २ व्यर्थ घालवितां. ३ गर्भहत्या. ४ संगरहित. ५ आत्मस्वरूपांत आसक्ति.

तेंचि लक्षी । चित्तबुद्धेंनिचि जो रक्षी । अलंकार सोनियाचे ॥ ९४ ॥ ऐशि-यास कर्म नियत । तेंही करणें न लागे निश्चित । परी जरी असे तृप्तही अत्यंत । आत्मसुखीं ॥ ९५ ॥ आत्मत्वींच आहे प्रीती । आणि विषयसुखें मानी तृप्ती । तरी तो अपक्क क्रियासमाप्ती । नसे त्याची ॥ ९६ ॥ मृग देखोनि मृगजळ । धांवे मार्गी सांपडे जळ । त्यासही तेंच मृगजळ केवळ । मानू-नि होतो मृग तृप्त ॥ ९७ ॥ तैसें विषय सेवितां इंद्रियें । विषयीं सुख मानि-तो निश्चयें । तों तो अज्ञानीच स्वयें । आत्मज्ञ ऐसें न मानी ॥ ९८ ॥ ज्ञा-त्यास प्रारब्ध सारणें । विषय तो भोगी त्याकारणें । सुख तें आत्मसुख अंतः-करणें । सेवितां तृप्त जो जाला ॥९९॥ आत्मज्ञ होऊनिहीं । विषयसुख आणि तृप्ती कांहीं । मानूं लागला त्यास नाहीं । बाणली आत्मतृप्ती ॥ ३०० ॥ तरी तो होऊनिही ज्ञानी । कर्माच अधिकारी ह्मणूनी । चतुर्थी त्रयोदशीं स्ववचनीं । कर्मी समाधि त्याची वर्णील ॥ १ ॥ "ब्रह्मार्पणं ब्रह्म हवि" । या श्लोकीं हेचि पदवी । चतुर्थी बोलेल गोसावी । जगद्गुरु श्रीकृष्ण ॥ २ ॥ "ध्यानेनात्मनि प-श्यंति" । त्रयोदशीं या श्लोकाचे अंतीं । "कर्मयोगेन चापरे" ऐसें श्रीपती । कर्मयोगें आत्मध्यान वर्णील ॥ ३ ॥ यालागीं आत्मत्वींच तृप्ती । बाणतां कर्माची समाप्ती । "आत्मतृप्तश्च" ह्मणूनि यदुपती । या भावें ह्मणे या श्लोकीं ॥४॥ ऐशियास ह्मणे मानव । कीं अन्यथा पशु दैत्य दानव । जरी हें आत्म-ज्ञानवैभव । मानव तोची ॥ ५ ॥ हें पुढें निरूपण । करील भगवान् आपण । एवंच मानवपण । तरी कीं जरी असे या मार्गी ॥ ६ ॥ आत्मरति आत्म-तृप्ती दोनी । ज्ञानियाचीं लक्षणें वदोनी । त्यास कर्म करणें न लगे ह्मणोनी । "तस्य कार्यं न विद्यते" ह्मणतसे॥७॥आत्मरत आत्मतृप्त जाला। जैसा अन्नरत अन्नें तृप्ति पावला । परी दक्षिणे कारणें असे भुकेला ।दक्षिणा पावतां संतोषे॥८॥ आत्मरत आत्मतृप्त । त्याला किमपिही नसे वांछित । तो अन्य पदार्थे नि-श्चित । संतुष्ट नव्हे ॥९ ॥ संतुष्ट स्वरूपीं नित्य । त्यास नलगे कर्म अगत्य । कीं त्यास उरलें नसे कृत्य । साधनाचें ॥३१०॥ "आत्मन्येव च संतुष्ट" ह्मणोनी । हा भाव दावी या वचनीं । त्यास साध्यांश नसे कर्मकरूनी । हें बोलतो आतां या श्लोकीं ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

---

१ संपविणें.

॥ टीका ॥ अगा कोणी एक अर्थ । कोणी एक पुरुषार्थ । केल्या कर्मे नसे कीं परमार्थ । समग्र साधला जयाला ॥ १२ ॥ कर्म केल्या पुण्य न दिसे । न करितां प्रत्यवाय कांहीं नसे । मनीं जयाच्या न वसे । भय कांहीं ॥ १३ ॥ कीं ब्रह्मादिस्तंभवरी । भूतरूपें चराचरीं । देवतेंही तींचि परी । आश्रय नसे ज्यास कोणाचा ॥ १४ ॥ करूनि यज्ञादि क्रिया । जरी यजाव्या देवता या । तरी कोण्या अर्थाची तया । चाड नाहीं ॥ १५ ॥ पक्वज्ञानियाचें हें लक्षण । साधकें पूर्वोक्तरीती कर्म करणें । तूं तरी मुमुक्षुच आपण । कर्म करीं ह्मणतो या श्लोकीं ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥ तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।

॥ टीका ॥ जें ज्ञान पक्व जालिया । कर्म नलगे धनंजया । त्या ज्ञानाकारणें नित्यक्रिया । तूं बरे रीतीनें आचर ॥ १७ ॥ होऊं नको फलासक्त । ह्मणजे काम्यत्यागें हो विरक्त । बरे रीति ते हेंचि कीं हरिभक्त । होऊनि अर्पावें सर्व त्याला ॥ १८ ॥ कीं न अर्पितां विष्णूस[१] कर्म । कर्ममात्राचें तुज वर्म । बोलिलों कीं बंधभ्रम । त्याविगळें करीं सर्वही ॥१९ ॥ “यज्ञार्थात्कर्मणोन्यत्र”। या श्लोकीं कर्म सर्वत्र । बंध करी एक त्यास मात्र । अर्पितां नव्हे बंध ॥३२०॥ तदर्थंही मुक्तसंग । ह्मणिजे फळीं होऊनि निःसंग । करीं ह्मणोनि मीच श्रीरंग । तुज बोलिलों त्या श्लोकीं ॥ २१ ॥ कीं अरे कामनेनें सेवा । करितां न पाविजे देवा । निष्काम अर्पितां देवाधिदेवा । त्यासिच पाविजे ते ॥ २२॥ असक्तें कर्म आचर ह्मणतां । तरी इतका अर्थ न निघता । 'समाचर' ह्मणतां तत्त्वता । भाव सूत्रविला इत्यादि ॥ २३ ॥ समाचर ह्मणजे जो प्रकार । त्या प्रकारें सम्यक् आचर । सम्यक् ह्मणतां हा भाव कीं आधार । यास पूर्वोक्त विष्णुसमर्पणविधीचा ॥ २४ ॥ भाव ऐसा मनीं । श्रीकृष्णाच्या ह्मणोनी । बोलतो उत्तरार्धेकरूनी । कर्मार्पणेंचि प्राप्ति ज्या पुरुषाची ॥ २५ ॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पुरुषः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ अगा फळीं न होऊनि आसक्त । कर्मे समर्पी तरीच होय मुक्त । ह्मणूनि निष्कामकर्मे भक्त । पावतो परमपुरुषातें ॥ २६ ॥ हें वेदशास्त्रें सिद्ध करूनी । आज्ञा केली कर्म करीं ह्मणोनी । आतां संतांच्या प्रवृत्तीवरूनी । हेंचि करीं ह्मणतो या श्लोकीं ॥ २७ ॥

---

१ फलेच्छेनें केलेलें कर्म.

॥ श्लोक ॥ कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।

॥ टीका ॥ अगा जीवन्मुक्त । काम्यत्यागें संन्यासी विरक्त । नित्यकर्मार्पणें हरिभक्त । होऊनि सिद्धि वरी पावले ॥ २८ ॥ या पूर्वोक्त भावें हरी । ह्मणे कर्मेंचि करितां वरी । सिद्धि पावले जनकादि तरी । कर्मेंचि करीं अगा तूंही ॥ २९ ॥ पूर्वार्द्धपर्यंत गोष्टी । ऐसी सिद्धि होतां किरीटी । करीं विचार पोटीं । कीं कर्म नलगे मजलागीं ॥३३०॥ कीं जरी करूं कर्म । भीष्मादि वधें होतो स्वधर्म । तरी आत्मत्वें कळतां ब्रह्म । आत्मरतास कर्म नलगे ॥ ३१ ॥ मी नव्हे आत्मज्ञानी । मज कर्म करीं ह्मणतो ह्मणोनी । परी आत्मज्ञास कर्म नलगेसें करूनी । स्वयें देवचि बोलिला ॥ ३२ ॥ तरी जो मज हे धर्म । सांगतो तो न सांगे कां ब्रह्म ।.मी शिष्य शरणही प्रपन्नधर्म । त्यां तों पूर्वाध्यायींच निवेदिला ॥ ३३ ॥ आतां आत्मरत आत्मतृप्त । आणि आत्म लाभेंचि असणें संतोषयुक्त । इत्यादि मत हें मज असे युक्त। कीं मीं असें विरक्त सर्वत्र॥३४॥जिता भूमीच वरी । सार्वभौम होऊनिहीं जरी । निष्कंटक पावलों ये अवसरीं । तरी नलगे मज तें इंद्रपद ॥ ३५ ॥ कीं भीष्मादिवधाचा शोक । न नासे पावलों जरी दोनी लोक । पूर्वाध्यायीं उत्तमश्लोक । प्रार्थिला त्यां या वचनेंहीं ॥ ३६ ॥ विषयवासनाही माझी मेली । कीं जीवितेच्छाही माझी गेली । तनु माझी तुकडे केली । कौरवीं तरी तें मज इष्ट ॥ ३७ ॥ हेंही मीच बोलिलों । आणि शिष्य ह्मणोनि शरण आलों । तरी हा लागला बोलों । कीं कर्मचि करीं ॥ ३८ ॥ मागुती बोलों हा प्रकार । तरी श्रीगुरूसी बोलों नये फार । बोलतां वारंवार । न कळे काय ह्मणेल ॥३९ ॥ परंतु जरी सांगे ब्रह्म । आणि निवारी हें करणें कर्म । तरी माझें कल्याण परम । त्यांत असे ॥ ३४० ॥ हा भाव अंतर्यामीं । जाणे श्रीकृष्ण स्वामी । परी ह्मणे ब्रह्म केवीं सांगों मी । जो मुखें ब्रह्म सांगा ह्मणेना ॥ ४१ ॥ आणि जरी असेच सांगणें ब्रह्म । तथापि हें या हातीं कर्म । करवणेंचि असे कीं हा नेणे वर्म । हें असे याच्या प्रारब्धीं ॥ ४२ ॥ हे अष्टादशीं शेवटीं । यास सांगों गुह्य गोष्टी । आतां ब्रह्मोपदेश करणें पोटीं । असे आमुच्या या मिसें ॥ ४३ ॥ आत्मनिष्ठास कर्म । नलगे हें आणें मनीं वर्म । धरिलें तरी जाणोनिही ब्रह्म । कर्म करणें लोके-

---

१ लोकांस सन्मार्गास लावण्यासाठीं.

संग्रहार्थ ॥ ४४ ॥ हेंचि बोलों याला । कीं ब्रह्म सांगणेंचि असे मजला । नाहीं ठाउकें तुजला । कां ह्मणे ॥ ४५ ॥ ऐसें ह्मणतांचि डोई । ठेवील ये-क्षणींच पायीं । मग कोणत्याही उपायीं । वळेना कर्मीं॥४६॥कीं जाणोनियां ब्रह्म । ह्मणतो न करणें लागे कर्म । या प्रसंगीं सांगतां वर्म । गोष्टी खंडिलीच कर्माची ॥४७॥ यालागीं तूं तें नेणसी । प्रस्तुत बोलों नये गोष्टी ऐसी । पुढें सांगोनिही यासी । जनसंग्रहार्थ योजूं कर्मींच ॥४८॥ तरी तेंचि या प्रस्तुतीं । बोलों ह्मणे संतांचा पती । ह्मणूनि हें अर्जुनाप्रती । बोलतो या उत्तरार्धें॥४९॥

॥ श्लोकोत्तरार्ध ॥ लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

॥ टीका ॥ अगा लोक सन्मार्गीं लावणें । त्या नांव लोकसंग्रहपण । तें पाहोनिही तूं निपुण । करावया योग्य होसीच ॥ ३५० ॥ पाहें पाहें हा जन-क । जगदलंकारीं ब्रह्मकनक । देखोनिही लेंकरास जैसा जनक । जन ऐसा वर्तवी स्वधर्मीं ॥ ५१ ॥ कीं तो स्वयें जरी । वर्णाश्रमोचित कर्म करी । लोक स्वधर्मीं वर्तती तरी । हा भाव दावी या श्लोकीं ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

॥ टीका ॥ अगा श्रेष्ठ जो जैसें । आचरतो स्वयें तैसें । इतर जन आ-चरती ऐसें । प्रत्यक्ष दिसे ॥ ५३ ॥ आणि तो श्रेष्ठ सुजाण । जें शास्त्र करी प्रमाण । जो मार्ग वर्तवी तोचि जाण । धरूनि वर्तती सर्वही ॥ ५४ ॥ जरी तो श्रेष्ठ कर्मातीत । तरी कर्म करी निश्चित । येविषयीं मीच दृष्टांत । श्रीकृष्ण ह्मणतो या श्लोकीं ॥ ५५ ॥

॥ श्लोक ॥ न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

॥ टीका ॥ अगा यावरूनि समज । कीं कर्तव्य कांहीं नसोनि मज । ऐ-श्वर्य अतर्क्य सहज । ज्या माझें ॥ ५६ ॥ त्रैलोक्यांत कांहीं । नाहीं प्राप्त मज ऐसें नाहीं । अथवा कांहीं प्राप्त व्हावें ऐसेंही । किमपि असेना ॥५७॥ ऐसें असोनिही मी । वर्तत आहेंच कर्मीं । कैसा न वर्तों मीं जगाचा स्वामी । ह्मणोनि ह्मणतो या श्लोकीं ॥ ५८ ॥

॥ श्लोक ॥ यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

---

१ कर्म करण्याचें कारण राहिलें नाहीं ज्याला.

॥ टीका ॥ अगा आळस टाकोनि सर्वदा मी। जरी न वर्ते या स्वकर्मी। तरी मनुष्यां सर्वांचा मी स्वामी । कीं ते सर्व मार्गी माझ्याच ॥ ५९ ॥ माझीं कर्मे अद्भुतें । मानिती मी थोर त्यांच्या मतें । वरीं माझीं निश्चितें कर्में वाटती तयांस ॥ ३६० ॥ मी आचरतों स्वधर्म । ह्मणूनि तेही आचरती स्वकर्म । मज वाटतें मनुष्यजन्म । सफळ त्यांचा मनुष्य तेच ॥ ६१॥ मीं न वाटें ज्यांस थोर । ते पशु किंवा असुर घोर। नररूपी ते वानर खर । मार्गी माझ्या कां न वर्तती ॥ ६२ ॥ मी कल्पवृक्षस्वभावमूर्ती । त्यांची चिंता कां वाहों चित्तीं । त्यांकारणें कां प्रवृत्ती । कर्मी करितों मी ह्मणों ॥ ६३ ॥ ते नव्हती मनुष्य । पशुरूप ज्यांचें आयुष्य । त्यांचें प्रत्यक्ष दिसतें भविष्य । नरक आणि पशुयोनी ॥ ६४ ॥ कीं पशु चाविलें चाविती । हे सेविले विषय सेविती । परी पाहतां याहूनि बरी स्थिती । पशूंची ॥ ६५ ॥ पशु पडे अंधकूपीं । निघणें असाध्यचि तथापि । चरफडी निघावया हे पापी । गृहांधकूपीं सुख मानिती ॥ ६६ ॥ पशु पशुत्वापासूनी सुटे हे चौऱ्याशीं लक्ष योनी । प्राप्त होती नरक भोगूनी । ऐसीं कर्मे आचरती ॥ ६७ ॥ असोत त्यांच्या गोष्टी । एवं इत्यादि भाव पोटीं । तों कृष्ण ह्मणे अगा किरीटी । मनुष्य ते माझ्या मार्गीच वर्तती ॥ ६८ ॥ अनुलक्षूनि माझा मार्ग । वर्तती सर्व मनुष्यवर्ग । सर्व शब्दें श्रीरंग । गहन भाव एथें सूचवी ॥ ६९ ॥ कीं लक्षकोटींत एक । मनुष्य धरी स्वहिताचा विवेक । त्यावेगळा इतर लोक । ईश्वर मी एक आहें हेंही नेणती ॥ ३७० ॥ आणि मी बोलतों श्रीपती । कीं सर्व मनुष्य माझ्या मार्गे अनुवर्तती । तेव्हां जे माझ्या सन्मार्गी प्रवर्तती । तेचि मनुष्य ॥ ७१ ॥ एवं ऐशा कारणें । मज अगत्य स्वधर्म करणें । हें न करितां लोकांचा आपण । घातक होणार ह्मणतो या श्लोकीं ॥ ७२ ॥

॥ श्लोक ॥ उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ कर्म न करीं मी जरी । हे भ्रष्ट होती लोक तरी । कीं श्रीकृष्ण कर्म न करी । तरी कर्म करणेंचि फटकाळ ॥७३॥ आतां मी स्वयें ब्रह्म । लोकांकारणें करितों कर्म । ह्मणूनि भलत्या वर्णी भलता धर्म । भलतिया वर्णी-

१ तृणादिकांच्या आच्छादनामुळें ज्याचें तोंड स्पष्ट दिसत नाहीं असा कूप, विहीर. २ घर हाच अंधकूप यांत. ३ व्यर्थ.

चा जरी करूं ॥ ७४ ॥ तुज ऐसा क्षत्रिय होऊनी । म्हणसी भक्षीन भिक्षा मी मागोनि । हा ब्राह्मणधर्म करीन म्हणोनि । इच्छितोसि जैसा ॥७५॥ संतान परपुरुषापासुनी । होय तें संकर म्हणोनि । म्हणिजे तें अभिज्ञजनीं । अगा जैसें ॥७६॥ तैसा असोनि एकवर्णाश्रमीं । वर्ते अन्यवर्णाश्रमधर्मी । संकर म्हणावें तें ज्या कर्मी । व्यभिचार घडला ॥ ७७ ॥ ब्राह्मणां यजन[1] याजन[2] । आह्मां क्षत्रियां एक यजन । याजन करीं मी यदुनंदन । तरी तें कर्म संकर म्हणावें ॥७८॥ यजन म्हणजे यज्ञ यजणें । उचित आह्मां यज्ञचि करणें । दुसरिया हातीं यज्ञ करविणें । तें याजन निषिद्ध क्षत्रियां ॥७९॥ उचित आह्मां अध्ययन । ब्राह्मणां अध्ययन अध्यापन[3] । आह्मां उचित देणें दान । प्रतिग्रह[4] घ्यावा ब्राह्मणींच ॥३८०॥ एवं भिक्षा ब्राह्मणधर्म । आह्मां क्षत्रियां तो अधर्म । वेद पढवणें हेंही कर्म । उचित नव्हे आह्मांसी ॥८१॥ इत्यादि भाव मनीं । श्रीकृष्णें धरूनी । म्हणतो कीं संकर म्हणोनि । म्हणावें अनुचिता कर्मातें ॥ ८२ ॥ कीं संकर कर्माचा कर्ता । जरी मी होतों अगा पार्था । तरी सकळ प्रजांचा पुरता । मीच जाण घात करणार ॥ ८३ ॥ करूनिही कर्मसंकर । होऊं नेदी धर्म । लोकसंग्रहाचें वर्म । अगा ऐसें ॥ ८४ ॥ लोकसंग्रह करावया । तूंही अगा धनंजया । योग्य होतोसि टाकीं या । गोष्टी स्वधर्मत्यागपरधर्माश्रयाच्या ॥ ८५ ॥ जनसंग्रहाकारणें । जरी अगा कर्म करणें । तथापि आदर न धरणें । हा भाव दावी आतां या श्लोकीं ॥ ८६ ॥

॥ श्लोक ॥ सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ अगा ज्ञान नाहीं जयास । कर्मी अत्यंत आदर तयास । कर्मेचि तारील आह्मांस । हे कर्मश्रद्धा[5] अज्ञजनां ॥ ८७ ॥ आणि हे गोष्टही खरी । कीं अज्ञानी जरी कर्मे न करी । तो तरेल कवणेपरी । त्यास असावाच आदर ॥ ८८ ॥ कर्मनिष्ठ आसक्त कर्मी । याची निष्ठा सर्वगतब्रह्मीं । हाही श्रद्धा धरी क्रियाधर्मी । तरी श्रद्धा ब्रह्मीं मग कैंची ॥ ८९ ॥ ज्ञानचि वाटे तारक । तरीच ब्रह्मत्वावलोक[6] । सर्वत्र घडे आणिक एक । तारक म्हणतां हें कैंचें ॥ ३९० ॥ म्हणोनि जरी कर्मेचि न करी । लोकसंग्रह न घडे

---

१ यज्ञ करणें. २ यज्ञ करविणें. ३ वेदादि शिकविणें, पढविणें. ४ दान घेणें. ५ कर्मावर विश्वास. ६ ब्रह्म पाहणें.